मा १०८

मराठी ग्रंथ संग्रहालय, अंक २
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — महाराष्ट्र सारस्वत [illegible]

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९३५.

अंक — १ ते ६

(महिने) महिने ७ ते १२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)




वर्ष १४ वें जानेवारी-फेब्रुवारी १९३५ अंक १

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व**

**ग्रामोफोन मशीन्स**

**मिळण्याचें एकच ठिकाण.**

ऑथोराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,


**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

नवीन व कोऱ्या रेकार्डस्चा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:—S. M. Varde, B.A., LL.B.




सर्वत्र मिळतो

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

(कलकत्ता)

स्थापना १९१०] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदर्हू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—

भेटण्याची जागा व वेळः—
घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट,
गिरगांव, कोणत्याही दिवशीं सायंकाळीं
६ ते १० (स्टँ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर आणि कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
**माझगांव, मुंबई नं. १०.**

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १४ वें जानुआरी-फेब्रुआरी १९३५ अंक १ ला

सं. २८ ता. ३।५।३५

## संपादकीय

या दुमाहींत वर्षाचा दुसरा अंक प्रसिद्ध व्हावयाचा असतां आज फक्त पहिलाच निघत आहे. अशा रीतीनें झालेला विलंब पुढील दुमाहींत प्रत्येक महिन्यांत एक अंक काढून भरून काढण्यांत येईल. विलंब आणि अनियमितपणा यांचा महाराष्ट्र सारस्वताशं संपर्क नसावा अशी आमची उत्कट इच्छा असून त्यासाठीं आम्ही प्रयत्न करीत असतांही या सालाची सुरवात विलंबानें झाली. आमच्या वाचकांप्रमाणेंच आमचीही विलंब होऊं नये अशीच इच्छा असून, आमच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळें असा विलंब होतो, हें ध्यानांत घेऊन आमचे वाचक व हितचिंतक यांनीं दोन वर्षांनंतर झालेल्या अशा प्रकारच्या पहिल्याच दिरंगाईची महाराष्ट्र सारस्वतास क्षमा करावी अशी त्यांस आमची विनंती आहे.

× × ×

या दिरंगाईमुळेंच या अंकांत यावयास पाहिजे होते असे कांहीं महत्वाचे विषय मागें राहिले असून ते पुढील अंकीं देण्यांत येतील. या अंकांत ज्ञातिवृत्ताचा भरणाच विशेष झाल्याकरणानें कांहीं ज्ञातिवृत्त मागें ठेवावें लागलें तें पुढील अंकीं देण्यांत येईल. अत्यंत महत्त्वाचा विषय म्हणजे संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद भरविण्याचा होत असलेला प्रयत्न होय. ही परिषद भरविण्यासाठीं झालेल्या प्रयत्नांची सुरवात ज्या जोमानें झाली, तो जोम पुढें कांहींस ओसरल्यासारखा दिसतो. तसेंच परिषदेबरोबर प्रदर्शन भरविण्याचा विचार केलेला असतां, त्यासंबंधीही हालचाल फारशी दिसत नाहीं. कोणत्याही कारणानें या कामीं शैथिल्य आलें असेल, तर तें दूर होणें अवश्य आहे, इतकेंच सध्या निदर्शित करून, परिषदेचा विचार पुढील अंकावर ठेवणें भाग आहे.

+ + +

आमच्याकडे अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची पोंच व त्यांवरील अभिप्राय पुढील अंकीं येतात. तथापि शेळडेकर बंधु यांनीं प्रकाशित केलेल्या श्रीशांतादुर्गा देवीचा संक्षिप्त इतिहास, प्रो. यशवंत गणेश नाईक, एम्. ए. कृत 'नंदादीप' ही कादंबरी आणि काव्यकौस्तुभ यशवंत सदाशिव कोरेकल यांच्या 'काव्य-कुसुम-कालिकां'चे दोन विभाग या तीन ग्रंथांचा येथें निर्देश करून त्यांवरील अभिप्राय येत्या अंकांत देण्याचें आम्ही अभिवचन देतों.

× × ×

या अंकांत श्री. कृष्णाबाई बाप यांचें येथील सारस्वत ब्राह्मण समाजांत झालेलें भाषण आलें आहे. या भाषणांतील अनेक विचार व श्री. कृष्णाबाईनीं सांगितलेले त्यांचे कित्येक अनुभव मननीय व उद्बो-

धक आहेत. समाजकार्य करणाऱ्या माणसांचा बहुतेक अभाव असलेल्या आमच्या देशांत तें कार्य करणाऱ्या स्त्रिया दुर्मीळ आहेत. तशांत अशा कार्याचें पद्धतशीर शिक्षण घेणारी स्त्री म्हणजे अपवादात्मकच. त्यामुळें श्री. कृष्णाबाईंनीं परदेशीं जाऊन या विषयाचें ज्ञान मिळविल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांच्या कार्याचा उपयोग हिंदी समाजास व्हावा व त्यांच्या उदाहरणाची स्फूर्ति इतरांस मिळावी अशी आम्हांस आशा आहे.

× × ×

संत सोहिरोबा आंबिये यांच्या मूळ निवासस्थानाचें व स्मारकाचें रक्षण करण्यासाठीं रा. सडेकर वकील यांनीं या अंकांत केलेल्या विनंतीकडे आमच्या वाचकांनीं जरूर लक्ष पुरवावें. सोहिरोबांसारख्या संतांचें स्मारक वस्तुतः सर्व महाराष्ट्राकडून झालें पाहिजे. परंतु ज्ञातिभेदग्रस्त आमच्या हिंदु समाजाच्या आजच्या स्थितींत तें केवळ सारस्वतांचें कर्तव्य झालें आहे. त्याची उपेक्षा सारस्वतांनीं करणें योग्य नाहीं.

## बॅ. चंदावरकर यांचें भाषण

[ पुणें येथें ट्रेनिंगकॉलेज फॉर मेन या संस्थेच्या ६६ व्या वाढदिवसप्रसंगीं ता. १२-१-१९३५ रोजीं झालेलें ]

"ट्रेनिंग कॉलेजचें सर्टिफिकेट घेणाऱ्या तुम्हा भावि ट्रेंड शिक्षकांना मला असें सांगावयाचें आहे कीं, आपण ट्रेंड झालों म्हणजे सर्व कांहीं झालें, आतां शिक्षण असें कांहीं उरलें नाहीं असें समजूं नये. येथील शिक्षणक्रम संपल्यावरही वाचनानें व इतर साधनांनीं आपल्या मनांत भर घालीत जा. तसेंच तुम्ही ज्या खेडयांत काम करीत असतां तेथील स्थानिक पक्षोपपक्षांच्या राजकारणांत पडूं नका. त्याचप्रमाणें एका विरुद्ध दुसऱ्यास मदत करण्याच्या मोहापासून अलिप्त राहा.

तुमच्या अध्यापनाच्या कार्यांत तुम्ही मनें घाला. तुमच्या बालविद्यार्थ्यांचीं मनें जिंकून जें कार्य होईल तें इतर मार्गानें होणार नाहीं. भावि लोकशाहीचे जबाबदार मतदार तयार करण्याचें अत्यंत महत्त्वाचें कार्य तुम्हांस करावयाचें आहे.तेव्हां या बाबतींत तुम्हीं जितकें कसोशीनें काम कराल तितकी तुमच्या हातून देशसेवा होणार आहे. त्या दृष्टीनें पाहतां राजकारणी अगर मुत्सद्दी लोकांपेक्षांही तुमच्या हातून अधिक कार्य होणार आहे.

या संस्थेंतून अस्पृश्यतेचें उच्चाटन केलें आहे, हें पाहून मला खरोखरच आनंद होत आहे. तरी पण पुढील आयुष्यांत तुम्हांस खेडयांतील जनतेच्या विरोधास तोंड द्यावयाचें आहे. अस्पृश्य अगर दलित विद्यार्थ्यांना चांगलें वागण्यास शिकविलें पाहिजे.म्हणजे अस्पृश्यता आपोआप कमी होत जाईल. अस्पृश्यता घालविण्याविषयीं तुम्ही जास्त दक्ष असलें पाहिजे. आपल्या समाजांतील अगर देशांतील ही अस्पृश्यता नष्ट होईपर्यंत आपण सर्वच अस्पृश्य व दलित आहोंत हें लक्षांत ठेवा, व ती घालविण्याच्या प्रयत्नास तुम्ही मदत केल्यास देशोद्धाराच्या पुण्याईचे तुम्हीही भागीदार व्हाल."

## ना. न्यायमूर्ति रांगणेकर यांचें भाषण

[ कोल्हापूर येथें गेल्या वर्षीं सुरू झालेल्या साइवस-ॲंड-कॉलेज या संस्थेच्या द्वितीय वार्षिक समारंभ व सम्मेलन प्रसंगीं ता.९-२-१९३५ रोजीं झालेलें. ]

"सार्वजनिक समारंभांत भाग घेऊन भाषणें करण्याचा प्रसंग मीं आजपर्यंत टाळला होता;परंतु आतां प्रि.केळवकरांच्या आग्रहामुळें आज येथें आलों आहें. तरी पण आपल्यास विशेष कसला उपदेश करण्याचा मला कंटाळा आहे. एक सुंदर ऐतिहासिक शहर म्हणून

### कोल्हापुरची प्रसिद्धि

असल्यानें तें एकदा पाहावें व तब्बेतीकरितां इकडे हवापालटही करावा असें वाटून मीं आपल्या आमंत्रणाचा स्वीकार केला आहे. तेव्हां माझ्याकडून फार मोठया भाषणाची अपेक्षा आपण करूं नये. असो.

श्रीछत्रपति महाराजांच्याविषयीं सर्व मराठ्यांना म्हणजे महाराष्ट्रीयांना केवढा अभिमान व उत्साह वाटत असतो हें सुप्रसिद्धच आहे. आज येथें उपस्थित असलेले छत्रपतींचे हुषार व लोकप्रिय मुख्य मंत्री रावबहादुर सुर्वे यांच्या सल्ल्यानें श्रीमंत राजाराम महाराज छत्रपति यांनीं या संस्थानांत जी फार मोठी

### शैक्षणिक प्रगति

घडवून आणिली आहे ती खरोखर अभिनंदनीय आहे. येथील व बाहेरील सर्व जातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय महाराजांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें केली आहे हें पाहून आनंद होतो. सध्याचे महाराज राज्यारूढ झाले, तेव्हां येथील कॉलेजांतील विद्यार्थ्यांची एकंदर संख्या फक्त २८० होती. आतां

### विद्यार्थ्यांची संख्या ११०० वर आहे.

ही वाढ निःसंशय फार चांगली आहे. साइक्सलॉ-कॉलेजची प्रगति व लोकप्रियता झपाट्यानें वाढत आहे, हें अहवालावरून दिसून येतें. कॉलेजजिमखान्यानें बोटिंगचीही सोय केली आहे हें विशेष उल्लेखनीय वाटतें.

आज या प्रसंगीं मला माझ्या विद्यार्थिकालाची गोड आठवण होत आहे. वकिलीच्या धंद्याचा उपहास करण्याची प्रवृत्ति अलीकडे पुष्कळ ठिकाणीं दिसून येते. पण आपण पक्कें लक्षांत ठेवा कीं,

### वकिली-व्यवसायाचें ध्येय मोठें

असून त्याच्या हातांत राष्ट्राची नीतिमत्ता आहे. वकिलवर्ग हा सर्वत्र पुढारीपणानें वावरत असतो. न्यायाची बाजू घेऊन आपण सतत व स्वार्थत्यागपूर्वकही काम करीत राहण्याचा निश्चय केला पाहिजे. रस्किननें वकिलांस मिळणाऱ्या सन्मानाची कारणमीमांसा करतांना जे उद्गार काढले आहेत ते अवश्य लक्षांत ठेवा:—

"Our respect for the lawyer depends upon his efforts to deal justice even at a sacrifice."

सध्या कायदेपंडित म्हणून अत्यंत प्रसिद्धीस आलेले सर्व वकिल अनेक वर्षें चिकाटीनें आपला व्यवसाय व अभ्यास करीत राहिले, म्हणूनच ते पुढें आले हें आपण विसरूं नये. माझे मित्र

### श्री. दादासाहेब करंदीकर,

लॉर्ड हॉल्डेन व सर जॉन सायमन यांनीं कठीण परिस्थितीला तोंड देऊनच यशाचें शिखर गांठलें आहे. तेव्हां हल्लींच्या बेकारीमुळें तुमची स्थिति विशेष वाईट झाली आहे व पुढें येण्यास वाव नाहीं असें मानून निराश होऊं नका. परीक्षा पास झाली म्हणजे कायदेपांडित्य आलें असें समजूं नका. कायद्याच्या खऱ्या अभ्यासास नंतरच खरी सुरवात होते हें विसरूं नका. आजन्म कायद्याचे अभ्यासू विद्यार्थी बना. लॉ रिपोर्टस् व अमेंडमेंट सतत वाचा. पण कादंबरीप्रमाणें नव्हे. रिपोर्ट वाचतांना न्यायाधीशाचा निकाल वाचण्यापूर्वी तुम्ही आपला निकाल स्वतंत्रपणें ठरवा व मग दोहोंची तुलना करा. वकिलींत

### यशाची गुरुकिल्ली

कोणती? असा प्रश्न केल्यास मी सर रूफस आयझॅक ऊर्फ लॉर्ड रीडिंग यांनीं दिलेलें उत्तर देईन; "Have plenty of animal spirits and have a high standard of honour" भरपूर आनंदी वृत्ति व सन्मान्यतेचा मोठा आदर्श बाळगा म्हणजे यश हटकून मिळेल. वकिलीच्या धंद्यांत वक्तृत्वकलेची फार आवश्यकता आहे असें कोणी म्हणतात; पण त्यावर विश्वास ठेवूं नका. येथें आतां वक्तृत्वाचें पारितोषिक मिळालेल्या कु. कमल दीक्षित

यांच्याप्रमाणें तुम्हाला मोहक वक्तृत्व असावयास पाहिजे असें नाहीं, खटल्यांतील सर्व गोष्टींचें स्वच्छ ज्ञान, कायद्याची चांगली पक्कड ( Grasp of law ) व मुख्य मुद्यांची व्यवस्थित मांडणी या तीन गोष्टी तुम्हीं संपादन केल्या पाहिजेत. बोलतां येत नसेल तर

### दि. ब. जी. एस्. राव यांच्याप्रमाणें अगदीं सावकाश बोला

वायफळ बडबड करूं नका व पुनः पुनः तीच ती गोष्ट सांगूं नका. कोर्टाविषयीं आदरभाव ठेवा व स्वतः चिडखोरपणा सोडून सहनशील वृत्ति ठेवा. आपल्यापैकीं कित्येकजण फार मोठ्या पदवीस जाण्याचा संभव आहे. तरी आपला व संस्थेचा उत्कर्ष इच्छून मी आपलें भाषण पुरें करतों."

# सर गोविंदराव माडगांवकर यांचें भाषण

[ पुणें येथील लॉ-कॉलेज-जिमखान्याच्या वार्षिक बक्षिस-समारंभाच्या प्रसंगीं ता. ३-२-१९३२ रोजीं झालेलें ]

" आज वकिलीच्या धंद्यांत अत्यंत गर्दी झालेली दिसत आहे. वकिलीचा पेशा पत्करणाऱ्या फारच थोडया लोकांना यश लाभतें, अनेकांची निराशा होते व पुष्कळ जणांवर किती तरी वर्षें वाट पाहत ताटकळत बसावें लागतें. मुंबई-हायकोर्टांत काम करीत असतां आपल्या राष्ट्राला ललामभूत झालेल्या अनेक वकिलांशीं माझा परिचय झाला. या धंद्याकरितां तुम्हांला अनेक गुणांची कमाई करावी लागेल. अभ्यास, निरीक्षण, वक्तृत्व, सुहृत्सूद्पणा हेच ते गुण होत. हे सर्व गुण आपल्या अंगीं आणून तुम्ही वकिलीपेशाचा दर्जा उच्च पदावर ठेवण्याची ईर्षा बाळगा."

---

# श्री. कृष्णाबाई वैद्य यांचें भाषण

[ श्रीमती कृष्णाबाई वाघ ( लेडी इन्व्हेस्टिगेटर, लेबर कमिशनर्स ऑफिस, सेक्रेटरिएट, मुंबई ) या समाज शास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं व निरनिराळ्या संस्थांचें निरीक्षण करण्यासाठीं एक वर्षापूर्वी विलायतेस गेल्या होत्या. नियोजित कार्यक्रम पुरा करून त्या ता. १० जानुआरी १९३५ रोजीं मातृभूमीस परत आल्या. तेव्हां सारस्वत ब्राह्मण समाजानें एक समारंभ करून त्यांचें स्वागत केलें.

श्री. कृष्णाबाई यांनीं उत्तरादाखल त्या वेळीं खालील अर्थाचें भाषण केलें. ]

" मित्र हो,

आज समाजांत येण्याचें आमंत्रण देऊन आपण जो माझा गौरव केला, त्याबद्दल आपणा सर्वांची मी अत्यंत आभारी आहें. खरें पाहिलें असतां, माझा गौरव करण्यासारखें मीं कांहींच केलेलें नाहीं. ज्या माणसांच्या हातून गौरव करण्यासारखी कामगिरी झालेली असते त्यांना यथोचित गौरव झाल्यास तें शोभून जातें; परंतु ज्यांच्या हातून कांहींच झालेलें नसतें, अशा माणसांस उगाच महत्त्व दिलें गेल्यास तें तितकेंसें चांगलें दिसत नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्या माणसास आपल्या कामगिरीची खरी जाणीव असली तर त्याची मोठी चमत्कारिक स्थिति होत असते.

विलायतेला जाऊन मीं कांहीं विशेष केलेलें आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. कांहीं मित्रमंडळी म्हणतात, "बरें झालें, तुम्हाला फायदा मिळाला." मला वाटतें, मला नुसता फायदा मिळून त्याचा काय उपयोग ! मला मिळालेल्या त्या फायद्याचा जर दुसऱ्या माणसांना—ज्यांना खरोखर गरज आहे अशांना थोडासा जरी उपयोग झाला तरी मला समाधान वाटेल व त्याच वेळीं आपण आज बंधुप्रेमानें मला भेटण्यास आमंत्रण देऊन माझा गौरव केलात त्यास मी थोडीशी तरी पात्र आहें असें मला वाटेल. तोंपर्यंत आपण केलेला हा माझा सन्मान एक प्रकारचें माझ्यावर सामाजिक ऋण आहे असेंच मी समजेन. विलायतेंत ज्या ज्या वेळीं कांहीं अत्युत्कृष्ट संस्था पाहण्याची मला संधि मिळत असे, किंवा एकंदर समाजाच्या परिस्थितीचें निरनिराळ्या दर्जाच्या माणसांत मिसळल्यामुळें मला अवलोकन करण्यास मिळत असे, त्या वेळीं माझ्या विलायतच्या सफरीचें मला केव्हांच सुख वाटलें नाहीं. कारण Ignorance is bliss हेंच खरें. जोंपर्यंत आपल्याला बाहेरचें जग म्हणजे काय आहे त्याची प्रत्यक्ष जाणीव नसते, तोंपर्यंत ज्या परिस्थितींत आपण असतों, त्यांतच आपल्याला सुख वाटतें. पण एकदा आपला दृष्टिकोण बदलला, बाहेरच्या जगाची आपल्याला ओळख झाली, आपली दृष्टि विशाल झाली, म्हणजे आपण आपली व आपल्या आजूबाजूच्या जगाची मनांतल्या मनांत तुलना करूं लागतों. या तुलनेंत आपलें पारडें आपणांस अगदीं हलकें असल्याचें आढळून येतें व त्या वेळीं आपल्या भयाण परि-

स्थितीची आपणांस खरी कल्पना येते, व मग आपल्या मनास एक प्रकारची हुरहुर लागून राहते. अशा परिस्थितींत पाहिलेल्या गोष्टींचें सुख न वाटतां अशा गोष्टींचा आपल्या परिस्थित्यनुरूप आपणास थोडा तरी उपयोग करून घेतां येईल का, अशी विवंचना मनास जडते. पण नुसती अशी विवंचना करून कार्यभाग साधत नाहीं. ज्या परिस्थितींतून आपण आज जात आहोंत, तशाच कांहीं बाबतींत थोड्या निराळ्या अडचणी ह्यांनाही सहन कराव्या लागल्या आहेत. परंतु इतकेंही असून त्यांनीं आपल्या अंगच्या अनेक गुणांच्या जोरावर प्रगतीचें शिखर आज गांठलेलें आहे हें मात्र खरें.

येथून विलायतेला जाणाऱ्या पुष्कळशा विद्यार्थ्यांची परीक्षा, अभ्यास व कॉलेज ह्यांपलीकडे फारशी मजल जात नाहीं. कारण वेळ फार थोडा असतो व त्यामुळें परदेशगमनाचा व्हावा तसा फायदा होत नाहीं. तसेंच कांहीं विद्यार्थी आपल्या मित्रमंडळींतच राहतात. त्या राहणीचा एका दृष्टीनें जरी फायदा असला, तरी अशी राहणी मला मुळींच इष्ट वाटत नाहीं, हें मी पाहिलेल्या अनुभवावरून सांगतें. त्याचा तोटा असा होतो कीं, सोबत मिळाली, आपण आपल्या मित्रमंडळींत आहोंत अशी खात्री पटली, कीं मनुष्य बाहेरचे मित्र मिळविण्याची खटपट करीत नाहीं व त्यामुळें चारचौघांत मिळण्या–मिसळण्याची संधि अर्थात कमी मिळते.

ज्या वेळीं आपण परदेशांत जातों, त्या वेळीं तेथील लोकांना आपण समजून घेणें व आपल्या लोकांची त्यांस माहिती देणें हें मला वाटतें प्रत्येकाचें काम असतें. कारण एकमेकांची जर आपल्याला माहिती झाली, तर त्यामुळें आंतरराष्ट्रीय संबंध चांगल्या तऱ्हेनें वाढण्याचा संभव असतो. आपल्या येथून जाणाऱ्या कांहीं लोकांत Inferiority Complex असतो, व ते आपण होऊनच मागें राहतात व इंग्लिश लोकांत मिसळण्याची संधि मिळत नाहीं म्हणतात. लढाईपूर्वी ते लोक आपापसांतही बरेच Snobish होते. पण आतां तो मनु पालटला आहे. दुसरें, त्यांच्या Characterestics निराळ्या, आपल्या निराळ्या. आपण ओळखी करावयास लागलों, कीं थोड्याशा परिचयावरून देखील आज्या-पणज्यांच्या ओळखीपर्यंत मागच्या पिढींत व पगार, मुलेंबाळें, घरदार, पर्यंत नव्या पिढींत ओळखीचा शिक्का मारून ठेवूं. इंग्लिश लोक तासचे तास तुमच्याशीं बोलत राहतील, पण व्यक्तिविषयक माहिती काढून घेण्याचा कधींही प्रयत्न करणार नाहींत; ह्या व अशा तऱ्हेच्या त्यांच्या वागण्यामुळेंही आपणांस ते आपल्याशीं बेफर्वाईनें वागतात असें वाटण्याचा संभव असतो. आपण जाऊं त्या देशांतील निरनिराळ्या समाजांत मिळूनमिसळून एकमेकांची माहिती एकमेकांस होऊं दिल्यास आंतरराष्ट्रीय संबंध (International relations) वाढविण्यास बरीच मदत होईल व त्याचा फायदा दोन्ही राष्ट्रांस होईल.

विलायतेंत असलेल्या मुदतींत तेथील निरनिराळ्या औद्योगिक, सामाजिक व शैक्षणिक संस्थांत काम करण्याची संधि मला मिळाली. त्याचप्रमाणें एका वजनदार मैत्रिणीच्या मार्फत Ministry of Labour of Home Office ह्या सरकारी खात्यांतही मला माझा शिरक व करून घेतां आला व मला भरपूर मदत मिळाली. हीं सर्व कामें करीत असतांना निरनिराळ्या माणसांशीं बराच संबंध आला व त्यामुळें ज्यास बौद्धिक सुख (Intellectual pleasure) म्हणतात, तेंही भरपूर मिळालें.

ह्या लोकांचा एक मोठा गुण म्हणजे आपल्या कामाची आस्था. कितीही हलकें काम असूंद्या, प्रत्येक मनुष्याला आपल्या कामामध्यें इतकें (Interest) सुख वाटत असतें, इतकी कमालीची आस्था वाटते कीं, नुसतें वरवर पगारापुरतें काम करून उपर्णें झाडून घरीं गेलें असा प्रकार तेथें दृष्टीस पडत नाहीं. कितीही

हलकें काम असूंद्या, आपलें काम हलकें आहे असें कोणासही वाटत नाहीं. जो तो आपल्या परीनें मोठा; ज्याला-त्याला स्वतःसंबंधीं कांहीं विशिष्ट हक्क असतो, हीच त्यांची भावना. तसेंच एकमेकांच्या हक्कास धक्का पोंहचेल अशी कधींही त्यांची वागणूक नसते. धनी व नोकर असा संबंध असला, तरी तो कामापुरता. त्या नोकरांनाही त्यांच्या बाबतींत कांहीं स्वतंत्र हक्क आहेत, ह्याची पुरेपूर जाणीव धन्याला असते. आपल्या इकडे आपणा कोणालाच हक्क नाहींत. तरी पण जर कांहीं थोडे असले, तर ते आपल्यालाच, असें वरच्या लोकांना वाटत असतें व त्यामुळें खालच्या लोकांच्या हक्काची जाणूनबुजून पायमल्ली होत असते. नोकर जरी झाला, तरी त्याच्या हक्काला धोका पोंचावा अशी त्यांची वागणूक नसते. त्यामुळें खालच्या दर्जाच्या माणसालाही समाजांत आपणास एक प्रकारचा दर्जा आहे, आपणासही एक प्रकारचें महत्त्व आहे, ह्याची जाणीव असते. अर्थात् ह्या सर्वांच्या मुळाशीं प्रत्येकाला कार्यक्षम करणारें, प्रत्येकाला आपल्या हक्काची जाणीव देणारें शिक्षण मिळालेलें असतें.

काम आहे म्हणून करावयाचें, पोटास पाहिजे म्हणून नोकरी करावयाची, आयुष्य असेल तेवढें जगावयाचें, असा त्यांचा नीरस आयुष्यक्रम नसतो. अगदीं गरीब मनुष्य असला तरी त्याला महत्त्वाकांक्षा असते; उत्तम नागरिक म्हणून त्याला समाजांत वागावयाचें असतें. त्याला आयुष्यांत भरपूर कार्यक्षेत्र मिळतें. गरिबी, जात, सामाजिक बंधनें, स्त्री-पुरुष असले भेद बौद्धिक प्रगतीच्या आड येऊं शकत नाहींत व त्याची बुद्धि, त्याचा उत्साह, त्याची कार्यक्षमता ह्यांना भरपूर वाव मिळून त्यांच्या पात्रतेचा समाजास, राष्ट्रास मिळावा तितका फायदा मिळतो. आपल्यासारखा त्यांच्या बुद्धीचा, कार्यक्षमतेचा, पात्रतेचा निष्कारण व्यय (उपयोगांत न आणल्यामुळें) होत नाहीं. असो.

कोणताही समाज धर्म, शिक्षण, सामाजिक चालीरीति, स्वातंत्र्य वगैरेंनीं तो कितीही पुढारलेला असूंद्या, मनुष्यस्वभावानुसार असलेले गुण-दोष तेथेंही दृष्टीस पडावयाचेच. विलायतेंत असलेल्या मुदतींत निरनिराळ्या दर्जाच्या अनेक माणसांशीं ओळखी झाल्यामुळें त्यांच्या सामाजिक जीवनाविषयीं Social Life भल्याबुऱ्या अनेक गोष्टी पाहण्यास व ऐकण्यास मिळाल्या. परंतु आपण लोक त्यांच्या वाईट गोष्टी पाहण्यास तिकडे जात नसतों, व म्हणून नको तें सोडून देऊन, पाहिजे असलेलेंच मनांत ठेवतों. मी माझ्या मैत्रिणींना हेंच सांगत असें कीं, "तुम्ही लोक हिंदुस्थानांत जातां, ते आपल्या वाईट गोष्टी तेवढ्या प्रामुख्यानें मनांत ठेवण्यास; कारण सध्यांच्या परिस्थितींत आमच्या वाईट गोष्टी चवाठ्यावर आणण्यानें तुमचा फायदा होईल असें तुम्हांस वाटत असतें. आम्ही हिंदी लोक तुमच्या देशांत तुमच्या चांगल्या गोष्टी शिकण्यास येतों. तुम्हीही कोणत्याही प्रकारचें पूर्वग्रहदूषित मन न ठेवतां तिकडे जाल, तर तुम्हांसही पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकतां येतील. आमचें कौटुंबिक जीवन काय असतें, आमची संस्कृति काय आहे याची ओळख तुम्हाला होईल. शिक्षण नसलें, कायद्याचें बंधन नसलें, सामाजिक बंधनें नसलीं, तरी प्रत्येक हिंदु कुटुंबांत स्त्रियांना काय दर्जा असतो, किती अधिकार असतो हें सहज दिसून येईल. अशिक्षित बाई असली, तरी आपल्यावरची जबाबदारी ओळखून प्रसंग पडल्यास पुरुषांच्या मदतीशिवाय, आर्थिक स्वातंत्र्याच्या आधाराशिवायही ती अडचणींतून कसा मार्ग काढूं शकते, हें मी त्यांना सांगत असें. कारण इतर गुणांबरोबर दुसऱ्यांचे गुण बरोबर ओळखून त्यांची चहा करणें हा इंग्रिश लोकांचा एक मोठा सद्गुण आहे. ह्या आमच्या घरगुती गोष्टींत एक गोष्ट मात्र मला कबूल करावी लागत असे आणि ती म्हणजे ही कीं आपल्या, पुरुषांना बायकांच्या संगतीपासून बौद्धिक सुख मात्र मुळींच मिळत नाहीं. कारण

शिक्षणांतील फरक हें तर खरें; पण हा फरक इतर अनेक गोष्टींनीं भरून काढणें शक्य असूनही तसे प्रयत्न केले जात नाहींत, ह्याचीं कारणें जरी आणखी दुसरीं असलीं, तरी पुरुषांचा ह्या बाबतींत होत असलेला "काणाडोळा" हें मुख्य कारण होय. असें मला कष्टानें म्हणावें लागतें. आपल्या वैवाहिक जीवनांत त्यांनीं बौद्धिक सुखाचा कधीं विचारच केलेला नसतो. तसलें सुख ते घराबाहेर इष्टमित्रांच्या संगतींत मिळविण्याचा प्रयत्न करितात; व एकदा असल्या आयुष्याची संवयी झाली, म्हणजे आहे तेंच बरें वाटूं लागतें. ह्या माझ्या बोलण्यावर पुष्कळ मतभेद होईल हें मला ठाऊक आहे; पण त्या सर्वांना थोडासा निर्विकार बुद्धीनें विचार केला तर उत्तर देतां येईल असें मला वाटतें. चारचौघांत मिळण्यामिसळण्याची स्त्रियांना संधि दिली, बाहेर काय गोष्टी चालतात, त्या त्यांच्या कानावर जाऊं दिल्या, तर नां त्यांना बाहेरच्या जगाची माहिती होणार! शिक्षणाच्या बाबतींत सुधारलेल्या आपल्या समाजानें तरी हा असला भेदाभेद करून चालणार नाहीं. त्यामुळें प्रत्येकाचें; स्त्रीचें तर खरेंच, पण पुरुषाचें सुद्धां नुकसान होत असतें. जोंपर्यंत एक पाय मागें सामाजिक बंधनाच्या खोड्यांत अडकला आहे, तोंपर्यंत एका पायावर प्रगतीचें शिखर गांठणें केव्हांही शक्य होणार नाहीं. असो.

विलायतेंत असलेल्या मुदतींत कामाच्या कार्यक्रमानुसार मजूर वर्गाशीं माझा बराच संबंध आला. तरी पण त्यांच्या एकंदर आयुष्यक्रमाची थोडी जास्त माहिती मिळावी, ही इच्छा असल्यामुळें मी थोडे दिवस East End मध्यें एका Settlement मध्यें राहिलें होतें. त्यामुळें charity oraganisation व खरें social work म्हणजे काय असतें व त्यांसाठीं सुशिक्षित मध्यम वर्गांतील स्त्री-पुरुष त्यागी वृत्तीनें तन-मन-धनें करून गरीब व गरजू लोकांस मदत करण्यास कसे झटत असतात, हें प्रत्यक्ष पाहण्याची संधि मला मिळाली. ह्याबद्दल सांगावें तेवढें थोडेंच होईल. परंतु विस्तारानें सांगण्याचा हा प्रसंग नसल्यानें मी आतां पुनः एकदा आपले मनःपूर्वक आभार मानून रजा घेतें."

---

# रा. रा. पु. मं. लाड, आय. सी. एस. यांचें भाषण

(न्यायमूर्ति रानडे यांची पुण्यतिथि सातारा येथें न्यू इंग्लिश स्कूलच्या पटांगणांत नुक्तीच साजरी करण्यांत आली. बॅ. विठ्ठलराव चंदावरकर यांचें सुमारें अर्धा तास रानडे यांच्या गुणवर्णनपर इंग्रजींत भाषण झालें. रिटायर्ड जज्ज रा. रा. सप्रे व न्यू इंग्लिश स्कूलमधील शिक्षक रा. रा. गोखले यांचींही समयोचित भाषणें झालीं. शेवटीं सभेचे अध्यक्ष रा. रा. पुरुषोत्तम मंगेश लाड, आय्. सी. एस्., असिस्टंट जज्ज, सातारा, यांचें खालील अत्यंत मार्मिक असें समारोपात्मक भाषण झालें :—)

"रानडे यांच्या अंगीं असलेल्या असामान्य गुणांबद्दल आतां आपण ऐकिलेंच आहे. परंतु त्यांची थोरवी यांत नाहीं. प्रत्येक पिढींत यांपैकीं सर्व किंवा कांहीं गुण असणारीं माणसें जन्मास येतात व पुढेंही येतीलच. परंतु त्यांचा जो खरा थोरपणा होता तो राष्ट्रांतील तेजोगर्भ संस्कृतीचा परिपोष करून त्यांनीं थंड झालेल्या राष्ट्राच्या गोळ्याला, लोकमान्य टिळक यांनीं म्हटल्याप्रमाणें, कर्तृत्वाची ऊब आणली यांत आहे. राष्ट्राला मार्गदर्शक होणाऱ्या पुढाऱ्यांचे मी दोन वर्ग करितों. यांपैकीं एका वर्गाची प्रवृत्ति राष्ट्राला परभृतासारखी परक्यांच्या पंखाची ऊब देण्याची होती. कै. मि. आगरकर यांच्या प्रतिपादनाचा सर्व भर मिल्ल, स्पेन्सर वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या शिकवणुकीवर असे. उलट न्या. रानडे आपल्या प्रतिपादनांत

प्राचीन हिंदी संस्कृतीचा, आधार घेण्यास चुकत नसत. आपण जें पुढें मांडीत आहों तें नवीन नसून त्याचा कांहीं काळ लोप झालेला होता आणि त्याची राष्ट्राला पुनरपि ओळख करून देणें अवश्य झालें आहे. आजही राष्ट्रांत नवमतवाद येऊं पाहत आहे. पूर्वींचे आचार्य जाऊन त्यांची जागा कार्ल-मार्क्स-लेनिन-प्रभृतींनीं घेतली आहे. अशा वेळीं हिंदुस्थानची अति-प्राचीन तेजोगर्भ संस्कृति पचविण्याचा व तिचें संवर्धन करण्याचा न्या. रानडे यांचा जो मार्ग होता, त्याचें अवलंबन करण्याची जरूरी पुनः उत्पन्न झाली आहे. रानडे यांचें मराठी वाङ्मयावरील प्रेम त्यांच्या संस्कृतीच्या आदराचेंच द्योतक ठरेल. लो. टिळकांनीं एखादे वेळीं न्या. मू. रानडे यांच्यावर टिकास्त्र उपसलें असेल, परंतु त्यांना पटणारे विचार न्या. रानडे यांनीं बोलून दाखविले कीं, त्याची प्रसिद्धि केसरींतून करण्याची जागरूकताही त्यांनीं दाखविली हें विसरून चालणार नाहीं.''

वाई यमुनाबाई एल्. नायर इस्पितळ व कल्याण येथील शेट गोविंद करसन मेमोरियल धर्मार्थ डोळ्यांच्या इस्पितळाचे खास नेमलेले ऑप्टिशियन्स

**भांडारे आणि कंपनी, चष्मे बनविणार**

लंडन आणि ऑक्सफर्ड येथील डोळ्यांच्या इस्पितळांतून अनुभव घेऊन आलेल्या क्वालिफाइड सर्जनकडून शास्त्रशुद्ध पद्धतीनें डोळे काळजीपूर्वक फुकट तपासून चष्मा दिला जातो; तसेंच डोळ्यांच्या सर्व विकारांची पूर्ण चिकित्सा करून योग्य तो इलाज केला जातो.

आम्ही सर्व तऱ्हेच्या रोल्ड गोल्ड, इमिटेशन टारटॉइज शेल व फुल-व्यु फ्रेमचा भरपूर स्टॉक ठेवतों. झीसस पंक्टूल, अंब्रल, क्रूक्स वगैरे उत्तम, उंची व डोळ्यांना थंडावा देणाऱ्या अशाच लेन्सिस वापरण्यांत येतात.

डोळ्यांस लागणारीं सर्व औषधें आमचेकडे मिळतात, व नुकत्याच सुरवात झालेल्या मोतीबिंदुवर आमचा इलाज केल्यास, पुढें शस्त्रक्रियेची जरूरी राहत नाहीं. इस्पितळांतून चष्म्याचे नंबर आणणाऱ्यांस खास किफायत भाव.

पत्ता—**स्टोन हाउस,** २१० चर्नीरोड, प्रार्थना समाजनजीक, गिरगांव **मुंबई**

# ज्ञातिसमाचार

## १ ज्ञातिसंस्थांचा परामर्ष

१. कुडाळ हायस्कूल सम्मेलन—कुडाळ हायस्कूलचें द्वितीय सम्मेलन ता. २३ डिसेंबर १९३४ रोजीं मुंबईचे बॅरिस्टर शामराव रघुनाथ तेंडोलकर यांच्या अध्यक्षतेखालीं हायस्कूलसमोर उभारलेल्या भव्य मंडपांत थाटानें साजरें करण्यांत आलें. सम्मेलनप्रसंगीं श्रीमंत मोतीराम नारायणराव देसाई टोपीवाले वगैरे सन्मान्य पाहुणे हजर होते. सम्मेलनाच्या तीन्ही दिवसांत विद्यार्थ्यांनीं 'उसना नवरा', 'पदवीधर' व 'गुरुदक्षिणा' हीं तीन नाटकें यशस्वी रीतीनें करून दाखविलीं. त्याशिवाय लाठी, लेझीम, कुस्त्या, बोथाटी वगैरे शारीरिक प्रयोग व बरेच बौद्धिक प्रयोग विद्यार्थ्यांनीं करून दाखविले. सम्मेलनाच्या मुख्य दिवशीं स्वागतकमिटीचे अध्यक्ष रा. रा. महादेव रघुनाथ सडेकर वकील, यांनीं गोड शब्दांत अध्यक्ष व सन्मान्य पाहुणे यांचें स्वागत करून स्मशानभूमीचें कुडाळ हायस्कूलांत स्थित्यंतर कसें झालें व हायस्कूलची स्थापना १९२० सालीं झाली असली, तरी हें पहिलेंच सम्मेलन असल्यामुळें हा दिवस हायस्कूलच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे असें सांगितलें.

अध्यक्ष बॅरिस्टर तेंडोलकर यांनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणांत आजचे विद्यार्थी उद्यांचे नागरिक कसे आहेत व त्यांच्यावर काय जबाबदाऱ्या आहेत याचें सुंदर वर्णन केलें, व विद्यार्थ्यांस उत्तम शीलसंवर्धन करून त्यांना भावी आयुष्यांत उपयोगी पडणारें असे प्रामाणिकपणा, स्वार्थत्याग, राष्ट्राभिमान इत्यादि गुण अंगीं बाणविण्याचा कळकळीचा उपदेश केला. शाळेचे माजी विद्यार्थी व मुंबईचे राष्ट्रप्रेमी प्रसिद्ध शेअरब्रोकर रा. रा. आत्माराम भास्कर पंडित, बी. ए., यांनीं कुस्त्यांसाठीं स्पेशल बक्षिसें ठेविल्यामुळें कुस्त्यांची मोठी दंगल उडाली. कुमारी शालिनी नेरूरकर यांनीं जळती बोथाटी फार सफाईदार रीतीनें फिरवून दाखविली व कु. कुसुम पंडित व कु. नलिनी नेरूरकर यांचें हार्मोनियमवादन व गायन सुंदर झालें. रा. देसाई यांच्या नकला झाल्यावर पदकें देण्यांत आलीं.

२. सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी—बक्षिस समारंभ—कुमारी हिराबाई सखाराम राजाध्यक्ष स्मारक वक्तृत्वोत्तेजक व इतर पारितोषिकें देण्याचा जाहीर समारंभ रविवार ता. २७ जानेवारी १९३५ रोजीं सकाळीं स्टॅ. टा. ९ वाजतां सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत ठाणें येथील सुप्रसिद्ध वकील श्रीयुत मोरेश्वर शंकर रांगणेकर यांच्या अध्यतेखालीं साजरा करण्यांत आला.

लहान बालिकांचें ईशस्तवनपर व स्वागतपर गायन झाल्यावर, व्यवस्थापकमंडळाचे अध्यक्ष श्रीयुत शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एल्‌एल्. बी. यांनीं संस्थेतर्फे सर्वांचें स्वागत करून, वक्तृत्वोत्तेजक बक्षिसांचा इतिहास निवेदन केला व यंदाच्या वक्तृत्वोत्तेजक चढाओढींत भाग घेणाऱ्या मुलांमुलींची संख्या गेल्या पांच वर्षांतील कोणत्याही वर्षाच्या संख्येपेक्षां जास्त होती, याबद्दल समाधान व्यक्त केलें. संस्थेच्या व्यवस्थेखालीं असलेल्या निरनिराळ्या स्मारक फंडांतून देण्यांत येणारीं बक्षिसें मिळविणाऱ्या उमेदवारांत मुलींची संख्या मुलांएवढीच आहे, ही गोष्ट स्त्री–शिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत अभिनंदनीय आहे असें त्यांनीं सांगितलें. वक्तृत्वोत्तेजक स्पर्धा होतात, त्या वेळीं कित्येक पालक व सभासद स्वतः हजर राहून संस्थेच्या कार्याविषयीं सक्रिय सहानुभूति व कळकळ दर्शवितात, याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून, पुण्याचे सुप्रसिद्ध नागरिक व महाराष्ट्रांतील उत्तम वक्ते श्रीयुत बाबासाहेब कामत यांनीं यंदा या चढाओढीच्या प्रसंगीं हजर राहून पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या याबद्दल त्यांचे आभार मानले.

नंतर संस्थेच्या एक चिटणीस कुमारी नीरा मोंडकर, बी. ए., बी. टी. यांनीं संक्षिप्त अहवाल वाचून संस्थेच्या गेल्या ३२ वर्षांतील कामगिरीचें दिग्दर्शन केलें, त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

संस्थेच्या पटावर ३२ व्या वर्षअखेर १९ पेट्रन्स, ११फेलोज, ३९२ लाइफ मेंबर्स व १३९५ साधारण सभासद मिळून १८१७ सभासद आहेत. संस्थेनें आजपर्यंत रु. १,६८,६८१ रक्कम विद्यावेतनाच्या रूपानें दिली असून, ७७९ पेक्षां जास्त विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना शिक्षणाचा लाभ घेण्यास तिची अंशतः तरी मदत झाली आहे. त्यांत ५२ गत-भर्तृका असून त्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ संस्थेकडून रु. १४,३३७ खर्च झाले आहेत. स्मारक-फंड, कायमनिधि वगैरे धरून आजमितीस रु.१,९५,००० शिल्लक तिच्या हातीं आहे.

नंतर श्रीमती कृष्णाबाई वाघ, यांचें भाषण झालें. त्यांनीं सध्याच्या काळीं वक्तृत्वाची किती आवश्यकता आहे याचें वर्णन करून अशा कामीं प्रोत्साहन देणाऱ्या संस्थेचें अभिनंदन केलें. सा. वि. सा. मंडळीनें विद्यार्थ्यांच्या शारीरिक परीक्षेसंबंधीं, तसेंच संभाषणात्मक सभासंबंधीं केलेल्या उपक्रमा-बद्दल संतोष व्यक्त करून, संस्थेचें कार्यक्षेत्र विकास पावो व विद्यार्थ्यांस समाजसेवेची अभिरुचि लागो अशी आशा व्यक्त केली. विद्यार्थ्यांनीं मिळत असलेल्या सर्व संधींचा सदुपयोग करावा, निरनिराळ्या विषयां-वर योग्य, खुलासेवार व चर्चात्मक विचारविनिमय करून सुशिक्षित व्हावें, अशा आशयाचा अत्यंत कळकळीचा त्यांस उपदेश करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर श्रीयुत श्रीपाद दत्तात्रय तेंडुलकर, बी. ए., यांनीं वक्तृत्वाचें महत्त्व अनेक ऐतिहासिक दाखले देऊन वर्णिलें व वक्तृत्वशक्ति ही जगांत अत्यंत उपयुक्त आहे व त्या शक्तीचा इतर प्रकारच्या सामर्थ्याप्रमाणेंच प्रत्येकानें सदुपयोग केला पाहिजे असें सांगितलें.

सर नारायणराव चंदावरकर प्राथमिक शाळेचे सुपरिंटेंडंट श्रीयुत विष्णुपंत वेलणकर यांनीं प्रत्ये-कानें आपापलें कार्य करीत राहावें व ईश्वराचें स्मरण करावें व त्यांतच आपलें कल्याण आहे असा प्रेमळ उपदेश केला.

नंतर श्रीमती सौ. कृष्णाबाई रांगणेकर यांच्या हस्तें यशस्वी विद्यार्थि-विद्यार्थिनींना बक्षिसें वांटण्यांत आलीं.

अध्यक्ष श्रीयुत मोरेश्वरपंत रांगणेकर यांनीं सर्व यशस्वी मुलांमुलींचें अभिनंदन केलें व गेल्या मॅट्रिक परीक्षेंत पहिला नंबर मिळविलेले विद्यार्थी श्री. रमाकांत महेश्वर मुझुमदार यांच्या सुयशाबद्दल विशेष आनंद व्यक्त केला. अशा विद्यार्थ्याला बक्षिसरूपानें उत्तेजन देणें आवश्यक आहे असें मत सांगून त्यांचा पुढील शिक्षणक्रम असाच उज्ज्वल व कीर्तिप्रद होवो अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली.

वक्तृत्वाची महती फार मोठी आहे व विद्यार्थ्यांनीं योग्य वेळींच यासंबंधीं मेहनत करून सभाधीटपणा व मुद्देसूद बोलण्याची संवय हे गुण अंगीं आणावे असें त्यांनीं सुचविलें. विद्येला विनयाची जोड सदैव पाहिजे, यशस्वी विद्यार्थ्यांनीं योग्य अभिमान बाळगावा पण पोकळ गर्व करूं नये, असा त्यांनीं विद्यार्थ्यांस उपदेश केला. वक्तृत्वासंबंधीं झालेल्या चढाओढींत ज्या विद्या-र्थ्यांना यश मिळालें नाहीं, त्यांनीं बिलकुल निराश न होतां, सतत प्रयत्न करीत राहावें, यशाची खरी गुरु-किल्ली अविरत प्रयत्नांत आहे, बक्षिससंपादनांत नाहीं असें सांगून, संस्थेचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी इच्छा प्रदर्शित करून, त्यांनीं आपलें सुंदर व मननीय भाषण संपविलें.

प्रिन्सिपॉल वसंतराव रामचंद्र नेरूरकर, एम्. ए., एस्.टी. सी.,टी. डी., एम्.आर्.एस्. टी. व श्रीयुत यशवंत हणमंत सुखठणकर यांनीं अध्य-क्षांचे व त्यांच्या पत्नीचे योग्य शब्दांत आभार मानले.

नंतर आभारगीत व राष्ट्रगीत होऊन समारंभाचें काम संपलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. ........ नं. ........

३. संयुक्त गौ. सा. ब्रा. परिषदेचें पुनरुज्जीवन. मुंबई येथें सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सभागृहांत एक सभा भरून तींत "संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें" पुनरुज्जीवन करून तिचें नववें अधिवेशन मुंबईस भरवावें असें ठरल्याचें आम्हीं मागील अंकीं प्रसिद्ध केलें आहे. हें घडवून आणण्यासाठीं जी कमिटी नेमण्यांत आली होती, तिची सभा ता. १० फेब्रुवारी १९३५ रोजीं बॅरिस्टर विश्वनाथराव दळवी यांच्या अध्यक्षतेखालीं भरून परिषद शक्य तर ता. २६, २७, २८ आक्टोबर १९३५ या दिवशीं भरण्याची तजवीज करावी असें ठरलें. कमिटीनें रा. रा. शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एलूएल्. बी., रा. रा. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी. व रा. रा. शांताराम विनायक कोंकरे, यांस आपले चिटणीस नेमून त्यांनीं लागेल ती मदत परिषदेचे जनरल सेक्रेटरी यांना द्यावी असें ठरलें. शिवाय या कमिटीचे सभासद स्वागतकमिटीचेही सभासद समजले जाऊन या व स्वागतकमिटीच्या पुढें होणाऱ्या सभासदांना वर्गणी प्रत्येकीं १० रु., प्रतिनिधींची फी प्रत्येकीं ३ रु. व इतर प्रेक्षकांची फी १ रु. याप्रमाणें आकारण्यांत यावी असें ठरलें. कलाकुसरीचें प्रदर्शनही परिषदेस जोडून भरविण्याचें ठरलें असून तें घडवून आणण्यासाठीं कार्यकर्त्या स्त्री-पुरुष-सभासदांची एक, तसेंच माहिती प्रसिद्ध करण्यासाठीं एक व पैसे वगैरे जमा करण्यासाठीं एक अशा एकंदर खालील तीन कमिटया नेमण्यांत आल्या असून त्यांना आणखी सभासद घेण्याचा अधिकार दिला आहे:—

### प्रदर्शन-कमिटी

(१) श्री. सौ. नलिनीबाई विश्वनाथराव दळवी, B. A., J. P., (२) डॉ. श्री. सौ. मालिनीबाई भालचंद्र सुखठणकर, M. B. B. S., J. P., (३) श्री. सौ. शांताबाई सीतारामपंत पाटकर, J. P. (४) श्री. सौ. सुमतीबाई वामनराव वर्दे, (५) श्री. सौ. मंजुळाबाई दत्तात्रय रेगे, (६) श्री. सौ. सीताबाई रामराव पडबिद्री, (७) श्री. सौ. कमलाबाई रामराव डोंगरकेरी, (८) श्री. अण्णाजी राव, (९) रा. रा. कृष्णाजी तातोबा मंत्री, बी. ए. बी. टी., (१०) रा. रा. धोंडनाथ काशीनाथ रेगे, (११) रा. रा. [illegible]कर, (१२) रा. रा. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी., (१३) रा. रा. वामन पुंडलिक वर्दे, बी. कॉम (सेक्रेटरी).

### फायनॅन्स कमिटी

(१) रा. रा. विश्वनाथ ग. दळवी, बी. ए., एलूएल्. बी., बार-ॲट-लॉ, (२) रा. रा. भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए., एलूएल्. बी., (३) रा. रा. सखाराम सीताराम नाईक, बी. ए., एल्. सी. ई., (बॉम्बे), बी. एस्सी. (एडिंबरो), (४) रा. रा. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर, (५) रा. रा. शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एलूएल्. बी., (६) रा. रा. धोंडनाथ काशीनाथ रेगे, (७) रा. रा. यशवंत हणमंत सुखठणकर, (८) रा. रा. रामचंद्र कृष्ण प्रभू (९) रा. रा. पुरुषोत्तम महादेव जुवळे, (१०) रा. रा. शांताराम विनायक कोंकरे (सेक्रेटरी).

### पब्लिसिटी कमिटी

(१) रा. रा. रामचंद्र कृष्ण प्रभू, (२) रा. रा. श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एलूएल्. बी. (३) रा. रा. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी.

४. चिकित्सक समूह हायस्कूल—चिकित्सक समूह हायस्कूलचा वार्षिक बक्षिससमारंभ ता. २० जानेवारी १९३५ रोजीं बॅ. वि. ना. चंदावरकर, व्हाइस चेन्सलर, यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. त्या वेळीं वाचलेल्या रिपोर्टांत हायस्कूलसंबंधीं पुढील हकीकत दिली आहे.

"कै. वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनीं १८७१ सालीं "पोतदार प्रायमरी स्कूल" या नांवानें स्थापून चालविलेली मराठी शाळा डबघाईस आलेली पाहून, १९०६ सालीं स्थापन झालेल्या "चिकित्सक समूह" ह्या सारस्वत संस्थेनें आपल्या शिक्षणप्रसाराच्या ध्येयास अनुसरून तिची व्यवस्था आपल्या हातीं घेतली व हळूहळू वाढ करीत १९१७ सालीं तिला हायस्कूलचें व्यापक स्वरूप आणून दिलें. हल्लींचे प्रिन्सिपॉल श्री. व. रा. नेरूरकर यांची

नेमणूक त्या सालीं करण्यांत येऊन त्यांच्या ताब्यांत प्रायमरी स्कूल व हायस्कूल हीं देण्यांत आलीं, त्या वेळीं त्यांत विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमें १४७ व ७४ होती, ती वाढत जाऊन आतां १५४ व ५६६ झालेली आहे. १९०८ पासून १९११ पर्यंत त्या शाळांचा योगक्षेम चालविणें 'समूहा'स फार जड गेलें; पण विशेषें करून डॉ. वि. भा. सुखठणकर व कै. ज. भा. रेगे यांच्या परिश्रमांमुळें ही अडचणीची वेळ टळून आज दोन्ही शाळा सुस्थितींत असून गिरगांवच्या भागांत शिक्षणदानाचें काम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करीत आहेत हें वरील आंकड्यांवरून दिसून येईल. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं मॅट्रिक व स्कूल लीव्हिंग परीक्षेंत वरचे नंबर पटकावून "जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कालर्शिप" सारखीं बक्षिसें कित्येक वेळां तरी पटकावलीं आहेत. या हायस्कूलमधून सदर परीक्षेंत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण शेंकडा ६० ते ८० पडतें व मराठी चवथ्या इयत्तेच्या परीक्षेंत तर तें शेंकडा १०० पडतें या शाळेंत १३ ग्रॅज्युएट शिक्षक असून त्यांपैकीं एक M. A., B. T. व नऊ S. T. C. आहेत. कै. विष्णु जनार्दन शिरोळकर या थोर मनाच्या दात्यानें दिलेल्या एक लक्ष रुपयांच्या देणगीमुळें हायस्कुलास स्वतःची इमारत लाभण्याचें भाग्य आतां नजीक आलें आहे."

सारस्वतांच्या शिक्षणाच्या व शिक्षणदानाच्या आवडीची निदर्शक ही संस्था व तिनें चालविलेल्या दोन्ही शाळा भरभराटीस येऊन शहरांत इतरत्र शाखा उघडण्याचा सुयोग त्यांस प्राप्त होवो असें आम्ही इच्छितों.

**५. सारस्वत दीनवत्सल संघ**–या संघाची पंचविसावी वार्षिक सभा रविवार तारीख ३ फेब्रुवारी १९३५ रोजीं दुपारीं तीन वाजतां सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत श्रीयुत वामनराव शांताराम दाभोळकर, एम्. ए., एलूएल्. बी., सॉलिसिटर, यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यांना अध्यक्ष निवडण्याची सूचना करतांना श्री. भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए., एलूएल्. बी. यांनीं श्री. दाभोळकर व त्यांचे बंधु यांनीं संघाविषयीं आजपर्यंत दाखविलेल्या आर्थिक व इतर सहानुभूतीचें दिग्दर्शन केलें. तसेंच संघाचे हितेच्छु परलोकवासी श्री. शिरोळकर यांच्या व्यवस्थापत्रांत ठेवलेली रक्कम संघास मिळवून देण्याच्या कामीं निरपेक्ष काम केलें इतकेंच नव्हे, तर मेहनतीबद्दल कोर्टामार्फत मिळालेली रक्कम सुद्धा त्यांनीं संघास देण्याचें ठरविलें. या त्यांच्या उदात्त व अनुकरणीय कृतीनें त्यांनीं संघास कायमचें उपकृत करून ठेवलें आहे असें सांगितलें.

संघाचा १९३३–३४ सालचा वार्षिक अहवाल जमाखर्चाच्या आढाव्यासह मंजूर करण्याचा ठराव श्री. भिकाजी सीताराम सबनीस, बी.ए., एलूएल्.बी, यांनीं मांडला व तो मांडतांना गेल्या वर्षी संघाचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आल्यामुळें अहवाल छापून प्रसिद्ध करण्याला विलंब झाला असें सांगितलें. सदहू ठरावास श्री. विनायक मंगेश रांगणेकर यांनीं अनुमोदन दिल्यावर अहवालांत झालेल्या मुद्रणाच्या चुका दुरुस्त करून अहवाल व जमाखर्चाचा तक्ता एकमतानें मंजूर करण्यांत आला. नंतर श्री. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एलूएल्. बी. यांनीं अहवालाच्या सालीं व्यवस्थापक मंडळानें केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलें. पण संघाच्या उपयुक्ततेकडे लक्ष दिल्यास संघाच्या पटावर असलेली सभासदांची संख्या अगदींच असमाधानकारक आहे असें सांगून त्याबद्दल व्यवस्थापकमंडळाकडून तसेंच सभासदांनीं प्रयत्न केले पाहिजेत असें सुचविलें. नंतर श्री. वामनराव पुंडलिक वर्दे, बी. कॉम्. यांनीं पुढील वर्षापासून वार्षिक अहवालांत आणखी कांहीं माहिती देण्यांत यावी असें सांगून विशेषतः अर्जदारांविषयीं व त्यांच्या अर्जाच्या निकालाविषयीं संक्षेपतः माहिती, नांवें न देतां अहवालांत द्यावी असें सुचविलें.

नंतर पुढील वर्षासाठीं सभासदांनीं निवडलेल्या व स्वयंसेवकांनीं निवडलेल्या सभासदांचें खालीलप्रमाणें व्यवस्थापकमंडळ निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें:—

अध्यक्ष श्री. भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए., एलूएल्. बी.; उपाध्यक्ष श्री. सदानंद लक्ष्मण कापडी,

बी. एस्सी.; सभासद् श्री. लक्ष्मण नारायण दड-कर; श्री. नीळकंठ बालकृष्ण रांगणेकर, बी. ए.; श्री.कृष्णराव शिवराम पिंगे; श्री. शांताराम नानाभाई कानविंदे; श्री. अनंत विष्णु वायंगणकर; श्री. जगन्नाथ गोविंद हवालदार; श्री शंकर साबाजी कुळकर्णी; श्री. यशवंत हणमंत सुखठणकर; श्री. नीलकंठ त्रिंबक देसाई; श्री. श्रीपाद वासुदेव पाडगांवकर;श्री. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एल्एल् बी ;श्रीमती कृष्णाबाई वाघ; श्री. बाळाजी नारायण रेगे; श्री. अच्युत नारायण रेडकर; श्री. वामन काशीनाथ महाले;श्री. शंकर आनंदराव वागळे; श्री. यशवंत विनायक सुखठाणेकर; श्री.वामन सखाराम अणावकर; श्री. जनार्दन पुंडलिक नेरूरकर; श्री. सदाशिव विठ्ठल राजाध्यक्ष, जी.डी.ए.

नंतर सभेचे अध्यक्ष श्री. वामनराव दाभोळकर यांनीं आपणास सभेचें अध्यक्षस्थान देण्याचा मान दिल्याबद्दल सभेचे आभार मानले व ते म्हणाले कीं, "सारस्वत दीनवत्सल संघासारख्या संस्थेची आम्हांस जरूर असावी ही सारस्वत ज्ञातीस फारशी स्पृहणीय गोष्ट नाहीं. अशा प्रकारच्या संस्थेच्या आवश्यकतेचीं कांहीं कारणें म्हणजे सारस्वत ज्ञातींतील एकत्र कुटुंबपद्धति नामशेष होत आली असून पूर्वी प्रत्येक धंद्यामध्यें असलेलें सारस्वतांचें अग्रणीत्व हळूहळू नाहींसें होत चाललें आहे. तसेंच आपल्या ज्ञातींत परस्परांविषयींचा आपलेपणा कमी होत असून स्वकीयांस मदत करण्याची प्रवृत्तिही नष्ट होत चालली आहे, हींच विशेषतः होत. या कारणांमुळें संघासारखी संस्था अस्तित्वांत आणणें जरूर झालें. प्रत्येक सारस्वतानें त्या संस्थेस शक्यनुसार मदत करून ज्ञातींतील हीनत्व नाहींसें करणें हें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें संघाचा कायमनिधि वाढविण्याच्या कामाबरोबर जास्तींत जास्त अर्जदारांना शक्य तेवढी जास्त मदत कशी देतां येईल या गोष्टीचाही आपण विचार केला पाहिजे. संघाच्या कार्याबद्दल व सर्वसाधारण सभासदांच्या उत्साहाबद्दल त्यांचें अभिनंदन करून आपणास कार्यबाहुल्यामुळें संघाच्या कामांत फारसा भाग घेतां येत नाहीं याबद्दल त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली व संघाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी इच्छा प्रकट करून आपलें भाषण संपविलें.

यानंतर श्री. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एल्एल्. बी. यांनीं अध्यक्षांचे आभार मानण्याचा ठराव आणला व जो टाळ्यांच्या गजरांत पास झाला.

वार्षिक सभा संपल्यावर थोड्या वेळानें रावबहादुर गंगाधर जगन्नाथ रेगे, एम्. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं संघाची असाधारण सभा भरविण्यांत आली व संघाच्या ट्रस्टींपैकीं परलोकवासी श्री. माणिकराव एकनाथ मुळगांवकर, जे. पी., यांच्या जागीं श्रीयुत शंकरराव दत्तात्रय-प्रभावळकर, एल्. सी. ई., एम्. आ. ई. यांची सर्वानुमतें ट्रस्टी म्हणून निवड करण्यांत आली.

नंतर संघाच्या नियमांत दुरुस्ती करण्यासाठीं अगर जरूर तर नवीन नियम करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या नियमकमिटीनें तयार केलेले नियम विचारांत घेण्यांत आले व यांपैकीं नियम नंबर १ ते ११ हे कांहीं दुरुस्त्यांसह पास करण्यांत आले, व वेळेच्या अभावीं सभा रविवार तारीख १० पर्यंत तहकूब करण्यांत आली. याप्रमाणें तहकूब झालेली सभा रविवार तारीख १० फेब्रुवारी १९३५ रोजीं दुपारीं तीन वाजतां सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत भरवून बाकी राहिलेले नियम सभेनें सुचविलेल्या दुरुस्त्यांप्रमाणें मंजूर करण्यांत आले.

हे नियम तारीख १५ एप्रिल १९३५ पासून अमलांत येणार आहेत.

संघानें पुढील वर्षासाठीं आपल्यामधून खालील कार्यवाह नेमिले आहेत:—

चिटणीस—रा. रा. वामन सखाराम अणावकर.

दुय्यम चिटणीस-रा.रा.शंकर साबाजी कुळकर्णी.

खजिनदार—रा. रा. जगन्नाथ गोविंद हवालदार

दुय्यम खजिनदार-रा.रा. बाळाजी नारायण रेगे.

स्वयंसेवककाग्रणी—रा. रा. श्रीपाद वासुदेव पाडगांवकर

दुय्यम स्वयंसेवकाग्रणी—रा. रा. हिरानाथ वामनराव पिळगांवकर,

६. मंगलोर येथील स्वकीय बँक—मंगलोर येथील "कॅनरा बँक, लिमिटेड" या संस्थेची स्थापना व वाढ चालकांनीं सुरवातीपासून अशा तऱ्हेनें केली आहे कीं, तिच्यासंबंधानें कोणाही सारस्वत ब्राह्मणास सकौतुक अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाहीं. १९०८ व १९०९ सालीं 'गौड सारस्वत ब्राह्मण परिषदे'चीं दोन अधिवेशनें मंगलोर येथें भरविण्यांत आलीं, त्या वेळीं ज्यांचें नांव प्रामुख्यानें इकडील लोकांस परिचित झालें, ते श्री. ए. सुब्रय्या पै या कर्तृत्ववान् व विद्वान् सद्गृहस्थांनीं ही बँक १९०६ सालीं स्थापन केली. ज्या हायस्कूलमध्यें परिषद् भरली होती, तें मंगलोर येथील 'धी कॅनरा हायस्कूल' यांच्याच प्रयत्नांचें फल होय.

गौड सारस्वत ब्राह्मणांसच या बँकेचे भागीदार होतां येतें. ही बँक स्थापण्यांत येण्यापूर्वी जुनी 'मद्रास बँक' हीच एकटी काय ती तिकडील लोकांच्या गरजा भागवीत असे. दक्षिणेस पश्चिम कनाऱ्यावर कुमटा ते कोचीन, आलेपीपर्यंत सर्वत्र स्वज्ञातीचे लहान-मोठे व्यापारी विखुरलेले असून अडचणीच्या वेळीं अवाढव्य व्याज देऊन मद्रास बँकेकडून त्यांना कर्ज घेणें भाग पडत असे. या बोजाखालीं अल्प प्रमाणावर व्यापार करणारे पूर्ण नाश पावले, हें पाहून बँक स्थापण्याचा प्रयत्न केल्यावांचून श्री. पै यांच्यानें राहवेना व सदर बँक स्थापन करतांच केव्हांही शेंकडा १० पेक्षां ज्यास्त व्याज कर्जावर आकारूं नये असा त्यांनीं निर्बंध घालून ठेवला. हल्लींचा या बँकेचा साधारण दर शेंकडा ७ च आहे.

सुरवातीस या बँकेचें नांव "धी कॅनरा हिंदु परमनंट फंड" असें ठेवलें होतें व एक रुपयाच्या हप्त्यानें भाग वसूल करण्याची सवलत ठेवली होती. नंतर वरील नांव देण्यांत आलें असून हल्लीं हिच्या शाखा कालिकत, कोचीन, अलेपी, मुंबई ( नं. १ कमिसरिएट बिल्डिंग, हॉर्नबी रोड, ), एर्नाक्युलम्, बंगलोर, चिकमागलुर येथें असून हुबळीस लवकरच एक शाखा उघडण्यांत येणार आहे. हिचें सुरवातीचें एक लाख भांडवल आतां सहा लक्षांवर आलेलें आहे. रिझर्व फंड साडेचार लाखांचा आहे व एकंदर घडामोड व्याहत्तर लाखांची होते. डिव्हिडंड शेंकडा १२ पडतो व भागाची किंमत दुप्पट वाढली आहे. नुकत्याच पुऱ्या झालेल्या वर्षी बँकेस ६० हजार रुपये फायदा झाला. या बँकेंत सर्व ठिकाणीं मिळून नोकर ( खालच्या दर्जाचे वगळून ) एकंदर ११९ असून ते सर्व स्वज्ञातीय आहेत. बँक अप्रत्यक्षतः इतक्या कुटुंबांची पोषक झाली आहे.

चालक मंडळी कल्पक आहेत. त्यांनीं बँकेच्या एजंट लोकांपैकीं एकास मुंबईच्या सेंट्रल बँकेंत प्रत्यक्ष शिक्षण घेण्यासाठीं पाठविलें. तो 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स'च्या परीक्षेस बसून पहिल्या नंबरास पास झाला. सर पोचखानावालासाहेबांच्या मेहेरबानीनें लंडन येथील 'मिडलंड बँकें'त पुढील शिक्षणासाठीं त्यास प्रवेश मिळाला. तिकडून परत आल्यावर ह्या गृहस्थांस बँकेचे जनरल मॅनेजर नेमण्यांत आलें आहे व त्यांचा बँकेची वाढ करण्याच्या कामीं डायरेक्टर मंडळास फार उपयोग होतो.

प्रत्येक सारस्वत वसतीच्या केंद्रभागीं या बँकेची शाखा असावी अशी चालकमंडळाची महत्त्वाकांक्षा आहे. आम्हांस तरी अशीं ठिकाणें बरींच दिसतातः—वेंगुर्लें, मालवण, रत्नागिरी, पणजी, कारवार, बेळगांव, पुणें, मुंबई ( सबर्ब वांद्रें अगर दादर—अगर पार्लें—अगर अंधेरी ), इंदूर इत्यादि. या सर्व ठिकाणच्या स्वकीय मंडळींनीं शाखा उघडल्यास ठिकठिकाणच्या लोकांस बँकेचें शिक्षण मिळून हल्लींच्या उपासमारीच्या दिवसांत कांहीं कुटुंबांच्या पोषणाची सोय होईल, हें सांगणें नकोच.

शाखा उघडल्यामुळें त्यांची वारंवार तपासणी करण्यासाठीं अधिकारी नेमण्याची जबाबदारी बँकेवर येते. बँकेच्या कामांत प्रावीण्य दाखविल्यावर इन्शुरन्ससारखा धंदा हातीं घेतां येईल किंवा नाहीं हें पाहणें इतरांपेक्षां बँकेच्या चालक मंडळीस सोपें जाईल असें आम्हांस वाटतें. सट्टयासाठीं कर्ज न देण्याची घातकी स्पर्धा न करण्याची, व काटकसरीनें कारभार चालविण्याची जशी खबरदारी या बँकेच्या चालकांनीं

घेतली आहे, त्याचप्रमाणें प्रामाणिक लोकच बँकेंत काम करण्यासाठीं नेमले जातील अशाविषयीं कसून खबरदारी घेतली पाहिजे. तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आजपर्यंत प्रामाणिक माणसांनीं अनेक देशीं उद्योगधंदे बुडवून लोकांचा विश्वास अशा प्रयत्नांविषयीं लोपविला आहे, हें पाहतां या बँकेनें आपलें पाऊल अविरत पुढेंच टाकलें आहे. याबद्दल सन्मान्य उत्पादक कै. सुब्रय्या पै व मागाहूनची चालक मंडळी यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानावे तितके थोडेच. ज्ञातीची कीर्ति वाढविण्यास असेच प्रयत्न कारणीभूत होतात.

( 'ऑल इंडिया सारस्वत'च्या जानेवारी १९३५ च्या अंकावरून )

७. इंदूर येथील 'सारस्वत मित्रमंडळ' सदर मंडळातर्फें इंदूरच्या समस्त गौड सारस्वत ब्राह्मण समाजाच्या तारीख २७ जानेवारी १९३५ च्या बैठकींत मंजूर झालेला दुखवट्याचा ठराव:—

" इंदूरच्या वागळे घराण्यांतील एक प्रमुख व्यक्ति कै. श्रीयुत माधवराव कृष्ण ऊर्फ माधूभय्यासाहेब वागळे यांच्या अकालीं झालेल्या निधनानें इंदूर येथील गौड सारस्वत ब्राह्मण समाजास अत्यंत दुःख होत आहे. कै. माधूभय्या यांची त्यांच्या घराण्यास साजेशी थोर व उदार वर्तणुक, ज्ञातींत व ज्ञातिविषयक क्षेत्राबाहेरही त्यांनीं केलेली स्पृहणीय कामगिरी आणि आपल्याहून लहानांशीं देखील समरस होऊन काम करण्याची शैली इत्यादि सद्गुणांमुळें ते सर्वत्र आदरास पात्र झाले होते. स्वज्ञातीच्या हिताकरितां त्यांनीं यथाशक्ति सक्रिय सहानुभूति दाखवून ज्ञातीस ऋणी करून ठेविलें आहे. अशा थोर आणि निगर्वी गृहस्थाच्या अकालीं निधनानें त्यांच्या कुटुंबाचेंच नव्हे, तर इंदूर येथील गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीचें अपरिमित नुकसान झालें आहे. त्यांच्या कुटुंबीयांवर जो हा दुःखाचा प्रसंग ओढवला आहे, त्यांत इंदूरचा गौड सारस्वत ब्राह्मण समाज सहभागी आहे.

ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो व त्यांचे सर्व कुटुंबीयांवर आपलें कृपाछत्र राखो."

अशाच प्रकारचा ठराव इंदूर येथील महाराष्ट्र ब्राह्मण सभेनेंही केला.

## २. माननीयांचा सन्मान

रा.रा. विठ्ठलराव नारायण चंदावरकर, B.A. ( Canatb. ), Bar-at-Law, J. P., यांची मुंबई विश्वविद्यालयाच्या व्हाइस चॅन्सलरच्या जागीं झालेली नेमणूक आणखी दोन वर्षांनीं वाढविण्यात आली आहे हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. आपणांवर सोंपविण्यांत आलेल्या कामावर आपलें बुद्धिसर्वस्व योजून विकारवशतेस बळी न पडतां कोणत्याही पक्षाच्या मतासंबंधानें आपले विचार करून बनविलेलें मत व्यक्त करण्यास ते केव्हांही कचरत नाहींत. यांत त्यांचें निःपक्षपातित्व सर्व पक्षाच्या प्रत्ययास येत असल्यामुळें विश्वविद्यालयासंबंधीं त्यांचें नेतृत्व सर्वांस प्रिय झालें आहे, हें विश्वविद्यालयाच्या वारंवार होणाऱ्या कार्यव्यासींच्या चर्चेवरून अनुमान काढतां येतें. बॅरिस्टरसाहेबांच्या विश्वविद्यालयीन निरलस व थोर दर्जाच्या कामगिरीची साक्ष ता. १४ फेब्रुवारी १९३५ च्या दैनिक 'ज्ञानप्रकाश'च्या अग्रलेखांतील पुढील उतारेच पटवितील:—

" मुंबई-विश्वविद्यालयाच्या व्हाइस चॅन्सलरच्या जागेवर बॅ. विठ्ठलराव चंदावरकर यांची योजना होऊन आतां दोन वर्षें पुरीं होतील. परंतु या लहानशा कालावधींतच त्यांनीं विश्वविद्यालयाच्या एकंदर कामकाजाला कसें इष्ट वळण लाविलें आहे व तेथील कारभाराची कार्यक्षमता वाढविण्याचें श्रेय कसें संपादन केलें आहे, याची बरीचशी चांगली कल्पना १९३३-३४ सालचा जो मुंबई-विद्यापीठाच्या कारभाराचा अहवाल सिंडिकेटनें सेनेटला सादर केला आहे, त्यावरून कोणाही निःपक्षपाती व जिज्ञासु मनुष्याला सहज येऊं शकेल. सिंडिकेटचे हे वार्षिक अहवाल विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं सेनेटच्या भरणाऱ्या सभेला प्रतिवर्षी सादर केले जातात. परंतु आजपर्यंत हे अहवाल अगदीं त्रोटक स्वरूपाचेच असत. बॅ. चंदावरकर यांनीं विद्या-

पीठाच्या या अहवालाच्या लिखाणांत व प्रकाशनपद्धतींत अभिनंदनीय प्रगति घडवून आणलेली दिसून येईल. १९३३-३४ सालचा वर निर्दिष्ट केलेला अहवाल अवलोकन केला, तरी वरील विधानाची सत्यता कोणालाही सहज पटेल. या अहवालांत सेनेट, सिंडिकेट, ॲकॅडेमिक कौन्सिलर, विद्यापीठाचें ग्रंथालय व इतर खातीं, पोस्टग्रॅज्युएट शिक्षण व संशोधन, कॉलेजिएट शिक्षण, पदवीपरीक्षा, प्रवेशपरीक्षा वगैरे दहा स्वतंत्र प्रकरणें असून प्रकाशन-देणग्या, संशोधन देणग्या, विद्यार्थ्यांची संख्या, परितोषकांची यादी, अध्यापकांचीं नांवें, संशोधनकार्याचें स्वरूप व जमाखर्च अशीं त्यास तपशीलावर माहितीचीं नऊ परिशिष्टें जोडलेलीं आहेत, आणि अशा रीतीनें कोणाही अभ्यासकाला व निरीक्षकाला विद्यापीठाच्या बहुविध कार्याची संकलित स्वरूपाची कल्पना करतां यावी, असें एक उत्कृष्ट साधन त्यांस निर्माण करून दिलेलें आहे. विद्यापीठाच्या कार्याविषयींची माहिती लोकांमध्यें वाढून, त्याची लोकप्रियता वाढण्याला अशा साधनांचा निःसंशय फार उपयोग होतो, हें कांहीं सांगावयास नकोच. सध्याच्या लोकशाहीच्या कालांत अशा माहितीचें महत्त्व विशेषच असतें.

बॅ. चंदावरकर हे विद्यापीठाच्या कार्यांत फुरसतीच्या वेळीं आवश्यक तेवढेंच किमान लक्ष पुरविणारे व्हाइस चॅन्सलर असते, तर विद्यापीठाच्या कारभारांत अलीकडे जें चैतन्य दृग्गोचर होऊं लागलें आहे, तें केव्हांही दृष्टीस पडलें नसतें. रोज नियमितपणें ठराविक वेळीं युनिव्हर्सिटी कचेरींत येणारे व तेथील कामें पाहणारे बॅ. विठ्ठलराव चंदावरकर हेच बहुधा पहिले बिनसरकारी व बिनवेतनी व्हाइस-चॅन्सलर असावेत असें आम्हांस वाटतें. अशा मार्गदर्शकत्वाच्या सान्निध्याचा लाभ अत्यंत बहुमोल असतो, हें युनिव्हर्सिटीचे कार्यक्षम रजिस्ट्रार श्री. एस. आर. डोंगरकेरी यांच्याही प्रत्ययाला आलें असलेंच पाहिजे. युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर व रजिस्ट्रार अशी जोडी कोल्हापूरास गेली होती, व तेथें त्यांनीं प्रश्नपत्रिकांच्या मुद्रणाच्या खर्चाची चौकशी स्वतः केल्यामुळें मुंबई-विद्यापीठाच्या खर्चांत सालीना १००० रुपयांची बचत झाली! ही एकच गोष्ट विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीं दूरदूरच्या कॉलेजांना व शिक्षणकेन्द्रांना स्वतः भेटी दिल्या, तर त्यांत दोन्ही पक्षांचा किती मोठा फायदा होणार आहे, हें पटवून देण्यास केव्हांही पुरेशी आहे. मुंबई-विद्यापीठाच्या कारभारांत सुधारणा घडवून आणण्यानें बॅ. चंदावरकरांनीं सुरू केलेलें धोरण त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखालीं आणखी कांहीं वर्षें असेंच जोरानें पुढें चालविलें जाईल, अशी आम्ही दृढ उमेद बाळगतों.

रा. रा. चंदावरकर यांच्या नेमणुकीची मुदत वाढविण्यांत दाखविलेल्या गुणग्राहकतेबद्दल चॅन्सलरसाहेबांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. युनिव्हर्सिटी संबंधीं व्हाइसचॅन्सलरसाहेबांनीं आंखलेल्या सुधारणा तडीस नेण्यास यामुळें त्यांस भरपूर सवड मिळेल ही समाधानाची गोष्ट होय."

× × ×

नुकत्याच झालेल्या मुंबई-म्युनिसिपालिटीच्या त्रैवार्षिक निवडणुकींत डॉ. श्री. सौ. मालिनीबाई सुखठणकर, M. B. B. S., J. P., व रा. रा. सदाशिव कानोबा पाटील हे 'डी' वॉर्डातर्फे व रा. रा. पी. डब्ल्यु. वाघ, हे 'जी' वार्डातर्फे निवडून आले, हें नमूद करण्यास आनंद वाटतो. रा. रा. वाघ हे सार्वजनिक कार्यांत नवीन असले, तरी 'जी' वार्डांत निरनिराळ्या ज्ञातींच्या व धर्मांच्या उमेदवारांत मतसंख्यानुक्रमें पहिले आले, ही गोष्ट त्यांच्या परिश्रमाची व लोकप्रियतेची उत्तम साक्ष देते. मुंबई-म्युनिसिपल-कार्पोरेशनमध्यें हल्लीं काम करीत असलेले स्वकीय बंधु बॅरिस्टर विठ्ठलराव चंदावरकर व रा. रा. दत्ताराम गणपत दळवी, M.A., LL.B. हे चालू निवडणुकीच्या वेळीं उमेदवार म्हणून उभे राहिले नाहींत. त्यांच्यासारख्या बहुश्रुत, अनुभवशीर व तडफदार माणसांची उणीव पुढील कार्पोरेशनला पदोपदीं भासल्यावांचून राहणार नाहीं असें आम्हांस वाटतें. यशस्वी उमेदवारांचें आम्ही हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या

हातून नगरहिताची पुष्कळ कामगिरी घडो असें आम्ही इच्छितों.

* * *

प्रिन्सिपॉल दत्तात्रय अनंत तेलंग, बी. ए., यांना बाबु पन्नालाल पुरणचंद जैन हायस्कूल, मुंबई, यांतील नव्या-जुन्या विद्यार्थ्यांनीं ता. २० जानेवारी १९३५ रोजीं हायस्कूलच्या रौप्य-महोत्सव-प्रसंगीं एक मान-पत्र अर्पण केलें. त्यांत त्यांनीं संस्थेशीं असलेल्या त्यांच्या पंचवीस वर्षांच्या संबंधाचा उल्लेख करून त्या अवधींत प्रिन्सिपॉल या नात्यानें त्यांनीं शाळेचा वाढविलेला दर्जा, विद्यार्थ्यांवर पितृतुल्य प्रेम करून व संस्थापकांच्या उद्देशानुरूप त्यांच्यांत विद्याभिरुचि उत्पन्न करून त्यांच्या बुद्धिमत्तेला, नीतिमत्तेला व कर्तब-गारीला लावलेलें वळण, यांबद्दल कृतज्ञतापूर्वक प्रेम व आदर व्यक्त केलेला आहे, व संस्थेस त्यांचें नेतृत्व बरींच वर्षें लाभो, अशी ईश्वराकडे प्रार्थना केली आहे. शाळेच्या ट्रस्टींनींही रौप्यसमारंभाचे अध्यक्ष सर पुरुषोत्तमदास ठाकुरद्दास यांच्या हस्तें प्रिन्सिपॉल तेलंग यांना या गोड प्रसंगाची आठवण म्हणून एक सोन्याचें घड्याळ व सांखळी देऊन आपली गुण-ग्राहकता व्यक्त केली हें योग्यच होय. गुरुवर्य तेलंग यांच्या झालेल्या या सन्मानाबद्दल आम्हांस परम संतोष वाटत असून आम्ही त्यांना आयुरारोग्य इच्छितों.

× × ×

कुमारी लीला वागळे, एम्. ए., ह्यांनीं १९३२ सालीं केंब्रिज येथें भाषाप्रावीण्य मिळविण्यासाठीं विलायतेस प्रयाण केलें होतें. माजी अकाउंटंट जनरल रा. रा. कृष्णाजी बळवंत वागळे, एम्. ए., यांच्या लीलाताई या कनिष्ठ कन्या होत. मुंबई-विश्वविद्या-लयांत एम्. ए. खेरीज करून सर्व परीक्षांत या पहिल्या वर्गांत व त्यांतील कांहीं परीक्षांत पहिल्या नंबरास पास झाल्या असून एल्फिन्स्टन कॉलेजांत फेलो व उपशिक्षक या नात्यानें त्यांनीं कामही केलेलें होतें. वक्तृत्वांत त्यांनीं अनेक पारितोषिकेंही पटकावलीं होतीं. केंब्रिज येथील गर्टन्स कॉलेजांत २ वर्षें अध्य-यन करून, लँग्वेज ट्रायपॉस परीक्षा देऊन त्या जाने-वारीच्या आरंभीं मायभूमीस परत येतांक्षणींच त्यांस पुणें येथील सर परशुरामभाऊ कॉलेजांत इंग्रजीच्या अध्यापकाची जागा मिळाली हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. आपल्या विद्वत्तेनें, शिकवि-ण्याच्या हातोटीनें व सौजन्यानें आपल्या विद्यार्थी-वर्गाच्या मनांत त्या आदर उत्पन्न करितील व महिला-वर्गाचा लौकिक वाढवितील अशी आम्हांस बळकट आशा आहे.

\+ + +

वैद्य पुंडलिक वामन विर्जिनकर, मडगांवचे रहिवासी, यांनीं गोव्यांत गीता-जयंतीचा उत्सव सार्व-जनिक रीतीनें साजरा करण्याची प्रथा पाडली. प्रथम मडगांव व इतर एक दोन ठिकाणींच हा उत्सव साजरा होत असे. हल्लीं तो १५० हून अधिक गांवांत साजरा होत असल्याचें समजतें. या कामीं रा. रा. विर्जिनकर यांनीं नेतृत्व स्वीकारल्यामुळें त्यांना बरीच झीज सोसून दीर्घ परिश्रम करावे लागले. शुद्ध धार्मिक ज्ञानाकडे लोकांचें अशा उत्सवामुळें लक्ष लागून रा. रा. विर्जिनकर यांच्या श्रमाचें चीज होवो असें आम्ही इच्छितों.

× × ×

रा. रा. बेनेगल नरसिंग राव, I.C.S. (हिंदु-स्थानसरकारच्या कायदेकौन्सिलखात्याचे दुय्यम चिटणीस) यांची ता. १ एप्रिल १९३५ पासून कल-कत्ता-हायकोर्टाचे जज्ज म्हणून तात्पुरती नेमणूक झाली आहे हें जाहीर करण्यास आम्हांस आनंद वाटतो. त्यांचें प्राथमिक शिक्षण मंगलोर येथें कॅनरा हायस्कूलमध्यें होऊन उच्च शिक्षण केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजांत झालें. १९०९ सालीं ते विलायतेंत इंडियन सिव्हिल सर्व्हिस परीक्षेंत उत्तीर्ण झाले. पुढील सालीं ते हिंदुस्थानांत परत आले व त्यांच्या नोकरीस सुरवात झाली. बंगाल व ओरिसा प्रांतांत अनेक हुद्यांच्या जागीं त्यांनीं काम करून आपली कर्तबगारी दाखविली आहे. सरकारनें १९३४ सालीं त्यांना सी. आय्. ई. हा किताब देऊन त्यांच्या कामगिरीबद्दल

आपली गुणग्राहकता व्यक्त केली. त्यांचे एक बं. रा. रा. बेनेगल रामराव हेही इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें आहेत. रा. रा. नरसिंगराव हे निस्पृ व करारी न्यायाधीश म्हणून उच्च न्यायमंदिरांतह आपला लौकिक प्रस्थापित करितील अशी आम्हांस उमेद आहे.

* *

इस्लामपूर येथील आमचे सन्मान्य ज्ञातिबंधु श्रीमंत बळवंतराव त्र्यंबकराव ऊर्फ भाऊसाहेब मंत्री हे हल्लींच झालेल्या सातारा जिल्हा लोकलबोर्डाच्या त्रैवार्षिक निवडणुकींत वाळवें तालुक्यातर्फे निवडून आले, हें नमूद करण्यास आम्हांस संतोष वाटतो आमच्या माहितीप्रमाणें यशस्वी झालेल्या २४ उमेदवारांत श्रीमंत भाऊसाहेब यांस सर्वांत अधिक मतें मिळालीं. या एका गोष्टीवरूनच त्यांच्या लोकप्रियतेची कोणासही कल्पना होईल. तालुक्यांतील को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कारभारांत प्रारंभापासून तों आतां-पर्यंत फार बारकाईनें व आस्थापूर्वक ते मन घालीत असतात. प्रारंभीं फक्त ६०० रुपयांच्या भांडवलावर स्थापन झालेल्या अर्बन को-ऑपरेटिव्ह इस्लामपुर बँकेची सुधारणा उत्साहानें व दक्षतेनें होत गेल्यामुळें आज त्या बँकेचें शेअर-भांडवल २०००० रुपयांवर गेलें असून एकंदर उलाढाल (वर्किंग कॅपिटल) १,५०००० रुपयांची झाली आहे व बँकेला सरकार-कडून 'अ'वर्ग मिळाला आहे असें कळतें. बँकेच्या ह्या प्रगतीचें श्रेय श्रीमंत भाऊसाहेब यांच्या श्रमांस व आस्थेस बहुतांशीं आहे. सहकारी संस्थांशिवाय शैक्ष-णिक, आरोग्यविषयक, ग्रामसुधारणा, शिशुसंगोपन इत्यादि अनेक प्रकारच्या जनतेच्या हिताच्या प्रचलित चळवळींत श्रीमंत भाऊसाहेब गेलीं कांहीं वर्षें प्रमुख्यानें भाग घेत असून त्या संस्थांच्या प्रगतीसाठीं द्रव्यद्वारा व अंगमेहनतीनें मदत करीत असतात. अनेक अड-चणींच्या प्रसंगीं शेतकरी व इतर गरीब व मागसलेला वर्ग आणि अस्पृश्यसमाज यांस त्यांच्याकडून साह्य व प्रोत्साहन मिळत असतें. त्यांच्या लोकप्रियतेची गुरुकिल्ली याच गोष्टींत आहे. श्रीमंत भाऊसाहेब यांचें वय आज केवळ २९-३० वर्षांचें आहे. घरची गर्भश्रीमंती असतांना इतक्या तरुण वयांत सार्वजनिक हितासाठीं ते झटत आहेत, हें त्यांस फार भूषणावह आहे.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा सामाजिक दर्जा लक्षांत घेतां सातारा जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यांत पडेल असा अंदाज आहे. हा मान त्यांस मिळून त्यांचें अभिनंदन करण्याची संधि पुढील अंकीं आम्हास मिळेल असा भरंवसा आहे.

## ३. देणग्या

दानशूर कै. रा. रा. विष्णुपंत जनार्दन शिरोळकर यांनीं आपल्या हयातींत ज्ञातीसाठीं महाजन वाडीकरितां एक लाख रुपये ट्रस्टींच्या नांवें ठेविले होते; तसेंच चिकित्सक समूह हायस्कूलला इमारतीसाठीं सुमारें एक लाख रुपये मिळावे अशी योजना आपल्या मृत्युपत्रांत केली होती. याशिवाय आपल्या कुटुंबांतील माणसांची तरतूद करण्यासाठीं केलेल्या व्यवस्थापत्रामध्यें व्यवस्थापत्रांतील कांहीं योज-नेची जरूर न पडल्यास त्यांतील सुमारें २८,००० रु. सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीस व सुमारें १४,००० रु. सारस्वत दीन-वत्सल संघास मिळावे अशी तजवीज करून ठेविली होती. महाजन-वाडीच्या शिल्लक असलेल्या ट्रस्टींवर महाजनवाडीच्या रकमेसंबंधानें वगैरे येथील हायकोर्टमध्यें काम चालून त्याचा निकाल कांहींसा तडजोडीनें हल्लींच होऊन येथील मुगभाट रस्त्यावरील कै. रा. रा. शिरोळकर यांनीं घेतलेली एक जागा, तसेंच फणसवाडींत त्यांच्या ट्रस्टींनीं घेतलेली एक जागा व सुमारें ५५,००० रु. महाजनवाडीसाठीं ट्रस्टींनीं द्यावे असें ठरलें आहे. हे पैसे केव्हां मिळतील हें कांहीं आज सांगतां येणें शक्य नाहीं; तरी दोन्ही जागा मात्र लवकरच त्या ट्रस्टी-कडून मिळतील असें समजतें

चिकित्सकसमूह संस्थेसाठीं ठेविलेल्या रकमेसंबं-धानें सुद्धा असेंच काम चालून गेल्या ऑक्टोबरपर्यंत

ती रक्कम व आतांपर्यंत जमा झालेलें व्याज धरून रक्कम सुमारें एक लाख झाली आहे व लवकरच समूह जागा घेऊन त्यावर शाळेसाठीं इमारत उठविण्याच्या विचारांत आहे असें कळतें.

सा. वि. सा. मंडळी व सा. दी. संघ यांनाही गेल्या डिसेंबर महांत त्यांना ठेवलेल्या रकमा मिळाल्या.

रा. शिरोळकर यांच्या आत्म्यास आपली इच्छा फलद्रूप झालेली पाहून संतोष होईल. आपल्या प्राप्तिसर्वस्वाचा एवढा मोठा वांटा सार्वजनिक कार्यास देणारा इसम क्वचितच सांपडतो. ईश्वरकृपेनें त्यांच्या आत्म्यांस सदैव शांति लाभो अशी आम्ही त्या जगन्नियंत्याकडे प्रार्थना करितों.

रा. रा विनायक वामनराव कुवाडेकर, मुंबई, यांनीं आपले परमपूज्य वडील कै. रा. रा. वामनराव सखाराम कुवाडेकर यांच्या स्मरणार्थ, ते वयांत आल्यावर ता. २ मार्च १९३५ रोजीं झालेल्या प्रथमसांवत्सरिक-श्राद्धानिमित्त, सार्वजनिक संस्थांस कांहीं अटींवर खालील देणग्या देऊं केल्या आहेत हें जाहीर करण्यास आम्हांस संतोष वाटतो. त्यांनीं या संस्थांशीं आपल्या कर्तबगार वडिलांचें नांव कायमचें संलग्न करून त्यायोगें त्यांचें उत्तम स्मारक करून पितृऋण फेडलें आहे इतकेंच नव्हे, तर आपल्या दातृत्वाचें या संस्थास कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

रा. रा. कुवाडेकर यांनीं देऊं केलेल्या देणग्या:—

( १ ) सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी ( कार्यालयासाठीं )......४,००० रु.

( २ ) सावंतवाडी हायस्कूल ( शिष्यवृत्तिसाठीं ) ५०० रु.

( ३ ) वेंगुर्लें एज्युकेशन सोसायटी (त्यांच्या किंग जॉर्ज इंग्लिश स्कूलच्या इमारतफंडासाठीं ) ५०० रु.

( ४ ) पानवल ( सावंतवाडी संस्थान ) येथील श्रीदत्तमंदिराच्या आवारांत सार्वजनिक उपयोगासाठीं विहीर बांधण्याकरितां सुमारें ५०० रु.

( ५ ) अमेरिकन मिशन हायस्कूल, मुंबई, ( देणगी ) ...१०० रु.

याशिवाय या प्रसंगीं रा. रा. विनायकराव कुवाडेकर यांनीं ( १ ) सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई, ( २ ) सारस्वत दीनवत्सल संघ, मुंबई (३) वेंगुर्लें एज्युकेशन सोसायटी व (४) सावंतवाडी एज्युकेशन सोसायटी, या संस्थांस प्रत्येकीं १०० रु. देऊन ते त्यांचे ‘ हयातींत सभासद ’ झाले आहेत.

× × ×

त्यांनीं सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या हवालीं ४००० रु. केलेले असून, सारस्वत ब्राह्मण समाज अगर दुसरी एखादी ज्ञातिसंस्था स्वतःच्या उपयोगासाठीं इमारत विकत घेत असल्यास अगर बांधीत असल्यास त्यांत मंडळीच्या कचेरीसाठीं स्वतंत्र खोली मिळण्याची व्यवस्था होण्याकडे सदर रकमेचा विनियोग करावा, अशी त्यांची अट आहे; व तशी व्यवस्था होईपर्यंत इतर कोठें तरी मंडळीच्या कार्यालयासाठीं खोली घेऊन तिचें भाडें देण्याकडे त्या देणगीच्या व्याजाचा उपयोग करावा अशी त्यांनीं सवलत दिली आहे. कै. रा. रा. वामनरावजी कुवाडेकर यांनीं पूर्ववयांत बिकट परिस्थितीशीं धीरोदात्त वर्तनानें झगडून त्यांतून मार्ग काढून मोठ्या कर्तबगारीनें हल्लींची सुस्थिति प्राप्त करून घेतली होती; म्हणूनच त्यांना मध्यमवर्गाच्या अडचणींची रात्रंदिवस जाणीव असल्यामुळें त्यांचा दानकृत्यांत नेहमीं सढळ हात असे. त्यांच्या चिरंजिवांनीं वयांत आल्यावर केलेल्या पहिल्याच गोष्टींत त्यांचा कित्ता गिरवून या स्मारकानें आपल्या वडिलांसंबंधीं आदर दर्शवितांना, मंडळीची तूर्त उणीव काय आहे हें अचूक शोधून काढण्याइतकी दूरदृष्टि दाखविली, ही खचित समाधानाची गोष्ट होय. त्यांनीं वरील प्रसंगाच्या निमित्तानें आणखीही इतर अनेक संस्थांस देणग्या दिल्याचें समजतें. ज्ञातींत असे दाते निघाल्यास व सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं त्यांच्या देणग्यांचा यथायोग्य उपयोग करून त्यांच्या दातृत्वास उत्तेजन दिल्यास, सर्व बाजूंनीं जातीची प्रगति घडवून आणण्यास वेळ लागणार नाहीं. बालपणीं दुर्लभ अशा

दातृत्वशीलतेबद्दल रा. कुवाडेकर यांचें आम्ही सकौतुक अभिनंदन करितों, व त्यांना विद्याभ्यासांत यश मिळून त्यांच्या धंद्याची उत्तरोत्तर भरभराट होवो असें आम्ही इच्छितों.

× × ×

डॉ. कमळनाथ पुरुषोत्तम पिळगांवकर, एम्. बी., बी. एस्. (मुंबई) यांनीं आपले चुलते कै. रा. रा. गणपतराव रामचंद्र पिळगांवकर यांच्या स्मरणार्थ पुस्तकरूपानें बक्षिसें देण्यासाठीं अगर विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेची फी देण्यासाठीं ३½ टक्के दराची १,५०० रु. दर्शनी किंमतीची गव्हर्मेंट प्रॉमिसरी नोट सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीकडे पाठविली आहे. या गुणग्राहकतेबद्दल व औदार्याबद्दल आम्ही डॉ. पिळगांवकर यांचें अभिनंदन करितों.

× × ×

मुंबई येथील सुप्रसिद्ध कॉंग्रेसकर्ते व शेअरब्रोकर रा. रा. आत्माराम भास्कर पंडित, बी. ए., यांनीं स्वातंत्र्य-दिनाचें (ता. २६-१-१९३५ रोजींचें) आपलें सर्व उत्पन्न रु. ५४१-११-६ सार्वजनिक कार्यासाठीं महाराष्ट्र प्रॉव्हिन्शिअल कॉंग्रेसकमिटीकडे पाठविलें आहे. फार स्तुत्य.

× × ×

रावबहादूर साबाजीराव रघुनाथ तिरोडकर (नाशिक शहर) यांनीं आपले चि. रा. महादेव साबाजीराव तिरोडकर यांच्या स्मरणार्थ सारस्वत दीनवत्सल संघाला १०० रु. ची देणगी नुक्तीच पाठविली आहे.

× × ×

रा. रा. दत्तात्रय वामन रेगे, B.A., (Bom. & Cantab.) Bar-at-Law, I.C.S. डेप्युटी कमिशनर, बुलढाणा, सी. पी. यांनीं सारस्वत दीनवत्सल संघास १०० रु. पाठवून ते त्याचे 'तहहयात सभासद' झाले आहेत.

× × ×

## ४ अभिनंदन

—रा. रा. विठ्ठल नारायण चंदावकर, बी. ए. (कॅन्टब.), बार-ॲट-लॉ, जे. पी., यांना बॉम्बे मिलओनर्स ॲसोशिएशननें १९३५ सालासाठीं आपले डेप्युटी चेअरमन निवडलें आहे.

—जुनागड येथील बाहुद्दिन कॉलेजचे प्रिन्सिपॉल हे सेवानिवृत्त झाल्यामुळें त्यांच्या जागीं प्रो. वासुदेव सदाशिव घुर्ये, एम्. ए. यांची ॲक्टिंग प्रिन्सिपॉल म्हणून नेमणूक झाली आहे.

—मुंबई-युनिव्हर्सिटीच्या शेवटच्या एम्. बी. बी.एस. परीक्षेचा निकाल ता. १५ जानेवारी १९३५ रोजीं लागून परीक्षेस बसलेल्या २५६ उमेदवारांपैकीं ६० पास झाले. रा. रामचंद्र गुंडी गिंडे हे तींत यशस्वी झाले असून त्यांस चार्लस मूरहेड व बाळकृष्ण सुदामजी हीं दोन पारितोषकें व लिस्बो सुवर्णपदक हीं मिळालीं आहेत.

—डिसेंबरअखेर लंडन येथें इंडिया सोसायटीच्या पुरस्काराखालीं भरलेल्या हिंदी चित्रकलेच्या प्रदर्शनांत रा. रामचंद्र पांडुरंग कामत यांनीं ठेविलेल्या शिल्पकलेच्या चित्रांची सर्वत्र तारीफ झाली आहे. त्यांना ॲकॅडमीची १४० पौंडांची शिष्यवृत्ति नुक्तीच मिळाली आहे. ते येत्या मे महिन्यांत हिंदुस्थानांत परत येतील.

—कुमारी लीला राव यांनीं ता. २०-२-१९३५ रोजीं मुंबई जिमखान्याच्या क्रीडांगणावर झालेल्या एक्झिबिशन टेनिसच्या सामन्यांत मिस नेन्सी लायली यांच्यावर विजय मिळविला. तसेंच यंदा हिंदुजिमखान्याच्या विद्यमानें झालेले बॉम्बे प्रेसिडेन्सी हायकोर्ट टुर्नामेंटमध्यें सिंगल्स, डबल्स, व मिक्स्ड डबल्समध्यें त्या सर्व खेळांडूंत विजयी झाल्या आहेत. पारशी जिमखान्यातर्फें झालेल्या सामान्यांतही त्यांनीं तसाच सन्मान मिळविला आहे असें कळतें.

—बॉम्बे आर्टसोसायटीचें ४४ वें वार्षिक प्रदर्शन ता. १८-१-१९३५ रोजीं लॉर्ड ब्रेबोर्न-मुंबईचे गव्हर्नर यांच्या हस्तें खुलें करण्यांत आलें. त्यांपैकीं

प. वा. रावबहादुर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष यांच्या नांवें ठेविलेल्या स्मारक बक्षिसांपैकीं एक बक्षिस रा. गोकर्ण यांस मिळालें आहे.

—डॉ. गणपत पांडुरंग काळोखे, एल. एम. एस. यांना त्यांनीं वैद्यकरितां लिहिलेल्या रोगनिदान-चिकित्साशास्त्रावरील 'भिषग्वर' नांवाच्या ग्रंथाबद्दल डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रॅन्स्लेशनसोसायटीकडून पारितोषिक मिळालें आहे. याशिवाय ग्वाल्हेर-दरबार व बडोदें विद्याखातें यांच्याकडून सदर ग्रंथाबद्दल त्यांस पूर्वी बक्षिसें मिळालीं आहेत.

—बडोदें येथें नुकत्याच झालेल्या साहित्यसम्मेलनांतील काव्यगायनांत गोमांतकाचे तरुण कवि रा. रा. बाळकृष्ण भगवंत बोरकर यांस पारितोषिक मिळालें आहे.

—पुणें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेंत जानेवारी महांत भरलेल्या हस्ताक्षरांच्या प्रदर्शनांत रा. श्री. गो. परुळेकर ( लो. बो. फ. मे. शाळा, हडी, मालवण ) व रा. द. ब. सामंत ( लो. बो. मराठी शाळा, वरवडें, रत्नागिरी ) यांना बालबोध हस्ताक्षराबद्दल पहिला वर्ग मिळून बक्षिसें व प्रशस्ति-पत्रें देण्यांत आलीं.

—पुणें येथील आंतरशालेय वक्तृत्वसंस्थेच्या विद्यमानें झालेल्या वक्तृत्वाच्या चढाओढींत आपल्या वेळच्या विषयांत मराठी भाषणाबद्दल सुलोचना राव ( आगरकर हायस्कूल, पुणें ) यांस व इंग्रजींतील भाषणाबद्दल व उतारे म्हणण्याबद्दल कृष्ण तोणसे ( आगरकर हायस्कूल, पुणें) यांस बक्षिसें मिळालीं.

—पी. वाय्. सी. हिंदु-जिमखाना स्त्री-शाखा बॅडमिंटन टुर्नामेंटमध्यें श्रीमती सौ. सुशीलाबाई केरकर या सिंगल्समध्यें विजयी झाल्या व डबल्समध्यें श्री. सौ. केरकर व श्री. सौ. आठल्ये ही जोडी यशस्वी झाली.

—नवीन महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीवर रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रॉ. क. च्या जुन्या सभासदांनीं केलेल्या ९ सभासदांच्या निवडणुकींत पुढील नांवें आहेतः—(१) रा. रा. मधुकर यशवंत भांडारकर, मालवण, (२) रा. रा. आत्माराम भास्कर पंडित, बी. ए., मुंबई (३) रा. रा. अनंत सखाराम नाबर, शिरोडें.

—कॅप्टन मंगेश नारायण कलबाग, एम्. बी. बी. एस्., ए. आय्. आर्. ओ. यांना धारवाड जिल्ह्यांत दुसऱ्या वर्गाचे ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. एम्. एम्. मुंडकूर, फायर सुपरिंटेंडंट, न्यू इंडिया ॲश्युअरन्स कं. यांना बॉम्बे फायर ॲंड जनरल इन्शुअरन्स कंपनीचे मॅनेजर नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. एस्. एन्. कलबाग, यांना विलेपार्लें म्युनिसिपालिटीचे पुन्हा अध्यक्ष निवडण्यांत आलें आहे.

—डॉ. एस्. एल्. कल्याणपूरकर, एम्. बी. बी.एस्. हे लिव्हरपूल युनिव्हर्सिटीचा ट्रॉपिकल मेडिसिनवील डिप्लोमा घेऊन ता. २४-१-१९३५ रोजीं स्वदेशीं परत आले आहेत.

—रा. एम्. आर्. सबूर यांना आय्. एम्. एम्. ट्रेनिंगशिप 'डफरिन'वर शिक्षणासाठीं प्रवेश मिळाला आहे.

—सेंट जॉन ॲम्ब्युलन्स—बॉम्बे फायर ब्रिगेड सेंटरतर्फें हिंद महिला समाज, भटवाडी, मुंबई, येथें डिसेंबरमध्यें झालेल्या होमहायजीनच्या परीक्षेंत पुढील विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेतः —(१) कु. ताराबाई गोठोस्कर, (२) कु. अनसूया घुर्ये (३) श्री. सौ. कृष्णाबाई तलगेरी, (४) श्रीमती उमाबाई चंदावरकर, (५) श्री. सौ. लक्ष्मीबाई नाडकर्णी, व (६) श्रीमती सीताबाई प्रभू.

वरील संस्थेतर्फें नाथीबाई कन्याशाळेंत झालेल्या फर्स्टएडच्या परीक्षेंत पुढील विद्यार्थिनी यशस्वी झाल्या आहेतः—(१) कु. शालिनी पै, (२) कु. सुमन पै व (३) कु. तारामती बांवकर,

## ५ सभा-सम्मेलनें

—सोशल सर्व्हिस लीग, मुंबई, या संस्थेनें वि पार्ले येथें चालविलेल्या महिला सेवा मंडळ औद्योगि शाळेचा बक्षिससमारंभ रा. रा. सर्वोत्तम गणेश कंट यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ६-१ १९३५ रो थाटानें पार पडला.

—रा.रा. नरसिंगराव शेषगिरी कौशिक, बी. ८ जे. पी. यांचें " शहराला पैशाचा पुरवठा क होतो !" या विषयावर ता. ८-१-१९३५ रोजीं मुं येथें नागपाडा नेबरहुड हाउसमध्यें व्याख्यान झा

—न्यू सारस्वत युनियन या संस्थेच्या सभ दांचें मकर-संक्रातिनिमित्त सम्मेलन ता. २०- १९३५, त्रिभुवन रोडवरील संस्थेच्या दिव खान्यांत झालें.

—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें यंदा सुरू केले हेमंत-व्याख्यानमालेतर्फे ता. २०-१-१९३५ रे सुप्रसिद्ध नाटककार रा. रा. भार्गवराम वि. वरे यांचें " स्त्रीजीवनांतील आजचे प्रश्न " या विष वर व्याख्यान झालें.

—सुधांशु मंडळातर्फे दादर येथें छबिल हायस्कूलमध्यें ता. २३-१-१९३५ रोजीं कुमारी यशवंतराव गुणाजी यांचें काव्यगायन झालें.

—मराठा हायस्कूल मुंबई, या संस्थेचा ब समारंभ रविवार, ता. ३-२-१९३५ रोजीं प्रो. म दामोदर अळतेकर, एम्. ए. यांच्या अध्यक्षते थाटानें झाला.

—कॅनरा बँकची मांडवी शाखा, गुरुमुख भु मसुजिद बंदर रोड, येथें शेठ वेलजी लखमसी न बी. ए., एल्एल. बी. यांच्या हस्तें ता.८-२-१९ रोजीं उघडण्याचा समारंभ झाला. बँकेच्या बोर्ड डायरेक्टर्सचे अध्यक्ष रा.रा. ए. श्रीनिवास पै, बी. बी. एल्. व रा. रा. नारायण बळवंत देशपांडे मंडळीचीं समयोचित भाषणें झालीं.

—राजाराम कॉलेजांतील अर्थशास्त्राचे नवीन विद्वान अध्यापक प्रो. बी. आर्. शिर्नाय, एम्. ए., एम्. एस्सी. (लंडन) यांनीं राजाराम कॉलेज हॉलमध्यें डॉ. बाळकृष्ण यांच्या अध्यक्षतेखालीं 'सुवर्णपरिमाण' (The Gold Standard), 'गंगाजलि पेढी' (The Reserve Bank) व 'ओटावा करार' (The Ottawa Pact) या हिंदुस्थानच्या जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांशीं निगडित असलेल्या तीन अर्थशास्त्रीय विषयांवर व्याख्यानें दिलीं.

—पुणें येथें मराठा व्यापारी-कारखानदार परिषद ता. १६ व ता. १७ फेब्रुवारी १९३५ रोजीं भरली होती. स्वागतमंडळाचे अध्यक्ष श्रीयुत बाबासाहेब कामत हे असून परिषदेच्या अध्यक्षस्थानीं कोल्हापूर शुगर मिल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. शांताराम रघुनाथ शिरगांवकर, एम्. डी. (लंडन) यांची योजना करण्यांत आली होती.

—जोगेश्वरी (अंधेरी) येथील इस्लामिया कॉलेजचें वार्षिक सम्मेलन बॅरिस्टर विठ्ठलराव चंदावरकर, व्हाइसचॅन्सलर मुंबई युनिव्हर्सिटी, यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ३-३-१९३५ रोजीं पार पडलें.

## ६. शोचनीय मृत्यु

गोमंतकांतील एक प्रसिद्ध काजूकारखानदार रा. रा. गणपत शंकर तोरणे यांना देवाज्ञा झाली हें कळविण्यास खेद वाटतो. त्यांचे निरनिराळ्या ठिकाणीं १२-१५ कारखाने असून ते उत्तम प्रकारें चाललेले असून त्यांच्यावर पुष्कळ कामगारांची उपजीविका चालली आहे. त्यांचें मूळ गांव वेंगुर्लें, परंतु, गेल्या २० वर्षांपासून ते गोव्यांत व्यापार करूं लागल्यापासून डिचोली येथें मुख्य कारखान्यांत कायमचे राहत होते. यामुळें ते गोमंतकीय झाले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दुखवटयाची सभा—मुंबई येथील सेंट झेवियर कॉलेजचे संस्कृत व मराठी भाषेचे अध्यापक

ता. ........

न्यायशास्त्री भवानीशंकर सुखठणकर यांच्या निधनानिमित्त त्यांच्या द्वादशाह दिवशीं ता. ( १३-१-३५ रोजीं ) दुखवटयाची सभा त्यांची जन्मभूमि माशेल येथील श्री देवकीकृष्ण देवालयाच्या पटांगणांत ह. भ. प. विठ्ठल कृ. का. चंदगडकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरून दुखवटयाचा ठराव पास झाला. या ग्रामस्थ मंडळीच्या जाहीर सभेंत अध्यक्षांशिवाय पंडित अनंतशास्त्री धुपकर, रा. रा. पुं. केंकरे व रा. भा. वि. खालकर यांचीं शास्त्रीबुवांच्या गुणगौरवपर भाषणें झालीं, व खालील ठराव त्यांचे पुत्र रा.काशीनाथ भवानीशास्त्री सुखठणकर, B.A., LL.B. यांच्याकडे पाठविण्यांत आलाः—

" १ पंडितजींच्या निधनामुळें आम्हां माशेलनिवासी सर्व लहानथोर माणसांना परमदुःख होत आहे, आणि पंडितजींच्या कुटुंबांतील व आप्तवर्गांतील माणसांवर कोसळलेल्या तद्विषयक वियोग-दुःखाचे वांटेकरी आम्ही आहोंत.

( २ ) पंडितजींनीं मिळविलेल्या कीर्तींत त्यांचे विद्वान व सुशील पुत्र अधिकच भर घलून पंडित महेश्वरबावांपासून चालत आलेला सुखठणकर घराण्याचा लौकिक वाढवितील व आमच्या गांवाचें नांव अधिक उज्ज्वल करतील अशी आशा आम्ही सर्वजण करीत आहोंत. "

स्मारक योजना-ता १३-१-३५ रविवार रोजीं येथील धी गोवा हिंदु ॲसोशिएशन ह्या संस्थेच्या विद्यमानें गोमन्तकाचे अद्वितीय संस्कृतज्ञ पंडित कै. भवानीशंकरशास्त्री सुखठणकर यांच्या निधनाबद्दल मुंबईतील अखिल गोमंतकीयांना वाटत असलेलें दुःखप्रदर्शन करण्याकरितां, श्री. सखाराम वा. शिरगांवकर, एम्. ए., यांच्या अध्यक्षतेखालीं संस्थेच्या दिवाणखान्यांत दुखवटयाची सभा भरली होती. सुरवातीस शास्त्रीबुवांचें उज्वल व आदर्श चरित्र सांगून व त्यांच्या गुणांचें वर्णन करून अध्यक्षांनीं दुखवटयाचा ठराव मांडला. ठरावास दुजोरा देण्याकरतां श्री. बा. द. सातोस्कर, गणपतराव नाईक, आर. लोथेस, वर्दे वालावलीकर, वि. र. शेळडेकर, वगैरेंचीं भाषणें झालीं व ठराव पास झाला. ठरावास दुजोरा देतांना श्री. सातोस्करांनीं अशी सूचना केली कीं, शास्त्रीबुवांचें स्मारक होण्याकरितां मॅट्रिक परीक्षेंत संस्कृत घेऊन पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास एक भवानीशंकर-शिष्यवृत्ति ठेवावी व त्याकरितां एक स्मारकफंड उभारावा. त्यांच्यानंतर बोललेल्या सर्व वक्त्यांनीं या सूचनेस पुष्टी दिली. डॉ. व्यं. पा. कामत, श्री. ग. वि. लाड, श्री. न. प्रभु वगैरेंचीं भाषणें झाल्यावर कशा तऱ्हेनें शास्त्रीबुवांचें स्मारक करावें,ह्याची योजना तयार करून ती गोमन्तकीयांच्या सभेपुढें मांडण्याकरितां पुढीलप्रमाणें कमिटी निवडली गेली व सभेचें काम संपलें.

श्री. ग. वि. लाड, डॉ. व्यं. पां. कामत, श्री. अ.क. प्रियोळकर, बी.ए., श्री. वि. आ. भोंसले,बी. ए., श्री. स. वा. शिरगांवकर, एम् ए., श्री. बा. द. सातोस्कर, (सं. चिटणीस), श्री.शि. कृ. सांखोळकर, बी. ए. एस्. टी. सी. (सं.चि.), श्री.आर्. लोथेस, श्री. मु. के. शिरोडकर, श्री. शा. ना. माशेलकर.

---


# मंगेश ब्रदर्स

**यांचे**

**हातानें बनविलेले**

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले,सांबार,मिरची भुकी (तिखट),हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**

# संत सोहिरोबा आंबये यांचें स्मारक

हिंदुस्थानांत जे चांगल्यापैकीं साधु होऊन गेले, त्यांत सारस्वत ज्ञातींत जन्मास आलेले सोहिरोबा आंबये यांची प्रामुख्यानें गणना होते, यांत शंका नाहीं. या पुण्यपुरुषाचा जन्म सावंतवाडी संस्थानांत बांदें गांवीं झाला हें सर्वांस माहित आहे. गेल्या नाताळांत सहज बांदें गांवीं जाणें झालें, त्या वेळीं मुद्दाम जाऊन सोहिरोबांचें घर व पादुका पाहिल्या. तो प्रकार पाहून मन उद्विग्न झालें. घर पडक्या स्थितींत असून स्मारकासाठीं म्हणून बांधलेला चौथुरा पडत असलेला दिसला. ज्या सोहिरोबा आंबयांची कीर्ति उत्तरहिंदुस्थानपर्यंत पसरली आहे, त्यांचें कायमचें स्मारक करण्याच्या बाबतींत सारस्वत ज्ञातीकडून हेळसांड व्हावी ही गोष्ट अत्यंत शरमेची आहे. त्यांचें कायमचें स्मारक उभारण्यास सुमारें तीन हजार रुपये लागतील व कोणीही पुढाऱ्यानें मनावर घेतल्यावर हें काम सहज होण्यासारखें आहे. सारस्वत ज्ञातींतील पुढाऱ्यांनीं हा प्रश्न जिव्हाळ्यानें हातीं घेऊन सोहिरोबांच्या स्मारकास लवकर मूर्त स्वरूप द्यावें, या उद्देशानें या ही विनंती प्रसिद्ध करीत आहें. तरी या प्रश्नास चालना देऊन पुढारी आपले विचार प्रदर्शित करून स्मारकाच्या योजनेस पाठिंबा देतील अशी आशा आहे. स्मारककमिटीस मी व्यक्तिशः शक्य ती मदत करण्यास तयार आहें.

महादेव रघुनाथ सडेकर, वकील
कुडाळ.

---


## न्यू डायमंड इलेक्ट्रिक वर्क्स


**इलेक्ट्रिक इंजीनियर्स, लायसेन्स्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**

१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटर:—बी. पी. नाडकर्णी

**आश्रयदात्यांस विनंती:—**

आपल्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतीनुसार बंगले, घरें, चाळी तसेंच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमाचीं कामें उत्तम प्रकारें केलीं जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या.



**एव्हर रेडी पॉकेट टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे **स्वस्त तितकें महाग** हलक्यासलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व "इलेक्ट्रिक कन्झम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.

**ता. क.**:—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतीनुसार करण्यांत येतील.




वर्ष १४ वें    मार्च-एप्रिल-मे-जून १९३५    अंक २–३ रा

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

## नवीन कोरे रेकॉर्डस् व
## ग्रामोफोन मशीन्स

**मिळण्याचें एकच ठिकाण.**

ॲथॉराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,


## रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई

**फोन नं. २४१४१**

नवीन व कोऱ्या रेकार्डस्चा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:—S. M. Varde, B.A., LL.B.




## द. कृ. सांडू ब्रदर्स

चेंबूर यांचा मुंबई

# बाळंतकाढा

नं. १ पहिले १० दिवसांत घेण्याचा

नं. २ १० दिवसानंतर घेण्याचा

सर्वत्र वापरा मिळतो

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

**कलकत्ता**


स्थापना १९१० ] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमा-कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरिएंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहू एकच कंपनी गणली जाते. " हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स् पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटा:—

भेटण्याची जागा व वेळ:—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव,** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टँ. टा. )

**आर. एम्. दिवाकर आणि कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
**माझगांव, मुंबई नं. १०**



कै. विष्णु जनार्दन शिरोळकर. यांच्या उदार देणगीमुळें चिकित्सक समूहाच्या हायस्कूलला स्वतःच्या मालकीची जागा मिळाली.



कै. वामनराव सखाराम कुवाडकर. यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. विनायकराव यांनीं सा. वि. स. मंडळीस चार हजार रु. दिले.

सं. २८–213
ता. २३/८/३८
आणे.

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १४ वें — मार्च-एप्रील-मे-जून १९३५ — अंक २-३ रा

## 'बालिकेचा सवाल'

( चाल-दिंडी )

चार वर्षांची सान रम्य पोर
रूप साधें गोजिरें वर्ण गौर
हास्य विलसे त्या मुखीं सतत फार
काय नोहे स्वस्थीति तिला सार १

एक दिन ती खेळण्या गेलि वेगें
सखी शेजारीं होति 'बनी रेगे'
लुटपुटीचा संसार मांडियेला
खेळण्या त्या रंगल्या दोन्हि बाला २

बनी वदली आमुच्या बालिकेला
'पहा माझी खेळणीं–बाहुलीला
दिला बाबांनीं मला हा सुरेख
तुवां नाहीं कां सांग खेळ एक ?' ३

तोंच–वदली 'ना', गृहा आलि बाला
म्हणे मातेला 'खेळ देइ माला
कुठें बाबा ? मज सांग सत्वरी गे
खेळ देण्या ते येत नाहिं कां गे' ४

हृदय मातेचें येइ भडभडून
जवळ घेई पोरिला कळवळून
उत्तराला तिज नाहिं उरे भान
म्हणुनि बोथट मम होय काव्य बाण ५

# मुंबईची येती परिषद्

संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें अधिवेशन मुंबई येथें भरविण्याची योजना झाली आहे. ही योजना करणाराचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों. पंचवीस वर्षांपूर्वी परिषद् भरविण्यांत आली, त्या वेळेपेक्षां आज अनेक प्रकारें सामाजिक प्रगति झाली आहे.त्या अर्थी अशा परिषदेचें कांहीं एक प्रयोजन नाहीं असा एक आक्षेप परिषदेवर घेण्यांत येतो. परंतु हा आक्षेप अगदीं अनाठायीं आहे असें आम्हांस वाटतें. गौड-सारस्वत या नांवानें ओळखले जाणारे जे पांचसहा ज्ञातिसंघ किंवा भेद अगर पोटभेद आहेत, त्यांच्यांत परस्परांशीं अन्नव्यवहार व विवाहसंबंध घडून येऊन त्यांचें एकीकरण व्हावें हा परिषदेच्या सुरवातीचा एक प्रमुख हेतु होता. पूर्वी मंगळूर येथें भरलेल्या परिषदेंत त्यांपैकीं दोन पोटभेद अगर भेद वगळले होते व त्यांचा गौड सारस्वत या नांवानें ओळखल्या गेलेल्या जातींत समावेश होत नाहीं, असें ठरविल्याप्रमाणें झालें होतें. ती चूक सुधारण्याकरितां बेळगांव येथील संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद भरून हे सर्व ज्ञातिसंघ मिळून एकच जात होते, या तत्त्वाला सामान्यतः सर्वांकडून मान्यता मिळाली. वस्तुतः सहभोजनाला पूर्वी फारसा विरोध नव्हता व जो थोडासा विरोध होता, तो काळाच्या ओघानेंच बहुशः दूर झाला असून तो साफ नाहींसा करण्यास परिषदेनेंही बराच हातभार लावला यांत शंका नाहीं.

विवाहसंबंधाचा प्रश्न त्याहून बिकट होता. आज आमच्या जातींत तरुण मुलांनीं व मुलींनीं अन्य ज्ञातींतील किंवा धर्मांतीलही वधूवरांशीं विवाह केल्याचीं कांहीं उदाहरणें आढळतील. परंतु परिषदेचा उद्देश ज्या प्रकारचे विवाह घडवून आणण्याचा होता तसे विवाह मात्र झालेले आढळत नाहींत. परिषदेचीं अधिवेशनें बंद पडलीं हें देखील या परिस्थितीचें कारण असणें संभवनीय आहे.

परिषदेच्या योगानें आमच्या जातींतील निरनिराळ्या उपसंघांतील कार्यकर्ती आणि प्रमुख माणसें एके ठिकाणीं वर्षांतून एकदा तरी जमत. ज्या ठिकाणीं परिषद भरत असे, त्या ठिकाणीं तरी वर्षांतील बरेच महिने परिषदेचा उद्देश प्रामुख्यानें लोकांच्या डोळ्यांसमोर राहात असे. गेल्या अठरा वर्षांत परिषद् बंद झाल्यामुळें फार अनिष्ट परिणाम झाला. निरनिराळ्या केंद्रांतील व पोटकेंद्रांतील कार्यकर्ते आपापल्यापुरता विचार करूं लागले. त्यांतच कांहीं माणसांनीं आपण साफ निराळे आहों असें प्रस्थापित करण्याचे प्रयत्न आरंभिले. कुडाळदेशकर गौड अणि कर्नाटक सारस्वत यांची वृत्ति आज पाहूं गेलें तर जरी एकीकरणाचें तत्त्व त्यांना मान्य असलें, तरी त्यांच्या बहुतेक कार्याची मर्यादा अतिशय आकुंचित झालेली आढळून येईल. या परिस्थितीचा परिणाम आणखी एक दोन पिढ्यांत परिषदेच्या मूळ उद्देशाची पूर्ण हानि केल्याखेरीज राहणार नाहीं. तसें होऊं नये, सर्व ज्ञातिसंघांतील सार्वजनिक कार्य करण्याची वृत्ति असलेलीं माणसें एकत्र यावीं, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत पसरलेल्या आमच्या माणसांना परस्परांची माहिती व्हावी, हें कार्य साधण्यास परिषदेइतकें सुलभ व चांगलें साधन आढळणें कठीण आहे.

आजच्या राष्ट्रीय वृत्तीच्या काळांत ज्ञातिपरिषदांसारख्या संस्थांना महत्त्व देणें योग्य नाहीं, असा दुसरा एक आक्षेप घेण्यांत येतो. वस्तुस्थिति खरोखरच तशी असती, तर हा आक्षेप योग्य असता. परंतु आमच्या वाढत्या राष्ट्रीय वृत्तीची वाढ कशी होत आहे याचा विचार केला, तर ज्ञातिसंघांची घटना करणें व राष्ट्राच्या हितासाठीं तरी स्वज्ञातीच्या घटनेला योग्य वळण देणें, हें एक राष्ट्रीय कर्तव्य आहे असें आढळून येईल. आम्हांस आजच्या राजकीय वादांत पडावयाचें नाहीं. परंतु हिंदुस्थानांत गेल्या

पंधरा वर्षांत जी राजकीय सुधारणा झाली आहे व पुढें होण्याचें घाटत आहे, त्या सुधारणेच्या पद्धतीमुळें हिंदु व मुसलमान, ब्राह्मण व ब्राह्मणेतर, स्पृश्य व अस्पृश्य, स्वजातीय व परजातीचा या भेदांना महत्त्व आलें असून त्या भेदांकडे दुर्लक्ष्य करणें आत्मघातकी-पणाचें किंबहुना राष्ट्रालाही विघातक आहे. अन्य धर्मीय किंवा अन्यजातीय अशांना विरोध कर-ण्यासाठीं नव्हे, तर स्वतःच्या संरक्षणासाठीं तरी निरनिराळ्या धर्मांच्या व जातींच्या माणसांनीं आपापली संघटना करणें जरूर आहे. तशांत आम्हां दाक्षिणात्य गौड सारस्वत ब्राह्मणांची संख्या थोडी असून आमची परिस्थिति देखील फार विचित्र आहे! दक्षिण हिंदुस्थानांत ज्या द्रवीड ब्राह्मणांचा भरणा फार मोठा आहे, त्यांच्यांतील भेदभावना बऱ्याच अंशीं दूर झालेल्या असून उरलेल्या दूर करण्याचे व स्वतःचें संघटन करण्याचे त्यांचे प्रयत्न सारखे चालू आहेत. आम्हांकडे कोणत्याही भेदाचें किंवा पोट-भेदाचेंही ब्राह्मणत्व कबूल करण्याचें टाळवेल तितकें टाळावें अशी त्यांच्यांतील बहुजनसमाजाची वृत्ति दिसून येते. स्वच्छता, शुद्धता, नीति, सुसंस्कृतपणा वगैरे बाबतींत सारस्वतांच्या अंगीं शक्य तितके दोष चिकटविण्याची प्रवृत्ति नव्या वाङ्मयांत व त्या वाङ्मयाच्या अनेक शाखांत याच कारणानें घुसलेली आपणांस आढळते. निरनिराळ्या ज्ञातींचा निर्देश करतांना सारस्वतांचा उल्लेख क्षात्रज्ञातींच्या मागाहून करावा व त्यांना ब्राह्मणांपेक्षां निराळें लेखावें, असें सरसहा घडतें. हा प्रकार बुद्धिपुरःसर घडत नसावा. पण तो तसा सहजगत्या घडतो हें फारच वाईट. कारण त्यामुळें सारस्वतांना गौण लेखण्याचा सरावच पडून गेला आहे, असें सिद्ध होतें. एकीकडून दाक्षिणात्य द्रवीड ब्राह्मण व इतर यांचा कल सारस्वतांना ब्राह्मणवर्गाच्या बाहेर ढकल-ण्याचा आहे, तर दुसरीकडून ब्राह्मणेतरांत त्यांचा समावेश करण्यास कोणीच तयार नाहीं. विद्यार्थ्यांस मिळणाऱ्या कित्येक शिष्यवृत्त्या ब्राह्मणांस मिळा-वयाच्या त्या गौडसारस्वतांना देऊं नयेत, असे स्पष्ट सरकारी व निमसरकारी ठराव आहेत. उलट ब्राह्मणेतरांसाठीं ठेवलेल्या खास सवलती व शिष्य-वृत्त्या गौडसारस्वतांना मिळूं शकत नाहींत. आमचा बुद्धिजीवि बहुजनसमाज नोकऱ्यांच्या मागें लागला आहे, हें चांगलें कीं वाईट हा विचार निराळा. परंतु एकीकडून ब्राह्मण म्हणविणाऱ्या समाजांकडून अव-हेलना व दुसरीकडून ब्राह्मणेतरांत अंतर्भाव होत नाहीं, या अवस्थेंत आमच्यांतील बेकारीचें प्रमाण वाढत आहे. आम्ही संघटित झाल्याखेरीज ही दुरवस्था टळणार नाहीं. संघटना करून ती कायम ठेवण्याचा मार्ग काढणें अवश्य आहे. देश पुढें जात असला, तरी हिंदुसमाजांतील जातिभेद कायम आहे. इतर जाति संघटित होत आहेत. अशा वेळीं सारस्वतांसारख्या संख्याबळानें व द्रव्यबळानें दुबळ्या समाजानें औदा-र्याचा आव घालणें म्हणजे आपला दुबळेपणा वाढ-विणें होय. आजची प्रगति पूर्णतेला जाऊन जातिभेद दूर करण्याचे निकराचे प्रयत्न लवकर म्हणजे आणखी पंचवीस वर्षांत होवोत, किंवा कालावधीनें म्हणजे पन्नास वर्षांनीं होवोत, तसे प्रयत्न होतील त्या वेळीं सुसंघटित व सामर्थ्यवान जातीच ते प्रयत्न यशस्वी करूं शकतील. जपानच्या सामुराईप्रमाणें सामर्थ्यवान जातींनीं आपण होऊन जातिभेद दूर करून आपल्या कनिष्ठ गणलेल्या बांधवांना जवळ केल्यानेंच राष्ट्राला जोमदारपणा येईल. जातिभेद दूर करण्यासाठीं तरी जातींनीं सुसंघटित बनून जातिध्वंसन केलें पाहिजे. नाहीं तर काळाच्या ओघांत कांहींनीं जातिभेद माना-वा व जातींच्या कोंडाळ्यांत बसावें आणि इतरांनीं मनसोक्त वागून जातिभेद मोडल्याची फुशारकी मा-रावी हा क्रम आज देखील सुरू आहे. सामाजिक क्रांति किंवा उत्क्रांति हा समाजसुधारणेचा उपाय होय. सुसंघटित समाजच अशी क्रांति किंवा उत्क्रांति करूं शकतो. विस्कळित आणि पांगलेल्या समाजांत अरा-जकता (anarchy) असते. अशा समाजांत केवळ

लाथाळी चालते. त्यापासून समाजाला सामर्थ्य न लाभतां दुबळेपणा येतो. त्याचा थोडा बहुत अनुभव आज आपणांस येत आहे. इतर विद्यासंपन्न समाजांच्या मानानें सारस्वत राष्ट्रकार्यांत आज आपणांस मागसल्यासारखे दिसतात त्याचें खरें कारण म्हणजे आमची परस्परांविषयींची अनास्था होय. ती दूर करण्याच्या प्रयत्नास परिषदेची पुष्कळच मदत होण्यासारखी आहे.

परिषदेसंबंधीं आणखी एकाच आक्षेपाचा विचार करून हा लेख आटोपता घेतों. परिषदेनें गाजावाजा मात्र होतो; माणसें एकत्र जमून लांबरुंद भाषणें करतात; खरें कार्य कांहींच होत नाहीं; असा एक आक्षेप असून तो फार महत्त्वाचा व विचार करण्यासारखा आहे. राष्ट्रीय सभेवरही हाच आक्षेप कैक वर्षे होता व अद्याप थोडाबहुत आहेच. परंतु त्यामुळें अशा साधारण सभेची आवश्यकता मात्र नाहींशी होत नाहीं. कार्य करण्यासाठीं कार्य करणारीं माणसें एकत्र यावीं लागतात व त्यांच्या कार्यास इतरांच्या स्पष्ट सहानुभूतीची अपेक्षा असते. गाजावाजा किंवा भाषणें करणें हा दोष नाहीं; त्यांच्या अंतीं कांहींच निष्पन्न न होणें हा दोष होय. उत्सवप्रियता हा मानवी धर्म आहे. उत्सवाबरोबर उत्पन्न होणारा उत्साह कामीं लावला तर उत्सव कारणीं लागला; नाहीं तर व्यर्थ गेला. हें जाणून परिषदेचा उपयोग सदोदित वर्षांतून बारा महिने कार्य करून ज्ञातिहित साधणारी योजना करणें इष्ट आहे. कार्य करणाऱ्या माणसांनीं वर्षभर काम करावें. तरुणांची वाढती निराशा, बेकारी, नवीन उत्पन्न होणाऱ्या सामाजिक अडचणी, ज्ञातीची आर्थिक परिस्थिति, आपसांतील नेहमींचें दळवळण वगैरे गोष्टींत अवश्य ती कामगिरी केली जाईल; हीं कामें करणारांना उत्तेजन दिलें जाईल; त्यांच्या कार्याची माहिती सर्वांना मिळेल; यासाठीं सदोदित चालणारी योजना करून, त्या योजनेचा परिणाम दरसाल, किंवा एकदोन वर्षांआड सर्व ज्ञातीला परिषदेंत मिळेल अशी व्यवस्था परिषदेनें केल्यास परिषदेच्या कामीं उत्साह व पैका यांचा व्यर्थ व्यय होतो असें म्हणण्यास जागा राहणार नाहीं.

परिषद ही सर्वांची आहे; त्यासाठीं जेथें मतभेद असतील तेथें शक्य तितकें एकमेकांशीं जुळतें घेणें जरूर आहे. आज असे कित्येक नवीन सामाजिक प्रश्न उद्भवले आहेत कीं, त्यांच्या बाबतींत तीव्र मतभेद होण्याचा संभव आहे. अशा गोष्टींचा वाद शक्य तितका टाळावा. टाळतां न आला तर बहुमतानुसार निकाल होणें, आजच्या लोकमताच्या काळांत वाजवी आहे. अशा निकालानें बिथरल्याशिवाय किंवा दुफळी केल्याशिवाय बहुमताचा विजय मान्य करून बहुमत आपल्या बाजूस वळविण्यासाठीं प्रयत्न करणें हा श्रेयस्कर मार्ग होय. तथापि मतभेदाची बाब फारच तीव्र असली तर यशस्वी मताच्या मार्गांत खोडा घालून आपल्या व आपल्या विरोधकांच्या शक्तीचा अपव्यय न करतां त्यांना त्यांच्या मतानुसार कार्य करण्यास मोकळें सोडून आपण आपल्या समानशीलांसह आपल्या मतानुसार लोकसेवा करावी. लोकसेवेचें हें खरें मर्म ध्यानीं घेऊन परिषदेचें कार्य केल्यास परिषद यशस्वी आणि स्वज्ञातीला कल्याणप्रद होईल.

# दैवाचा खेळ !

[ ले. कु. नीरा मोंडकर, बी. ए., बी. टी. ]

"असा राग येतोय् या तिन्नीचा ! कान उपटून चांगले हातांत द्यावेत ! " श्यामा त्रासिकपणें म्हणाली. आज तिच्या नसानसांत उत्साह दिसत होता. जयंताची व तिची ओळख होऊन आज बरोबर वर्ष झालें. ती सहवासोत्तर विवाहाची पुरस्कर्ती होती. प्रथमदर्शनी प्रेमावर तिचा मुळींसुद्धां विश्वास नव्हता; कारण असले बरेचसे विवाह परिणामीं घातुक ठरलेले तिच्या दृष्टोत्पत्तीस आले होते. एकमेकांचे गुणावगुण समजून प्रेमाचें पारडें जड झालें, तरच तें चिरकाल टिकेल, नाहीं तर नावीन्याचा भर ओसरल्यावर प्रेम धुक्यासारखें विरळ होत जाईल. तिचे वडील या बाबतींत समंजस व सुधारणाप्रिय असल्यामुळें त्यांनीं तिला पूर्ण मोकळीक दिली होती. स्वातंत्र्यानें नीतीला धक्का बसतो असें म्हणणाऱ्या कोत्या लोकांपैकीं ते नव्हते. जनसंपर्कापासून दूर राहिलेल्या योग्याचें शील शाबूत राहिलें, तर त्यांत नवल काय ? मोहाचा पडदा दूर करून आत्मतेज फांकेल तेव्हांच नीतीचे गोडवे गावे.

" कां हो बाईसाहेब, दुसऱ्याच्या कानांवर एवढ्या उदार झालां ? स्वतःचे दोन पुरत नाहींत वाटतं जयंताचे प्रेमाचे बोल ऐकायला ! हो, थोड्या वेळानं माझ्या डोळ्यांवरही उदार व्हाल–पण उसनं घेऊन भागणार नाहीं, बाईसाहेब ! परतफेड करावी लागेल. आणि बऱ्याच लौकर आठवण झाली माझी आपल्याला. मला बोलावलं तरी होतंस का ? मी आपण होऊन आलें म्हणून ! " तिन्नी आंत येऊन म्हणाली.

" खरंच, खरंच मला वाटलं, मीं गड्याला पाठवलं; आणि तुला माझी पर्वा नाहीं असं वाटून माझा सारा राग होता. "

" तर तर ! तुला बरं सर्व वाटतं ! आणखी नाहीं कांहीं वाटलं ? "

"हो हो, वाटलं तर ! तुला केव्हां सांगेन असं झालंय् मला ! माझं मन उत्साहानं कांठोकांठ भरून कसं उतून जातंय तें तुला कसं सांगूं ? "

"हो हो, पण काव्यरसांत स्वतःबरोबर मला बुडवूं नकोस. माझ्या नाकातोंडांत रस जाऊन मी गुदमरेन. मला समजेल असं कोरड्या शब्दांत सारं सांग. पण मी आधीं विचारतें, तूं या वेळीं इथं कशी ? Appointment चुकली वाटतं ? "

" तिन्ने, तूं अगदीं ही आहेस. "

"म्हणजे मी She ची He कधीं झालें ? "

"बरेच तारे तुटायला लागले कीं ! राहूं दे तें आतां. जेवायला राहशील ना ? मी पाठवतें निरोप घरीं. तुझं अळंटळं चालणार नाहीं. "

"एवढं काय विशेष आहे ? "

" विशेष आहे म्हणून तर सांगतें. तुला कोरडं सांगायचं, म्हणजे आज आमचा वाङ्‌निश्चय आहे. जयंत आणि त्यांचा तो मित्र राजेंद्र जेवायला येणार आहेत. माझ्या खोलींत चल. आजच्या दिवशीं आणलेलं प्रेझेंट दाखवतें, " असें म्हणून श्यामा तिन्नीला जवळ जवळ ओढीतच आपल्या खोलींत घेऊन गेली.

"आनंदी फुलपाखरूं आहेस बाई तूं ! देवानं सदोदित तसंच तुला ठेवावं." तिन्नी उर्फ त्रिवेणी कौतुकानें तिच्याकडे पाहत म्हणाली, " ओहोहो ! काय पण आजीबाई आशीर्वाद देणारी ? मी देऊं का तुला एखादा आशीर्वाद ? "

" नको नको. त्यावांचून कांहीं अडलं नाहीं."

" काय Love present आणलंस तें दाखव."

" पाहा ना ! " एक सुंदर मखमलीची डबी तिच्या हातीं देत श्यामा म्हणाली,

"नुसती डबीच किती सुंदर आहे. मग त्यांतील वस्तु तर अप्रतिम असणारच. आणि देणारीचा हात त्याहून मोहक. असल्या भाग्याचा देवांनाही हेवा वाटेल ? "

" काव्यरस समजत नव्हता ना ? आत्तां हा कोणता रस पाघळतोय् ? " श्यामा चेष्टेनें हंसत म्हणाली.

" अग 'पुष्पसंगें मातीस वास लागे.' पण श्यामे, आंगठीवरचीं अक्षरं ग कुणीं सुचवलीं ? ही आंगठी का

तुम्हाला One heart : One mind करून टाकणार ? "

" बरं बरं; पण माझी idea तुला कशी काय आवडली ? "

" छान छान ! अगदीं पसंत !"

× × × *

जेवणाचा बेत अगदीं पूर्णपणें सुधारकी होता. दोन्ही घराणीं साहेबी थाटांत राहत असत. अर्थात् संकोचाचें कारण नव्हतें. बायकापुरुषांच्या पंक्ति समोरासमोर होत्या. रोज भाटासारखी वडबडणारी श्यामा आज मुखस्तंभ बनली होती ! "आनंदाचे घुटके गिळते आहेस वाटतं ?" तिला डिंवचीत हळूच त्रिवेणी म्हणाली. श्यामेच्या तोंडांत घांस होता. पण त्रिवेणीची थट्टा तिला इतकी आवडली, कीं खुदकन् हंसण्याच्या नादांत तिला ठसका लागला.

" काय ग श्यामे, जेवण सुद्धा जाईना कीं काय ?"

" भरलेल्या पोटावर जेवायचं कसं, हा प्रश्न पडलाय् तिला. " तिचे वडील म्हणाले.

" डोळे नको वटारूंस माझ्यावर. बाबा सुद्धां असंच म्हणताहेत, " त्रिवेणी मिस्किलपणें म्हणाली.

" कांहीं नाहीं म्हणत बाबा, तुझीच सर्व मखलाशी आहे. "

"मी असं विचारतों, कीं तूं आज चूप कां ?" पुन: तिच्या वडिलांनीं विचारलें.

"हें हो काय विचारतां? तुमच्यासारख्यांनीं तरी असं विचारूं नये. आनंदांत मन गुरफटल्यावर बोलायला शब्द सुचणार कसे? दुसऱ्याचे ऐकण्यास मात्र टवकारलेले कान जाग्यावर आहेत. " त्रिवेणी म्हणाली.

"अस्सं ! बरं तर जयंत, मग तुमचा पुढचा विचार काय ठरला ? एम्. ए.च्या टर्म्स भरणार का ?"

"मला वाटतं बाबासाहेब, आणि अण्णांचंही म्हणणं आहे कीं आय्. सी. एस् करितां ट्राय करावा. आमच्या प्रिन्सिपालनीं माझी पाठ पुरवली आहे. Age limit ची अडचण येऊं म्हणून लौकर निघावं तितकं बरं. "

"म्हणजे विवाह उरकून मग ना ? "

"तसं केलं तर सहा महिन्यांवर जाणं ढकलावं लागेल. नकोच तें. हिचं शिक्षणही तोंपर्यंत पुरं होईल. काय रे राजन् , तुला कसं वाटतं ?

"पाहा बुवा, पण अभ्यास करायला मन ठिकाणावर राहील ना ? या बाबतींत श्यामाबाईचं मत घेणं जास्त श्रेयस्कर नव्हे का ? ज्याचं मनुष्य त्याला ठाऊक,म्हणून म्हणतों. कां श्यामाबाई, खरं ना ? "

"मला नाहीं ठाऊक !" श्यामा वरवर हंसून म्हणाली. पण तिचा चेहरा बराचसा उतरला. भावि वियोगाची कल्पना आठवून तिच्या अंत:करणाला लहानसा धक्का बसला. कल्पना आणि व्यवहार यांत जमीन अस्मानाचा फरक असतो. गोड तंद्रींत गुंग असलेल्या श्यामाला आपलें कदाचित् विस्मरण पडेल म्हणून भवितव्यतेनें तिला तो एक पहिला बारीकसा चिमटा घेतला. तिच्या अंत:करणाचा संदेश जयंताला तावडतोब पोंचला. तंतुवाद्यांच्या एका तारेला गति दिली, कीं बाकीच्यांतून झंकार निघूं लागतात. तसाच तिच्या अंत:करणावर झालेला आघात त्याच्या अंत:करणावर प्रतिध्वनित झाल्याशिवाय राहिला नाहीं; पण त्यानें चेहऱ्यावर कांहीं एक दिसूं दिलें नाहीं. मनाचा हळूवारपणा वाटतांना पुरुष गैरहजर असावेत; नाहीं तर कोणत्याही दु:खद प्रसंगाचा ठसा स्त्रीइतकाच पुरुषाच्या चेहऱ्यावर उमटला असता. तिला समजुतीच्या गोष्टी सांगून धीर देण्यास जयंत आतां फार आतुर झाला. जेवण झाल्यावर त्रिवेणी निघून गेली. राजेंद्र व बाबासाहेब फोनो ऐकत बसले. आणि श्यामा-जयंतची एकदांची भेट झाली. टेबलापाशीं एका खुर्चीवर श्यामा सचिंत बसली होती व समोरच्या पुस्तकाचीं पानें विमनस्कतेनें चाळीत होती. जवळच एका बशींत नुक्तेच तयार केलेले विडे होते.

" कां ? आज दिवाणखान्यांत यायची लहर नाहीं वाटतं लागत ? वाट पाहिली आम्हीं आणि वाटलं आपण आपलं कोडग्यासारखं जावं. काय करतां ? डोंगर जागचा हालेना, म्हणून महंमद उठून त्याच्याकडे जातो म्हणतात ना."

" खरंच का पण ? मला नाहीं हें खरं वाटत. नाहीं तर मला सोडून–निदान देवाधर्माच्या साक्षीनं मला आपलीशी केल्यावांचून जायचा बेत केला नसता. "

" त्याकरतांच का हा सारा रुसवा ? जणूं काय मी स्वत:साठींच जाणार आहें. "

" तर कुणा माझ्यासाठीं जाणार ? "

" अर्थात्; तुला कलेक्टरीणबाई म्हणून मिरवायला सांपडावं म्हणून. पुरुषाचा पराक्रम स्त्रीसाठींच नसतो का ? "

"पुरे झालं; अशा चकवण्यानं माझी परवानगी उपटायचा बेत दिसतो. पण मी अशानं फसायची नाहीं."

"वेडी तर नाहींस तूं ? दोन वर्षं तीं काय ! भर्रकन् जातील. मनानं मी इथंच आहें.आणि दर आठव्या दिवशीं माझा दूत तुला संदेश पोंचवील. मग आतां 'हो' म्हण पाहूं ! श्याम, काय बरं असं ? तुला माझ्याबद्दल अविश्वास का वाटतो ? सांग बरं मन मोकळं करून. तुझ्या अश्रूंनीं माझा पाय मागं खेंचतो."

" मला काय वाटतं तें मी काय सांगूं ! आज सकाळपासूनच्या आनंदाला कोणाची दृष्ट तर लागली नाहीं ! फार हंसल्यानंतर रडायची पाळी येते म्हणतात. माझ्या आनंदाला आज सीमा राहिली नव्हती, तोंच इतक्या लौकर वियोगाची कल्पना दत्त म्हणून समोर उभी राहिली. मला आपल्या प्रेमाची मुळींच शंका नाहीं. पण कांहीं जणींच्या संसाराचे उडालेले बोजवारे पाहिले म्हणजे चटका बसतो. "

"मग स्वतःच चल माझ्या बरोबर सक्त देखरेख करायला. वेडी कुठली; नसत्या कुशंकांचीं जाळीं मन पसरायला लागलं,कीं त्यांतून सुटायला नको व सुखाचा क्षणही लाभायला नको. मनुष्यानं नेहमीं सुखाची आशा करीत राहावं. आतां मी जाईपर्यंत विचार करायला तुला मुळींच अवसर देणार नाहीं.सर्व कार्यक्रम अगदीं आंखून ठेवणार. बोट सुटेपर्यंत तुझ्या सहवासांत वेळ घालवायचा. कबूल ? आणखी एक तुला आनंदाची बातमी सांगतों. राजेंद्र माझ्याबरोबर बॅरिस्टरच्या परीक्षेकरतां येणार आहे. त्याचा-माझा स्नेह तुला ठाऊक आहे. डोळ्यांत तेल घालून मला जपायला त्यालाच सांग, म्हणजे झालं. आतां तरी मनावरंच दडपण दूर झालं कीं नाहीं राणीसाहेबांच्या ? "

" एकूण गोड बोलून आपला हेतु साध्य करून घ्यायचा आहे. इतकं ठरवून टाकल्यावर माझ्या नकारानं जाणं कसं रहित होणार ? पुरुषी मनाची घडणच निराळी यांत शंका नाहीं. " इतक्यांत तिची नजर विड्याकडे वळली. "हौसेनं तयार केलेला विडा वाळला कीं, " असें म्हणत तिनें तो त्याच्या हातीं दिला. त्यानेंही तो प्रेमानें खाल्ला व तिच्याकरितां मुद्दाम करवून आणलेली आंगठी तिच्या बोटांत घातली. त्या आंगठीचे हिरे बहुमोल होते. ती आंगठी व तिचा हात यांत जास्त सुंदर कोणतें, कीं दोन्हींचा मिलाफ मोहक यावर तो विचार करीत असावा. श्यामचीही दृष्टि आंगठीवर खिळून राहिली होती. वर मान केल्याबरोबर दोघांची दृष्टादृष्ट झाली. तेव्हां तिच्या चेहऱ्यावर लज्जेची लाली पसरली. ती लपविण्याकरितां ती म्हणते, "मी देखील असंच कांहीं तरी देणार आहें. मग कोणतं सरस तें सांगावं. " तिनें दिलेली आंगठी उलटी सुलटी करून पाहिल्यावर जयंतच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाले, "आहे बुवा रोमॅंटिक कल्पना. असं गोंडस प्रेझेंट रोज मिळेल तर कोण नको म्हणेल ? "

× × ×

जयंत व राजेंद्र यांना पोंचविण्याकरितां आलेली मंडळी बॅलर्ड पिअरवर गोळा झाली होती. पुष्पहारांचा नुसता ढीग पडला होता. श्यामा-जयंतच्या म्लान चेहऱ्यांचें प्रतिबिंब त्या पुष्पहारांवर पडून तेही कोमजले. जणूं असलें भाग्य आपल्याला पुनः कधीं लाभेल असेंच ते विचारीत होते. पत्राच्या बाबतींत बिलकुल हयगय न करण्याविषयीं श्यामेनें पुनः पुनः बजावलें व राजेंद्रालाही तसेंच विनवून सांगितलें. शेवटीं बोट सुटण्याची वेळ झाली. मंडळी भराभर खालीं उतरली व शिडी काढण्यांत आली. डेकवरून दोघेंही अश्रुभरित दृष्टीनें आपल्या मंडळीकडे पाहूं लागलीं. श्यामा-जयंत बाह्य जगाला पूर्ण विसरलीं. आपल्याला कोणी निर्लज्ज म्हणेल कीं काय, याकडे लक्ष न देतां दृष्टीनेंच एकमेकांचा निरोप घेऊं लागलीं. कांहीं काल तरी या सुखाची व आपली फारकत होणार म्हणून नेत्रांवाटे रूप सांठवून ठेवूं लागलीं. शेवटीं बोट चालूं लागून बरीच दूर गेली, तरी श्यामा शून्य दृष्टीनें तिकडे पाहत राहिली. तिचें मन बोटीभोंवती घिरट्या घालूं लागलें. आतां बोटीचा कोणताही भाग दिसणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यावर ती घरीं परतली.

× × × ×

सकाळची वेळ.श्यामेचे वडील दिवाणखान्यांत आले. टेबलावर टाम्इसचा ताजा अंक पडला होता. इतक्यांत श्यामा चहाचा कप घेऊन आली. वडिलांचें प्रत्येक काम श्यामा स्वत: लक्ष लावून करीत असे."बाबा, वायर आली आहे ना ?" तिनें मोठया उत्कंठेनें विचारलें, "रिझल्ट लागला असेल." ती तार जयंतची पास झाल्याचीच होती. पण तिची थोडी गंमत करण्याच्या उद्देशानें ते म्हणाले," पास झाले असते तर तुला मनोमन साक्षीनं नसतं का कळलं?' तें ऐकून तिचा चेहरा खर्रकन उतरला व आणखी कांहीं दिवस वियोगांत काढावे लागणार म्हणून तिला अत्यंत वाईट वाटलें. पित्याचेंच वत्सल-हृदय तें! तें दृश्य पाहून कळवळलें. " किती ग हळवी तूं ताई, ही घे पास झाल्याची तार ! प्रत्यक्ष खात्री करून घे. आतां पेढयांची ऑर्डर कोणत्या दुकानांत द्यायची सांग. त्याची कशाला आठवण होतेय् म्हणा, सिव्हिलियनची बायको झाल्यावर मग काय काय करायचं त्याचं मनोराज्य चाललं असणार."

"इश्श बाबा !" इतकेंच बोलून शामा खुदकन हंसली. आनंदातिशयानें तिच्या तोंडून ज्यास्त शब्द निघेनात. तें पाहून तिच्या वडिलांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रु आले. प्रेमभरानें तिला जवळ ओढून ते म्हणाले," बेटा, परमेश्वर तुला असाच आनंदांत ठेवो. त्रिवेणीकडे जाण्यासाठीं तुझी चुळबुळ चालली आहे. जा बरं." आज्ञा मिळतांच श्यामा सटकली. आपल्या मैत्रिणीला ती आनंदाची बातमी सांगण्याकरितां ती किती आतुर झाली होती. आनंदाची दामदुप्पट करण्यास किंवा दु:खाची वजाबाकी करण्यास मित्राइतकें स्थिर हृदय कोणतें असूं शकेल काय ?

"हां बाईसाहेब,समोर पाहून चला बरं का.ठेंच लागेल. बाकी तुला ठेंच लागली, कीं तुझ्या मागची मी शहाणी होईन. तरी पण तुझी झळ मला पोंचेल ना ? एवढा धांदरटपण करण्यासारखा कसला ग आनंद झालाय् ? आपले ' ते ' पास झाले वाटतं ?" मागून येणारी तिन्नी श्यामेच्या पाठीवर हात ठेवून म्हणाली.

" तुला ग कुणी सांगितलं ?"

"तुझा चेहरा सांगत नाहीं का? बऱ्याच दिवसांच्या या कोमेजलेल्या फुलावर टवटवी यायला आजच्या सूर्यानं कोणता तरी कानमंत्र सांगितला असावा. आणखी तो दुसरा कोणता असणार ?"

" तर्कशास्त्रांत बरीच प्रगति झालेली दिसते ! ठीक ठीक; बरोबर सांगितल्याबद्दल मार्क शंभर !"

"म्हणजे माझं बरोबर आहे तर ! काढ पेढे."

" अग पण हो, घरीं चल."

× × ×

" राजन्, श्यामनं तुला नमस्कार सांगितलाय्, मला congratulations आहेत. आजचं पत्र अतिशय गोड आहे."

" म्हणून मिटक्या मारतोस वाटतं ?" किंचित् हंसून राजेंद्र म्हणाला. हें बोलतांना त्याचा चेहरा थोडासा खेदयुक्त दिसत होता. आपल्या भावना मित्रापासून लपविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता. श्यामेबद्दल उद्भूत झालेली नवीनच भावना हृदयांतून दूर करण्याचा तो जों जों प्रयत्न करी, तो तों ती तेथें अधिकच खोल जाई. " माझं हें वंडखोर मन मला आवरलंच पाहिजे. मित्रद्रोह ! कोण भयंकर पातक !"

" अहो राजेश्री, आपल्याला Dinner ला जायचंय्; आटप लौकर !" हे जयंतचे शब्द ऐकतांच त्याची विचारशृंखला तुटली."

"चल आलोंच मी."

× × + +

राजेंद्राच्या अंत:करणांतील खळबळीचा एक तुषार सुद्धां जयंतला अजून भिडला नव्हता. त्याचें मन आनंदांत निमग्न होतें. "चकोरपक्षी किती दुर्दैवी. रोज रात्रीं बिचाऱ्याच्या कपाळीं वियोग ठेवलेला. मी आतां हिंदुस्थानांत गेल्यावर कधींकधीं म्हणून माझ्या शामेला दूर करणार नाहीं. आतां फक्त पंधरा दिवस." पण दैव त्याच्या विरुद्ध खेळत होतें. सुखाचा पेला तोंडीं लावण्याच्या आधींच फुटून चुराडा झाला. जयंत एकाएकीं आजारी पडला. " राजन्, माझ्या आजाराची बातमी घरीं कळवूं नकोस.मला थोडंसं बरं वाटतांच निघायचं." पण म्हणतात ना, " मनसा चिंतित कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत्" तशीच बिचाऱ्याची गत झाली. ताप उतरण्याचें चिन्ह दिसेना. आपलें बरेंवाईट झालें, तर शामेची होणारी अनाथ अवस्था त्याला डोळ्यांपुढें दिसूं

लागली. श्यामेसारख्या प्रेममय मुलीची प्रेमाच्या अभावीं दारुण अवस्था होईल ही कल्पनाच त्याला सहन होईना. राजेंद्र त्याच्यासाठीं अविश्रांत श्रम करीत होताच. त्याचे हाल पाहून जयंतचा जीव तिळतिळ तुटूं लागला.

तापांत श्रम होऊन तो बडबड करीत असे. एकदा तर तो फारच बेफाम झाला असतां राजननें त्याला मोठ्या कष्टानें आवरून झोंपविलें. थोड्या वेळानें जयंत जागा झाला. " Shyama, my love, I will save him for you' असे राजनचे उद्गार त्याच्या कानीं आले- एकाएकीं त्याच्या डोक्यांत एक कल्पना आली. आपण जागे असल्याची चाहुल जयंतनें लागूं दिली नाहीं. पण कांहीं वेळ जाऊं देऊन तो डोळे उघडून म्हणाला, " राजन्, मला एक वचन दे पाहूं. " "वचन ? तें कशाचं ? तूं स्वस्थ नीज पाहूं." " कशाचं तें मग सांगेन. तूं माझा मित्र ना ? एवढंसुद्धा ऐकणार नाहींस ? पुनः थोडंच मी तुला सांगणार ?" ' कांहीं तरी बडबडू नकोस.हें घे वचन.' "राजन्, मनाची फसवणूक करण्यांत काय अर्थ ! मला सारखं वाटतं कीं मी कांहीं यांतून जगणार नाहीं. माझी शेवटची इच्छा म्हणून श्यामेशीं लग्न कर." ते शब्द ऐकतांच राजेंद्र एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें स्तब्ध झाला. आपलें इच्छित अशा तऱ्हेनें तृप्त होणार या कल्पनेनें आनंदाचा बारीकसा पडसाद त्याच्या अंतःकरणांत उठला. पण तितक्यांत स्वतःला सावरून आपल्या स्वार्थी मनाचा त्यानें शतशः धिक्कार केला. मित्रद्रोहावर उभारलेला प्रेमाचा डोलारा कोसळल्याशिवाय कसा राहील ? श्यामेचा प्रेमाचा संथ प्रवाह असें आडवळण घेईल हें त्याला शक्य वाटेना. "जयंत, आतां तूं स्वस्थ झोंप बघूं. इतक्या लवकर तुला मी मरायला देणार नाहीं. आशेसारखं जीवन नाहीं."

× × ×

श्यामा आज फॉरीन मेलकडे डोळे लावून बसली होती. आपल्या पत्राचें उत्तर आज येणार खचित आणि तें सुद्धा कधीं येतों तें कळविण्याकरितां. " आतां कसलं त्यांना तिथं चैन पडणार आहे ? तशांत माझं पत्र गेलं आहे. पण अद्याप कशी वरं डाक आली नाहीं ? या वेळीं तिन्नी तरी येईल तर वेळ इतका कंटाळवाणा जाणार नाहीं. वा ! तिन्नी म्हणतांच तिन्नी हजर !"

" तें काय विचारावं ! माझ्याच नांवाचा जप चालविला आहेस कीं नाहीं. !"

" नाहीं तर काय म्हणच आहे मुळीं 'A friend in need is a friend indeed.' "

"तुला माझी कसली या वेळीं need आहे ग ?"

"नाहीं कशी ? आजची पत्राची वेळ टळून गेली म्हणून हुरहूर लागली आहे. ती तुझ्यामुळं थोडी दूर होईल कांहीच्या कांहींच मनांत येतं. "

" अग प्रत्यक्षच येणार असतील मग पत्राची काय जरूरी ? " त्रिवेणीनें श्यामेची समजूत घातली, तरी तिलाही थोडी हुरहूर लागल्याखेरीज राहिली नाहीं. मग ती श्यामेच्या सुखासाठीं उत्सुक होती, कीं स्वतःसाठीं, तें तिचें तिलाच माहित. राजन्‌साठीं मात्र तिला अलीकडे जिव्हाळा वाटूं लागला होता एवढी गोष्ट खरी.

आठ दिवस होऊन गेले तरी कांहींच खबर कळेना. श्यामेचें डोकें काळजीनें व विचारांनीं दुखूं लागलें. ती कुठेंच बाहेर जाईना. तिची समजूत घालण्यांत त्रिवेणीला व तिच्या वडिलांना कोण मेहनत पडे !

"अरेरे, शेवटीं दुर्दैवानं पोरीला असं चकवलं ! आतां ती प्राण ठेवायची नाहीं." टाइम्सकडे शून्य दृष्टीनें पाहत श्यामेचे वडील म्हणाले. जयंतच्या मृत्यूच्या बातमीनें त्यांना केवढा भयंकर धक्का बसला होता ! त्रिवेणीच्या संगतींत कांहीं दिवस पोरीला ठेविली पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं त्रिवेणीच्या खोलींमध्यें जो हृदयभेदक प्रकार घडला, त्यानें दगडी अंतःकरणेंसुद्धा द्रवलीं असतीं. " त्रिवेणीताई, हें जयंतनं श्यामाबाईंना शेवटचं पत्र लिहिलं आहे. तेव्हां पुढं काय करावं हें तुम्हीं ठरवा." त्या पत्रानें त्रिवेणीच्या सर्व आशा धुळीस मिळणार होत्या. गुलाबाचें रोपटें उगवतें तोंच त्यावर वीज पडल्यासारखा तो भयंकर प्रकार होता ! एखाद्या निर्जीव यंत्रासारखी ती पत्राकडे पाहत होती. तें पुढीलप्रमाणें होतें. "प्रिये श्याम, या पत्रानं तुला किती यातना होतील तें मी जाणून आहें. पण ईश्वरेच्छेपुढं इलाज नाहीं. मी या दुखण्यांतून उठत नाहीं. राजननं माझ्यासाठीं जे कष्ट केले, त्यांची फेड होणें कठीण. या आजारांत मी बेशुद्धींत आहें असें समजून चुकून त्यानें उच्चारलेल्या तुटक शब्दांवरून मला एक संशय आला

व तो खरा आहे. त्याचं तुझ्यावर प्रेम आहे. मी तर आतां जगत नाहींच. तूं त्याच्याबरोबर लग्न करून सुखी हो. तूं मला कठोर म्हणशील. पण तूं सुखांत असावेंस ही माझी शेवटची इच्छा आहे. कालांतरानं तुला माझा विसर पडेल. माझ्या शेवटच्या इच्छेप्रमाणं केलंस तर माझ्या आत्म्याला शांति मिळेल.

तुझा

**जयंत"**

"एवढा प्रकार पाहिल्यानंतर मला आपल्या प्रेमाचा होम केला पाहिजे." तिनी मनांत म्हणाली. दुसऱ्या दिवशीं ती व राजन् श्यामेच्या घरीं गेलीं. पुढें पंधरा दिवशीं श्यामा पूर्ण वेशुद्धींत होती. त्या अवधींत राजननें व त्रिवेणीनें तिची मनोभावें सेवा केली. पुढें विचार करकरून तिनें जयंतच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. आपण नाखुषी दाखविली, तर राजेंद्राला वाईट वाटेल हें ती जाणून होती ! विवाहाचा मंगल दिवस, पण औदासीन्याच्या अभ्रांनीं तो झांकून गेला होता. थोडें हायसें वाटलें असेल तर तें तिच्या वडिलांना. सहवासानें श्यामा राजेंद्रावर प्रेम करील ही त्यांची खात्री होती. प्रेमचक्रांत सांपडलेले हे तीन दुर्दैवी जीव ! आपल्याविषयीं तिची उदासीन वृत्ति ठाऊक असून तिला फुलपांखरासारखी ठेवूं पाहणारा राजेंद्र ; आपला सुखाचा फुटलेला पेला सांधतां येणें अशक्य हें जाणून सलोख्यानें वागणारी त्रिवेणी; कर्तव्यपालनास तयार झालेली श्यामा – वाचक हो, हा दुर्दैवी प्रेमयोग, पण कोणाचा ?

## श्रीशांतादुर्गा देवस्थानाचा संक्षिप्त इतिहास

गोमंतकांतील कैवल्यपूर येथील श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या इतिहासाची ही द्वितीयावृत्ति, मागील आवृत्तींत विशेष माहितीची भर घालून, गोमंतकांतील जुन्या पिढींतील वाङ्मयसेवक शेळडेकर बंधु यांनीं प्रकाशित केली आहे.

या इतिहासांत श्रीशांतादुर्गा देवस्थानची समग्र माहिती तर आहेच, पण या देवस्थानाच्या महाजनांचा विशिष्ट कारणामुळें निगडित संबंध असणाऱ्या श्रीमंगेश, श्री महालक्ष्मी, श्रीमहालसा व श्रीकामाक्षी या अंत्रुज प्रांतांतील पालवी देवतांचीही त्रोटक पण संगतवार माहिती लेखकांनीं दिली आहे.

कैवल्यपूर देवस्थानाविषयींच्या माहितींत सदर दैवताविषयीं पौराणिक माहिती, या दैविक संस्थांचे मूळ संस्थापक, दैवतांचीं झालेलीं स्थलांतरें; गोमंतक वसविण्याच्या प्रसंगीं जी मंडळी आपल्या कुलदेवांसह उत्तरेकडून इकडे आली, त्यांजबद्दलची माहिती; अखिल गौडसारस्वत ब्रह्मवृंद, गुरुपीठें व गोमंतकांतील तत्कालीन राज्यकर्त्यां यांचा त्रोटक इतिहास, हा अत्यंत महत्त्वाचा भाग शांतादुर्गा देवस्थानच्या महाजनमंडळीस अगर गौडसारस्वत ब्रह्मवृंदासच नव्हे तर प्रत्येक इतिहासभक्तास प्रिय वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

या इतिहासाचीं एकंदर ७ प्रकरणें असून प्रमुखत्वें पहिल्या प्रकरणांतील देवीबद्दलची पौराणिक माहिती; दुसऱ्यांतील सारस्वतांचा व कुलदेवतांच्या स्थापनेचा इतिहास; तिसऱ्या प्रकरणांतील गोमंतांतील सारस्वतांचा स्वतंत्र कारभार व गावडे लोकांची माहिती, व माध्वसंप्रदायाचा सारस्वतांत प्रसार; चवथ्या प्रकरणांतील पोर्तुगीजांचा अंमल, व पाद्र्यांचा जुलुम; साष्टींतील स्थलांतर; श्रीशांतादुर्गा देवीचें कवळ्यास स्थलांतर ; नारोराम मंत्री, रामचंद्र मल्हार वगैरेविषयीं माहिती, व पेशव्यांच्या सनदा; कवळें गांवांचा व प्रियोळ गांवांतील मंगेशी व म्हाडदोळ स्थलाचा मोकासा; गोकर्ण येथील श्रीचक्रवर्ति शिवलिंगासंबंधीं माहिती व पत्रव्यवहार इत्यादि माहितीमुळें या इतिहासाच्या उपयुक्ततेंत विशेष भर पडली आहे. श्रीकवळें देवस्थानची महाजनमंडळी अगर गौडसारस्वत ब्रह्मवृंद हे शेलडेकर बंधूंच्या या श्रमाचें चीज करतीलच; पण प्रत्येक इतिहासभक्तासही हें पुस्तक संग्रहणीय वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

पुस्तकांत देवीचे आसनस्थ व अभिषेकमूर्तीचे, गौडपादाचार्यांचे, देवस्थानच्या रमणीय दृश्यांचे वगैरे फोटो दिले असल्यामुळें पुस्तकाच्या सौंदर्यांत विशेष भर पडली आहे.

# उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत

( ले.:-अनंतानुज )

वरील मथळा केवळ एक प्रचलित ढब म्हणून दिलेला नाहीं. ज्ञातीची लुप्त झालेली "परिषद्" पुनरुज्जीवित करण्यासंबंधानें हल्लींच मुंबई येथील सारस्वत ब्राह्मणसमाजांत भरलेल्या सभेंत जो ठराव पास करण्यांत आला, त्याच्या यथार्थतेसंबंधानें वरील मथळा कसा लागू पडतो हें दाखविणें आहे.

आज १७ वर्षांत एकही "Conference" भरण्यांत आली नाहीं हेंच घोर निद्रेचें निदर्शक आहे. निद्रेंत आयुष्य जावें हें कोणाला बरें वाटेल ? कोणी म्हणतील आमची प्रगति होत आहे; मग 'सभा' कशाला ? प्रगति होत आहे हें म्हणणें सर्वांशीं वस्तुस्थितीस धरून नाहीं. आजकाल गरीब विद्यार्थ्यांचें स्वास्थ्य द्रव्याच्या मुबलक सहाय्यामुळें सर्वत्र वृद्धिंगत झालेलें आहे. पूर्वींच्यासारखे हल्लींच्या विद्यार्थ्यांना विद्यार्जनासाठीं जीवापाड कष्ट करावे लागत नाहींत. असें असतां भरभर परीक्षा पास होऊन पोटापाण्याच्या धंद्यास लागण्यापलीकडे मानसिक, बौद्धिक अगर शारीरिक शक्ति खर्च करण्याकडे प्रवृत्ति किती जणांची दिसून येते ? ज्ञातींतील मासिकांत लिहिणारीं तींच तींच नांवें आढळावयाचीं. बाहेरील मासिकांत लिहून अगर ग्रन्थ लिहून बौद्धिक दिवा तेवत ठेवणारांचीं उदाहरणें हाताच्या बोटांवर मोजतां येतील इतकींच. सार्वजनिक कार्यांत भाग घेणारांची स्थिति तीच. रुळलेल्या मार्गाच्या बाहेर ज्योतिष, वैद्यकी, गायनवादनशास्त्र, व्यापार, चित्रकला इत्यादि हजारों ज्या कलाहुन्नरीच्या शाखा आहेत, त्यांत प्रामुख्यानें आमच्यापैकीं कोणाचेंही नांव ऐकू आलें असें क्वचित् घडतें. आपलें घर, बायको, मुलेंबाळें यांच्या शुश्रूषेंत व नोकरींत शक्ति खर्च करण्यापलीकडे कांहीं न करितां आम्हीं घोरत आहों असा जेव्हां संशय येऊं लागतो, अशा वेळीं 'उत्तिष्ठत' या शब्दाचा उच्चार करून, दारावर हात मारल्यास वावगें होईल काय ?

कौटुंबिक अस्तित्वाबरोबर सामाजिक अस्तित्व आहेच नाहीं का ? नाहीं तर जुडयांतून विसकटलेल्या काठीच्या नाशाप्रमाणें व्हावयाचें. स्वार्थलोलुपांच्या डोक्यांत हें कुठें यावयाचें ? कुटुंबांत दहा मुलें असलीं, तर एखादें नांवारूपास जेमतेम यावयाचें. एक दोन जेमतेम योगक्षेम चालविण्यायोग्य. बाकीचे टोळ असावयाचे. याचा दोष कोणाकडे ? त्यांच्या आवडीनिवडीचा विचार करणें, त्यांस उद्योगशीलतेचें, नीतिमत्तेचें, आरोग्य व शक्तिसंपादनाचें वळण लावण्याचें काम आईबापाकडून होत नसल्यास वाटेल ती आर्थिक झीज सोसून अशांसाठीं गुरुकुलांची सोय करणें, हें समाजाचें कर्तव्य नव्हे काय ? या व अशा तऱ्हेच्या इतर उणीवा जागरूकतेनें व अंतर्दृष्टिपूर्वक भरून काढल्याशिवाय सत्त्वसामर्थ्यवान् स्त्रिया व पुरुष ( केवळ कुटुंबपोषणोद्युक्त पदवीधर नव्हत. ) आपल्यांत निपजणार नाहींत. म्हणून 'जागृत' या शब्दाचा उपयोग आहे.

सिद्धि या आळशाच्या घरीं पाणी भरीत नाहींत. त्यांना सिद्धि सदैव जवळ आहेत, याची जाणीव सुद्धां नसते; म्हणून त्यासुद्धा त्यांचेकडे ढुंकून बघत नाहींत. नाहीं तर "करील त्याचा करभार व मारील त्याची तरवार" ही म्हण त्रिकालाबाधित आहे. साहस, स्वकीय प्रीति, जीवनकलहाची तीव्र जाणूक, शेजाऱ्यांच्या स्पर्धेचें भय, व्यवहार-ज्ञान इत्यादिकांच्या जोरावर इंग्लिश राष्ट्रानें आपल्या साम्राज्याचा एवढा पसारा केलाच कीं नाहीं ? दुसऱ्यानें जगूं दिलें म्हणून आयुष्य कंठीत असलेलींही कांहीं राष्ट्रें आहेत; याचें

कारण त्यांच्यांत पुरुषार्थाचा व तत्पोषक गुणांचा अंश कमी. तेंच प्रकार कुटुंबास व समाजास लागू पडतो; म्हणून वर (भाग्योदय) नजीकच आहेत पण आपल्यांतील बुद्धिमान, स्वार्थत्यागी व समाजहितेच्छु व्यक्तींनी त्यासंबंधीं एकत्र विचारविनिमय व उपाययोजना न केल्यास ज्ञातिपुरुषांच्या कृपेस आम्ही कसे पात्र होऊं ? म्हणून 'प्राप्य वरान्निबोधत' या वाक्याची योजना आहे. परिषदेच्या इष्टतेसंबंधीं अधिक खोल विवरण होईल तितकें थोडेंच. फक्त व्यावहारिक दृष्टि व मित भाषण यांची आवश्यकता समोर ठेवून चाललें पाहिजे.

परिषद् ज्या बाबी विचारांत घेईल, त्यांत पुढील बाबीचाही अवश्य विचार व्हावा. हल्ली बुद्धिमान् विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. त्यांच्या दसपटीनें मंदबुद्धि विद्यार्थी जातींत असणार. एवढ्यासाठीं त्यांच्या अंगची शक्ति व युक्ति वायां जाऊं देतां नये. अशासाठीं एखाद्या शहराच्या नजीक मोकळी जागा घेऊन प्रयोगादाखल थोड्या (अजमासें दहा वर्षांच्या मुलांमुलींसाठीं) चाळी बांधून तेथें त्यांच्या मराठी व थोड्या इंग्लिश शिक्षणाची तरतूद व्हावी पण शिस्तीवर कटाक्ष असावा. त्या वसाहतींत शेतकीची, सुतारकाम, चित्रकला, गायनवादन, सूपशास्त्र, शिवणकाम, इत्यादि उपयुक्त धंदे शिकण्याची नजीक अगर शहराच्या सहवासानें सोई असावी. मनुष्य हा जात्या उद्योगप्रिय असल्यामुळें, टाकाऊ म्हणून समजल्या गेलेल्या, अतएव, भारभूत झालेल्या अगर पुंडाईकडे वळलेल्या मुलांना नीतीचें वळण मिळून धंद्याची गोडी लागल्यास, सर्व समाजाच्या हिताची एक दांडगी शक्ति उत्पन्न केल्यासारखी होईल. अर्थात् यास पैशाचें पाठबळ दांडगें लागेल. पण लहान प्रमाणावर एकदा प्रयोग यशस्वी करून दाखविल्यावर सारस्वत विद्यार्थी-साहाय्यक मंडळीच्या उदाहरणावरून पैशांची टंचाई पडेल असें दिसत नाहीं. सेवानिवृत्त नांवाजलेल्या शिक्षक मंडळीची प्रयोगाच्या कामीं चांगली मदत होईल अशी अपेक्षा आहे. सुरुवातीस पन्नास हजार रुपये तरी लागतील असा अजमास आहे. जोगेश्वरीच्या 'सरस्वतीबागेच्या' आसपास जागा मिळणें बहुधा कठीण हाणार नाहीं. प्रथम पन्नास मुलांमुलींची सोई करावी; विलेंपालें येथें धंदेशिक्षणाची चांगली सोई आहे असें समजतें. परिषदेची विषयनियामक कमिटी ही सूचना विचारांत घेईल तर आभार होतील व ज्ञातीचें व पर्यायानें देशाचें कल्याण होईल.


# गौड सारस्वत ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या

**डॉ. भाऊ दाजी रोड वरील वसाहतींतील घराचें भाडें बरेंच उतरल्यामुळें मध्यम स्थितींतील सारस्वत कुटुंबाची सोय झाली आहे.**

प्रत्येक खोलींत नळ असून सबंध रात्र विजेच्या दिव्याची सोय केली आहे. १४ फूट लांब व १२ फूट रुंदीच्या खोल्यांचें भाडें वत्ती खर्चासह तळमजला १४, पहिला मजला १५ व दुसरा मजला १६ रुपये ठेवलें आहे. खोलीसंबंधीं चौकशी सोसायटीच्या ऑफिसांत करावी.

# सारस्वत ब्राह्मण व विद्याप्रसार

लेखक:—रा. रा. श्री. ना. कर्नाटकी

सुमारें पन्नास वर्षांपूर्वी एका गृहस्थांनीं सारस्वत ब्राह्मणांवर सामान्यतः असा आरोप ( गुंजीकरकृत ''भ्रमनिरास'' पृ. १२२ पाहा) केला होता कीं, एकोणीसाव्या शतकांत मुंबईतील सारस्वत ब्राह्मणांना नव्या इंग्लिश शिक्षणाचा लाभ प्रथम मिळाला असून सामान्य जनतेमध्यें विद्याप्रसार करण्याच्या कामीं त्यांच्या हातून कांहीं खटपट झाली नाहीं. सदहू गृहस्थ हे मुंबईंतच राहणारे असून त्यांच्या वेळीं अगर त्यांच्या वेळेच्याही पूर्वी ज्ञानप्रसाराच्या कामीं सारस्वत ब्राह्मणांच्या हातून झालेली महत्त्वाची कामगिरी त्यांच्या कशी लक्षांत राहिली नाहीं हें कळत नाहीं. गेल्या शतकाच्या मध्यास अगर नंतर मुंबईतील प्रसिद्ध सारस्वत ब्राह्मण म्हणजे कै. गोविंद नारायण माडगांवकर, डॉ. भाऊ दाजी, बाळ मंगेश वागळे, शांताराम नारायण वकील व काशीनाथपंत तेलंग हेच होत. ह्यांचें सरकारनें चालविलेल्या शिक्षणप्रसाराच्या कामीं तर जरूर तें सहाय्य असेच. परंतु ज्या एका संस्थेच्या स्थापनेपासून मुंबईत ज्ञानप्रसाराचें व विशेषेंकरून स्त्रीशिक्षणाचें महत्त्वाचें कार्य घडून आलें, त्या स्टु.लि. अँड सा. सोसायटीच्या मुलींच्या शाळेंत शिकविण्याचें व परीक्षा घेण्याचें व तसेंच ज्ञानप्रसारक सभेपुढें निबंध वाचणें वगैरे जीं कामें होत त्यांत, वर सांगितलेल्या माडगांवकरादि सर्व सारस्वत ब्राह्मणांचें प्रामुख्यानें अंग असे. इतकेंच नव्हे, तर सार्वजनिक कार्यें स्वतंत्र बाण्यानें करण्याकरितां शक्य तेवढी घस सोसण्याचीही त्यांची तयारी असे. डॉ. भाऊ दाजी यांची वैद्यकांतील शेवटची परीक्षा पास झाल्यावर सरकारी नोकरींत सब-असिस्टंट-सर्जनच्या जागेवर यांची नेमणूक झाली. परंतु त्या नोकरीचें बंधन न रुचल्यामुळें त्यांनीं ती लवकरच सोडली व स्वतंत्र रीतीनें आपला धंदा चालवून त्यांत उत्तम यश संपादन केलें. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं "नागदेवी धर्मार्थ दवाखाना" ही संस्था कित्येक वर्षें चालवून असंख्य लोकांवर उपकार केले. माडगांवकर हे विल्सन हायस्कूलमध्यें जे अगदीं लहान पगारावर प्रथम नोकरीस लागले ते तिकडे अखेरपर्यंत राहिले. परंतु ग्रंथरचना करणें, व्याख्यानें देणें, गरजू मुलांस माफत शिकविणें हीं त्यांनीं हौसेनें पत्करलेलीं कामें आमरण चालचीं होतीं. वागळे, शांताराम नारायण, व तेलंग यांचा जरी हायकोर्टांत धंदा चालू असे; तरी ते गरीब विद्यार्थीवर्गाला सढळ हातानें मदत करीत असत.

परंतु वर लिहिल्याप्रमाणें ज्ञानप्रसाराच्या कामीं सारस्वत ब्राह्मणांनीं केलेली महत्त्वाची कामगिरी हल्लींच्या महाराष्ट्रांतील चांगल्या चांगल्या लोकांनाही माहित नाहीं. ह्याचें मुख्य कारण म्हणजे, त्या वेळीं हल्लींच्या केसरी भाला याधारखीं स्वजनांची मुक्तहस्तानें स्तुतिपाठ करणारीं पत्रें नव्हती ! "नेटिव ओपिनियन" किंवा "इंदुप्रकाश"यांसारखीं जीं होतीं, त्यांतून प्रसंगविशेषीं वरीलसारख्या कामांची प्रसिद्धि होत असे.

असो. पण ही मुंबईतील गोष्ट झाली. पुण्यांत—म्हणजे खुद्द पेशव्यांच्या राजधानी शहरांत—विद्याप्रसार–विशेषें करून स्त्रीशिक्षणाचा प्रसार–करण्याच्या कामीं गेल्या शतकांत सारस्वत ब्राह्मणांच्या हातून किती महत्त्वाचें सहाय्य झालें हें परवांच झालेल्या एका सार्वजनिक प्रसंगीं लोकांच्या निदर्शनास आलें. ता. २६ नवंबर रोजीं पुण्याच्या फीमेल हायस्कूलची —हुजूरपागेची—ज्युबिली म्हणजे अर्धशतकोत्सव साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं "महाराष्ट्र-गर्ल्स-एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस रा. ब. के. जी. जोशी यांनीं जो शाळेचा पन्नास वर्षांचा अहवाल

वाचून दाखविला त्यांत डॉ. भांडारकर व रा.ब.शंकर पांडुरंग पंडित यांच्या नांवांचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला होता. चिटणीसांनीं सांगितलें कीं, सन १८८४ मध्यें प. वा. सर विल्यम वेडर्बर्न या उदारमनस्क गृहस्थांनीं आपल्या बंधूंच्या स्मरणार्थ म्हणून दहा हजार रुपयांची देणगी दिली व त्यावरून पुण्यास एक मुलींची इंग्रजी शाळा स्थापन करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. त्यांत मुख्य अंग डॉ. भांडारकर, न्या. रानडे व रा. ब. पंडित यांचेंच होतें. पुढें मग शाळेच्या इमारतीला जागा मिळविणें, इमारत बांधणें, शाळेच्या खर्चाकरितां फंड जमविणें हीं कामें हातीं घेण्यांत आलीं व त्यांत सारी खटपट रा. ब. पंडित यांचीच असल्याचा अहवालांत स्पष्ट उल्लेख आहे. आज शाळेच्या इमारतीची किंमत सुमारें सव्वा दोन लक्ष रुपये आहे. ही रक्कम व कायमनिधि जमविल्याचें खरें श्रेय रा. ब. पंडितांचें आहे. रिपोर्टांतील शब्द असे आहेत:—

"Most of the share of the Society's cost for buildings as also endowment funds etc. were collected by the late Rao Bahadur Shankar Pandurang Pandit. He deserves credit not only for conceiving the idea of a High School for Girls in the early eightees of the last century but also for giving that idea a concrete shape and form and for suitably providing for growth and development."

तात्पर्य, वरील शाळा स्थापन करण्यांत रा. ब. पंडित व डॉ भांडारकर या दोन सारस्वत ब्राह्मणांचें मुख्य अंग होतें इतकेंच नव्हे, तर शाळेकरितां इमारती, कायमचा फंड वगैरेंची जमवाजमव करून संस्थेस चिरकालचें स्वरूप देण्याचें महत्त्वाचें काम रा. ब. पंडितांनीं केलें. इतकी तयारी झाली नसती, तर शाळेला पन्नास वर्षांत हल्लींचें भव्य स्वरूप खास आलें नसतें.

सदहू ज्युबिलीच्या निमित्तानें हुजूरपागेंतील एक विद्वान अध्यापिका कु. वेणुबाई पानसे यांनीं लिहिलेला शाळेचा एक स्मारकग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. त्यांतून रा. ब. पंडित व डॉ. भांडारकर यांच्यासंबंधानें खालीं दिलेले उतारे प्रत्येक सारस्वत ब्राह्मणास अभिमानास्पद व स्फूर्तिदायक वाटतील अशी खात्री वाटते.

रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित हे हायस्कूल कमिटीचे पहिले सेक्रेटरी होत. सर विल्यम वेडर्बर्न यांच्या दहा हजारांच्या देणगीच्या मागोमाग कोल्हापूर, बडोदें, जत, धार, मिरज, फलटन, जंजिरा, जुनागड, पोरबंद, गोंडाळ, औंध, सावंतवाडी, मुधोळ, रतलाम, विशाळगड, इचलकरंजी, सांगली, नवानगर, देवास इत्यादि संस्थानाधिपतींकडून व इतर दानशूर स्त्रीपुरुषांकडून उदार देणग्या हायस्कूलासाठीं मिळाल्या यांचें सर्व श्रेय रा. ब. पंडित यांनाच आहे. हिराबागेंतील सभेमध्यें व गव्हर्नरसाहेबांकडे जें डेप्युटेशन गेलें त्यांमध्यें त्यांचाच पुढाकार होता. सांगलीकरांच्याकडून हुजूरपागा त्यांनींच मिळविली. इतकेंच नव्हे तर, युरोपियन अधिकारी, युरोपियन स्त्रिया, मोठमोठे संस्थानिक यांच्यामध्यें शाळेच्या कार्याविषयीं सहानुभूति त्यांनींच उत्पन्न केली. × × × त्यांच्यासारखा करारी, बाणेदार व धर्मनिष्ठ पुरुष विरळाच. स्पष्टवक्तेपणा व सत्यप्रियता हे त्यांचे विशेष गुण होते. + + + + स्त्रीजातीबद्दल त्यांची अत्यंत उदारवृत्ति असून स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ त्यांनीं अविश्रांत श्रम केले. + + + अखेरीस पोरबंदर संस्थानच्या अॅडमिनीस्ट्रेटरचें काम करीत असतां त्यांस फार परिश्रम होऊन त्यांची प्रकृति ढासळली व १८ मार्च १८९४ रोजीं मुंबई मुक्कामीं त्यांनीं देहत्याग केला. शाळेच्या संस्थापकांपैकीं प्रमुख असे हे गेल्यानें शाळेचा आधारस्तंभ नाहीसा झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं शाळेच्या कौन्सिलच्या सेक्रेटरींचें काम सतत अकरा वर्षें केलें. आपल्या प्रिय ध्येयाच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं तन-

मन-धन वाहिलें होतें. अशा प्रकारचा विद्वान स्त्रीशिक्षण व इतर सामाजिक सुधारणांचा पुरस्कर्ता नाहींसा झाल्याकारणानें शाळेच्या सोसायटीचें व समाजाचें अपरिमित नुकसान झालें."

"डॉ रामकृष्ण गोपाळ भांडारकर हेही हायस्कूलच्या संस्थापकमंडळांत होते. हायस्कूलच्या सोसायटीचे उपाध्यक्ष व कौन्सिलचे कार्याध्यक्ष म्हणून सतत तीस वर्षे त्यांनीं काम केलें. हें काम करीत असतां विविध प्रकारच्या संकटांपासून त्यांनीं संस्थेचें रक्षण करून तिच्या विकासास हरएक प्रकारची मदत केली. हायस्कूलच्या सोसाटीचेच नव्हे, तर डेक्कन एजुकेशन सोसायटी, शिक्षणप्रसारक मंडळी यांच्या कौन्सिलचेही ते कित्येक वर्षे कार्याध्यक्ष होते. ते जें काम हातीं घेतील, तें सफळ होणारच असा सर्वांचा दृढ विश्वास असे. उत्कृष्ट अध्यापक, विद्वान् ग्रंथकार, आदरणीय समाजसुधारक व परमेश्वराचे परमनिष्ठ भक्त असा त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. " Long after you and I have gone, Dr. Bhandarkar's name will remain. " हे प्रि. सेल्वी यांनीं डेक्कन कॉलेजच्या एका संमेलनप्रसंगीं विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण करतांना काढलेले उद्गार यथार्थ आहेत. + + समाजसुधारणेच्या पोकळ गप्पा न मारतां त्यांनीं त्या तंतोतंत आचरणांत आणून दाखविल्या. त्यांच्या घराण्यांत तिन्ही पिढ्यांतील स्त्रिया सुशिक्षित आहेत.

"बोलण्याप्रमाणें आचरण करणारे सत्पुरुष या जगांत क्वचितच जन्माला येतात. आमच्या विद्यामंदिराचें वातावरण त्यांच्या पुण्यस्मृतींनीं भरून राहिलें आहे. इ.स. १८८४ मध्यें लाविलेल्या बीजाचें सुंदर वृक्षांत रूपांतर झालेलें पाहण्याचें भाग्य संस्थापकांपैकीं फक्त एकट्या डॉ. भांडारकरांनाच लाभलें. सामाजिक सुधारणेच्या प्रथम कालांत जीं ध्येयचित्रें त्यांनीं रंगविलीं होतीं, तीं सत्यसृष्टींत अवतरलेलीं त्यांना दिसलीं. २५ ऑगस्ट १९२५ रोजीं संगमाश्रमांतील हे महर्षि ईशपदीं लीन झाले. "

विद्याप्रसाराचें कार्य सारस्वत ब्राह्मणांनीं अन्यत्रही पुष्कळ केलें आहे व तसें ते आजकाल करीतही आहेत. पण तत्संबंधाचा आज विस्तार न करतां दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं करूं.

---


# मंगेश ब्रदर्स

**यांचे**

## हातानें बनविलेले

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी (तिखट), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**

# बेकारी निवारण्याचा एक उपाय

( लेखक—श्री. जी. अण्णाजी राव, एम्. ए.; बी. एल्., ॲडव्होकेट )

बेकारीचा प्रश्न आपणां सारस्वतांना अनेक वर्षे जाणवूं लागला आहे. आपल्यामधून सालोसाल अनेक तरुण ज्ञानार्जन करतात आणि कोठें तरी नोकरी मिळविण्याची अपेक्षा धरतात, हें आमच्या आजवरच्या परंपरेस धरून आहे. परंतु नोकरी मिळण्याची दिवसेंदिवस अडचण भासत असून 'नो व्हेकन्सी'च्या पाट्या तरुणांना भेडसाविण्यास जिकडे तिकडे नजरेसमोर उभ्या राहतात. पाहावें तिकडे व्यापारी आणि सरकारी नोकरींत माणसें कमी करण्याचा सपाटा चालला आहे. या स्थितींत पुढील पिढीसाठीं शक्य ती तरतूद करण्याची जबाबदारी ज्ञातींतील पुढारी आणि वडील पिढी यांवर आहे व त्या जबाबदारीस अनुसरून करतां येण्यासारखा एक मार्ग मी सुचवीत आहें. आपल्या समाजांतील तरुण जरी सर्व हिंदुस्थानभर नोकरीसाठीं फांकलेले आढळतात, तरी बहुतेक भरणा हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर कराचीपासून मंगळूरापर्यंतच सांपडेल. आपणांपैकीं बहुतेकांची घरें कोंकणप्रांतांत आणि दक्षिणेस कारवार मंगळुरापर्यंत असून दरसाल नसला तरी चार दोन वर्षांनीं आगबोटींत घरीं जाण्याचा प्रसंग प्रत्येकाला येत असतो. त्या वेळीं आगबोटीच्या तिकिटाइतकाच किंवा त्याहूनही जास्त खर्च आपलें सामान चढविण्या-उतरण्यासाठीं, गाडीभाड्यासाठीं बंदरावरून गांवीं किंवा घरीं जाण्यासाठीं येत असल्याचा अनुभव आहे. अशा घाईच्या वेळीं हमाल, गाडीवाले वगैरे अडवून पैसा घेतात व धांदल होऊन जीव मेटाकुटीस येतो. आगबोटींत व उताराच्या जागीं खाण्यापिण्याचे हाल होतात आणि दुप्पट दाम देऊनही मनासारखें अन्न मिळत नाहीं. या हालअपेष्टांतून केवळ आपल्यापुरताच नव्हे, तर सर्व उतारूंना वांचविण्याचा प्रयत्न सारस्वतांसारख्या बुद्धिमान समाजाला सहज करतां येण्यासारखा आहे. गांवीं जाणाऱ्या व गांवाहून येणाऱ्या उतारूंच्या सामानाची व्यवस्थित नेआण करणें; त्यांना आगबोटींत आरामशीर जागा मिळण्याची व्यवस्था करणें; त्यांच्या अन्नापाण्याची तरतूद करणें; हीं कामें करणारी एखादी एजन्सी निघाल्यास अशा प्रवासांत वेळीं चार पैसे जास्त खर्च करणारे उतारू एजन्सीची मदत खात्रीनें घेतील. एजन्सी असल्यास जागेच्या अभावीं होणारे उतारूंचे हालही फार कमी होतील. अशा एजन्सीला आगबोट कंपन्यांशीं सहकार्य करून किती तरी सोई मिळवून घेतां येण्यासारख्या आहेत. फक्त मुंबई ते पणजीपर्यंतच्या सुमारें वीस बंदरांत सालीना दहा लाखांहून जास्त उतारू प्रवास करतात. त्याशिवाय कारवार, मंगळोर आणि भावनगर, कराची या बाजूच्या बंदरांचे उतारू असतातच. कराची-मुंबईसारख्या शहरांतून त्यांचें सामान आगबोटीवर पोंचविणें, त्यांचीं तिकिटें काढून त्यांच्यासाठीं आगबोटीवर सोईवार जागा ठेवणें, त्यांना खाण्यापिण्याचे जिन्नस पुरविणें, उतरण्याच्या बंदरीं ते पोंचल्यावर त्यांचें सामान उतरून, बंदरावरून, गांवीं जाण्याची सोय योग्य वाहनांतून करून देणें या कामांस आज उतारूंना खर्च येतो, त्याहून पुष्कळच कमी खर्च येऊन तें काम करणाऱ्या एजन्सीलाही भरपूर फायदा मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. थॉमस कुक आणि कंपनी या प्रकारचें काम करीत असून त्या कामाची माहिती असलेले अनेक नोकर आज त्या कंपनींत नाना प्रकारचीं कामें अनेक वर्षें करीत आहेत. परंतु हिंदी किनाऱ्यावरील उतारूंसाठीं अशी एजन्सी काढण्याचें अद्याप कोणीं मनावर घेतलेलें नाहीं. मुंबईंतील

गोंवेकर ख्रिश्चनांचेंही या कामीं सहकार्य मिळण्याची शक्यता आहे. अशा एजन्सीला आगबोट कंपन्यांकडून सवलती मिळण्याचाही फार संभव आहे. या कामांत बंदरोबंदरीं व मुख्य शहरांतून मिळून हजारों सुशिक्षत तरुणांना कायम नोकरीची तरतूद होण्यासारखी आहे. हें काम सुमारें दहा हजार रुपयांच्या भांडवलावर सुरू करतां येण्यासारखें असून तेवढी सर्व रक्कम देखील काम सुरू झाल्यावर लागणार नाहीं. या कामासाठीं दोन-तीन धनिकांनीं मिळून खासगी एजन्सी काढावी किंवा एखादी लिमिटेड कंपनी काढावी. हळूहळू या एजन्सीला स्वतःच्या बस, गाडया, मोटर, वगैरे उतारू व सामान जागोजाग पोंचविण्याच्या साधनांचीही तरतूद करावी लागून अशा वाढत्या व्यवहारांत अनेक तरुण माणसांना नोकरी मिळेल. ही योजना आज सारस्वतांनीं हातीं घेतली नाहीं, तर उद्यां दुसऱ्यांच्या हातीं हा धंदा जाईल.बेकार जवानांविषयीं केवळ तोंडी सहानभूति गाण्यापेक्षां प्रत्यक्ष कार्य करून त्यांचा भार हलका करण्याच्या या योजनेकडे आमच्यांतील समर्थ माणसांचें लक्ष जाईल व या दिशेनें प्रयत्न होईल अशी आशा आहे.*

*'कॅनरा सारस्वत' मासिकाच्या जानेवारी १९३५च्या अंकांत आलेल्या याच लेखकाच्या लेखानुरोधानें

# संपादकीय

मुंबईतील देवळांचा फंड लाखों रुपयांचा असून पंचवीस तीस वर्षांनीं कांहीं तरी कोर्ट-खर्च होऊन त्याचा खर्च व्हावा असा एक योगायोग दिसतो. इतका फंड असतांही ट्रस्टींच्या व ज्ञातीच्या सभा देवळाच्या व्यवस्थेसाठीं भरविण्यास, किंवा देवळांचे कागदपत्र ठेवण्यास ट्रस्टच्या मालकीची इमारत नसावी ही फार लाजिरवाणी परिस्थिति आहे. ट्रस्टसारख्या संपन्न संस्थेनें या बाबतींत कांहीं तरी प्रयत्न करणें अवश्य असून स्वतःच्या मालकीची इमारत गिरगांवसारख्या ज्ञातीच्या मध्यवस्तीच्या ठिकाणीं पाहिजे, याचा विचर स्वज्ञातीयांनीं व ट्रस्टींनीं करावा.

× × ×

रा. बाजी विष्णु नेरूरकर यांची नेमणूक या सालापासून मुंबईतील देवळांच्या ट्रस्टींच्या अध्यक्ष स्थानीं झाली आहे. बोर्डाचे सेक्रेटरी व ट्रेझरर ही जबाबदारीचीं कामें बाजी काकांनीं गेल्या पंचवीस वर्षांत संभाळलीं. त्यांच्या एकनिष्ठ दक्षतेमुळेंच देवळांची व्यवस्था या पंचवीस वर्षांत बिनबोभाट सुरळीतपणें चालली. बोर्डाच्या अध्यक्षस्थानीं बाजीसाहेबांची निवड यापूर्वीच व्हावयास पाहिजे होती. कांहींशा विलंबानें तरी स्वज्ञातींतील एका दीर्घोद्योगी व कार्यदक्ष, कार्यकर्त्याच्या ज्ञातिसेवेची थोरवी बोर्डानें त्यांना अध्यक्ष नेमून मान्य केली याबद्दल आम्ही बोर्डाचें व बाजीसाहेब नेरूरकर यांचें अभिनंदन करतों.

---

—सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या व्यवस्थापक मंडळानें ज्ञातींतील गरीब व होतकरू मुलांमुलींच्या विद्यार्जनासाठीं १९३५–३६ सालासाठीं रु. १३३४ च्या २०५ मासिक शिष्यवृत्त्या (परतफेडीच्या करारानें) नुकत्याच मंजूर केल्या असून त्यांचें वर्गीकरण ठोकळ मानानें खालीलप्रमाणें आहे. शिष्यवृत्त्यांसाठीं यंदा एकूण ३४५ अर्ज आले होते. विश्वविद्यालयीन शिक्षणः—४१ शिष्यवृत्त्या ३८१ रु.च्या दरमहा; औद्योगिक शिक्षण २७ शिष्यवृत्त्या २६१ रु.च्या दरमहा; दुय्यम शिक्षणः—१०६ शिष्यवृत्त्या ४४० रु.च्या दरमहा; प्राथमिक शिक्षणः- १० शिष्यवृत्त्या ३१ रु.च्या दरमहा; गतभर्तृकांचें शिक्षणः—२१ शिष्यवृत्त्या २२१ रु.च्या दरमहा.

# शरत्कालीन मेघ

ता. ४ एप्रिल १९३५ (चैत्र शुद्ध प्रतिपदा) रोजीं येथील सारस्वत ब्राह्मण समाजानें आपला वर्धापन दिन सर्वांत जुनें सभासद श्री. बाजी विष्णु नेरूरकर B.A., LL. B. यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा केला. तीन तपांवर जातिसेवा करूनही समाजास अद्याप स्वतःचें घर नाहीं या गोष्टीवर याप्रसंगी बराच वादविवाद झाला. समाजाच्या वाढत्या गरजांस पुरणारी जागा भाडयाच्या घरांतून मिळणें अशक्यप्राय आहे हें आतां स्पष्ट झालें आहे. सभा, व्याख्यानें इत्यादि प्रसंगांसाठीं दिवाणखाना, खेळणारांसाठीं एखादें दुसरें दालन, वाचणाऱ्यांसाठीं रीडिंग-रूम, समाजगृहांत ज्यांचीं कार्यालयें आहेत अशा संस्थांच्या कार्यकारी मंडळांच्या सभांसाठीं एकादी खोली, स्त्रियांसाठीं स्वतंत्र खोली, गप्पा मारणाऱ्या सभासदांसाठीं एखादी स्मोकिंग रूम अथवा 'लाउंज' इतक्या सोयी असलेली जागा गिरगांवसारख्या मध्यवस्तींत माफक भाडयानें मिळणें कठीण. म्हणून समाजाला स्वतःचें घर मिळाल्याशिवाय त्याजकडून आजच्यापेक्षां जास्त ज्ञातिसेवा होणें शक्य नाहीं. उपरिनिर्दिष्ट सोयींनीं संपन्न असें घर विकत घ्यावयाला लागणारा पैसा कसा उभारावयाचा हा प्रश्न समाजाच्या का. मंडळापुढें आहे. श्री. वामन पुंडलिक वर्दे यांनीं आवश्यक अशी पन्नास-साठ हजारांची रक्कम डिबेंचर काढून जमवावी, व सालोसाल ज्ञातिबंधूंकडून देणग्या मिळवून डिबेंचर फेडून टाकावें. डिबेंचरसाठीं तारण म्हणून जी इमारत विकत घ्यावयाची, तीच ठेवावी अशी सूचना केली, व प्रत्येकीं हजार रुपयांचे डिबेंचर्स जमविणारे पन्नास सभासद पुढें आल्यास हा प्रश्न मिटेल असें सांगितलें, व आपण स्वतः हजार रुपयांचे डिबेंचर्स खपविण्याची हमी घेतली.

श्री. शंकरराव वर्दे म्हणाले कीं, स्वज्ञातीचे देवालयाचे ट्रस्टी यांनीं एक इमारत गिरगांवसारख्या मध्य वस्तींत बांधून ती ज्ञातिसंस्थांस योग्य भाडयास द्यावी, अथवा समाजगृहाचे तारणावर सारस्वत ब्राह्मण समाजास आवश्यक रकमेचें कर्ज द्यावें. तसें केल्यास समाजगृहाचा प्रश्न अल्प कालांत सुटेल व देवालयांच्या पैशावर योग्य व्याज मिळेल. देवालयांचा पैसा बँकेंत पडून राहण्यापेक्षां अप्रत्यक्ष रीतीनें ज्ञातीच्या उपयोगी पडेल असें सांगितलें.

अध्यक्ष श्री. नेरूरकर यांनीं समाजाच्या आकांक्षांविषयीं सहानुभूति दर्शविली; सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितींत या कार्यास आवश्यक अशी रक्कम देणग्यांच्या रूपानें जमा होणें आपल्यास कठीण दिसतें असें सांगितलें.

देवलयांच्या पैशाचा सारस्वत ब्राह्मण समाजासारख्या उपयुक्त संथेस कर्ज म्हणून सुद्धां उपयोग करितां येणार नाहीं काय ? आज कित्येक वर्षें या प्रश्नाचा विचार चालला आहे; परंतु त्यापासून कांहीं फलनिष्पत्ति झालेली नाहीं. ट्रस्टींकडून शाब्दिक सहानुभूतिपेक्षां कांहीं जास्त मिळेल असे जर सा. ब्रा. समाजाच्या कार्यकारी मंडळास खरोखर वाटत असेल, तर त्यांचें आशावादित्व बळकट परंतु अव्यवहार्य आहे असें आम्हांस वाटतें.

ट्रस्टींचा या प्रश्नाकडे पाहावयाचा दृष्टिकोण निराळा आहे. त्यांचें कर्तव्य म्हणजे ज्यांचे ते ट्रस्टी आहेत त्यांचे हित पाहणें. देवालयांच्या पैशांस जर दुसऱ्याकडून ५ टक्के व्याज मिळत असेल, तर तो पैसा ज्ञातिसंस्थांस कमी व्याजानें देतां येणार नाहीं किंवा घरें किंवा चाळी बांधून तीं कमी भाडयानें देऊन स्वज्ञातीय लोकांची सोय करितां येणार नाहीं. त्याचप्रमाणें असलेली मिळकत सुरक्षित ठेवणें हें

त्यांचें प्रधान कर्तव्य आहे. ती वाढण्याचा प्रयत्न करणें गौण आहे. आपल्या कर्तव्याकडे कांटेकोर दृष्टीनें पाहणाऱ्या ट्रस्टींच्या हातून कोणताही नवीन उपक्रम होणें अशक्य आहे. कारण त्यांच्या दृष्टीस अडचणीचें गुरुत्व व फायद्यांचें लघुत्व दिसावयाचें. म्हणून कोणतेंही लोकपयोगी कार्य करावयाचें असल्यास त्याबद्दल ट्रस्टींस लोकांकडून प्रेरणा झाली पाहिजे.

यापेक्षां श्री. श्रीपदराव वर्दे यांनीं वार्षिक सभेंत केलेली सूचना म्हणजे ट्रस्टींनीं देवाल-यांच्या कारभाराच्या व्यवस्थेसाठीं ऑफिस व सभां-साठीं सभागृह बांधावें, व या कामासाठीं बांधलेल्या इमारतीचा अवशिष्ट भाग ज्ञातिसंस्थांस भाड्यानें द्यावा ही जास्त व्यवहार्य आहे असें आम्हांस वाटतें. असें केल्यानें देवालयांचें हित व इतर संस्थांचें उद्दिष्ट हीं दोन्ही साधतील, व स्वज्ञातीच्या सर्व संस्था एकत्र नांदतील. देवालयाच्या व्यवस्थेसाठीं ऑफिस व सभागृह हीं आवश्यकतेच्या सदरांत पडूं शकतील असें म्हणावयास कायद्याचा कीस काढा-वयाची जरूरी नाहीं.

परंतु ऑफिस व सभागृह यांची जरूरी ट्रस्टींच्या बोर्डास वाटत असेल काय ? या प्रश्नाचें उत्तर नाहीं असें द्यावें लागेल. " आज पंचवीसपेक्षां जास्त वर्षें ट्रस्टचा कारभार स्वतंत्र ऑफिसशिवाय सुरळीत चालला आहे कीं नाहीं ? कांहीं कपाटें आनंदकाननांत, थोड्या चोपड्या कारकुनाच्या बिऱ्हाडीं, कांहीं माल श्रीबालाजी मंदिरांत, उरले सुरले रेकॉर्ड सेक्रेटरीच्या घरीं, अशा बारभाई पद्धतीनें आम्हीं ट्रस्टचा कारभार आजपर्यंत हाकला, मोठ-मोठे खटले लढून विजय मिळविले, आम्हांस ऑफिस-सभागृह वगैरे उपाधींची उणीव भासली नाहीं. उलट ऑफिसच्या भाड्यास लागणाऱ्या रकमेची बचत केल्यामुळें गेल्या पंचवीस वर्षांत देवालयांचा हजारों रुपयांचा फायदा झाला असें ट्रस्टी मोठ्या अभिमानानें सांगतील. खरें आहे. पैशाच्या दृष्टीनें पाहिलें तर फायदा झाला हें कबूल करावें लागेल. तथापि ट्रस्टींस नम्रपणानें असें सांगावेंसें वाटतें कीं, मित्राच्या घरीं फुकट चम-चमीत भोजन मिळतें म्हणून एखादा इसम आपलें घर टाकून सदोदित मित्रगृहीं राहूं लागला तर तो त्या मित्राच्या त्याचप्रमाणें इतर लोकांच्या तिरस्कारास व अवहेलनेस पात्र होतो व स्वाभिमानास मुकतो. ज्या ट्रस्टचा फंड जवळ जवळ दोन लाख आहे, त्यानें इतकी कार्पण्यदृष्टि ठेवावी काय ?

भुलेश्वर येथें मिळालेल्या जागेची किंमत आजच्या वाढत्या दरांत अडीच–तीन लाख रुपये येईल. त्या वस्तींत घर न बांधतां ती जागा विकून गिरगांवच्या बाजूस वरीलसारखी इमारत बांधली अगर घेतली, तर देवालयाचा व ज्ञातीचाही फायदा होईल.

देवालयांचें ट्रस्ट हें शरत्कालीन मेघाप्रमाणें दिसावयास लठ्ठ परंतु कोरडें आहे असें समजून आमच्या संस्थांनीं स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा प्रयत्न करावा. त्यांनीं आपापल्या निधिमधून आपा-पल्या भागापुरती रक्कम काढून ती एकत्र करून सर्वांसाठीं म्हणून एक इमारत उभारावयाचा प्रयत्न कां करूं नये ? सारस्वत ब्राह्मणसमाजासही तसें करतां येईल. अशा रीतीनें 'दसकी लडकी एकका बोजा' या म्हणीप्रमाणें सर्व संस्थांच्या सहकार्यानें हां हां म्हणतां इमारत होऊं शकेल. सारस्वत सहायक मंडळीस हल्लींच रा. कुवाडेकरांकडून कार्यालयासाठीं चार हजार रुपये मिळाले आहेत. प्रयत्न केल्यास दुसऱ्या दानशूर सारस्वतांस कुवाडेकरांप्रमाणें आपलें किंवा आपल्या प्रियजनांचें स्मारक बिल्डिंग फंडास देणग्या देऊन करावयाची इच्छा होईल. म्हणून सारस्वत ब्राह्मण समाजांतील सर्व संस्थांनीं एकवटून प्रयत्न केल्यास स्वतःच्या मालकीचें गृह पाहावयाचें भाग्य त्यांस लवकर लाभेल असें आम्हांस वाटतें. तो दिन कोणत्याही उपायानें लवकर उजाडो अशी आमची श्रीभुलेश्वरास प्रार्थना आहे.

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद्

संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें आठवें अधिवेशन इ. स. १९१७ सालीं अलिबाग येथें झालें. त्यानंतर अद्यापपर्यन्त अधिवेशन झालें नाहीं; तथापि असें अधिवेशन होण्याची आवश्यकता वाटल्यामुळें कांहीं मंडळीनें सभा भरवून परिषदेच्या जनरल सेक्रेटरींना यंदा मुंबई येथें परिषदेचें अधिवेशन भरविण्याची विनंती स्वीकारून परिषदेच्या जनरल सेक्रेटरींची स्वज्ञातिबांधवांस पुढीलप्रमाणे विनंती जाहीर करण्यांत येत आहे:—

"संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें नववें अधिवेशन मुंबई येथें ता. २६, २७ व २८ अक्टोबर सन १९३५ रोजीं भरविण्यासाठीं श्री. बॅरिस्टर व्ही. जी. दळवी व इतर गृहस्थ यांच्या कमिटीनें पाठविलेल्या निमंत्रणपत्रिकेनुसार परिषदेचें अधिवेशन मुंबई येथें वरील दिवशीं किंवा त्या सुमारास भरविण्यांत येईल. परिषदेस निमंत्रण करणारांकडून स्वागत कमिटीची योजना झाली असून परिषद् भरविण्यासंबंधींचीं पुढील पत्रकें सदरील स्वागत-कमिटीकडून जनरल सेक्रेटरींच्यामार्फत केली जाईल. ही परिषद् अठरा वर्षांनंतर भरविण्यांत येत आहे. तरी ठिकठिकाणच्या गौड सारस्वत ज्ञातिबांधवांनीं परिषदेस प्रतिनिधि पाठवावे व सर्व प्रकारें सहाय्य करावें.

बाजी विष्णु नेरुरकर,
ता. २ जुलै १९३५ अनंत विश्वंभर साखरदांडे,
जनरल सेक्रेटरी,
सं. गौ. सा. ब्राह्मण परिषद्

या विनंतीचा स्वीकार करून सं. गौ. सा. ब्राह्मण परिषदेचे उद्देश व संघटना मान्य असलेल्या गौड सारस्वत ब्राह्मणबांधवांनीं या परिषदेंत जरूर भाग घ्यावा. स्वागत मंडळाच्या सभासदास रु. १० व प्रतिनिधीस रु. ३ याप्रमाणें वर्गणी आहे.

या परिषदेच्या पहिल्या बेळगांव येथील अधिवेशनांत पास झालेल्या संघटनेचे मुख्य नियम पुढीलप्रमाणें आहेत:—

"१ या परिषदेचें नांव संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषद" असें असावें.

२ गौडसारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील सर्व पोटभेदांचें एकीकरण व्हावें व त्यांच्यामध्यें परस्पर अन्नव्यवहार व शरीरसंबंध व्हावा, हें तत्त्व ज्यांस पूर्ण संमत आहे, अशा स्वज्ञातिगृहस्थांस या परिषदेचे सभासद होतां येईल.

३ स्वज्ञातींत ऐक्यवृद्धि व्हावी, व इतर ज्ञातींशीं सलोखा वाढावा या दोन तत्त्वांच्या पायावर आपल्या ज्ञातीची समाजिक, नैतिक, बौद्धिक व सांपत्तिक उन्नति करणें हा या परिषदेचा उद्देश होय.

जनरल सेक्रेटरी यांच्यावरील पत्रकानुसार स्वागत मंडळाची घटना झाली असून श्री. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर, न्या. सीताराम सुन्दरराव पाटकर, बॅ. व्ही. जी. दळवी आदिकरून सुमारें शंभर स्वज्ञातिगृहस्थ अद्यापपर्यंत या स्वागतमंडळाचे सभासद झाले आहेत. या स्वागतमंडळाचे अध्यक्ष बॅ. व्ही. जी. दळवी हे असून रा. शंकरराव पुंडलिक वर्दे, रा. सदानंद लक्ष्मण कापडी व रा. शांताराम वा. केंकरे हे सन्मान्य चिटणीस आहेत. रा. भिकाजी सीताराम सबनीस, ॲडव्होकेट, स्वज्ञातीच्या देवळांचे एक ट्रस्टी व सेक्रेटरी आणि रा. डी. के. नेगे यांना खजिनदार नेमण्यांत आलें आहे. स्वागत मंडळाच्या सभासदांची सभा लवकरच भरून परिषदेच्या अध्यक्षांची निवडणूक करण्यांत येईल.

या संमेलनास जोडून स्वज्ञातियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविण्याची योजना झालेली असून त्यासाठीं प्रदर्शनमंडळाचीही घटना झालेली आहे. प्रदर्शन मंडळाचें अध्यक्षस्थान न्या. सीताराम सुन्दरराव पाटकर यांच्या पत्नी सौ. शांताबाई पाटकर

यांनीं मंडित केलेलें असून सौ. डॉ. मालिनीबाई सुकथनकर, सौ. नलिनीबाई दळवी; सौ. कमलाबाई डोंगरकेरी, व सौ. लक्ष्मीबाई परुळकर यांची उपाध्यक्षांच्या स्थानीं निवड झालेली असून आणखीही सुविद्य गौड सारस्वत भगिनींची उपाध्यक्षांच्या स्थानीं योजना व्हावयाची आहे. सौ. पद्माबाई माडगांवकर, कुमारी माणिक राजाध्यक्ष; सौ. सीताबाई पडबिद्री आणि रा. रा. वामन पुंडलिक वर्दे, रा. वसंतराव रा. तळवडेकर आणि रा. ए. ए. भोंसुले, हे भगिनी-बांधव प्रदर्शनमंडळाचे सन्माननीय चिटणीस आहेत.

प्रदर्शनाच्या माहितीचें पत्रक व नियमावलि इंग्रजींत व मराठींत प्रसिद्ध झाली असून प्रदर्शनासाठीं कामें पाठविणाऱ्या भगिनींनीं व बंधूनीं तीं पत्रकें मागवून घ्यावीं अशी प्रदर्शनमंडळाची विनंती आहे. प्रदर्शनासाठीं देणग्या देऊन प्रदर्शनांत येणाऱ्या कामासाठीं बक्षिसें ठेऊन या कांहींशा खर्चाच्या परंतु स्वज्ञातीला अत्यंत उपयुक्त असलेल्या कार्यास सर्व स्वज्ञाति यांनीं मनःपूर्वक सहाय्य करावें आणि परिषदेचे प्रतिनिधि व्हावें अशी आमची सर्व ज्ञातिबांधवास आग्रहाची विनंती आहे. महाराष्ट्र सारस्वतानें ज्ञातिपरिषदेसाठीं वेळोवेळीं केलेली शिफारस फलद्रूप झालेली पाहून आम्हांस समाधान वाटत असून ही परिषद् व प्रदर्शन दोन्ही यशस्वी होतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

---


## धी बॉंबे प्रॉव्हिडंट अँड जनरल अॅश्युरन्स कं. लि.

### गांवोगांवीं भरपूर कमिशनवर

### हुशार, होतकरू व प्रामाणिक

# एजंट्स पाहिजेत

विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा

हेड ऑफिसः—**आत्माराम बिल्डिंगस्**

३४० ए, गिरगांव रोड, **मुंबई नं. २**

# ज्ञातिवृत्त

## १ अभिनंदन

नाणावलेल्या शिल्पकाराचें स्वदेशीं आगमन: श्रीयुत रामचंद्र पांडुरंग कामत हे शिल्पशास्त्राचा अभ्यास उत्तम रीतीनें पुरा करून व याच कलेचें निरीक्षण करण्याकरितां फ्रान्स, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड, इटली वगैरे युरोप खंडांतील बहुतेक सर्व देशांत प्रवास करून ता. १ ऑगस्ट १९३५ रोजीं पी. अॅन्ड्. ओ. कंपनीच्या "स्ट्रॅथर्ड" या टपालच्या आगबोटीनें ४॥ वर्षांनीं मातृभूमीस परत आले आहेत, हें जाहीर करण्यास आम्हांस संतोष वाटतो.

श्रीयुत कामत यांचा जन्म गोमंतकांतील मडकई या खेडेगांवांत झाला. तेथें त्यांचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर ते वयाच्या १६ व्या वर्षी चित्रकलेचें शिक्षण घेण्याकरितां मुंबईस आले. कोणत्याही प्रकारची घरची मदत नसतां स्वावलंबनानें व दीर्घ परिश्रमानें त्यांनीं प्रथम केतकर आर्ट स्टुडिओ व नंतर जे. जे. स्कूल ऑफ् आर्ट या संस्थांत शिक्षण घेऊन त्यांनीं आपला मॉडेलिंगचा अभ्यासक्रम अत्यल्पावधींत अत्यंत यशस्वी रीतीनें पुरा केला व आर्ट्स स्कूलमधील सर्वोत मोठी शिष्यवृत्ती व मान 'महाराव ऑफ् कच्छ' शिष्यवृत्ति व मेयो मेडल् हीं त्यांनीं पटकाविलीं. १९३० सालच्या फेब्रुवारी महांत मुंबई येथें भरलेल्या "बॉम्बे आर्ट सोसायटीच्या" वार्षिक प्रदर्शनांत "गळाला मासा लागला" उर्फ "कोळयाचा मुलगा" ह्या त्यांनीं तयार केलेल्या प्लॅस्टर ऑफ् पॅरिसच्या पहिल्याच कामास सोसायटीचें रौप्यपदक मिळून त्यांच्या नांवाचा जनतेंत प्रथम बोलबाला झाला. शिवाजीचा पुतळा तयार करणारे सुप्रसिद्ध शिल्पकार श्रीयुत विनायकराव करमरकर, कॅ. डब्ल्यू. इ. ग्लॅडस्टन् सॉलोमन वगैरे तज्ञांनीं व इतर मित्रांनीं उत्तेजन दिल्यामुळें व रा. ब. स. वि. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीनें [ज]रूर ती आर्थिक मदत केल्यामुळें त्यांनीं शिल्पकलेचा [वि]शेष अभ्यास करण्याकरितां ता. ५ जानेवारी [१]९३१ रोजीं विलायतेस प्रयाण केलें. 'रॉयल [अ]ॅकॅडेमी ऑफ् आर्टस् लंडन' या संस्थेंत दाखल [हो]ऊन पुढील अभ्यासक्रमास सुरवात केली; व [अ]वघ्या १० महिन्यांच्या आंतच सदर संस्थेच्या [वि]द्यमानें लंडन येथें भरलेल्या वार्षिक प्रदर्शनांत एक [रौ]प्यपदक, एक ब्राँझ् पदक ३० पौंडांचें व १० [पौ]ंडांचें अशीं दोन पारितोषिकें त्यांनीं मिळविलीं. [पु]ढील सालच्या (१९३२) प्रदर्शनांतही त्यांनीं [ठे]वलेल्या शिल्पकलेचें काम सर्वोत्कृष्ट ठरून त्यांना [प]न्नास पौंडांची "एडवर्ड स्टॉल" शिष्यवृत्ति, दहा पौंडांचे एक पारितोषिक, एक सिल्व्हर मेडल् व एक ब्राँझ मेडल् मिळून त्यांचा बहुमान झाला. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन समारंभाच्या वेळीं त्या संस्थेच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत श्रीयुत कामत यांच्या कलेची ओतप्रोत स्तुति केली. तसेंच सर गिल्बर्ट, आर्. ए., व सर डब्ल्यू. रॉथरस्टेन, एम्. ए., आर्. सी. ए., रॉयल कॉलेज ऑफ् आर्टस्चे प्रिन्सिपॉल व इतर कलाभिज्ञ यांनीं समारंभाच्या वेळीं जातीनें त्यांचें अभिनंदन केलें. गेल्या सालींही श्री. कामत यांना त्यांच्या कामाबद्दल सदर संस्थेनें आपलें सुवर्ण पदक, व दोनशें पौंडांची एडवर्ड स्टॉल् प्रवास-शिष्यवृत्ति देऊन त्यांच्या अत्युच्च कलेचा पुनः एकवार गुणगौरव केला. लंडन येथें सन १८६५ मध्यें रॉयल अॅकॅडेमी ऑफ् आर्टस् स्थापन झाल्यापासून आजपावेतों कोणाही हिंदी इसमास हें सुवर्णपदक देण्यांत आलें नव्हतें, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या यशाच्या असामान्यतेची कोणासही कल्पना येईल. या नवीन सन्मानानें त्यांनीं अखिल भारतवर्षाची कीर्ति परराष्ट्रांत उत्तम रीतीनें प्रस्थापित केली याबद्दल त्यांच्या देशबांधवांस व भगिनींस आनंद व अभिमान वाटणें साहजिकच आहे. मुंबई येथील

टाइम्स ऑफ् इंडिया या पत्रानेंही श्री. कामत यांच्या "न भूतो !" अशा या यशाबद्दल संपादकीय लेख लिहून त्यांचा योग्य गौरव केला, ही गोष्टही पुष्कळांच्या स्मरणांत असेल. या शिष्यवृत्तीच्या अटींच्या अन्वयें शिल्पकलेचा विशेष अभ्यास करण्यासाठीं व निरीक्षण करण्यासाठीं त्यांनीं फ्रान्स, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड, इटली, रशिया वगैरे युरोप खंडांतील अनेक देशांत पुष्कळ पर्यटण केलें व त्या कलेच्या आपल्या ज्ञानांत अमुप भर घातली. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या सर जे. जे. स्कूल ऑफ् आर्टस्च्या वार्षिक सरकारी अहवालांतही त्यांना मिळालेल्या या असामान्य यशाचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे.

अशा प्रकारें आपला शिल्पकलेचा नियोजित अभ्यासक्रम ब्रिटिश साम्राज्याच्या राजधानींत उत्कृष्ट रीतीनें पुरा करून ते आतां साडेचार वर्षांनीं मातृभूमीस परत आले आहेत. हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व इतर सधन मंडळी श्री. कामत यांना आपल्या थोर गुणांचें चीज करण्याची योग्य ती संधि देतील व त्यांचा उत्तरोत्तर असाच उत्कर्ष होईल अशी आम्हांस उमेद आहे.

—श्रीयुत **विनायकराव विठ्ठलराव कामत** यांची जी. आय्. पी. रेलवेंत असिस्टंट डेप्युटि एजंट ( स्टाफ ) या जागेवर हंगामी नेमणूक झाल्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. श्री. कामत यांनीं इंग्रजी भाषेचें मामुली शिक्षण घेऊन १९०७ सालीं आपल्या वयाच्या १५।१६ व्या वर्षी जी. आय्. पी. रेलवे कंपनीच्या नोकरींत महिना रु. २० च्या अल्प वेतनावर प्रवेश केला. पुढें त्यांच्या पगारांत हळूहळू बढती होऊन ते १९२२ मध्यें महिना १५० रुपयेपर्यंत पोंचले. जी.आय्. पी. सरकारी रेल्वे झाल्यानंतर १९२८ सालीं सीनियर अकाउंटंटची जागा त्यांस मिळाली व लवकरच अकाउंट व आडिट ऑफिसें निराळीं करण्यांत आलीं. तेव्हां दरमहा चारशेंच्या अकाउंटंटच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली. या वेळीं त्यांस ऑफिसरच्या वरिष्ठ जागांवर काम करावयाची संधी वारंवार मिळाली, व आपलें काम चोख बजावून आपली हुशारी व कार्यक्षमता त्यांनीं सरकारच्या नजरेस आणिली, व ते असिस्टंट अकाउंटंसी ऑफिसरच्या जागेपर्यंत पोंचले. शेवटीं गेल्या मे महिन्यांत उपरिनिर्दिष्ट महत्त्वाच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली आहे. अल्प शिक्षणाच्या सामग्रीनें आयुष्याचा आरंभ करून स्वतःच्या कर्तबगारीनें महत्पदास चढलेल्या या ज्ञातिबंधूचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावो, असें आम्ही इच्छितों.

—श्री. **यशवंतराव नीळकंठ नाडकर्णी** बी.ए., एल.एल.,बी. यांस मुंबई स्मॉल कॉज कोर्टाचे ॲक्टिंग न्यायाधीश नेमण्यांत आलें आहे, हें नमूद करावयास आम्हांस आनंद वाटतो. श्री. नाडकर्णी झेवियर कॉलेजांतून बी. ए. झाले, व कायद्यांची परिक्षा देऊन मुंबई हायकोर्टात वकिली करूं लागले. पुष्कळ वर्षेपर्यंत त्यांनीं वेस्टर्न इंडिया वकील्स ॲसोसिएशन या संस्थेच्या सेक्रेटरीचें काम केलें. सन १९२६ सालांत ते ॲडव्होकेट ( O.S. ) झाले. श्री. नाडकर्णी यांनीं यापुर्वी तीन चार वेळ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचें काम केलें आहे. या जागेवर असतांना उत्तम कायदेपंडित, निस्पृह व दयाळू न्यायाधीश व सौजन्यवान् अधिकारी असा लौकिक त्यांनीं कमावीला आहे. स्मॉल कॉज कोर्ट हें गरिबांचें कोर्ट म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील न्यायाधीश कायद्याच्या ज्ञानांत तर पारंगत असला पाहिजेच, परंतु त्यास मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान व गरिबांशीं सहानुभूति या गुणांची विशेष जरूरी आहे. पुष्कळदां त्या न्यायाधिशाला गरिबांचा वकील व न्यायाधीश असें दुहेरी काम करावें लागतें. श्री. नाडकर्णी यांचा शांत स्वभाव, सौजन्य इत्यादि गुणांचा गरिबांस उपयोग होईल. आमच्या माहितीप्रमाणें श्री. नाडकर्णी हे मुंबई स्मॉल कॉज कोर्टाचे पहिलेच न्यायाधीश स्वज्ञातिय आहेत; या जागेवर त्यांची नेमणूक झाल्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभि-

नंदन करितों व त्यांनीं मिळविलेली सुकीर्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन त्यांना लवकरच न्यायाधीशाची कायम जागा मिळो, असें इच्छितों.

बालबृहस्पति— मॅट्रिकच्या परीक्षेच्या बांकावर इतर बाल विद्यार्थ्यांबरोबर प्रौढ व क्वचित चाळीशी उलटून गेलेले वृद्ध बसल्याचीं उदाहरणें बरींच घडलीं आहेत; पण बांकावर बसल्यावर डेस्कपर्यंत धड हात न पोंचणारीं मुलें या परीक्षेला बसून पास झाल्याचीं उदाहरणें अगदींच हाताच्या बोटांवर मोजण्याएवढीं घडून आलीं आहेत. मुंबई-युनिव्हर्सिटीची स्थापना झाल्यापासून म्हणजे १८५३ सालापासून कै. न्या. मू. तेलंग, कै. गोपाळ कृष्ण गोखले व कै. डॉ. शिरवळकर व डॉ. परांजपे हे चौघे विद्यार्थी अनुक्रमें वयाच्या १४ व्या वर्षी या परीक्षेला बसून पास झाले; पण यंदा एका विद्यार्थ्यानें अल्प वयांत ही परीक्षा पास होण्याच्या बाबतींत या सर्व व्यक्तींवर ताण करून युनिव्हर्सिटीचें रेकॉर्ड मोडलें आहे ! या विद्यार्थ्याचें नांव दिनकर भास्कर महात्मे असून त्याचें वय अवघें १२ वर्षांचें आहे. या विद्यार्थ्याच्या अभ्यासक्रमाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. लहानपणीं विषमज्वरानें पछाडल्यामुळें या विद्यार्थ्याच्या शिक्षणक्रमाला बऱ्याच उशीरां सुरवात झाली. १९२९ मध्यें त्यानें श्रीगणेशाला घरींच सुरवात केली. १९३० एप्रिलपर्यंत मराठी चार इयत्तांचें शिक्षण त्यानें घरींच संपविलें. नंतर तो पोर्तुगीज शाळेंत दाखल झाला व तीन वर्षांच्या दोन कोर्सचा अभ्यास एका वर्षांत करून एकाच वर्षी या दोन्ही परीक्षा पास झाला. १९३१ मध्यें त्यानें इंग्रजी शिक्षणाला सुरवात केली. १९३२ मध्यें जूनांत हा चौथींत बसला, १९३३ च्या जूनांत एका वर्षाची उडी घेऊन तो ६ वींत गेला आणि १९३४ मध्यें मुंबईत येऊन त्यानें युनियन हायस्कूलमध्यें सातवींत दाखल होऊन यंदा मॅट्रिकमध्यें तो उत्तीर्ण झाला ! ह्या इतिहासाकडे पाहिलें, म्हणजे या बालबृहस्पतीच्या असाधारण ग्रहणशक्तीबद्दल व बुद्धिमत्तेबद्दल जेवढें कौतुक वाटतें तेवढेंच आश्चर्यही वाटतें. या बालबृहस्पतीचें या सुयशाबद्दल आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून त्याला त्याच्या भावि शिक्षणक्रमांत व आयुष्यांत असेंच यश मिळत जावो असें इच्छितों.

**रा. अण्णासाहेब वाघ यांचा सन्मानः** गेल्या त्रैवार्षिक म्युनिसिपल निवडणुकीमध्यें जी वॉर्डतर्फे सर्वांत जास्त मतें मिळून निवडून आल्याबद्दल दादर येथील शिवाजी पब्लिक स्कूलच्या दिवाणखान्यांत सारस्वत ब्राह्मण सेवासंघातर्फे सभा भरून रा. अण्णासाहेब वाघ यांचें अभिनंदन करण्यांत आलें. सभेचें अध्यक्षस्थान प्रि. रा. व्यं. नाडकर्णी यांनीं स्वीकारलें होतें.

प्रिन्सिपॉल नाडकर्णी यांनीं इंग्रजींत व रा. चिंतामणराव पागनीस यांनीं मराठींत अभिनंदनपर भाषणें केल्यावर उत्तरादाखल बोलतांना श्री. वाघ यांनीं असें सांगितलें कीं, 'गेल्या निवडणुकींत माझे प्रतिस्पर्धि वजनदार व अनुभवशीर असतांनाही मला जें यश मिळालें, त्यास कारण माझ्या ज्ञातिबांधवांनीं व इतर मित्रगणांनीं केलेलें सहाय्य होय, हें मी कधींही विसरणार नाहीं. मुंबईतील नागरिकांची कांहीं सेवा करावी अशी माझी पुष्कळ दिवसांची इच्छा होती. ती सफळ होण्याची संधि मला मिळालेली आहे. तिचा योग्य फायदा घेऊन माझ्याकडून होणारी कामगिरी मी यथाशक्ति बजावण्याचा प्रयत्न करीन व आपणही मला मदत करून प्रोत्साहन द्याल अशी आशा आहे.'

यानंतर रा. अण्णासाहेबांस व अध्यक्षांस हारतुरा देण्यांत आला व अध्यक्षांचे आभार मानल्यावर अल्पाहार होऊन हा समारंभ संपला.

## २ सभा संमेलनें वगैरे

डॉ. भाऊदाजींची पुण्यतिथि—ता. २३ जून १९३५ रोजी सारस्वत ब्राह्मण समाजांत साजरी करण्यांत आली. त्या प्रसंगीं श्री. शंकर

२२ २१३ ता. २४।८।३२

राव पुंडलिक वर्दे, B.A., LL.B. यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. माधवराव दामोदर अळतेकर, M.A. यांचें डॉ. भाऊंच्या चरित्रावर सुश्राव्य व्याख्यान झालें, याचा सारांश असा:—

"डॉ. भाऊदाजी दिवंगत झाल्यास ६१ वर्षें झालीं. म्हणजे ते तीन पिढयांपूर्वीचे पुढारी होते. जगन्नाथ शंकरशेठ, दादाभाई नौरोजी वगैरे जे पुढारी इंग्रजी राज्य महाराष्ट्रांत सुरू झाल्यावर पहिल्यानें चमकले, त्यांपैकीं भाऊदाजी हे होत. बदलत्या काळाबरोबर आपल्या निरनिराळ्या विषयांसंबंधींच्या कल्पनाही बदलत जातात. परंतु बदलत्या कल्पनांच्या मागें सुद्धां कांहीं त्रिकालबाधित तत्त्वें अशीं असतात, कीं त्या तत्त्वांच्या कसोटीनें मनुष्याची किंमत ठरवितां येते. तीच कसोटी भाऊदाजींच्या चरित्रास लावून पाहिली, तर ते फार थोर पुरुष होऊन गेले हें कोणाच्याही ध्यानांत येईल.

डॉ. भाऊ दाजी हे पाश्चात्य वैद्यकीय परीक्षा पास झालेले पहिले हिंदी डॉक्टर होते, म्हणून कांहीं ते थोर होते असें म्हणतां येणार नाहीं! ते पहिले डॉक्टर झाले, हा केवळ योगायोग; परंतु परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं आपल्या विषयावर आमरण व्यासंग चालविला. नुसतीं प्रिस्क्रिप्शनें खरडून समाधान मानलें नाहीं. रक्तपितीसारख्या भयंकर रोगावर औषध शोधून काढिलें यांत त्यांचा मोठेपणा दिसून येतो. त्याचप्रमाणें इंग्रजी राज्य नुकतेंच कोठें सुरू झालें असतां स्त्री-शिक्षणाचें महत्त्व जाणून 'स्टुडंट्स् लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी'ची मुलींची शाळा स्थापन केली ही गोष्ट त्यांच्या दूर दृष्टीचें द्योतक आहे. स्वतःच्या धंद्यांत पारंगतता मिळवूनही त्यांनीं ज्ञानप्रसारार्थ विविध प्रकारचे उद्योग केले, त्यावरून त्यांची विशाल बुद्धिमत्ता व उद्योगशक्ति दिसून येते. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास व्हावा म्हणून राणीची बाग स्थापण्याच्या कामीं त्यांनीं खटपट केली. जुने शिलालेख मोठ्या प्रयासानें मिळवून ते जुळवून वाचणें यांच्यायोगें त्यांनीं भाषाशास्त्र, इतिहास इत्यादि शास्त्रांच्या ज्ञानांत भर टाकिली. मुकुंदराजाच्या ग्रंथांची अस्सल प्रत मिळवून ठेवण्याचा खटाटोप त्यांनीं केला. हे व्यवसाय त्यांनीं ज्या काळीं केले, त्या काळीं त्यांचें महत्त्व फारच थोड्या लोकांस समजत होतें. तें त्यांनीं ओळखून त्यासाठीं आपला वेळ व द्रव्य वेंचलें ही त्यांच्या मोठेपणाची खूण होय. हे निरनिराळे व्यवसाय त्यांना करतां आले, यामुळें त्यांच्या बुद्धीचा अष्टपैलूपणाही व्यक्त होतो. त्यांची विद्वत्ता एकदेशीय नसल्यामुळें ते विद्वान या पदवीस खरोखर पात्र होते. विशाल बुद्धिमत्ता, सततोद्योगप्रियता, ज्ञानवृद्धीसाठीं डॉ. भाऊ दाजींनीं निरनिराळ्या दिशांनीं केलेले प्रयत्न, यांनीं त्यांचा मोठेपणा दिसून येतो हें खरें, पण यांपेक्षांही चिरकालिक महत्त्वाचा असा त्यांचा गुण म्हणजे अन्यायाचा प्रतिकार करावयाची त्यांची उत्कट इच्छा. रंजल्यागांजलेल्यांना आपलें म्हणणें हें साधुत्वाचें लक्षण आहे, असें जें तुकारामांनीं सांगितलें तें भाऊ दाजींमध्यें विशेष होतें. ज्याला आपण व्यवहारज्ञान म्हणतों तें आपणांस शिकवितें कीं, दुर्बळ व समर्थ यांच्या लढ्यांत आपण समर्थाची कास धरावी. हें व्यवहारज्ञान भाऊ दाजींकडे नव्हतें, ही त्यांच्या मोठेपणाची निःसंशय खूण होय. एका गरीब शिंप्यास न्याय मिळावा म्हणून ते स्वखर्चानें हायकोर्टापर्यंत लढले हें पुष्कळांस माहित आहे. परंतु 'महाराजा लायबेल' केसमध्यें करसनदास मूळजींच्या बचावासाठीं वैष्णव महाराजाविरुद्ध साक्ष देऊन त्यांनीं केवढा स्वार्थत्याग केला याची कल्पना फारच थोड्यांस असेल. हा महाराजा व त्याचे भक्तगण म्हणजे मोठमोठे शेटजीही त्यांचीं गिऱ्हाइकें होतीं, त्यांजकडून होणाऱ्या हजारों रुपयांच्या वार्षिक प्राप्तीवर या साक्षीमुळें त्यांस पाणी सोडावें लागलें. अशा प्रकारचा करारीपणा, अशी अन्यायप्रतिकारबुद्धि एखाद्या राष्ट्रांतील माणसांत ज्या प्रमाणांत असेल, त्या प्रमाणांत त्याचा अभ्युदय होतो हें आपणास इतिहास सांगतो. म्हणून भाऊ दाजींसारख्या विभूतीची पुण्यतिथि एकाच ज्ञातीनें साजरी न करितां सार्वजनिक रीत्या साजरी करण्यांत आली पाहिजे."

**स्वज्ञातीचीं देवालयं वगैरेंच्या रिपोर्टाची सभा**—मुंबई येथील गौडसारस्वत ज्ञातीचीं देवालयें, धर्मार्थ संस्था व फंड यासंबंधीं ट्रस्टींच्या बोर्डानें तयार केलेला १९३३ सालचा रिपोर्ट व हिशेब पास करणें, नवीन ट्रस्टी व ऑडिटर नेमणें या कामासाठीं गौडसारस्वत ब्राह्मण ज्ञातीची सभा रविवार ता. ३० जून १९३५ रोजीं लक्ष्मीबाग, भटवाडी, येथें श्री. शंकरराव पुंडलीक वर्दे बी. ए., एल्.एल्. बी यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. त्या वेळीं १९३३ सालचा रिपोर्ट व हिशेब व मालमत्तेची यादी पास करण्यांत आली.

श्री. भुलेश्वरचे दागिने भोपीच्या ताब्यांतून चोरीस गेले त्याबद्दल ट्रस्टींतर्फे असा खुलासा करण्यांत आला कीं, हे दागिने नेहमींच्या वापरण्यांतील होते, व त्यांच्या किंमतीच्या भरपाईबद्दल रु. १६० भोपीनें द्यावयाचें कबूल करून त्याबद्दल लेखही करून दिलेला आहे. नेहमीं उपयोगांत नसलेले दागिने वगैरे जड-जवाहीर व रोखे वगैरे सेफडिपॉझिट व्हॉल्टमध्यें ठेवण्याबद्दलची शिफारस ट्रस्टींस करण्यांत आली. पुढील सालासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणें ट्रस्टींची निवड करण्यांत आलीः—

१ श्री. बाजी विष्णु नेरुरकर, B.A. LL.,B.
२ ,, विश्वनाथ गणपतराव दळवी, B.A., Bar-at-Law,
३ श्री. भिकाजी सिताराम सबनीस, B.A., L.L.B.
४ ,, बळवंत विठ्ठल वाघ, B.E.
५ ,, बळवंत भास्कर पाटकर, B.E.
६ ,, डॉ. आत्माराम रामचंद्र रांगणेकर, M.B., B.S.
७ ,, वामन पुंडलिक वर्दे, B. Com.

श्री. लक्ष्मण नारायण दडकर व श्री. जयवंत पांडुरंग वेलिंगकर यांस हिशेबतपासनीस निवडण्यांत आलें व पुढील हिशेबपत्रक ते दाखवतील त्या पद्धतीनें तयार करावें अशी शिफारस करण्यांत आली.

## डॉ. डी. व्ही. नाडकर्णी यांचें अभिनंदनीय यश



मुंबईचे डॉ. डी. व्ही. नाडकर्णी, एम्. एस् हे पंधरा महिन्यांपूर्वी इंग्लंडास गेले होते. ते एफ्. आर. सी. एस.ची परीक्षा पास झाल्याची बातमी आली आहे. पंधरा महिन्यांच्या अवधींत या परीक्षेचा अभ्यासक्रम पुरा करून परीक्षेंत उत्तम यश मिळविणारे हे पहिलेच हिंदी डॉक्टर होत. त्यांच्या या बुद्धिमत्तेचें त्यांच्या शिक्षकांनाही कौतुक वाटत आहे. डॉ. नाडकर्णी यांचा मुंबईतील विद्यार्थिजीवनक्रम व नंतर वैद्यकीय धंद्यांतील त्यांची प्रगति हीं दोन्ही उज्ज्वल प्रकारचीं आहेत. मुंबईतील के. ई. एम्. हॉस्पिटलमध्यें ते बरींच वर्षें काम करीत होते व ग्रँट मेडिकल कॉलेजांत अॅनॅटोमीचे अध्यापक होते.

यापुढें ते व्हिएन्ना येथें 'ब्लडलेस सर्जरी' या शास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं जात असून तेथून अमेरिकेला 'प्लॅस्टिक सर्जरी' च्या अभ्यासासाठीं जाणार आहेत.

## ३ सारस्वत ब्राह्मण समाजाची प्रेतवाहक गाडी

हिंदु समाजांतील तिरडीवरून प्रेत न्यावयाची पद्धत बरीच गैरसोईची आहे, असें पुष्कळ विचारवंतांचें मत आहे. मुंबईसारख्या शहरांत अंत्यसंस्कारांच्या सामग्रीच्या दुकानांतून विकले जाणारे बांबू कधीं कधीं किचकट व बारीक असल्यामुळें स्मशानाच्या रस्त्यावरच तिरडी मोडून फजिती व्हावयाचे प्रसंग येतात ! प्रेत जड असलें व स्मशानयात्रेला लोक थोडे असले तर खांद्यावरून तें नेणारांस त्राहिभगवन् म्हणावयाची पाळी येते ही गोष्ट नित्य अनुभवाची आहे. तिरडीमुळें होणाऱ्या या सर्व गैरसोई दूर करण्याच्या उद्देशानें कै. श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर यांनीं प्रेत नेण्यासाठीं एक गाडी तयार करून ती कांहीं वर्षांपूर्वी देवालयांच्या ट्रस्टींच्या बोर्डाच्या स्वाधीन केली; त्या गाडीचा उपयोग प्रसंगानुसार केला जात असे. अलीकडे कांहीं वर्षे ती गाडी नादुरुस्त असल्यामुळें स्वज्ञातीय मंडळींची गैरसोय होत होती. कांहीं ठिकाणीं प्रार्थनासमाजाच्या गाडीचा उपयोगही करण्यांत येत असे. ही उणीव दूर करावी म्हणून सारस्वत ब्राह्मण समाजानें प्रेताच्या स्मशानयात्रेसाठीं नवीन गाडी तयार केली आहे. या गाडीला स्प्रिंग वगैरे आधुनिक सर्व सोई असल्यामुळें ती ढकलावयास हलकी आहे. रबर टायर असल्यामुळें तिच्या चाकांचा आवाजही होत नाहीं. यामुळें या गाडीतून प्रेत नेणें सोपें व सोईस्कर होणार आहे. स्वज्ञातींतील एका सन्माननीय भगिनीकडून ही उपयुक्त वस्तु समाजाला मिळालेली आहे, ही गोष्ट आमच्या भगिनी आवश्यक सुधारणेच्या मार्गातील परंपरेची आडकाठी जुमानीत नाहींत याची निदर्शक आहे. ही गाडी स्वज्ञातींतील सॉलिसिटर श्री. भालचंद्र सीताराम सुखठणकर यांच्या मुगभाटमधील शांतारामाच्या वाडींत ठेविली आहे. श्री. सुखठणकर यांनीं या गाडीसाठीं एक 'स्पेशल शेड' बांधून दिली आहे. जागेच्या भाड्याबद्दल किंवा 'शेड' बांधण्याच्या खर्चाबद्दल त्यांनीं सारस्वत ब्राह्मण समाजाकडून कांहींही मोबदला घेतलेला नाहीं. गाडी देणाऱ्या भगिनी ( यांचें नांव प्रसिद्ध करावयाची आम्हांस मनाई असल्यामुळें तें प्रसिद्ध करतां येत नाहीं ) व श्री. सुखठणकर व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. श्री. सौ. मालिनीबाई यांनीं सारस्वत ब्राह्मण समाज व तद्द्वारा आपली ज्ञाति यांस उपकृत केलें आहे. श्री. दाभोळकर यांनीं दिलेली गाडी सोनापुरांत ठेविली असल्यामुळें पुष्कळ लोकांस तिचा फायदा घेणें कठीण होत असे. नवीन गाडी मुगभाटसारख्या मध्यवस्तींत आहे, म्हणून तिचा फायदा घेणें लोकांस सोईचें होईल. ही गाडी स्वज्ञातींतील लोकांसाठींच नसून सारस्वतेतर हिंदूंसही इच्छा असल्यास तिचा उपयोग करितां येईल. अंत्य संस्कारासाठीं प्रेत गाडींतून नेणें ही धर्मबाह्य सुधारणा आहे असा संशय कोणास येत असल्यास त्यांस एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, ही सुधारणा अपूर्व नाहीं. वेदकालीन आर्य लोक दहनासाठीं गाडींतूनच प्रेत नेत असत. ऋग्वेदाच्या सूत्रांत पुष्कळ ठिकाणीं याबद्दल उल्लेख आहे. तेव्हां आपण नवीन कांहीं करीत नसून बंद पडलेली अशी जुनीच पण सोईस्कर चाल पुनः सुरू करीत आहों असें समजलें पाहिजे. म्हणून ज्यांच्यावर दुर्दैवानें प्रसंग येईल, त्यांनीं या प्रेतवाहक गाडीचा उपयोग करावा अशी आमची शिफारस आहे.

---



# पुनर्विवाहास तयार

सारस्वत, ज्ञातीचे एक गृहस्थ. वय ४७, सुसंपन्न स्थितींत असलेले, विधवापुनर्विवाहास तयार आहेत. विधवा बाई सारस्वत ज्ञातींतील कोणत्याही पोटभेदांतील असून, साधारण शिकलेली असावी व वय ३० हून कमी नसावें. यासम्बन्धानें खालीं सही करणारांस प्रत्यक्ष भेटावें, किंवा पत्रव्यवहार करावा. सर्व माहिती व पत्रव्यवहार अगदीं गुप्त ठेविला जाईल.

**पांडुरंग भास्कर गोठोस्कर,**

हाजीकासम वाडी, फ्रेंच पूल, चौपाटी, मुंबई नं. ७

# शोचनीय मृत्यु

## कै. वा. न्यायमूर्ति मा. कृ. वागळे

गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील एक थोर गृहस्थ कै. वा. मुंतझीम-ई-खास-बहादुर न्यायमूर्ति माधवराव कृष्ण वागळे, बी. ए. बार-अॅट-लॉ, हायकोर्ट जज्ज इंदूर यांचा जन्म तारीख १७ सप्टेंबर सन १८७९ रोजीं इंदूर संस्थानांतील सत्वास या गांवीं एका जुन्या जहागीरदार कुटुंबांत झाला. जन्मल्यावर एक महिन्याच्या आंतच आई निवर्तल्यामुळें व वयाच्या नवव्या वर्षी वडील वारल्यामुळें लहानपणचें सर्व संगोपन त्यांची आजी रमाबाई यांनीं केलें. पुढें इंदूर येथील "इंग्रेजी मदरसा" या शाळेंत प्राथमिक शिक्षण झाल्यावर ते स्थानिक होळकर कॉलेजांत गेले व सन १९०० मध्यें कलकत्ता-विश्वविद्यालयाची बी. ए.ची परीक्षा उतीर्ण झाले. नंतर कांहीं दिवस ऑनररी ॲसिस्टंट फायनान्स मेंबरच्या हुद्यावर काम केल्यानंतर ते बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडला गेले. सन १९०६ पासून १९०९ पर्यंत ते तिकडे होते व या अवधींत त्यांनीं युरोप खंडभर प्रवास केला. लंडन येथें असतांना ते "लंडन इंडियन सोसायटी" या संस्थेचे उपाध्यक्ष (Vice President) होते व तेव्हां त्यांचें नामदार गो. कृ. गोखले, सर हेन्री कॉटन M. P., सर विल्यम वेडरबर्न, डॉक्टर रदरफर्ड वगैरे नामांकित हिंदी व इंग्रज लोकांशीं संघटण झालें. त्या वेळचे त्यांचे इतर सहाध्यायी कै. विठ्ठलभाई पटेल, सर मोरोपंत अभ्यंकर, न्यायमूर्ति रांगणेकर वगैरे बॅरिस्टर मंडळी होती.

सन १९०९ मध्यें इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन आल्यावर त्यांनीं मुंबई-हायकोर्टाची सनद घेतली व नंतर मध्यप्रांतांत येऊन दहा वर्षे वकिली केली. त्या कालांत त्यांनीं निरनिराळ्या सामाजिक व राजकीय कार्यांमध्यें आस्थेनें भाग घेतला होता व तेव्हांचे भारतमंत्री राइट ऑनरेबल ई. एस. मॉंटेग्यू यांच्याकडे मध्यप्रांतातर्फें जें शिष्टमंडळ (Deputation) गेलें होतें त्यांत हे होते. सन १९१८ मध्यें त्यांचे चुलते रावबहादुर बळवंतराव पांडुरंग वागळे हे हृदयाच्या विकारानें इंदूर येथें एकाएकीं वारल्यामुळें मध्यप्रांत सोडून त्यांना इंदूरला पुन्हा यावें लागलें व सन १९१९ मध्यें न्यायमंत्री (Legal Remembrancer:) म्हणून त्यांची इंदुरांत नेमणूक झाली. एक वर्षानंतर ते इंदूर हायकोर्टचे न्यायाधीश झाले व त्या जागेवर सन १९३२ पावेतों काम करून प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांना सेवानिवृत्त व्हावें लागलें. त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांना श्रीमंत महाराजसाहेबांनीं 'मुंतजीम-ई-खास बहादुर' ही बहुमानाची पदवी अर्पण केली होती.

न्यायमूर्ति वागळे निरनिराळ्या मेसॉनिक लॉजचे फार जुने व उच्च प्रतीचे फ्रीमेसन होते. खांडव्याच्या "Lodge Coronation' चे व इंदूरच्या "Mark Lodge' चे ते पोस्टमास्टर होते व महू येथील "Royal Arch chapter Malwa"चे फर्स्ट प्रिन्सिपाल होते. Senior Grand warden in the Grand Lodge of A. S. Free Masonery in India या फार उच्च हुद्याच्या जागेवर ते अधिष्ठित होते. याखेरीज District Grand Mark Lodge E.C. of Bombay आणि District Grand Royal Arch Chapter S. C. of India यांजमध्येंही त्यांस मानाचीं स्थानें प्राप्त झालीं होतीं.

सामाजिक व साहित्यिक कार्यांत ते अत्यंत जिव्हाळ्यानें भाग घेत असत. सन १९१६ मध्यें इंदुरांत भरलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचे ते मुख्य कार्यवाहक होते. गुरुवर्य कर्व्यांची Hindu Womens University, श्री. बाजीराव, मल्हारराव उत्सवमंडळ, महाराष्ट्र ब्राह्मणसभा, सारस्वत शिक्षण

प्रसारक मंडळ, इंदूर—या व इतर निरनिराळया लहान-मोठया संस्थांशीं त्यांचा निकट संबंध होता.

अखेरीच्या कांहीं दिवसांत हाय ब्लडप्रेशरच्या विकारानें त्यांची प्रकृति बरीच खालावली होती. तारीख १९ जानेवारी सन १९३५ रोजीं सकाळीं त्यांच्या कुटुंबांतल्या व इतर अनेक मित्रमंडळीस दुःखांत लोटून ते शांततेनें दिवंगत झाले. त्यांच्या प्रेतयात्रेला मोठा लोकसमुदाय जमला होता. त्यांच्या पश्चात् त्यांचीं तीन मुलें व दोन विवाहित मुली अशीं अपत्यें आहेत.

त्यांच्या मृत्यूनिमित्त सर्व स्थानिक कोर्टें व हायकोर्ट हीं एक दिवस बंद ठेवण्यांत आलीं. हायकोर्टच्या बेंच बारनें व त्याचप्रमाणें इतर संस्थांनीं दुखवटयाचे ठराव करून न्या० वागळे यांच्या शोकग्रस्त नातलगांकडे पाठवून दिले. इंदूरचे श्रीमंत महाराजसाहेब व श्रीमंत सौ० महाराणीसाहेब यांजकडूनही दुखवटयाचे संदेश पाठविण्यांत आले.

न्यायमूर्ति वागळे यांचा स्वभाव निगर्वी, सहनशील, धिम्मा, साधा व अत्यंत प्रेमळ होता. सबंध आयुष्यांत त्यांनीं कोणाचेंही मन दुखविलें नाहीं किंवा नुकसान केलें नाहीं. सल्लामसलत अथवा आर्थिक मदत मागावयास आलेल्या माणसाला त्यांनीं केव्हांही रिक्तहस्तें माघारी फिरविला नाहीं. स्नेहीसंबंधी, अधिकारीवर्ग, वकील-पक्षकार, व साधारण जनता या सर्वांशीं त्यांचे संबंध फार मनमिळाऊपणाचे व सलोख्याचे होते. न्यायासनावर असतांना करारी बाण्याचें व निःपक्षपातीपणाचें जरी त्यांचें वर्तन असे, तथापि न्यायदान करतांना त्यांचें अंतःकरण दयार्द्र दिसून येई. स्त्री-शिक्षण वगैरे सामाजिक बाबतींत न्या० वागळे यांचीं मतें पूर्ण प्रागतिक असत, तर धार्मिक बाबतींत ते जुन्या सनातनी बाण्याचे होते. तरी पण आपलीं मतें दुसऱ्यावर लादण्याचा त्यांनीं केव्हांही अट्टाहास केला नाहीं. मतभेद असतांही अतिशय सहिष्णुतेनें वागण्याचा बहुमोल गुण त्यांच्या ठिकाणीं वसत होता. लहानपणापासून त्यांची धर्मावर श्रद्धा होती व ते पक्के ईश्वरवादी होते. त्यांचा विद्याव्यासंग दांडगा होता. इंग्रजी संस्कृत व मराठी वाङ्मयाची त्यांना आवड होती व बहुमोल ग्रंथांचा त्यांनीं संग्रह केला होता. काव्याची त्यांना विशेष अभिरुचि होती. संस्कृतांत कालिदास व मराठींत मोरोपंत हे त्यांचे आवडते कवि होते व या कवींचीं कित्येक काव्यें त्यांना अगदीं मुखोद्गत असत.

न्यायमूर्ति माधवराव वागळे यांच्या निधनानें जुन्या पिढींतील एक सार्वजनिक कार्यकर्ता व नमूनेदार आदर्श पुरुष नाहींसा झाला असल्यानें सर्वांस हळहळ वाटणें साहजिक आहे. ईश्वर मृताचे आत्म्यास शांति व सद्गति देवो.

## कै. जयवंतराव वाघ

कारवार हिंदु हायस्कूलचे एक विद्वान व तरुण शिक्षक श्री. जयवंतराव वाघ हे मेनिन्जायटिसच्या विकारानें तारीख १८ एप्रिल रोजीं वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी कारवार येथें स्वर्गवासी झाले, हें कळविण्यास वाईट वाटतें. श्री. वाघ यांनीं शाळा-कॉलेजांतून उत्कृष्ट रीतीनें यशस्वी होऊन बी. ए. च्या परीक्षेंत गणित विषयामध्यें सन्मान ( Honours ) मिळविला, व लगेच म्हणजे तीन वर्षांमागें हिंदु हायस्कुलांत शिक्षक या नात्यानें ते रुजू झाले. त्यांचे वडीलही या शाळेंत बरींच वर्षें शिक्षक होते. एक वर्षामागें श्री. जयवंतराव हे बी.टी. च्या अभ्यासासाठीं मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाऊन सुमारें पंधरा दिवसांपूर्वी परीक्षा देऊन परत आले होते. ता. १६–४–३५ रोजीं त्यांना बी. टी.च्या परीक्षेंत उत्तम रीतीनें यशस्वी झाल्याबद्दल तार आली त्याच दिवशीं त्यांना ताप आला व मेनिन्जायटीस होऊन दोनच दिवसांत त्यांचा अंत झाला ! त्यांच्या स्मरणार्थ कारवार येथील हिंदु हायस्कुल बंद ठेवण्यांत आलें होतें. श्री. वाघ हे विद्यार्थ्यांचे एक आवडते शिक्षक होते. वक्तृत्व व लेखनकला यांतही त्यांची गति चांगली असून अनेक तऱ्हेच्या

खेळांत त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें होतें. कारवार येथें आदुरारोग्यमंडळ स्थापून व्यायामशाळा चालविण्यांत हेच प्रमुख होते. त्यांनीं गणितविषयावर एकदोन पुस्तकें लिहिलेलीं आहेत. त्यांच्यामागें त्यांची विधवा आई व बंधु आहेत. ईश्वर जयवंतरावांच्या आत्म्यास चिरशांति देवो.

## कै. वामनराव कानविंदे

बेळगांव येथील परीक्षक या साप्ताहिकाचे वयोवृद्ध संपादक श्री. वामनराव कानविंदे यांना उदराच्या विकारानें वयाच्या ७० व्या वर्षी बेळगावीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें. वृत्तपत्रव्यवसायाशीं प्रथम हौसेच्या संबंध येऊन नंतर या हौसेचें रूपांतर व्यवसायांत केलेल्या गेल्या पिढींतल्या वृत्तपत्रकारांपैकीं कानविंदे हे एक होते. त्यांनीं काढलेलें परीक्षक हें साप्ताहिक कार्यक्षेत्र व आकार यांनीं लहान असलें, तरी या साप्ताहिकाच्या द्वारें त्यांनीं आपल्या प्रांतिक क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचें महत्त्व लहान नाहीं. परीक्षक या नांवाला साजण्याजोग्या चिकित्सेनेंच वामनरावजींनीं आपल्या पत्रांतून अनेक सामाजिक, राजकीय व धार्मिक प्रश्नांची चर्चा केली आणि आपल्या निर्णायक मतांचें सार आपल्या वाचकांपुढें ठेवलें. भावनेपेक्षां बुद्धिप्रामाण्यावर व तर्कशुद्धतेवर त्यांचा कटाक्ष असल्यामुळें 'परीक्षकांतील त्यांचे विचार व मतें कांहीं प्रसंगीं लोकाभिरुचीला रुचलीं नाहींत; परंतु त्यामुळें त्यांच्या विचारसरणीमध्यें अथवा धोरणांत फरक पडला नाहीं. स्वज्ञातींतील सामाजिक भेदाभेद मोडून पोटजातींचें एकीकरण करण्यांत व त्या जातींत रोटीव्यवहार सुरू करण्यांत त्यांनीं इतर पुढाऱ्यांबरोबर घेतलेला पुढारीपणा व केलेले परिश्रम गेल्या पिढींतील व्यक्तींच्या स्मरणांतून अजून गेलेले नाहींत. आपलीं स्पष्ट मतें स्पष्ट शब्दांत बोलून दाखविण्यासाठीं त्यांनीं आपल्या लेखणीचा आपल्या हयातींत उपयोग केला आणि लोकानुरंजनाऐवजीं मार्गदर्शनाकडे आपली दृष्टि ठेविली. वामनरावांच्या मृत्यूनें वृत्तपत्रव्यवसायांतील एक निर्भय, व स्वतंत्र विचाराची व्यक्ति नाहींशी झाली असून परीक्षकाच्या वाचकांना तिची उणीव बराच कालपर्यंत भासल्यावांचून राहाणार नाहीं कै. वामनरावजींच्या मागें परीक्षकाचे सहसंपादक असलेले त्यांचे चिरंजीव वामनरावजींचें कार्य चालू ठेवतील अशी आम्हांला आशा आहे. परमेश्वर कै. वामनरावजींच्या आत्म्याला चिरशांति देवो !

## कै. रामचंद्र वामन नाडकर्णी

सारस्वत समाजांतील एक तरुण विद्वान रा. रामचंद्र वामन नाडकर्णी यांच्या आकस्मिक व अकालीं निधानाचें वृत्त नमूद करण्ययास फार वाईट वाटतें. रा. नाडकर्णी चारपांच दिवस इन्फ्लुएंझानें आजारी होते आणि त्यांचा हा सामान्य वाटणारा आजार प्राणांतिक ठरेल अशी कोणालाच कल्पना नव्हती ! परंतु, क्रूर काळानें आपला डाव साधला आणि रा. नाडकर्णी ता' १२ जून रोजीं सकाळीं ९॥ वाजतां वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी इहलोक सोडून गेले. विविध वृत्ताच्या जन्मकालापासून त्या संस्थेशीं ज्या विद्वान, मार्मिक व धुरीण लेखकांचा संबंध आला, त्यांपैकीं नाडकर्णी हे एक होते. विविध वृत्ताच्या बाल्यावस्थेंत त्यांनीं वृत्ताला केलेलें लेखनसहाय्य अमोल होतें. अनेक सुंदर लघुकथा, 'डमरूचे अवाज', 'दुनियेंतील देखावे' या मथळ्यांखालीं प्रसिद्ध झालेले मार्मिक लघुनिबंध, पुस्तकपरीक्षणें व टीका लिहून त्यांनीं वृत्ताचा साहित्यविभाग विभूषित केला आणि अलीकडे ऐतिहासिक संशोधनात्मक लेख लिहून विविधज्ञानविस्तारच्या लेखकवर्गांतही ते ठळकपणें चमकूं लागले होते. प्रतिपाद्य विषयाचा सखोल अभ्यास, मार्मिक चिकित्सक दृष्टि, उच्च दर्जाची विनोदबुद्धि व परिणामकारक भाषाशैलि या गुणांनीं त्यांचे लेख निर्दोष व आल्हादकारक झालेले आहे. संतवाङ्मयावरील त्यांचा अभ्यास खोल होता व या वाङ्मयाचा अभ्यास भाविक दृष्टि ठेवून न करतां शास्त्रीय व ऐतिहासिक सत्याची दृष्टि ठेवूनच झाला पाहिजे, असें त्यांचें मत होतें. विविध वृत्तांत त्यांनीं लिहिलेली रामदासांचा संप्रदाय ही लेखमाला त्यांच्या प्रभावशाली लेखणीची ओळख करून देण्यास पुरेशी आहे. नाडकर्णी यांच्या मृत्यूनें एक कसलेला विद्वान नाहींसा झाला असून त्यांच्यामागें त्यांची वृद्ध माता, तरुण पत्नी, दोन लहान मुलें आहेत ईश्वर रा. नाडकर्णी यांच्या आत्म्यास चिरशांति देवो !

# मुंबई-विश्वविद्यालयाच्या परीक्षांत विशेष सन्मान मिळविणारे विद्यार्थी

### एम्. ए.

नित्यानंद मंगेश वागळे—पहिला वर्ग (१) यांना के. टी. तेलंग गोल्ड मेडल व प्राइझ. व (२) सर लॉरेन्स जेंकिन्स स्कॉलरशिप-अर्धी-मिळाली.

### बी. ए.

लक्ष्मीकांत माधवराव नाडकर्णी—फर्स्ट क्लास फर्स्ट. यांना (१) जेम्स टेलर प्राइझ् (२) गंगादास स्कॉलरशिप व (३) लॉर्ड मिंटो स्कॉलरशिप, हीं परितोषिकें मिळालीं आहेत.

गणेश नारायण लवंदे—फर्स्ट क्लास. यांना प्रल्हाद सीताराम पटवर्धन स्कॉलरशिप मिळाली आहे.

त्रिंबक महाबळेश्वर तेलंग—फर्स्ट क्लास.

मधुकर वासुदेव धोंड-सेकंड क्लास. यांना मराठीचें दादोबा पांडुरंग तर्खडकर गोल्ड मेडल मिळालें आहे.

### इंटर आर्टस्.

शंकर दत्तात्रय चित्तार—फर्स्ट क्लास. यांना व्हुलिंग्ज प्राइझ मिळालें आहे.

लक्ष्मण जनार्दन मांजरेकर—सेकंड क्लास यांना बाई डायाकोर मोटा भॉय विजभुकणदास संस्कृत स्कॉलरशिप मिळाली आहे.

### बी. एस्सी.

श्रीनाथ श्रीपाद शिराळी—फर्स्ट इन फर्स्ट क्लास—वुइथ डिस्टिंक्शन. यांना सर जेम्स फर्ग्युसन स्कॉलरशिप मिळाली आहे.

### इंटर सायन्स.

| | |
|---|---|
| शांता गोविंद वागळे | दुसरा वर्ग. |
| चंद्रा काशीनाथ राजाध्यक्ष. | तिसरा वर्ग. |
| ताराबाई शिरवलकर. | ,, ,, |

### इंटर आर्टस्.

| | |
|---|---|
| कृष्णा नारायण नाडकर्णी | दुसरा वर्ग. |
| वासंती वामनराव केरकर | तिसरा वर्ग. |
| कुसुम वामनराव पाटकर | ,, ,, |
| इंदिरा नारायण कामत | ,, ,, |
| मीरा समशी | ,, ,, |
| मालिनी सदाशिव उम्रणकर | ,, ,, |

### फर्स्ट एम्. बी. बी. एस्.

| | |
|---|---|
| सुमती वामनराव पाडगांवकर | दुसरा वर्ग. |

### बी. ए.

| | |
|---|---|
| प्रभावती वसंत कंटक. | दुसरा वर्ग |
| सुशीला शिवराम रेगे | ,, |
| सुलभा द्वारकानाथ नाईक | तिसरा वर्ग. |
| नलिनी भिकाजी फोंडेकर | ,, ,, |
| शारदा राघवेंद्र मंकीकर. | ,, ,, |
| चंपू श्रीधर नाईक. | ,, ,, |

### बी. टी. (पार्ट फर्स्ट.)

| | |
|---|---|
| सुशीला वासुदेव परूळेकर. | दुसरा वर्ग. |

### बी. एस्.सी.

| | |
|---|---|
| मदन कृष्ण केळकर—फर्स्ट क्लास वुइथ डिस्टिंक्शन, | |
| श्रीधर श्रीनिवास प्रभू— | ,, ,, ,, ,, |
| राजाराय व्यासराय भट— | फर्स्ट क्लास. |
| माधव शांताराम भांडारकर— | ,, ,, |
| जनार्दन व्यंकटेश भट— | ,, ,, |
| कुसुम वसंत कंटक | दुसरा वर्ग |

### इंटर सायन्स.

| | |
|---|---|
| रामकृष्ण चनार्दन नेरूरकर — | फर्स्ट क्लास. |
| राधाकृष्ण पंढरीनाथ परूळेकर— | ,, ,, |

### फर्स्ट एक्झॉमिनेशन इन इंजीनिअरिंग.

| | |
|---|---|
| भगवंत दत्तात्रय दाणी — | फर्स्ट क्लास. |
| लक्ष्मीकांत श्रीपाद दुभाषी — | ,, , |
| सदाशिव रघुवीर भिसे — | ,, ,, |

### सेकंड एक्झॉमिनेशन इन इंजीनिरिंग.

| | |
|---|---|
| माधव शंकर वागळे — | फर्स्ट क्लास. |

# यशस्वी विद्यार्थिनी

## मॅट्रिक्युलेशन परीक्षा

| नंबर | संपूर्ण नांव | शाळा | मार्कांची बेरीज |
|---|---|---|---|
| १ | शारदा त्रिणेकर. | बॅन्ड, वांद्रें. | ४३३ |
| २ | शरयु शांताराम सबनीस. | सेंट कोलंबा, मुंबई. | ३७० |
| ३ | प्रतिभा व्यंकटराव कायकिणी. | राममोहन ,, | ३६२ |
| ४ | सिंधु शांताराम प्रभावळकर. | एन्. जे. कराची. | ३६१ |
| ५ | सुमती सिद्धेश्वर पंडित. | युनिअन, मुंबई. | ३४८ |
| ६ | सुशीला रामकृष्ण कालेलकर. | सेंट कोलंबा. ,, | ३४५ |
| ७ | नंदिनी अनंत कामत. | हुजूरपागा, पुणें. | ३४४ |
| ८ | उमा देवराव कोप्पीकर. | सेंट ए. पी. ,, | ३४२ |
| ९ | सुशीला दत्तात्रय येन्नामडी. | आर्. एस्. | ३३९ |
| १० | विमल कृष्णराव वागळे. | गर्ल्स. | ३३७ |
| ११ | सुशीला जिवाजी रेडकर. | चिकित्सक, मुंबई. | ३३६ |
| १२ | { रमाबाई दत्तात्रय नाडकर्णी. | ऑन. | ३३५ |
| | { हिरा वामन खोत. | एस्. बी. | ३३५ |
| १४ | रत्ना शिवराम हेमाडी. | सेंट कोलंबा, मुंबई. | ३३३ |
| १५ | { चंद्रा बळवंत रेगे. | स्टुडंटस् लिटररी, ,, | ३३२ |
| | { कुंदबाला महादेव सामंत. | सेंट कोलंबा. ,, | ३३२ |
| १७ | मीरा शिवराम बिजूर. | एम्. टयूट. ,, | ३३१ |
| १८ | वत्सला दत्तात्रय ठाकूर. | गर्ल्स. | ३२८ |
| १९ | { सीता नारायण हत्यंगडी. | सेंट थेरेसा, मुंबई. | ३२५ |
| | { लीला नरसिंगराव उद्यावर. | ईस्ट. | ३२५ |
| | { इंदिरा शिवराम हेमाडी. | सेंट कोलंबा, मुंबई. | ३२४ |
| २१ | { सुशीला सुब्राव धारेश्वर. | धारवाड. | ३२४ |
| | { सोना कृष्णराव गुंजीकर. | ,, | ३२४ |
| २४ | { कमला वामनराव रांगणेकर. | सेंट कोलंबा. मुंबई. | ३१९ |
| | { विमल रामकृष्ण वर्दे. | ,, ,, ,, | ३१९ |
| २६ | यमुना दिवेकर. | कॉन्. एम्. ,, | ३१५ |
| २७ | दुर्गा नागेश कुंबळे. | मुड. | ३१३ |
| २९ | { रत्नप्रभा शिवराम नाबर. | विज. | ३१० |
| | { वत्सला महादेव नाडकर्णी | चिकित्सक, मुंबई. | ३१० |
| ३१ | { लीला शंकर सामंत. | सेंट कोलंबा, ,, | ३०८ |
| | { प्रमिला कृष्ण परूळकर. | हुजूर पागा, पुणें. | ३०८ |
| ३३ | सुशीला गजानन वागळे | चंदारामजी, मुंबई. | ३०६ |
| ३४ | मालतीबाई आत्माराम गोलिकेरी, | एन्. हुबळ. | ३०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | अनसूया नारायणराव गायतोंडे, | आर. डी. मुंबई. | ३०२ |
| ३६ | प्रमिला रावराव मयेकर. | चिकित्सक, ,, | २९९ |
| ३७ | ताराबाई शांताराम वर्टी. | गिब, कुमठा. | २९८ |
| ३८ | सुशीला हरिभाऊ गिंडे. | बेळगांव. | २९६ |
| ३९ | लीला अनंत नाडकर्णी | हुजुरपागा, पुणें. | २९४ |
| ४० | { कमला श्रीधर मोने. | सेवा. ,, | २९२ |
| | गुलाब वामन गोठोस्कर. | हुजूरपागा ,, | २९२ |
| ४२ | { इंदिरा रामकृष्ण हेमाडी. | सेंट कोलंबा, मुंबई. | २९० |
| | गंगा शंकर वाघ. | के. | २९० |
| ४४ | सरला वामन दाभोळकर. | महा. बडोदें. | २८७ |
| ४५ | गिरिजा अप्पाजीराव वाघ. | एच्. के. मुंबई. | २८५ |
| ४६ | लीला अनंतराव शिरगांवकर. | सेंट कोलंबा, ,, | २८२ |
| ४७ | { अनसूया वासुदेव नाडकर्णी. | हुजूरपागा, पुणें. | २८१ |
| | शांता सदाशिव कोटणीस. | के. एस्. | २८१ |
| ४९ | भानुमती दीनानाथ तेलंग. | चिकित्सक, मुंबई | पास |
| ५० | सुशीला महादेव नाडकर्णी. | बेळ. | ,, |
| ५१ | सुशीला शांताराम मोने. | राममोहन, मुंबई. | ,, |
| ५२ | इंदिरा गोविंद ठेंगे. | सेंट कोलंबा, ,, | ,, |

* या यादींतून एखादें नांव वगळलें गेलें असल्यास अगर तींत चुकीचें नांव दाखल झालें असल्यास, तसें संपादकांस कळविण्याची अवश्य कृपा करावी.

---

# ध्येयदृष्टीची आवश्यकता

"आजकालच्या विद्यार्थीवर्गांत सर्वसाधारणपणें मला ध्येयशून्यता अगदीं स्पष्टपणें दिसून येते; आणि त्यामुळें भोंवतालची परिस्थिति त्यांना अधिकच बिकट वाटूं लागते, व त्यांच्या शिक्षणाचा त्यांना विशेष उपयोग न होतां त्यांची जीवितनौका या जगांत परिस्थितीप्रमाणें वाटेल तशी भटकत राहते. कोणत्याही उच्च शिक्षणापेक्षां ध्येयदृष्टि मी अधिक महत्त्वाची मानतों; आणि निश्चित ध्येयाखेरीज मनुष्याच्या हातून कोणतीही महनीय कामगिरी होणें शक्य नाहीं असेंही माझें ठाम मत आहे, व या ध्येयदृष्टीच्या अभावामुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारचा अंतःकरणाचा उत्साह किंवा विश्वांतील विविध ज्ञान आत्मसात् करण्याविषयींची अनावर इच्छा यांच्यामध्यें दिसून येत नाहीं."

डॉ. बाळकृष्ण

(किर्लोस्कर १२ जुलै १९३५)

# इतिहाससंशोधक आपटे यांची चुकभूल !

## एक बनावट कागद

(ले. रा. रा. वि. जि. नाडकर्णी)

पुण्याचे इतिहाससंशोधक रा. द. वि. आपटे यांनीं, पुण्यांतील भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या त्रैमासिकाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकांत "शिवचरित्र साहित्य खंड ५" याचीं पहिलीं आठ पृष्ठें दिलीं आहेत त्यांपैकीं पृष्ठ २ वर "सारस्वतांचें ब्राह्मणत्व" या मथळ्याखालीं एक कागद सटीप प्रसिद्ध केला आहे. हा कागद त्यांना कोणाकडून मिळाला याचा उल्लेख त्यांनीं केलेला नाहीं. पण "प्रस्तुत कागद मला मुंबई येथें मिळाला. हा कागद अस्सल नाहीं. अंतश्चिन्ही अशा कागदावर लिहिलेली नक्कल आहे." एवढा उल्लेख मात्र केला आहे. या छापलेल्या कागदावर उजव्या बाजूस मिति "शके १५५२ वैशाख इ. स. १६३० एप्रिल मे" अशी छापलेली असून डाव्या बाजूस "ले७५९ श. १५५२ वैशाख" असें छापलें आहे. या मितीच्या बाबतींत "यांत दिलेला मितीचा उल्लेख अपुरा असल्यामुळें कागदाची तारीख बरोबर आहे कीं नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं," अशी सावधगिरीची टीप देण्यास रा. आपटे विसरलेले नाहींत.

रा. आपटे यांनीं एक महत्त्वाचा कागद म्हणून "शिवचरित्र साहित्य खंड ५" यांत संग्रहित केलेला **हा कागद शके १५५२ चा नसून शके १७१० चा आहे.** आपटे यांनीं या कागदावर प्रसिद्ध केलेली मिति श्री शिवछत्रपतींच्या नव्या जन्मतिथीशीं जुळते म्हणून त्यांना हा कागद शिवचरित्रसाहित्यांत समाविष्ट करण्याची भूल पडलेली दिसते; पण ऐतिहासिक बनावांचा त्यांनीं थोडा विचार केला असता, तर आपण हा कागद शिवचरित्रसाहित्यांत दाखल करण्यांत चूक करीत आहोंत हें त्यांच्या लक्षांत आलें असतें. "सारस्वतांच्या ब्राह्मणत्वा" संबंधाचा प्रश्न श्रीशिवछत्रपतींच्या जन्मकालाच्या सुमारास व त्यापुढेंही कैक वर्षें उपस्थित झाला नव्हता; पुढें पेशवाईंत हा वाद उकरून काढण्यांत आला.

रा. आपटे यांनीं प्रसिद्ध केलेला कागद हा काशीच्या दादंभटप्रभृति कांहीं ब्राह्मणांनीं मुंबईतील "देशस्थचित्तपावनकर्हाटकगुर्जरप्रभृतिक वाडवां" ना शके १७१० मध्यें पाठविलेल्या पत्राची नक्कल आहे. मुंबईतील सुप्रसिद्ध वाळुकेश्वर देवालय व त्यांतील पूजेअर्चेचे अधिकार सारस्वत ब्राह्मणांचे असतां त्यांजकडून ते काढून घेण्यासाठीं इतर जातींच्या कांहीं ब्राह्मणांनीं कंपनीसरकारच्या मुंबई येथील कोर्टांत फिर्यादी करून खटपटी चालविल्या, त्या वेळीं काशीच्या ब्राम्हणांकडून उपरिनिर्दिष्ट निर्णयपत्र आणवून पुराव्यांत दाखल करण्यांत आलें. मूळ अस्सल पत्र कोर्टाच्या रेकॉर्डांत असून त्याची अस्सलबरहुकूम सरकारी कागदावर सरकारी सहीशिक्यानिशीं घेतलेली नक्कल मुंबईतील सारस्वत ब्राह्मणांतील एक सुप्रसिद्ध पुढारी कै. भवानी विश्वनाथ कानविंदे यांच्याजवळ होती, असा उल्लेख कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं आपल्या 'सरस्वती मंडळ' या पुस्तकांत (स. १८८४) केला असून वरील पत्रही त्यांत परिशिष्ट १ मध्यें पृष्ट २६ वर "काशीस्थ पंडितांची दुसरी संमति" या मथळ्याखालीं छापलें आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या "जातीभेदविवेकसार" या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तींत सदर पत्र देऊन वरील माहितीचा त्रोटक निर्देशही तेथें ग्रंथकर्त्यानें केला आहे.

ही नक्कल खालीलप्रमाणें आहे: --

" स्वस्ति श्रीनृपविक्रमशके १८४४ वर्तमानें कीलकनाम संवत्सरे उदगयने वैशाखे मासे शुक्लपक्षे स्वस्तिश्रीमत्सकलानुष्ठानतत्परमुम्बापुरस्थ विद्वद्वरदेशस्थाचित्तपावनकर्हाटकगुर्जरप्रभृतिक वाडवान्प्रति श्रीकाशीतो भट्टोपाख्यदादंभट्टादीना प्रणतयः। कुशलमुभयत्रवृत्तान्तोस्तु। तत्रभवद्देशे सासष्टि

कुशस्थलीज्ञातीयानां षट्कर्माभावोऽस्तीत्याक्षेपः कृतस्तत्रत्यैः । परंत्वेने षट्कर्माधिकारिणो न भवंतीति वक्तमशक्यं यतस्तावत्सन्यासो दृश्यते देशे सर्वत्राग्निहोत्रादि कर्मैस्तेषामस्तीत्यपि विद्वन्मुखाच्छ्रूयते । अन्यच्च कमलाकरभट्टपादैरेतेषां ज्ञातिषु ये चतुर्थाश्रमिणस्तेषां महत्त्वं स्थापितम् । एते गौडान्तर्गताः स्वज्ञातौ मान्या इति तत्पत्रं च दृष्टम् । सर्वत्रान्ने कृतपाकेभोजनव्यवहारोपि दृष्टः । अनुष्ठानं चैतैः सत्कुर्वन्ति ब्राह्मणाः । श्राद्धं चैतेषां घटे जायते । अतो युक्त्या परंपरागतव्यवहारेण च नास्ति संदेहो द्विजत्वे । इत्यलं युक्तिकुशलेषु लेखनेन"

संमतोयमर्थो भट्टोपाख्य नंतरामशर्मणः

संमतोयमर्थो भट्टोपाख्य दादंभट्टस्य

संमतोमर्थो धर्माधिकारि महीधर शर्मणः

संमतोयमर्थो शेषोपाख्य वीरेश्वर शर्मणः

संमतोयमर्थो तारोपाख्य सखारामस्य

संमतोयमर्थो दशपुत्रोपाख्य लक्ष्मणपंतस्य

संमतोयमर्थोः पुण्यस्तंबोपाख्य वैजनाथस्य

संमतोयमर्थः पौराणिकोपाख्य आत्मारामभट्टस्य

संमतोयमर्थो ज्योतिर्विदुपनामक गुर्जरसिद्धेश्वरस्य

संमतोयमर्थो जज्युपनाम्नो गंगारामस्य

संमतोयं वासुदेवभट्टस्य

पत्रप्रमाण गंगारांम दीक्षित अयाचितापनामक

संमतोयमर्थो शेषोपाख्य चक्रपाणेः

संमतोयमर्थः पुण्यस्तंभोपाख्यस्तोम नाथशर्मणः

•संमतोयमर्थो गंगाराम मौन्योपनामकस्य

संमतोयमर्थो देवोपाख्य महादेव शर्मणः

संमतोयमर्थः केशरोपाख्य गणेश शर्मणः

अनुमतोयमर्थो नागेश शास्त्रिण आंध्रस्य

संमति बाळकृष्ण दीक्षित अयाचित.

वरील नकलेखाली कोर्टाचा शेरा आहे तो असा:—

"A True copy of the Original made by Pursottam Poy.
(Signed) P. S Maister. Registrar.

अस्सलबरहुकूम रुजू पाहिली असे ता. २६ आगस्ट १८६९ (मोडी सही) गोविंद गणेश कारकून } True copy (Signed) E.T. Richardson F.P. Magistrate & J. P.

वरील अस्सलबरहुकूम नकलेंत व रा. आपटे यांनीं छापलेल्या नकलेंत फरक आहे तो असा:—

(१) "स्वस्ति" पासून "शुक्लपक्षे" पर्यंतचा आरंभींचा मजकूर यांनीं छापलेल्या नकलेंत नाहीं

(२) "देशस्थचित्तपावनकर्नाटकगुर्जरप्रभुति" असें आपटे यांच्या नकलेंत आहे. मूळ प्रतींत 'कर्नाटक' नसून 'कर्हाटक' (कऱ्हाडे) असें आहे.

(३) पत्राखालील सह्या मूळ पत्रांत ९ डावीकडे व १० उजवीकडे अशा आहेत तर आपटे यांच्या नकलेंत एकापुढें एक असून त्यांचा अनुक्रमही फिरविला आहे, व त्या १८ च आहेत. त्यांत "वासुदेव भट्टा" ची सही गाळली आहे. आपटे यांच्या नकलेंतील सह्यांत "जडयूपनाम्नो गंगारमस्य" असें आहे. (त्यावर आपटे यांनीं "जडयूप (=जडे)" अशी टीप दिली आहे) तर मूळांत "जज्युपनाम्नो" असें आहे. आपटे यांच्या नकलेंत "गंगाराममैन्योपनामकस्य" असें आहे तर मूळ पत्रांत "मौन्योपनामकस्य' असें आहे. आपटे यांच्या नकलेंत " ककरोपाख्य गणेशशर्मणः" असें आहे तर मूळ पत्रांत "केसरोपाख्य"- असें आहे.

(४) मूळ पत्र "संमति बाळकृष्ण दीक्षित अयाचित" या सहीनें संपलें आहे. पण आपटे यांच्या नकलेच्या शेवटीं "लिखितमिदंम रामकृष्णेनाग्निहोत्रिणा शालिवाहन शके १५५२ प्रमोद सवंत्सरे वैशाखमासः।। शुभकृतनाहारहारी आहासम" एवढा मजकूर जास्त लिहिलेला आहे. शके १७१० सालच्या कागदाची शके १५५२ मध्यें नक्कल लिहून ठेवणारा रामकृष्ण अग्निहोत्री कोण याची इतिहाससंशोधक आपटे चौकशी करतील काय ?

भारत इ. सं. मं. च्या त्रैमासिकाचे संपादक "शिवचरित्र-साहित्य खंडांत" दाखल केलेल्या वरील पत्राच्या बाबतींत योग्य ती दुरुस्ती पुढील अंकांत करतील व रा. आपटेही जुन्या कागदांचें संशोधन करतांना अधिक दक्षता बाळगतील, अशी आशा आहे.

# साभार स्वीकार

किर्लोस्करः—या मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या वीस हजारांवर गेल्याचें वाचून आनंद होतो. त्यांतील रूढीचें खंडन, व नवीन कल्पनांचें आविष्करण करणाऱ्या लेखांनीं तरुण वाचकांमध्यें या मासिकाविषयीं आवड उत्पन्न केली आहे. गेल्या वर्षांत डॉ. बाळकृष्णांची स्फूर्तिदायक जीवनकथा, दिवेकरशास्त्र्यांचे बुवाबाजीवरील खळबळ उडविणारे लेख, खांडेकरांच्या सुंदर लघुकथा, सरदेसाई यांची 'आमचें वैवाहिक जीवन' ही लेखमाला इत्यादि विविध विषयांवरील लेख प्रसिद्ध झाले आहेत.

स्त्रीः—या मासिकाचे वर्गणीदार बारा हजार झाले, यावरून त्याच्या लोकप्रियतेबरोबरच महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाची प्रगति किती झपाट्यानें होत आहे, याची कल्पना होते. मनोहरः—किर्लोस्करांच्या तीनही अपत्यांत वयाप्रमाणें गुणाच्या बाबतींतही हें कनिष्ठ आहे.

स्वस्तता व नियमित प्रकाशन या बाबतींत मराठी मासिकांच्या बाबतींत अपूर्व असें यश किर्लोस्करांनीं मिळविलें आहे. सुंदर बाह्यांग, मनोहर चित्रें, मजकुराची विविधता इत्यादि गुणांनीं या मासिकांत महाराष्ट्रांत एक विशिष्ट स्थान प्राप्त झालें आहे; व त्याबद्दल किर्लोस्कर बंधु, लिमिटेड हे अभिनंदनास पात्र आहेत.

लोकमित्रः—सतत ४४ वर्षें चालत आलेलें यासारखें दुसरें मासिक विविधज्ञानविस्ताराशिवाय मराठी भाषेंत नसेल. संस्कृत सुभाषितें, समस्यापूरण इत्यादि वृद्धांस प्रिय असणारे विषय, उपयुक्त औषधी माहिती, हायकोर्टांनीं केलेल्या ठरावांची थोडक्यांत माहिती, गोष्टी वगैरे निरनिराळ्या अभिरुचीच्या वाचकांस आवडणारे असे निरनिराळे विषय शेवटच्या जोड अंकांत आहेत. खानापुरास प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकाच्या गोमंतकीय लेखकांची संख्या नजरेंत भरण्यासारखी आहे. शेवटच्या अंकांतील 'मित्रा'नें वाचकांस केलेल्या आश्रय देण्याबद्दलच्या विनंतीचा मराठी वाचकांनीं सहानुभूतिपूर्वक विचार त्याच्या ४४ वर्षांच्या लोकसेवेकडे पाहून अवश्य केला पाहिजे.

ज्ञानमंदिरः—भास्करराव जाधवांच्या रामायणविषयक लेखांनीं या मासिकास बरीच प्रसिद्धि मिळाली आहे. संपादकांनीं संकल्प केल्याप्रमाणें विविध विषयांचें ज्ञान संकलित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नास यश येवो असें आम्ही इच्छितों.

समाज सुधारकः—गोमन्तक मराठा समाजामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकाचें ध्येय गोमंतक मराठा समाजाची सुधारणा करण्याचें आहे व तें बऱ्याच प्रमाणांत सिद्धीस जात आहे असें त्यांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तान्तावरून दिसतें.

प्रभु प्रभातः— ज्ञातिसेवेसाठीं जन्म झालेल्या मासिकांपकीं हें एक आहे. त्यांतील जन्मविवाहादि गृह्य संस्कार प्रसिद्ध करावयाची पद्धति इतर ज्ञातिविषयक पत्रांस अनुकरणीय आहे.

प्रभातः—नवें गोवें. मराठी भाषेच्या मार्गांत पुष्कळ विघ्नें असतांही मराठी वाङ्मयाच्या सेवेसाठीं गोमन्तकस्थ हिंदूंनीं चालविलेले प्रयत्न अभिनंदनीय नाहींत असें कोण ह्मणेल? गोमन्तकीय लेखकांच्या लेखांना प्रसिद्धि देण्यासाठीं या मासिकाचा जन्म झाला असला, तरी गोव्यांबाहेरीलही प्रसिद्ध लेखकांचे लेख त्यांत प्रसिद्ध झाले आहेत. या मासिकाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो व स्वभाषेची सेवा त्याजकडून घडो असें आम्ही इच्छितों.

या मासिकांच्या संपादकांनीं तीं आम्हांस पाठविल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

पुस्तकांची पोंच पुढील अंकीं देऊं.

# सारस्वतांची पूर्वपीठिका

लेखकः—रामचंद्र नरहर सोहनी, वकील, गडहिंग्लज

प्राचीन कालीं कांहीं नद्यांच्या कांठच्या प्रदेशास त्या नद्यांच्या नांवावरून नांवें देण्यांत आलीं होतीं असें आढळतें. सरस्वती नदीच्या प्रदेशास 'सारस्वत' असें म्हटलें आहे. तसेंच यमुना नदीच्या प्रदेशास 'यामुन', मही नदीच्या कांठच्या प्रदेशास 'माहेय' अशीं नांवें दिलेलीं आढळतात. सारस्वत देशाचें नांव प्राचीन ग्रंथांत बऱ्याच स्थलीं आलेलें आहे. अति प्राचीन ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. त्यांतील सातव्या मंडळांतील ९५ आणि ९६ हीं दोन सूक्तें सरस्वती आणि सारस्वत यांविषयीं आहेत. सरस्वती नदीचें वर्णन ऋग्वेद संहितेंत पुष्कळ ठिकाणीं आलेलें आहे. त्यांत कित्येक ठिकाणीं त्या नदीच्या तीरावरील प्रदेशाचें वर्णन आलेलें आहे. त्यांतील एक महत्त्वाची ऋचा याखालीं देतों:—

"नित्वादधेवर आपृथिव्या इळा यास्पदेसुदिनत्वे अन्हां। । दृपद्वत्मां मानुप आपयायां सरस्वत्यां देवदग्ने दिदीहि ॥ (ऋग्वेदसंहिता ३–२४–४)

अर्थः—" हे अग्ने, शुभदिनी मी तुला पृथ्वीवरच्या पवित्र स्थानीं स्थापितों–हे संपत्तिमान अग्ने, तूं द्दषद्वती, आपया आणि सरस्वती यांच्या तीरांवरील मनुष्यसमुदायांमध्यें प्रकाशित हो." भारतांत हा देश कुरुक्षेत्राचा भाग म्हटलें आहे. परंतु या ऋचेंत वर्णन केलेल्या देशाबद्दल मनुस्मृतींत अध्याय २ यांत वर्णन आहे तें:—

सरस्वती दृपद्वत्योर्देवनद्योर्यदंतरं ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ १७ ॥
तस्मिन्देशेय आचारः पारंपर्यक्रमागतः ।
वर्णानां सान्तरालानां स सदाचार उच्चते ॥१८॥
कुरुक्षेत्रंचमत्स्याश्चपंचालाः शूरसेनकाः ।
एपब्रह्मर्पि देशोवैब्रह्मावर्तादनंतरः ॥ १९ ॥
एतद्देशप्रभूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वंस्वंचरित्रं शिक्षेरन्पृथिव्यां सर्वमानवाः ॥२०॥

अर्थः—" सरस्वती व दृषद्वती या दोन देवनद्यांच्या मध्यें जो प्रदेश आहे त्या देवनिर्मित देशास 'ब्रह्मावर्त' असें म्हणतात ( १७ ) त्या देशांत प्रायः शिष्ट लोकांचाच संभव असल्यामुळें तेथील ब्राह्मणादि संकीर्ण जातीपर्यंत लोकांचा परंपराक्रमानें प्राप्त असा जो आचार तोच सदाचार असें म्हटलें आहे. ( १८ ) कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, कान्यकुब्ज देश व मथुरेच्या आसपासचा प्रदेश हा ब्रह्मर्षि देश ब्रह्मावर्ताहून किंचित् कमी योग्यतेचा आहे. ( १९ ) या कुरुक्षेत्रादि देशांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणांपासून पृथ्वींतील सर्व मनुष्यांनीं आपला आपला आचार शिकावा. ( २० ) "

याप्रमाणें मनुस्मृतींत उल्लेख आहे. महाभारतांत शल्य पर्वांतील अध्याय ३५ पासून ५४ पर्यंत सरस्वती नदीचें व त्या नदीचा प्रदेश व त्यांतील तीर्थें इत्यादिकांचें वर्णन आहे. त्यांतील अध्याय ३७।३८।३९।४०।४१।४२।४३।४७।५१।५४ यांत त्या प्रदेशास 'सारस्वत' असें संबोधिलें आहे. राजपुतान्यांत जेथें सरस्वती नदी गुप्त झाली आहे तेथें ' विनशन ' नांवाचें सुप्रसिद्ध तीर्थ असून तेथून सरस्वती नदीच्या उगमापर्यंतचा जो प्रदेश त्याचा 'सारस्वत' या नांवानें उल्लेख केलेला आहे. सरस्वती नदीच्या उगमापासून तिचे सात प्रवाह असून ते पुढें एकत्र झाले आहेत.त्या सात प्रवाहांचीं नांवें:–सुप्रभा, कांचनाक्षी, विशाल् , मनोरमा, ओघवती, सुरेणु, आणि विमलोदका अशीं आहेत. या सात प्रवाहांत जो प्रदेश आहे त्यास 'सत्य सारस्वत' असें नांव आहे. त्याचें वर्णन शल्य पर्व अ० ३८ यांत आहे व तें एक महत्त्वाचें तीर्थ मानिलें आहे. शिवाय महाभारतांतील वनपर्वांत वर्णन केलेली द्वैतवन, काम्यकवन हीं वनें सरस्वती नदीच्या कांठीं होतीं. त्यांचीं वर्णनें त्या पर्वांत मनोरंजक रीतीनें लिहिलीं आहेत. कुरुक्षेत्र-

महात्म्य, वनपर्व अ० ८३ यांत व शल्यपर्व अ० ५३ यांत वर्णन केलेलें आहे तें वाचून पाहिल्यास या प्रदेशाचें महत्व किती आहे हें कळून येईल. याप्रमाणें महाभारतांत या देशाचा इतिहास विस्तारपूर्वक सांगण्यांत आला आहे.

श्रीमद्भागवतांत स्कं० १ अ० १० यांत सारस्वत देशाचा उल्लेख आलेला आहे. श्रीकृष्ण आनर्त देशास जात असतां कुरुदेशांतून निघून मार्गांत कोणकोणते देश उल्लंघून तेथें गेला, त्याविषयीं लिहिलें आहे तें:— "कुरुजांगल पांचालान् शूर सेनान्स यामुनान् ॥ ब्रम्हावर्तं कुरुक्षेत्रं मत्स्यान् सारस्वतानथ ॥३४॥" याप्रमाणें भागवतांत उल्लेख आहे.

मार्कंडेय पुराणांत अध्याय ५४ यांत भारत वर्षांतील देश लिहिले आहेत, यांत "भीरु कच्छाः समा हेयाः तैरपि सह 'सारस्वतै' । काश्मीराश्च, सुराष्ट्राश्च, अवन्त्या" या प्रमाणें श्लोक ५३ यांत या देशाचा उल्लेख आहे.

वराहमिहिर कृत बृहत्संहितेंत भारतवर्षांतील देश सांगितले आहेत त्यांतही सारस्वत देशाचा उल्लेख आहे. त्यांतील अध्याय १४ यांत " कूर्म विभागः " या प्रकरणांत " मरु वत्सघोष यामुन 'सारस्वत' मत्स्य माध्यमिकः ॥ २ ॥ " असा क्रम दिलेला आहे.

याप्रमाणें बऱ्याच प्राचीन ग्रंथांत या देशाचें सारस्वत हें नांव लिहिलें गेलें आहे व पंचगौडांतील इतर जे मुख्य पोटभेद आहेत, ते (कान्यकुब्ज, गौड, उत्कल, मैथिल.) देशपरत्वें नामाभिधान प्राप्त झालेले आहेत. तसाच सारस्वत समाज हाही सारस्वत देशावरून नामाभिधान पावलेला आहे तसेंच त्या देशास 'ब्रह्मसदन' असें जाबालोपनिषदांत म्हटलें आहे. महाभारत वनपर्व अ. ८३ यांत त्यास ब्रह्मक्षेत्र व ब्रह्मसाक्षात्काराचें स्थान मानिलें आहे. ब्रह्मदेवापासून आरंभीं दशमहर्षि उत्पन्न झाले, ते या स्थानीं झाल्याचा भागवतांत ३ स्कं० अ० १२ यांत उल्लेख आहे व त्या महर्षींपासून पुढें सर्व ब्राह्मणांची उत्पत्ति असल्यानें हें ब्राह्मणांचें मूलस्थान आहे, असा आमच्या प्राचीन ग्रंथांतील वचनांचा आशय आहे. अलीकडील विद्वान इतिहाससंशोधकांचेंही मत असेंच आहे. श्री. चिंतामण विनायक वैद्य यांनीं मध्ययुगीन भारत भाग ३ या ग्रंथांत, "पंजाब आणि सरस्वतीचा प्रदेश तसेंच पांचाल देश हा ब्राह्मणक्षत्रियांची मूळभूमि आहे. हिंदुस्थानच्या दक्षिण व पूर्व भागांत असलेले सर्व ब्राह्मण व क्षत्रिय येथूनच गेले आहेत " असें म्हटलें आहे. (पान ५६६)

याप्रमाणें सारस्वत ब्राह्मणांच्या प्राचीन इतिहासाची दिशा थोडक्यांत दाखविण्याचा येथें प्रयत्न केला आहे. या दिशेनें पुढें संशोधन केल्यास पुढील इतिहास संगतवार सांपडतो. साग्र इतिहास या ठिकाणीं लिहिणें अशक्य आहे व अप्रसंगिकही आहे. जातां जातां एक गोष्ट आमच्या समाजापुढें मांडून हा लेख पुरा करितों. ती गोष्ट ही कीं, उपरिनिर्दिष्ट सारस्वत देश व सारस्वत समाज यांचें वर्णन उत्तर हिंदुस्थानांतील आहे. दक्षिणेंतील शेणवी समाजाचा त्या सारस्वत ब्राह्मण शाखेमध्यें समावेश होतो कीं काय ? असा कित्येक लोकांचा प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधानें पूर्वी श्री. शाहू छत्रपति राजे, सातारा व श्री. बाळाजी पंडित प्रधान यांच्या दरबारीं शके १६७१ सालीं विचार होऊन एक निवाडा झाला आहे. तो निवाडा पुणें, भारत–इतिहास–संशोधक–मंडळ अहवाल शके १८३४ ( चैत्र-भाद्रपद ) ( त्या मंडळाचें ग्रंथमाला पुस्तक ४ थें ) यांत पृष्ठ ९३ ते ९७ यांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत दक्षिणेंतील शेणवी लोक हे पंचगौडांपैकीं सारस्वत शाखेचे आहेत, प्राचीन कालीं ब्राह्मण लोकांनीं कारकुनी धंदा करून कालक्षेप केल्यास त्यांस पंत अथवा शेणवाई म्हणण्याची पद्धत होती, असें म्हटलें आहे. हा निवाडा करण्यास शृंगेरी मठाहून आचार्य व पंडित पांच इसम व श्रीवाराणशी क्षेत्राहून पंडित शास्त्री पांच इसम आणविले होते.

शिवाय कऱ्हाड, पेण, माहुली, वांई, नाशिक, कृष्णातीर, माहुली संगमस्थान इत्यादि ठिकाणचे विद्वान ब्राह्मण आणविले होते. अष्टप्रधान मुत्सद्दी मंडळ; ब्राह्मण शिष्टमंडळी, प्रेक्षक मिळून सुमारें दहा हजार पर्यंत जन समुदाय जमा होत असे. इत्यादि वर्णन त्या निवाड्यांत आहे. असो. या वरील सर्व विवेचनावरून प्राचीन कालीं सारस्वत ब्राम्हणांची योग्यता व संस्कृति कोणत्या प्रकारची होती याविषयीं ढोबळ कल्पना वाचकांच्या अंतःकरणांत उत्पन्न होईल.

---

# कलाकौशल्याचें प्रदर्शन

संयुक्त गौड सारस्वत परिषदेच्या अधिवेशनाबरोबर स्वज्ञातियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन करण्याचा उपक्रम अतिशय अभिनंदनीय आहे. आमच्या जातींत दिवसेंदिवस उच्च शिक्षणाचा प्रसार होत आहे. परंतु पुस्तकी ज्ञानाच्या प्रसाराबरोबर हस्त कौशल्याकडे दुर्लक्ष होतें असें म्हणतात. पंचवीस वर्षांपूर्वी सारस्वतांच्या जन्मभूमीतून मुंबईत येणारी प्रत्येक नवोढा वधू शिवणटिपण, वीणकाम, कशिदा वगैरे गृहकृत्यांत उपयुक्त असलेल्या हस्तकलांमध्यें लवकरच तरबेज होत असे. मुंबई म्हणजे सारस्वतांपुरतें तरी या कलांचें आगर होतें. त्याच्याही पूर्वीच्या पिढींतील पत्नी शिवणकाम आणि विशेषतः टोप्यांचें झीगकाम यांच्या साधनानें पतीच्या संसाराला महत्त्वाची आर्थिक मदतही करीत असे. 'टोपीवाले' हें आडनांव प्राप्त करून घेणारे कै. अनंत शिवाजी देसाई आणि त्यांचे काका मेथाजी यांनीं सारस्वत समाजांतील स्त्रीवर्गाला ही हस्तकौशल्यानें संसाराला आर्थिक मदत करण्याची दिशा दाखवून दिली.

पुढें टोप्या विणण्यापासून मिळणारी प्राप्ति कमी झाली. आजच्या पिढींतील सुविद्य मुलींच्या अंगीं त्यांच्या आया-आज्यांच्या अंगचें हस्तकौशल्य नाहीं असा प्रवाद आहे. मुलांच्यासंबंधानेंही तशीच गत आहे. आर्टस्कूलमधील विविध कलांचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत सारस्वतांची संख्या फार कमी असून नोकरी हुडकीत फिरणाऱ्या बेकारीचें शिक्षण आमच्या मुलांना मिळत आहे. दादर येथें कांहीं साहसी मंडळींनीं सुरु केलेलें कलामंदिर नामशेष झालें आहे. या परिस्थितींत हस्तकलांचें महत्त्व तरुण पिढीच्या मनावर बिंबविण्यास प्रदर्शनासारखें परिणामकारक साधन नाहीं.

हस्तकलाकौशल्याकडे पाहिलें तर ललितवाङ्मयापेक्षांही या ललितकला मनोरम आणि चित्ताकर्षक आहेत. कवींच्या काव्याइतकेंच कल्पनाचातुर्य सुंदर चित्रांत आणि सुबक आणि नाजुक कारागिरींत असतें. परिश्रमाचीं कामें करण्यास असमर्थ असलेल्या स्त्रियांना आपलें घर या कलांनीं अंतर्बाह्य सुशोभित करून घरांत येणाऱ्या प्रत्येक माणसाचें मन प्रसन्न करतां येतें. चित्रकला, शिल्पकला वगैरे कलांचीं आवड स्वदेशांत वाढवून आणि परदेशीयांना या कलांचें महत्त्व पटवून हिंदभूमींतून बाहेर जाऊं पाहणाऱ्या लक्ष्मीला अडवून धरणें या कलांच्या उपासकांना बरेंच साध्य आहे.

आमच्या समाजांतील या कलांचें प्रमाण कमी होत चाललें आहे, हा प्रवाद हें प्रदर्शन खोटा ठरवील असा आम्हांस भरंवसा आहे. तसेंच या प्रदर्शनानें कलाकौशल्याच्या अभ्यासाला उत्तेजनही मिळेल. असें मोठ्या प्रमाणावरील प्रदर्शन खर्चाचें काम आहे. तसेंच प्रदर्शनासाठीं कामें पाठविणाऱ्या कारागिरांचें व कलानिपुण भगिनी-बांधवांचेंही साह्य या प्रदर्शनास पाहिजे. या प्रदर्शनाचें माहितीपत्रक व नियमावलि तयार झाली असून प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं कामें पाठविणारांनीं तीं "सन्मान्य सेक्रेटरी, प्रदर्शन मंडळ, सारस्वत ब्राह्मणसमाज, चर्निरोड, मुंबई," यांजकडून मागवून घ्यावीं. तसेंच प्रदर्शनासाठीं उदार हस्तें देणग्या देऊन आणि निरनिराळ्या विभागांसाठीं बक्षिसें देऊन प्रदर्शनाच्या कार्यास अवश्य सहाय्य करावें.

# परिषद्-वार्ता

येत्या अधिवेशनासाठीं अद्यापपर्यंत स्वागतमंडळाचे सभासद सुमारें शंभर झालेले असून प्रदर्शनासाठीं पदकें व बक्षिसें देण्यास सुमारें दोनशें रुपये देण्यांत आले आहेत. स्वागतमंडळाच्या कांहीं सभासदांचीं नांवें पुढें दिलीं आहेत. आणखी बरेच सभासद स्वागतमंडळास मिळत आहेत, असें परिषदेचे चिट-णीस कळवितात.

रा. रा. सीताराम सुंदरराव पाटकर, बी.ए., एल्. एल्. बी., जे. पी.

रा. रा. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर

रा. रा. सीताकांत शांताराम दाभोळकर

रा. रा. वामनराव शांताराम दाभोळकर, एम्. ए., एल्एल्. बी., सॉलीसिटर

रा. रा. विश्वनाथ गणपत दळवी, बी. ए., कँटब बार-ॲट-लॉ.

रा. रा. नीलकंठ घनश्याम नाडकर्णी, बी. ए., एल्एल्. बी., बार-ॲट-लॉ.

डॉ. जनार्दन शंकर नेरूरकर बी. एस्सी., एल्. एम्. ॲंड एस्., डी. पी. एच्. (कॅंब्रिज) एफ्. आर्. एस्. आय्. जे. पी.

रा.रा. शंकरराव दत्तात्रय प्रभावळकर, एल्. सी. ई., एम्. आय्. ई. ( Ind )

रा. रा. सुंदरराव रामराव डोंगरकेरी, बी.ए., एल् एल्. बी.,

रा. रा. बाजी विष्णु नेरूरकर, बी. ए., एल् एल्. बी.

रावबहादुर गंगाधरराव जगन्नाथ रेगे, एम्. ए.

गणेश पद्मनाभ मुर्डेश्वर, बी. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट

डॉ. अण्णापा विठ्ठल बळिगा, एफ्. आर्. सी. एस्., एल्.,आर्. सी.पी , एम्. आर्. सी. एस्.

रा. रा. सखाराम सीताराम नाईक, एल्. सी.ई., बी. ए., बी. एस्सी ( एडिंबरो )

रा. रा. नारायण रामचंद्र बस्तोडकर, एम्. बी. बी. एस्.

रा. रा. अनंत विश्वंभर साखरदांडे, बी. ए., एल्एल्. बी.

,, ,, शांताराम जगन्नाथ नाडकर्णी, एल्. एम्. ॲन्ड एस्.

,, ,, जनार्दन नारायण करंडे, एम्. डी.

,, ,, व्यंकटेश पांडुरंग कामत, एम्. बी., बी एस्.

,, ,, कृष्णराव यशवंत रेगे, एम्. एस्.

प्रोफेसर काशीनाथ रामचंद्र गुंजीकर, बी. एस्., सी. एम्. ए.

रा. रा. वसंत नारायण नाईक, एम्. ए.

रा. रा. वसंत रामचंद्र नेरूरकर एम्. ए., एस्. टी. सी., टी. डी. (लंडन) एम्. आर्. एस्. टी.

रा. रा. माधवराव विनायक हेगडे, बी. ए. एल्. एल्., बी.

कॅ. डॉ. काशीनाथ विष्णु कामत भांगले, एम्.बी.बी. एस्., ए. आय्. आर्. ओ.

रा. रा. नरसिंग शेषगिरी कौशिक, बी. ए., जे. पी.

रा. रा. दत्तात्रय अनंत तेलंग, बी. ए.

रा. रा. भालचंद्र सीताराम सुखटणकर, एम्. ए., एल्एल्. बी.

डॉ. वामन दत्ताराम तेलंग, एम्. बी.बी. एस्.

रा. रा. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी.ए., एल्एल्. बी.

रा. रा. कमळ रामराव मेंडे, एम्.ए., एल्एल्. बी.

रा. रा. काशीनाथ भवानीशंकर सुखटणकर, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट

डॉ. बाबुराव विनायकराव आरोसकर, एम्. डी.

रा. रा. नीलकंठ बाळकृष्ण रांगणेकर, बी.ए.

रा. रा. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी.




वर्ष १४ वें    जुलै-ऑगस्ट १९३५    अंक ४ था

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

HIS MASTER'S VOICE
COPYRIGHT
LOUD TONE

**नवीन कोरे रेकॉर्डस् व**

**ग्रामोफोन मशीन्स**

**मिळण्याचें एकच ठिकाण.**

Odeon

ॲथॉराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

नवीन व कोऱ्या रेकार्डस्‌चा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4
Editor:—S. M. Varde, B.A., LL.B.

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

**कलकत्ता**

स्थापना १९१० ] लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमा-कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरिएंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहूं एकच कंपनी गणली जाते. " हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स् पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटा:—

भेटण्याची जागा व वेळ:—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव,** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० (स्टॅं. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
**माझगांव,** मुंबई नं. १०



# कामत आणि कंपनी

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमच्या दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर, सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाईकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

Phone No. 42476



माणिकराव एकनाथ मुळगांवकर, जे. पी. यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. बाळकृष्ण व एकनाथ मुळगांवकर यांनीं सारस्वत दीनवत्सल सभास एक हजार रुपये दर्शनी किंमतीचा रोखा दिला.



स. वा. शिवेश्वरकर यांनीं गेल्या जून महिन्यांत विलायतेंत झालेल्या I. C. S. परीक्षेंत अभिनंदनीय यश संपादन केलें आहे.

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १४ वें | जुलै-ऑगस्ट १९३५ | अंक ४ था

## नववी संयुक्त परिषद्

झालें ! नाहीं होय म्हणतां संयुक्त परिषदेचे जनरल सेक्रेटरी श्री.बाजी विष्णु नेरूरकर व श्री.अनंत विश्वंभर सालरदांडे यांनीं त्यांस कांहीं मंडळींनीं केलेली विनंती मान्य करून परिषदेचें नववें अधिवेशन मुंबईंत भरविण्याचें ठरविलें. व त्या परिषदेस सर्व ज्ञातिबंधूनी साह्य करावें अशी जाहीर विनंती केली. जुन्या व नव्या परिषदेच्या सांखळीचा दुवा अशा रीतीनें सांगण्यांत आला, व परंपरा सुरू करावयाचें ठरलें. गेल्या नाताळांत बॅरिस्टर दळवी वगैरे मंडळींनीं पेरलेल्या बीजाला मोड फुटून त्याचा वृक्ष होत आहे, आणि ज्ञातिबांधवांनी त्यास खतपाणी घातल्यास येत्या दिवाळींत तो फुलांफळांनीं भूषित झालेला दिसेल.

हा अमृतवृक्ष कीं विषवृक्ष ? याच्या फुलांच्या परिमळानें ज्ञातीची कीर्ति वाढेल कीं त्या फुलांस ज्ञातीद्वेषाची दुरभिनाची दुर्गंधी येईल ? त्याच्या फळांनीं ज्ञातींतील प्रेमाची स्नेहाची व ऐक्याची वाढ होईल, कीं त्यामुळें द्वेषाचें, हेव्याचें वीष पसरून तें ज्ञातिनाशास कारणीभूत होईल अशी शंका पुष्कळ ज्ञातिबांधवांस आल्यावांचून राहिली नाहीं. पूर्वींच्या परिषदांतील खंदे योद्धे ज्यांनीं निधड्या छातीनें एकीच्या तत्त्वासाठीं रणधुमाळी माजविली, जित जितं म्हणून टाळ्या पिटल्या ते वयोमानामुळें म्हणा किंवा रणवैराग्यामुळें म्हणा परिषदेचें अरिष्ट पुन्हां नको म्हणून नकारार्थी मान हालवूं लागले. प्रशांत असलेल्या ज्ञातितलावांत परिषदेचे दगड बुद्ध्या टाकून त्याला तुफान आणणें बरें नाहीं, असा पोक्त सल्ला ते देऊं लागले; याउलट तीशीच्या आंतील तरुण मंडळी ज्ञातिपरिषदेच्या इष्टानिष्टतेविषयीं विचार करीतच नाहीं. उद्योगधंदा कसा मिळेल, याच विवंचनेंत असल्यामुळें त्या बिचाऱ्यांना या प्रश्नाचा विचार करण्यापुरतें स्वास्थ्यच प्राप्त झालेलें नाहीं. त्यापेक्षां लहान मंडळी म्हणजे कॉलेज-विद्यार्थी; ते तर फडक्यांच्या कादंबऱ्या, यशवंतांच्या कविता, व "स्त्री ही पुरुषाच्या मार्गांतील धोंड," इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा विचार करण्यांत दंग असल्यामुळें परिषदेबद्दलचा विचारही त्यांस शिवत नाहीं. अर्थात् बाकी राहिलेल्या, तिशी उलटलेल्या व पन्नाशीची झुळक न लागलेल्या सारस्वत समाजास परिषदेच्या इष्टानिष्टतेचा विचार कर्तव्य आहे.

वरील मंडळींत परिषदेचे आक्षेपक दोन प्रकारचे आहेत. एक प्रकारच्या आक्षेपकांचें म्हणणें असें कीं परिषदेचें इष्ट कार्य जें भेदांचें एकीकरण तें तात्त्विक दृष्ट्या तरी घडून आलें आहे. पूर्वींच्या काळांतील महत्त्वाचे प्रश्न म्हणजे सहभोजन व विवाह. यापैकीं पहिल्या प्रश्नाबद्दल मतभेद राहिलाच नाहीं, व दुसऱ्या बद्दल लोकांचा दृष्टिकोन बदलल्यामुळें त्याला पूर्वीप्रमाणें

महत्त्व राहिलेलें नाहीं. उलट पूर्वीच्या वादविवादाची, तंटेभांडणाची, शिव्यागाळीची, बुजालेली स्मृति फिरून जागृत करून परिषदेच्या द्वारें व्यक्तिद्वेष वैर-भाव,फाटाफूट कां वाढवावी ? जातीच्या सभेनें विचार करण्यासारखे महत्त्वाचे प्रश्नच राहिले नसल्यामुळें अशा परिषदांची आवश्यकताच नाहीं असें ते प्रतिपादतात.

दुसऱ्या प्रकारच्या आक्षेपकांची विचारसरणी भिन्न आहे. ते म्हणतात कीं, मुळीं जात असणें हेंच वाईट आहे. पुरातनकाळीं कोणी त्या केल्या असतील. पण सध्यांच्या काळीं त्यांना महत्त्व देणें योग्य नाहीं. त्या जितक्या लवकर नाहींशा होतील, तेवढ्या चांगल्या. ज्ञातिपरिषदांनीं जातिभेदाला तीव्रता येते. खोटा जात्यभिमान उत्पन्न होतो. दुसऱ्या जातींबद्दल द्वेष उत्पन्न होतो. प्रत्येक जातीनें आपापलें संघटन केलें,तर जातिभेदाची तीव्रता कमी होण्याऐवजीं वाढेल, जात नाहींशीं होण्याची शक्यता नाहींशी होईल. जातिभेद मोडणार नाहीं, राष्ट्रीयत्व उत्पन्न होणार नाहीं. सार-स्वतांसारख्या पुढारलेल्या जातीनें तरी राष्ट्रीयत्व विघातक असें कोणतेंही काम करूं नये.

या आक्षेपकांस उत्तर देणें फारसें कठीण नाहीं. विश्वबंधुत्वाचें तत्त्व फार उत्तम आहे यांत शंका नाहीं. परंतु व्यवहारांत त्या तत्त्वाला सध्यां किती मान दिला जातो याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. मुळी जात असणें हें वाईट; परंतु हजारों वर्षें हिंदुस्थानांत ती आहे व करडा अमंलही गाजवीत आहे. अशा स्थितींत तिच्याकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. बरें जात नाहींशी केली, तर समाजाचें धारण होण्यास तिच्याएवजीं दुसरी कोणती संस्था उत्पन्न झाली आहे ? अशा संस्थेच्या अभावा-मुळें जी अव्यवस्था माजेल तिचा परिहार कसा करा वयाचा, इत्यादि प्रश्नांवर अद्याप समाधानकारक उत्तर कोणीं दिलेलें नाहीं.

हे प्रश्न फार गहन म्हणून दिले, तरी जात कायम नाहींशी होणें शक्य आहे कीं काय याचाही विचार पुष्कळांनीं केलेला दिसत नाहीं. गोव्यांतील ख्रिश्चन समाज ख्रिस्ती होऊन पांचशें वर्षें होऊन गेलीं; तथापि 'बामण' ख्रिस्ती व 'चारडोस' ख्रिस्ती यांमधले भेदभाव अद्याप पूर्वीइतकेच तीक्ष्ण आहेत. त्यांमध्यें अद्याप शरीरसंबंधही होत नाहीं. कॅथोलिक पाद्र्यांच्या जुलमाखालीं पोर्तुगीच ख्रिस्ती प्रज्ञाहत झाले असें कोणी म्हटल्यास इंग्रजी हिंदुस्तानांत हिंदी ख्रिस्त्यांत जातिभेद व जातिद्वेष तितक्याच तीव्र प्रमाणांत आहेत हें मिशनांशीं संबंध असलेल्या प्रत्येकास माहित आहे. अशी स्थिति असतां जात मोडूं इच्छिणारा मनुष्य फारच आशावादी समजला पाहिजे. यामुळें असलें अशक्य कार्य करण्याची इच्छा न धरितां आहे त्या स्थितींतच सुधारणा करणें हेंच कोणींही व्यवहारी मनुष्य पसंत करील.

ज्ञातिपरिषद सध्याच्या काळांत भरविणें हें राष्ट्र-कार्यास अडथळा आणण्यासारखें आहे असें जे म्हणतात, ते सध्याच्या काळाकडे डोळेझांक करितात. १९२१ च्या कायद्यानें जातिभेद तीक्ष्ण केले इतकेंच नव्हे, तर ते हिंदी राजवटींत कायम करावयाची व्यवस्था झाली आहे. एक काळ असा होता कीं त्या काळांत तेलंग, भांडारकर, चंदावरकर हे सर्व हिंदुस्थानचे पुढारी म्हणून चमकले. त्या वेळीं त्यांची जात काय म्हणून कोणी विचारीत नव्हता. आतां कायदेकौन्सिलांत जाणाऱ्या पुढाऱ्याच्या योग्यतेपेक्षा त्याची जात कोणती या प्रश्नालाच फार महत्त्व आहे. अब्राह्मण म्हणून किंवा अस्पृश्य म्हणून किंवा मुसल-मान म्हणून कोणीही एखादा थर्डक्लास माणूस मिनि-स्टर होऊं शकेल. यामुळें जातिभेदास प्राधान्य आलेलें नाहीं काय ! व अशी स्थिति असल्यामुळें जातींचें संघटन झाल्याशिवाय व्यवहारिक क्षेत्रांत आपली प्रगति होईल काय ! मोठमोठीं अव्यवहार्य तत्त्वें बोलून सद्यःस्थितीकडे दुर्लक्ष्य करणें हें वाळूंत डोकें बुडवून अंध बनलेल्या जिराफासारखें आहे. जाति-तत्त्वाकडे आम्हीं दुर्लक्ष्य केलें, तरी जोंपर्यंत इतर जाति तसें करावयास तयार नाहींत, तोंपर्यंत आमच्या

हातून राष्ट्रहितपोषक कांहींही न होतां उलट स्वहित नाशच होईल. राज्यचक्राचा ओघ जातितत्त्व प्रवण असल्यामुळें त्यास विरोध करणारांना आत्म-नाशाचें बक्षिस मिळावयाचें हें त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. म्हणून प्रवाहाबरोबर पोहून त्यांतूनच मार्ग मिळाला तर पाहावयाचा ही शहाणपणाची वृत्ति होय.

जात मोडावयाची झाली तरी सुद्धां ती जातीची परिषद भरूनच मोडणें जास्त संभवनीय, श्रेयस्कर नाहीं काय ? बहुजनसमाजाच्या कल्याणाची कोणतीही गोष्ट करावयाची झाल्यास ती शिष्टांच्या सभेंत ठरवावी अशीच आपली पुरातन पद्धति आहे. जात मोडावयाची झाली तरी ती अशा रीतीनेंच लवकर मोडेल. आज सुरू असलेल्या स्वेच्छाचारानें मोडणार नाहीं. आपल्या समाजांत ज्याला वाटेल त्यानें तें करावें, त्याला कोणी विचारीत नाहीं, अशी जी बेबंदशाही आहे, तिचें नियमन होणें इष्ट नाहीं काय! त्याऐवजीं खरोखर मानवी कल्याण होणाऱ्या सुधारणेंला उत्तेजन व तद्विरुद्ध असलेल्या गोष्टींचा निषेध जातिपरिषेदेनें करून जातीचें नियमन कां करूं नये ! सारांश कोणत्याही दृष्टीनं पाहिलें तरी परिषदेची आवश्यकता सिद्ध होईल. तिच्या हातून होणाऱ्या कार्यावर तिची योग्यता किंवा बरेवाईटपणा अवलंबून राहील.

दुसऱ्या कांहीं मंडळीचा आक्षेप असा आहे कीं, परिषदेचें उद्दिष्ट कार्य जें भेदांचें एकीकरण हें तर होऊन गेलें आहे. म्हणून आतां ज्ञाती पुढें कोणते विषय आहेत ज्यांसाठीं परिषद भरावयाची ? प्रस्तुत लेखकाचे मतें या मंडळीस परिषदेचे उद्देशच समजले नाहींत. भेदांचें एकीकरण हें स्वज्ञातीच्या उत्कर्षाचें साधन, साध्य नव्हे. स्वज्ञातीची सर्वांगीण उन्नति हें साध्य आहे, आणि हें साध्य प्राप्त व्हावें म्हणून ज्ञातिसंघटन झालें पाहिजे. निरनिराळ्या ठिकाणच्या सारस्वत बांधवांमध्यें परिचय वाढला पाहिजे, प्रेमसंवर्धन झालें पाहिजे. या गोष्टी परिषदेशिवाय दुसऱ्या कोणत्या मार्गानें साध्य होतील ?

परिषदेनें आपली घटना पक्की करण्याकडे पहिल्यानें लक्ष्य दिलें पाहिजे. वीस वर्षांपूर्वी ठरविलेली घटना व नियम आज निरुपयोगी झाले आहेत. परिषदेंत स्त्रियांना मत न देण्याचा जो नियम करण्यांत आला त्यानें स्त्रियांवर अन्याय तर झालाच, परंतु परिषदेचीही पिच्छेहाट झाली. त्या अन्यायाचें परिमार्जन करणें अत्यंत अवश्य आहे. ज्ञातिसंघटन करावयाचें, एकीकरण करावयाचें तर स्त्रियांना बाजूस ठेवून हा उद्देश सिद्ध होईल असें मानणाऱ्यांच्या कल्पनाशक्तीची कींवच केली पाहिजे ! पुरुषास व्यवहारांत निरनिराळ्या व्यक्तींशीं वागावें लागल्यामुळें त्यांना जात्यभिमानास दूर सारावेंच लागतें. स्त्रियांची गोष्ट तशी नसल्यामुळें कूपमंडूकवृत्तीस तेथें जास्त वाव आहे. म्हणून स्त्रियांस मताधिकार देऊन परिषदेच्या कामांत लक्ष घालण्यास त्यांस उत्सुक केल्याशिवाय जुन्या परिषदेचें ध्येय जें एकीकरण तेंही साध्य होणें अशक्य आहे.

परिषदेनें विधवाविवाहासही जाहीरपणें मान्यता दिली पाहिजे. विधवाविवाह करणारास आज कोणी अपंक्त ठेवीत नाहीं हें खरें; परंतु अशा जोडप्यांची—tolerated अशी जी स्थिति आहे ती जाऊन त्यांस परिषदेकरवीं मान्यता मिळालीच पाहिजे. या गोष्टी हळूहळू होत आहेतच असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी सा. ब्रा. समाजांत पुनर्विवाहितांचें संमेलन भरलें असतां तेथें जें विचारप्रदर्शन झालें त्यावरून हें शल्य पुनर्विवाहित जोडप्यांच्या मनांत असतें असें दिसून आलें आहे. तें काढून टाकण्याची तजवीज परिषदेनें न केल्यास परिषद फुकट भरली असें होईल.

स्वज्ञातीचें संघटन न होण्याच्या मार्गांत जी विघ्नें आहेत, त्यांपैकीं सर्व सारस्वत समाजांत एक भाषेचा अभाव हें आहे. मंगळूरच्या सारस्वताची भाषा व मुंबईच्या सारस्वताची भाषा या भिन्न असल्यामुळें एकमेकाच्या परिचयवृद्धिस अडथळा येतो. एक दुसऱ्याच्या भाषेची थट्टा करावयास उद्युक्त होतो. त्यामुळें मुंबईकर, वाडकर, गोंयकर, कारवारकर

अशा प्रकारचे वृथाभेद उत्पन्न होतात, आणि आपापल्या भाषेच्या व स्थानाच्या वृथाभिमानामुळें स्वज्ञातींत इतकी फाटाफूट झाली आहे. पोटभेदाची गोष्ट सोडून द्या. पण वाडकर शेणवी व कारवारकर शेणवी यांच्यामध्यें कोणतीही उच्चनीचत्वाची भावना नसतांही कितीसे विवाह झाले आहेत हें कोणी दाखवून देईल काय ! सा. ब्रा. समाजांत कारवारचे कितीसे सभासद आहेत ? ते नसण्याचें कारण भाषाभेदापेक्षां दुसरें कोणतें ?

एक भाषा करावयाची झाली तर ती कोणती करावयाची हा मोठा प्रश्न आहे, व तो वादाचाही विषय होईल. परंतु संघटनाच्या एकाच दृष्टीनें सुज्ञांनीं हा प्रश्न सोडविला पाहिजे. अवांतर गोष्टींचा विचार करतां नये. सारस्वतांची मायबोली जी कोंकणी तिचें मूळ स्वरूप एकीकडून कानडी, दुसरीकडून मराठी, यांच्या आक्रमणानें पार बदलून गेलें आहे. तिचें पुनरुज्जीवन होऊन त्यामुळें स्वज्ञातिसंघटनास मदत होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. ही गोष्ट मायभाषेवरील प्रेम कितीही असलें, तरी कबूल केलीच पाहिजे. खुद्द गोव्यांत सुद्धा तिला मान नसून गोव्यांतील हिंदूंनीं मराठी भाषेचा स्वभाषा म्हणून स्वीकार केला आहे. कारवार मंगळूरकडील मुंबईस असलेल्या सारस्वत बंधुभगिनींना मराठीचा परिचय आहेच, व कानडी व मराठी या दोहोंपैकीं ते मराठीच पसंत करतील. बहुसंख्य सारस्वतांची भाषा म्हणून अखिल सारस्वत वृंदानें मराठीचा स्वभाषा म्हणून अंगीकार करणें व लहान मुलांना घरची म्हणून तीच भाषा शिकविणें हें ज्ञातिसंघटनाच्या दृष्टीनें व सौकर्याच्या दृष्टीनेंही इष्ट आहे. असें सुचवितांना प्रस्तुत लेखक ज्ञातिकल्याण व व्यवहार यांचाच विचार करीत आहे. मराठीच्या अभिमानानें बोलत नाहीं असें सांगितल्यावर कोंकणीचे अभिमानी त्याच्यावर रुष्ट होणार नाहींत अशी आशा आहे.

गौडसारस्वत या नांवाबद्दलही जो गैरसमज आहे त्याचाही विचार परिषदेनें केला पाहिजे. चुकीनें म्हणा किंवा बुद्धिपुरस्सर म्हणा, परिषदेनें गौडसारस्वत या शब्दाचा उपयोग केला व तो शब्दसमुच्चय आज कित्येक वर्षे रूढ आहे. परिषदेचीं तत्त्वें संमत असणाऱ्या लोकांनीं त्यास कबुली दिली आहे. असें असतां एका भेदानें गौड व दुसऱ्यानें सारस्वत या शब्दांचा अभिमान धरण्यांत अर्थ नाहीं. असा अभिमान धरून आपलें वैशिष्ट्य मिरविणारे परिषदेच्या तत्त्वालाच विरोध करितात असेंच म्हणावें लागेल. म्हणून ज्यांना ज्यानां म्हणून एकीचें तत्त्व संमत आहे, अशांनीं जरूर त्या प्रसंगीं आपण गौडसारस्वत ब्राह्मण आहों असाच उल्लेख केला पाहिजे.

परदेशगमन करणारांस पुनर्विवाहीत कुटुंबांस गोयंतकांतील स्वज्ञातीच्या देवालयांत मज्जाव होतो असें समजतें. विसाव्या शतकांत अशा प्रकारचे प्रतिबंध असणें अत्यंत अनिष्ट आहे. अशांमुळें सामाजिक बंडखोरीची प्रवृत्ति उत्पन्न होते व ज्ञातिबंधनें शिथिल होतात. म्हणून या बाबतींची उपेक्षा न करितां परिषदेनें असे प्रतिबंध दूर करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

दुसऱ्या ज्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार परिषदेनें करणें अवश्य आहे असें प्रस्तुत लेखकांस वाटतें, तो विषय म्हणजे हिंदुधर्मशास्त्राची स्त्रियांच्या वारसाहक्काच्या बाबतींत सुधारणा हा होय. आर्थिक परिस्थिति दिवसें दिवस बिकट होत चालल्या कारणानें पुष्कळ कुमरिकांचे विवाह होणें अशक्य झाले आहे. अशांच्या उपजीविकेची व्यवस्था काय व्हावयाची हा प्रश्न समाजापुढें आहे. बापाची मालमत्ता फक्त पुत्रांना मिळावी व मुलीस विवाहापर्यंत अन्नवस्त्र मिळावें ही पद्धति एकत्र कुटुंबाच्या परिस्थितींत कशीतरी चालली. परंतु अविभक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास होत चालल्यामुळें अशा कुमारिकांच्या नशिबीं बापाच्या मृत्यूनंतर भावजईच्या स्वयंपाकीण किंवा दासी म्हणून राहावयाचा प्रसंग येतो, किंवा पोटासाठीं कधींकधीं अनीतीचा मार्ग

स्वीकारावा लागतो. मुलींस शिक्षण दिल्यानें स्थिति सुधारत नाहीं; कारण पुरुषासच जर नोकरीधंदा मिळत नाहीं तर स्त्रियांची कथा काय. ही आर्थिक विषमता पुष्कळ समाजिक अनर्थाचें मूळ आहे. म्हणून मुलांमुलींस बापाच्या मालमत्तेंत सारखाच विभाग मिळण्याची व्यवस्था होणें अत्यंत आवश्यक आहे. असें झाल्यास हुंडा, मिश्रविवाह सपत्नीत्व इत्यादि सांप्रतचे प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागतील.

या प्रश्नाचा विचार जातीच्या परषदेनें कां करावयाचा असें कोणीं विचारीलसे वाटत नाहीं. आपली जात हा अखिल हिंदूसमाजाचा एक भाग आहे. आम्ही स्वतःस सुशिक्षित, प्रगमनशील म्हणवितों. सुशिक्षित अथवा स्वतःस उच्च म्हणविणाऱ्या जातींतच स्त्रियांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे; कारण त्या जातींतील स्त्रियाच आर्थिक गुलामगिरींत असतात. खालच्या जातींतील स्त्रिया स्वतः सिद्ध असल्यामुळें त्यांच्यापुढें हा प्रश्नच नाहीं. म्हणून आमच्या परिषदेनें अधिकारीपणें स्त्रियांची आर्थिक विषमता दूर करण्याच्या प्रश्नाबद्दल आपलें मत व्यक्त करून इतरांस उदाहरण घालून दिलें पाहिजे.

शिक्षणाच्या बाबतींतही विचार करण्याची वेळ आली आहे. उच्च शिक्षणास व ज्यांना noble professions असें म्हणतात, त्यांस आम्ही भलतेंच महत्त्व दिलें आहे. शारीरिक श्रमांचा आम्हांस कंटाळा. सॅंडहर्स्ट मिलिटरी कॉलेजांत आमच्या ज्ञातीपैकीं एकच उमेदवार गेला, व नाविकशिक्षणासाठीं ज्यांनीं प्रयत्न केला, असे हाताच्या बोटावरच सांपडतील. वैमानिक शिक्षणाची तर गोष्टच बोलावयासच नको. त्यांस या प्रकारच्या शिक्षणाचा खर्च सोसेल, असे धनिक गृहस्थ गौड सारस्वतांत अनेक असतील. परंतु त्यांच्या मुलांस ठरीव चाकोरींतून जाऊन ब्रीफलेस बॅरिस्टर किंवा भिंतीला तुंबड्या लावणारे डॉक्टर व्हावेंसें वाटतें. शिक्षणाची दिशा बदलण्याच्या बाबतींत फार प्रचारकार्य झालें पाहिजे. या बाबतींत परिषदेनें कांहीं दिशा दाखवून देणें अत्यावश्यक आहे.

अशा प्रकारच्या पुष्कळ सामाजिक प्रश्नांवर परिषदेनें विचारपूर्वक अधिकारी मत प्रदर्शीत करून ज्ञातीस दिशा दाखविली तरच मुंबईसारख्या प्रगमनशील शहरांत परिषद् भराल्याचें सार्थक होईल. तसें न होतां जुनेच ठराव कंठाळींतून काढून त्यांचा पुनरुच्चार करावयाचा असल्यास परिषदेसाठीं लागणारा पैसा व श्रम व्यर्थ गेला असे म्हणावें लागेल. मुंबईंत परिषद् पहिल्यानेंच भरत आहे. सर्व ज्ञाति बंधूना योग्य दिशा दाखविण्याची आपल्यावरील जबाबदारी आमचे मुंबईकर बंधू उत्तम रीतीनें पारपाडतील अशी आशा व्यक्त करून त्यांच्या प्रयत्नांला यश येवो असें इच्छितों.

---

—सारस्वत ब्राह्मण समाजानें भाऊदाजी मेमोरिअल प्राईझसाठीं चालू सालीं मागविलेल्या निबंधांमधून श्री. नागेश रामकृष्ण महात्मे व श्री. रामदास शंकर कल्याणकर यांचे निबंध परीक्षकांनीं बक्षिसासाठीं योग्य असे ठरवून त्यांस अनुक्रमें रु. ४० व रु. १५ चीं पारितोषिकें देण्यांत आलीं आहेत.

# न्यायमूर्ति तेलंग—राष्ट्रीय सभेचे एक संस्थापक

( सारस्वत ब्राह्मण समाजांत रा. वसंतराव नाईक यांचें तेलंग पुण्यतिथीचे दिवशीं झालेले व्याख्यान

काँग्रेससारख्या लोकमान्य राजकीय संस्थेचा हीरकमहोत्सव जवळ आला असतां, तिच्या संस्थापकांतही अग्रगण्य मानल्या गेलेल्या थोर विभूतीचा स्मृतिदिन पाळल्यास आज तरी कोणीं नावें ठेवणार नाहीं. या दृष्टीनें पाहिल्यास न्यायमूर्ति तेलंग यांची बेचाळीसावी पुण्यतिथि वास्तविकपणें अखिल हिंदी राष्ट्रानेंच पाळली पाहिजे. परंतु तसें करण्याची मनःस्थिती आज आपणांमध्यें नाहीं. म्हणूनच एका ज्ञातिविशिष्ट संस्थेला तें कार्य आज पार पाडावें लागत आहे. तेलंग हे काँग्रेसच्या मूळ संस्थापकापैकीं एक होते.सतत आठ वर्षें त्यांनीं जनरल सेक्रेटरी या नात्यानें तिचें कार्य केलें. १८९३ च्या डिसेंबर महिन्यांत लाहोरास दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरणाऱ्या अधिवेशनाची एकंदर पूर्व तयारी त्यांच्याच सल्ल्यानें करण्यांत आली. आणि दादाभाईंचा पाय हिंदुस्थानास लागणाऱ्या सुमारास त्यांनीं आपली इहलोकची यात्रा वयाच्या त्रेचाळीस वर्षांवर संपविली.

आठ वर्षांच्या या अमदानींत एका बाजूस लोकांचें गाढ अज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें अधिकाऱ्यांचा तीव्र विरोध या दोन धारींतून काँग्रेसचें तारूं शाबूतपणें पैलतीरास नेण्याचें कार्य कुशलतेनें पार पाडणाऱ्या कर्णधारांपैकीं तेलंग हे एक अग्रेसर होते. काँग्रेसच्या वतीनें डेप्युटेशनें पाठविणें, निरनिराळ्या विषयांवर विलायतेंतील लोकमत जागृत करून काँग्रेसकडे वळविण्यास्तव पत्रकें तयार करणें, त्यांच्या योग्य प्रचाराची जबाबदारी शिरावर घेणें. त्यासाठीं लागणाऱ्या सर्व खर्चाची झीज प्रसंगविशेषीं व्यक्तिशः सोसणें, अधिकारी वर्गानें काँग्रेसवर केलेल्या दोषारोपांना सडेतोड उत्तर देऊन अखेरीस निरुत्तर करणें, वगैरे कार्य तेलंगानीं आपल्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत चोख पार पाडलें. इतकें कीं १८९३च्या काँग्रेसमध्यें महर्षी दादाभाई नौरोजींनीही त्याना याबद्दल धन्यवाद दिले आहेत. तेलंगासंबंधीं या भाषणांत जो उल्लेख आढळता, तो त्यांच्या देशभक्तीच्या दृष्टीनें इतका महत्त्वाचा आहे कीं, या प्रसंगी तो येथें उद्धृत करणें अवश्य वाटतें. त्यासमयीं दादाभाई नौरोजी म्हणाले.

He was one of our greatest patriots and his death was a heavy loss to India. You all know what a high place he held in our estimation for his great ability, learning eloquence, sound judgment, wise counsel, and leadership. I have known him and worked with him for many years, and I have not known any one more earnest and devoted to the cause of the country. He was one of the most active founders of the Congress and its first hard working secretary in Bombay. From the very first, he had taken a warm interest and and active part in our work, and even after he became a judge, his sound advice was at our disposal.

त्या वेळीं विलायतेंत प्रसिद्ध होणाऱ्या काँग्रेसच्या मुखपत्रांत दादाभाईंनीं तेलंगांबद्दल incorruptible patriot and a farsighted statesman असें लिहिलें आहे. रानडयांनीं त्यांना नवीन हिंदुस्थानाचे मार्गदर्शक व प्रतिनिधि म्हणून गौरविलें आहे. त्यांच्या मृत्यूनंतर टाऊनहॉलमध्यें भरलेल्या जाहीर सभेंत रानडयांनीं त्यांच्याबद्दल काढलेले उद्गार तितकेच संस्मरणीय आहेत. ते म्हणतात, "like soldiers on the field of Coruna we follow our fallen leader with bated breath and heartfelt anxiety." त्यांच्या अष्टपैलु बुद्धीचें व सार्वजनिक कार्याचें वर्णन करून त्यांना रानडयांनीं उमलणाऱ्या गुलाब पुष्पाची उपमा दिली आहे. आणि त्यांचें कार्यबाहुल्य, कुशाग्र व तैलबुद्धि, निरलस उद्योग, आणि निरभिमानी व निःस्वार्थी सेवा यांचें वर्णन करून अवघ्या त्रेचाळिस वर्षांच्या आयुष्यक्रमांत त्यांनीं जें कार्य केलें, त्याच्याशीं

स्वतःच्या कार्यक्षमतेची तुलना करून प्रत्येकानें बोध घ्यावा असें सांगितलें आहे. तेलंगांबद्दल रानड्यांनीं काढलेल्या प्रशंसापर उद्गारांचा विचार करतां एका जर्मन तत्त्ववेत्त्यानें सांगितलेल्या त्यांतील रहस्याची आठवण होते. It requires a great man to understand another या त्याच्या शब्दांत तेलंगांबरोबर रानड्यांच्या थोरपणाचीही साक्ष आपणाला मिळते. गोखल्यांनीं रानडे, मेहेता, तेलंग या तीन थोर राष्ट्रविभूतींचा नामनिर्देश करून पहिल्यांत ऐतिहासिक दूरदृष्टि, दुसऱ्यांत धैर्य आणि तिसऱ्यांत मूर्तिमंत संस्कृति यांचा वास असल्याची ग्वाही एका प्रांतीय परिषदेपुढें केलेल्या भाषणांत दिली आहे. याचा अर्थ तेलंगांची प्रगल्भता रानड्यांत नव्हती, किंवा रानड्यांची ऐतिहासिक दृष्टि तेलंगांना नव्हती, अथवा मेहेतांमध्यें धैर्याशिवाय उपर्युक्त इतर गुणांचा वास नव्हता, असा करावयाचा नाहीं.

तेलंगांवर नाना रीतीनें शिंतोडे उडविण्याचें कार्य अनेकांनीं केलें आहे. आणि त्याचें कारण ते सामाजिक सुधारक होते या वेगळें देतां येणार नाहीं. संमतिवयाच्या कायद्याचा त्यांनीं जोरानें पुरस्कार केला, इतक्याच कारणास्तव त्या वेळच्या दुर्धारकांनीं त्यांच्यावर गहजब उडविला, परंतु तो कायदा योग्य होता अशी आज सनातन्यांचीही खात्री झाली आहे. हें या विषयावर सर मोरोपंत कमिटीपुढें झालेल्या साक्षींवरून सिद्ध करतां येईल. काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी लॉर्ड लिटनच्या प्रेस ॲक्टाविरुद्ध चळवळ करणाऱ्यांत त्यांनीं पुढाकार घेतला होता. आणि इंदुप्रकाशाच्या इंग्रजी बाजूकडे चार अग्रलेख लिहून त्याचा खरपूस समाचार घेतला होता, याची माहिती फारच थोड्यांना असेल. सर रिचर्ड टेंपल यांची मुंबई इलाख्याची कारकीर्द प्रजेला जाचक झाली. तेव्हां त्यांतील प्रत्येक बाबीवर हल्ला चढविण्याचें कार्य मेहेतांच्या खांद्याला खांदा भिडवून तेलंगांनींच केलें. इलबर्ट बिलाविरुद्ध युरोपियनांनीं केलेल्या चळवळीची नांगी मोडण्याचें कार्य मुंबईंत त्यांनींच पार पाडलें, त्याचप्रमाणें ज्या म्यूनिसिपल ॲक्टच गोडवे आपण आजही गात आहों, तो १८८८ सालाचा कायदा कौंसिलांत सुधारून पास करण्याचें श्रेयही मेहतां इतकेंच तेलंगांकडे येत असल्याची साक्ष मेहतांनींच दिली आहे.

१८८५-१८९०च्या पांच वर्षांच्या काळांत काँग्रेसला देशांतील एकमेवाद्वितीय राजकीय सभा असें नांव मिळवून देण्याला ज्यांचे दीर्घ परिश्रम कारणीभूत झाले, त्यांत अलाहाबादचे पंडित अयोध्यानाथ, मुंबईचे मेहता, तेलंग, तय्यबजी व रानडे, मद्रासचे जी. सुब्रमण्य अय्यर आणि बंगालचे सुरेंद्रनाथ बानर्जी यांचीं नांवें प्रामुख्यानें घेतलीं पाहिजेत. १८८९ सालीं मुंबईंत भरलेल्या काँग्रेसमध्यें चार्लस ब्रॅडला हजर राहिले. पार्लमेंटमध्यें नवीन इंडिया बिल सादर करण्याचा मक्ता त्यांनीं आपणाकडे घेतला व त्याचा मसुदाही तयार झाला. अशा प्रकारें काँग्रेसकार्याचें वजन वाढविण्याला ज्यांनीं मदत केली, त्यांत तेलंगांची बुद्धिमत्ता आणि जनरल सेक्रेटरी या नात्यानें दृष्टोत्पत्तीस आलेली त्यांची कार्यक्षमता यांचा उल्लेख केला पाहिजे. याच वेळीं तेलंग न्यायाधीश झाले, परंतु काँग्रेसकार्याची धूरा अप्रत्यक्षपणें सरतेशेवटपर्यंत त्यांच्याचकडे होती, याची ग्वाही दादाभाई नौरोजी यांनींच दिली आहे.

१८७२ सालापासून तों १८८९ अखेरपर्यंत अहर्निश सार्वजनिक कार्य करण्यांत सदैव तत्परता दाखविणाऱ्या थोर गृहस्थांनीं राजकीय क्षेत्रांत कार्य न करतां सामाजिक सुधारणेचीच तळी उचलली आणि ती केवळ सरकारला खूष करण्याकरितांच उचलली, असें म्हणणें याला अंधद्वेष व मत्सर यांवेगळें नांवच देतां येणार नाहीं. तेलंग हे जर सरकारच्या लांगूलचालनालाच वाहिलेले असते, तर हंटरकमिटीच्या रिपोर्टांत नमूद असलेली भिन्नमतपत्रिका त्यांच्या लेखणींतून कधींच उतरली नसती. त्याचप्रमाणें त्यांच्या वेळच्या पब्लिक सर्व्हिस--कमिशनच्यापुढील आपल्या साक्षींत " नेटिव्हां "ना वागविण्याच्या बाबतींत we are at a feast where there is pleanty of table cloth but scanty meat असे उद्गारही त्यांनीं काढले नसते. संमतिवयाच्या कायद्याच्या संबंधानें वर्तमानपत्रांत सुरू असलेल्या वादविवादांत त्यांनीं केलेली राणीच्या जाहीरनाम्याची छाननी मंदबुद्धि किंवा भित्र्या व्यक्तीला कधींही पेलली नसती. त्यांनीं केलेलें राणीच्या जाहीरनाम्यावरील भाष्य सरकारच्या तटस्थ धोरणाविरुद्ध हल्ला चढविण्याच्या कामीं आजही उपयुक्त व समर्पक वाटलें. सामाजिक,

राजकीय अथवा औद्योगिक सुधारणा यांपैकीं एकही गोष्ट त्यांनीं आपल्या सबंध आयुष्यांत वगल देवून टाळली नाहीं. किंवा सरकार किंवा जनता यांपैकीं कोणाला खूष करण्याकरितां त्यांत प्रतारणा केली नाहीं. हें मलबारीशेठना त्यांनीं दिलेलें उत्तर, सामाजिक सुधारणेवरील त्यांचें संस्मरणीय व्याख्यान, कॉंग्रेसमध्यें त्यांनीं केलेलीं अनेक भाषणें, खुला व्यापार किंवा संरक्षण यांवर त्यांनीं लिहिलेला निबंध, मुंबई प्रेसिडेन्सी ॲसोसिएशन व लेजिस्लेटिव्ह कौंसिलांतील त्याचें कार्य यांचें परीक्षण केल्यास लक्षांत येईल.

तेलंगांचें शैक्षणिक कार्य त्यांच्या इतर सार्वजनिक कार्याइतकेंच भरींव व व्यापक होतें, हें तेलंगकोर्स या नांवानें सुप्रसिद्ध असलेला विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रम आणि त्याच्या समर्थनार्थ त्यांनीं लिहिलेला रिपोर्ट पाहिल्यास कळेल. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत उच्च शिक्षण घेऊन तयार होणारा पदवीधर इतिहास अर्थशास्त्र आणि इंग्रजी व संस्कृत, वाङ्मयांत तरबेज अर्थात व्यापक दृष्टीचाच असला पाहिजे, तरच तो उत्तम नागरिक होऊन कोणत्या ना कोणत्या सार्वजनिक कार्यांत पडून देशाचें ऋण फेडण्यास पात्र होईल, हें ओळखूनच त्यांनीं रानडे, वर्डस्वर्थ भांडारकर, मेहता यांसारख्या विद्वान् व शिक्षणाचा देशहिताच्या दृष्टीनें विचार करणाऱ्यांच्या साहाय्यानें हा अभ्यासक्रम आंखिला व विश्वविद्यालयांत पास करून घेतला सुशिक्षित म्हणविणाऱ्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे विशिष्ट शिक्षण मिळण्यापूर्वी, त्याची दृष्टि विशाल करणारें व्यापक शिक्षण प्रथम मिळालें पाहिजे आणि तें योग्य शिक्षकांच्या द्वारेंच मिळालें पाहिजे, यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. हें हंटरकमिशनला जोडलेली त्यांची भिन्न मतपत्रिका पाहिल्यास दिसून येतें.

इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र व इंग्रजी वाङ्मय यांचा अभ्यास केल्यानें देशांत असंतुष्ट पदवीधरांचा भरणा अधिक होतो, याकरितां या विषयांना विश्वविद्यालयांत अर्धचंद्र दिला पाहिजे. या धोरणानेंच आज प्रचलीत असलेला सिडनहॅम कोर्स अमलांत आणिला गेला हेंही तितकेंच स्पष्ट आहे. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींत पास झालेल्या युनिव्हर्सिटी-ॲक्टनें या नवीन धोरणाची प्राणप्रतिष्ठा केली आणि लॉर्ड सिडनहॅम यांनीं त्यावर 'सायन्सची' ग्वाही देऊन कळस चढविला. हिंदुस्थानांतील असंतुष्ट पदवीधर त्यामुळें नष्ट झालेला नाहीं, उलट, त्यांच्या संख्येंत उत्तरोत्तर अधिकच भर पडत आहे; कारण स्पेशलाईझेशनचें त्या वेळीं जें भूत नाचविलें त्यामुळें आजचा पदवीधर अधिकच नालायक बनण्याच्या स्थितीस पोहोंचला आहे. त्याला इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, वाङ्मय यांचा गंध तर नाहींच; परंतु त्यानें पाठांतर केलेल्या शास्त्रीय किंवा इतर विवक्षित विषयांचेंही परीक्षा उत्तीर्ण होण्यापलीकडे ज्ञान असत नाहीं. आणि आपल्या ज्ञानांत भर घालून तें व्यापक व खोल बनविण्याची आवडही उरत नाहीं. राष्ट्रीय भावना, राष्ट्रहितपर राजकारण, सामाजिक सुधारणा आणि सरतेशेवटीं तत्पोषक शिक्षण आणि औद्योगिक सुधारणेची दिशा दाखविण्याचें कार्य अगदीं लहानवयांत म्हणजे चाळीशी उलटण्याच्या आंत तेलंगांनीं कशा तडफेनें, निरलस उद्योगानें आणि निःस्वार्थ लोकसेवेनें पार पाडलें, हें आज दाखविणें अधिक जरूर आहे. आणि हें पार पाडणारी व्यक्ति शील, सौजन्य आणि धवल चारित्र्य या तीन गुणविशेषांनीं मंडित होती हेंही त्याबरोबरच सांगितलें पाहिजे. तेलंग, मेहता, दादाभाई, रानडे, तय्यबजी आणि वाच्छा यांच्यासारख्या अलौकिक व गुणवान् विभूतींचा आज लोकांना विसर पडला आहे परंतु यांनीं राष्ट्रीयसभा स्थापिली, ती नांवारूपास चढविली, आणि तिला लोकांत वजन, मान्यता आणि स्थैर्य देण्याची कामगिरी उरकली हें ज्यांना माहित आहे, त्यांनीं या सभेचा हीरकोत्सव होण्याच्या शुभप्रसंगीं त्यांचीं नांवें मागें पडणार नाहींत, इतकी कृतज्ञता अवश्य दाखविली पाहिजे. आपली परंपरागत संपदा जो विसरतो, त्याला पुढील पिढीच्या हिताचीही पर्वा असत नाहीं, हें ऐतिहासिक सत्य लक्षांत बाळगून कॉंग्रेसच्या आजच्या सूत्रधारांनीं राष्ट्रीय गोत्रांतील या पंचप्रवरांची आठवण करून त्यांचा अभिमानही बाळगला पाहिजे. शिक्षण आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत आज त्यांच्या योग्यतेचे पुढारी आढळत नाहींत, म्हणूनच "आंधळे दळतात व कुत्रीं पीठ खातात" अशी शोचनीय स्थिति त्यांना आज प्राप्त झाली आहे! राष्ट्रीयसभा आणि मुंबई विश्वविद्यालय यांचा बाजार होण्याचें कारण यावेगळें नाहीं.

---

# ज्ञातिसमाचार

## १ माननीयांचा सन्मान

ठाणें येथील आपल्या ज्ञातींतील सुप्रसिद्ध वकील **रा. रा. वामन अनंत रेगे** हे ठाणा म्युनिसिपालिटी-तर्फें गेल्या जुलै महिन्याच्या १६ तारखेस भरलेल्या सभासदांच्या सभेमध्यें बहुमतानें अध्यक्ष निवडून आले ह्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों.

रा. रा. रेगे ह्यांचा जन्म इ. स. १८८८ सालीं सावंतवाडी संस्थानमध्यें झाला. ठाणें येथील बी. जे. हायस्कूल मधून ते इ. स. १९०५ सालीं मुंबई-विश्वविद्यालयाची प्रवेशपरिक्षा पास झाले. त्यानंतर आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमध्यें इ. स. १९०८ पर्यंत त्यांनीं शिक्षकाचें काम केलें.

इ. स. १९१२ मध्यें ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले, नंतर कांहीं दिवस ते सरकारी वकील, ( Police prosecutor ) म्हणून काम करीत होते. परंतु त्यांनीं ती नोकरी सोडून ठाणें येथें पुन्हा वकिली करण्यास सुरवात केली. इ. स १९२६ सालीं ठाणा-म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत ते निवडून आले. इ. स १९२८ सालीं ते ठाणा म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष होते.

आपल्या विभागांतील (ward) व शहरांतील लोकांच्या गरजा काय आहेत त्या लक्षांत घेऊन, नोकरशाहींत असलेल्या अंदाधुंदीचें निरीक्षण करून कोणाच्या भिडेस न पडतां त्यांनीं आपल्या कारकीर्दींत बरींचशीं लोकोपयोगी कामें केलीं, व त्याबद्दल विरुद्ध पक्षानें त्यांना 'बोलघेवडा' 'जाळपोळ करणारा' अशीं विशेषणें लाविलीं होती. पण त्यांस न जुमानतां ते आपल्या कर्तव्यापासून केव्हांही च्युत झाले नाहींत.

१९२९ ते १९३५ च्या सहा वर्षांत त्यांनीं म्युनिसिपालिटीच्या कामांत फारसें लक्ष घातलें नाहीं. गेल्या मे महिन्यांत झालेल्या निवडणुकींत ते पुनश्च उमेदवार म्हणून उभे राहिले व यशस्वी झाले.

* * *

अधिकाराच्या जागीं असलेल्या प्रत्येक इसमास आपल्या वजनाचा व लोकप्रियतेचा उपयोग सर्व-साधारण जनतेच्या दुःखनिवारणाचे उपाय योजण्याकडे व इतर सेवेकडे कसा करितां येतो, हें आमचे सुविद्य बंधु रा. रा. **दत्तात्रय वामन रेगे, आय्. सी. एस्.**, डेप्युटी कमिशनर बुलढाणा, (मध्यप्रांत) यांच्या उदाहरणावरून सहज दिसून येतें. आपल्या १३ वर्षांच्या नोकरींत मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतांत ठिकठिकाणीं त्यांनीं जीं जनसेवेचीं लहानमोठीं कृत्यें केलीं, त्यांची इकडील पुष्कळ मंडळीस माहिती नसणें साहजिक आहे. करितां त्यांपैकीं १।२ गोष्टींचाच येथें ओघानें उल्लेख करावासा वाटतो. साम्राज्याधिपतींच्या रौप्य-जुबिलीच्या प्रसंगीं आपल्या कर्तबगारीच्या व लोकप्रियतेच्या साहाय्यानें त्यांनीं बरीच मोठी रक्कम गोळा करून स्त्रिया व मुलें यांसाठीं खामगांव येथें एक हॉस्पिटल स्थापण्याची योजना हातीं घेतली आहे. सदर हॉस्पिटलच्या पायाचा दगड बसवितांना समारंभाचे अध्यक्ष नामदार बी. जी. खापर्डे यांनीं खऱ्या लोककल्याणासाठीं अहर्निश झटणारे रा. रा. रेगे यांच्यासारखे जिल्हाधिपति मिळाल्याबद्दल बुलढाणा जिल्ह्याचें अभिनंदन केलें व सदर रुग्णालयाची योजना सुयशस्वी व्हावी म्हणून ते करीत असलेल्या परिश्रमाची त्यांनीं स्तुति केली. रा. रा. रेगे यांनीं अलीकडे खामगांव येथें "सिल्व्हर जुबिली रेस्ट हाउस फॉर कॉटन ग्रोअर्स" स्थापन करण्यांतही पुढाकार घेतला होता. थोड्या वर्षांपूर्वी खांडवा येथें असतेवेळींही अशाच प्रकारचें एक हास्पिटल तेथें स्थापण्याची कल्पना काढून ती त्यांनीं मूर्त स्वरूपांत आणून दाखविली.

अशा बंधूबद्दल कोणास प्रेमादर वाटणार नाहीं

* * *

रा. रा. **अनंतराव वासुदेव सबनीस,** बी.ए., जे. पी., हे गेल्या जुलैच्या २५ तारखेस आपल्या मुंबई-म्युनिसिपल-सेक्रेटरीच्या जागेवरून अत्यंत सन्मानानें सेवानिवृत्त झाले. ता. २५ जुलै रोजीं भरलेल्या मुंबई-म्युनिसिपल-कॉर्पोरेशनच्या सभेंत त्यांच्या कामासंबंधानें निरनिराळ्या वक्त्यांकडून जे गौरवपर उद्गार निघाले, त्यावरून त्यांच्या दीर्घोद्योगी, निरलस व कर्तव्यतत्पर स्वभावाची चांगलीच ओळख पटते.

त्यांच्या ३२ वर्षांच्या नोकरीच्या मुदतींत मुंबई-म्युनिसिपालिटीची जी अमूल्य सेवा त्यांनीं बजावली, तिचा उल्लेख प्रशंसापूर्वक नमूद केला जावा असा ठराव मांडतांना मि. मेयर निसीम यांनीं जी माहिती दिली, तीवरून रा. रा. सबनीस यांनीं म्युनिसिपल-बजेटाची छाननी करण्यामध्यें बरेंच कौशल्य दाखविलें, कांहीं अंदाजांमधील चुका व्यक्त केल्या, आपल्या ऑफिसच्या व इतर खर्चांत बचत केली, कामास सुव्यवस्था लावली व कॉर्पोरेशनच्या कामाचीं परिशिष्टें संशोधून तारीखवंद तयार ठेविलीं, असें दिसून येतें. त्यांची वर्तणूक नेहमीं सर्वांशीं सलोख्याची व आदरयुक्त असे. कॉर्पोरेशनच्या कामाच्या नियमासंबंधीं व म्युनिसिपल-कायद्यांसंबंधीं त्यांस असलेल्या विस्तृत माहितीचा फायदा ते कॉर्पोरेशनच्या सभासदांस नेहमी आनंदानें देत असत, असा उल्लेख श्री. जमनादास मेहता, सर जहांगिर बमन बेहराम, सर होमी मोदी, मि. पटेल इत्यादि सभासदांनीं केला.

रा. रा. सबनीस हे ज्या वेळीं "सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या" सेक्रेटरीच्या जागेवर होते, त्यावेळीं त्यांची काम करण्याची हातोटी ज्यांनीं पाहिली होती, त्यांस आपल्या अंगच्या अनेक गुणांनीं रा. रा. सबनीस हे कोणत्याही जबाबदारीच्या जागेवर गेले तरी ते अशीच कीर्ति मिळवितील, असा पूर्ण विश्वास होता. त्यांचा विशेष ओढा शिक्षणविषयक संस्थांस आपल्या माहितीचा व सेवेचा फायदा देऊन त्यांची वाढ करण्याकडे फार आहे; व अशा संस्थांची सर्वांगीण उन्नति करतांना बारिकसारिक बाबींतही व्यंग राहूं नये असा त्यांचा नेहमीं कटाक्ष असतो.

रा. रा. सबनीस यांस दीर्घायुष्य लाभून त्यांच्या परिपक्व अनुभवाचा व सार्वजनिक कामाच्या आवडीचा फायदा ज्ञातींतील व इतर संस्थांस त्यांच्या विश्रांतीच्या अवधींत मुबलक मिळत जाईल, अशी आशा आम्हीं प्रदर्शित करितों.

* * *

रा. रा. सबनीस यांच्या रिकाम्या झालेल्या जागीं रा. रा. **दत्तात्रय व्यंकटेश नाडकर्णी,** यांची नेमणूक झाली याबद्दल नाडकर्णी यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करितों. आपल्या कर्तव्यतत्परतेनें, निरलस वृत्तीनें व सौजन्यानें रा. रा. सबनीस यांच्याप्रमाणेंच, ते सर्वांच्या स्नेहास व आदरास पात्र होतील अशी आम्हांस पूर्ण खात्री आहे.

* * *

मुंबई इलाख्याचे डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ, **मेजर ए. वाय. दाभोळकर,** एम्. सी., आय. एस. यांस सरकारकडून अलीकडे 'लेफ्टनंट कर्नल'चा हुद्दा मिळाला असून कांहीं विशिष्ट प्रकारच्या शिक्षणासाठीं व देशपर्यटनासाठीं ते यूरोप व अमेरिका खंडांत सहकुटुंब गेले आहेत. ते ता. ५ डिसेंबर १९३५ रोजीं स्वदेशीं परत येतील असें कळतें.

* * *

विदर्भ महिलापरिषदेचें ५ वें अधिवेशन उमरावती येथें ता. २० ऑक्टोबर १९३५ रोजीं भरविण्यांत येणार असून त्याच्या अध्यक्षपदासाठीं डॉ. श्रीमती सौ. **मालिनीबाई भालचंद्र सुखटणकर,** एम्. बी.; बी. एस्., जे. पी. यांची निवडणूक झाली आहे.

* * *

रा. रा. **सदानंद वामन शिवेश्वरकर** हे गेल्या वर्षी रँग्लर होऊन त्यांना 'बी' स्टार मिळाल्याचें

सर्वांत विदित आहेच. त्यानंतरचीही त्यांची कामगिरी फार प्रशंसनीय असून त्यांनीं ज्योतिर्विद्येसंबंधीं लिहिलेल्या संशोधनपर निबंधास केंब्रिज युनिव्हर्सिटीनें ४० पौंडांचें "शिपशँक्स एक्झिबिशन" पारितोषिक दिलें आहे. इतकेंच नव्हे, तर लंडन येथील 'रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी"नें त्यांस आपल्या संस्थेचे 'फेलो' निवडलें आहे. ते जेथें अध्ययन करीत आहेत, त्या केंब्रिज येथील "सीडने ससेक्स" या पाठशाळेनें त्यांस १३० पौंडांची संशोधन शिष्यवृत्तीही बहाल केली आहे. रा. शिवेश्वरकर, यांनीं विलायतेंत नुकत्याच झालेल्या "इंडिअन सिव्हिल सर्व्हिस"च्या परीक्षेंतही अभिनंदनीय यश मिळविलें आहे असें समजतें.

* * *

सा. वि. सा. मंडळीचे माजी चिटणीस व बाबू पन्नालाल जैन हायस्कूलमधील शिक्षक रा. रा. **गजानन हरि जांबोटकर,** एम्. ए., एस्. टी. सी., बी. टी. हे सुमारें एक वर्षापूर्वी शिक्षण-शास्त्राच्या विशेष अध्ययनासाठीं विलायतेस गेले होते. त्यांना लंडन युनिव्हर्सिटीच्या टीचर्स डिप्लोमा परीक्षेंत यश मिळाल्याची सुवार्ता तारेनें नुक्तीच आली आहे. रा. जांबोटकर हे ता ७ नोव्हेंबरला स्वदेशीं परत येतील असें कळतें.

* * *

रा. रा. **सच्चित् केशव नरगुंदकर** यांनीं धनबाद येथील इंडियन स्कूल ऑफ माइन्सचा अभ्यासक्रम पुरा करून ते तीन वर्षांपूर्वी उच्च शिक्षणासाठीं विलायतेस गेले होते. ते तिकडे फर्स्ट क्लास कॉलिअरी मॅनेजर्स सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन-मध्यें उत्तीर्ण झाले असून मातृभूमीस लवकरच परत येतील, हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. रा. नरगुंदकर हे "रा. ब. स. वि राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटी' चे स्कॉलर आहेत.

* * *

रा. रा. **मनोहर कृष्ण हेबळे,** एम्. ए. हे लंडन युनिव्हर्सिटीची बी. एस्सी. (इकॉनॉमिक्स) परीक्षा दुसऱ्या वर्गाच्या पहिल्या विभागांत पास झाले आहेत. सदर परीक्षेंत यंदा एकाही हिंदी विद्यार्थ्याला पहिला वर्ग मिळाला नाहीं.

* * *

रा. रा. **रमेश श्रीपाद बावडेकर,** बी. ई. (रा. रा. राजाराम श्रीपाद बावडेकर, आय्. सी. एस्., यांचे कनिष्ठ बंधु) हे लंडन युनिव्हर्सिटीची बी. एस्सी. (इंजिनीअरिंग) परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले असून, हल्लीं मँचेस्टर येथें प्रत्यक्ष कामाची माहिती व अनुभव घेत आहेत. पुढील वर्षी ते स्वदेशीं परत येतील असें कळतें.

* * *

रावबहादूर स. वि. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीची यंदाची ६००० रु. ची लोन-स्कॉलरशिप मध्यप्रांतापैकीं हर्दा येथील रा. रा. **मधुसूदन नीलकंठ कंकरे,** एम्. एस्सी., यांस Sound Recording व Radio or Meteriology या शास्त्रांचा विशेष अभ्यास करण्यासाठीं देण्यांत आली आहे. रा. कंकरे यांचा अभ्यासक्रम अभिनंदनीय असून, मॅट्रिक्युलेशन-पासून एम्. एस्सी. परीक्षेपर्यंत कोणत्याही परिक्षेंत त्यांनीं पहिला वर्ग सोडला नाहीं. रा. कंकरे हे "सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी"चे स्कॉलर होते. आजपर्यंतच्या त्यांच्या यशस्वी विश्वविद्यालयीन कारकीर्दीवरून पुढेंही ते असेंच यश मिळवितील असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

* * *

रा. रा. **गजानन शांबा प्रिओळकर,** एम्. ए. हे लंडनच्या इन्स्टिटयूट ऑफ ॲक्चुअरिच्या परीक्षेच्या पहिल्या भागांत उत्तीर्ण झाल्याचें शुभ वर्तमान कानीं आलें आहे. ही परीक्षा देणारे रा. प्रिओळकर

हे आमच्या माहितीप्रमाणें पहिलेच स्वकीय गृहस्थ असून, त्यांच्या उदाहरणावरून आपल्यापैकीं अधिक विद्यार्थ्यांचें लक्ष विद्येच्या या शाखेकडे जाईल अशी आम्हांस उमेद आहे.

* * *

रा. रा. **विजय आनंदराव माडगांवकर**, (कलकत्ता) यांनीं ऑल इंडिया बॅडमिंग्टन टुर्नामेंट-मध्यें चँपियनशिपचा पहिला मान हल्लींच मिळविला आहे.

* * *

"मुंबई हायस्कूल ॲथेलेटिक असोशिएशन" क्रिकेटनैपुण्य दाखविणाऱ्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास दर वर्षी एक चांद ( मेडल ) देत असते. चालू सालीं हें पदक कुमार **प्रभाकर शंकरराव वर्दे** यांस देण्यांत आलें आहे. कुमार वर्दे यांनीं क्रिकेट व इतर मर्दानी खेळांत जसें प्रावीण्य मिळविलें आहे, तसेंच बौद्धिक क्षेत्रांतही ते मिळवूं लागले आहेत, ही विशेष कौतुकास्पद गोष्ट होय. चालू सालीं ते सेंट झेवियर हायस्कूलमधून मुंबई-विश्व-विद्यालयाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले असून, इलाख्यांतील सर्व विद्यार्थ्यांत त्यांचा नंबर १० वा आला आहे.

* * *

कुमारी **किशोरी संझगिरी** ( डॉ. वसंतराव रामराव संझगिरी यांच्या जेष्ठ कन्या ) इंटरमिजिएट क्लास, एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, यांना सदर कॉलेजच्या कॅरम-डबल मिक्स्ड-टुर्नामेंटमध्यें चँपियनशिप मिळाली आहे.

* * *

डॉ **दिगंबर विठ्ठलराव नाडकर्णी** एम्. एस्. हे लंडन येथील एफ. आर्. सी. एस्. ची परीक्षा देऊन व व्हिएन्ना येथें तीन महिने अध्ययन करून व कामाचा अनुभव घेऊन लॉइड ट्रीस्टीनो कं. च्या "व्हिक्टोरिया" आगबोटीनें गुरुवार ता. ५ सप्टेंबर १९३५ रोजीं स्वदेशीं परत आले.

* * *

वरील सर्व बंधूंचें त्यांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत मिळविलेल्या यशाबद्दल आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

* * *

रा. रा. **वामन पुंडलिक वर्दे**, बी. कॉम्. हे ता. १७ सप्टेंबर १९३५ रोजीं झालेल्या "बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँके"च्या डायरेक्टरांच्या निवडणुकींत गुजरात व मुंबईंतील बँकांतर्फें डायरेक्टर निवडून आले हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. त्या बँकेंत त्यांनीं बरींच वर्षें काम करून चीफ अकाउंटंटच्या जागेवरून सेवानिवृत्त होऊन सुमारें एक वर्ष लोटलें नाहीं तोंच, ते त्या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर निवडून आले, यावरून त्यांची सर्वांगीण कर्तबगारी व लोकप्रियताच सिद्ध होत असून, त्याबद्दल सर्वांस साभिमान कौतुक वाटेल यांत संदेह नाहीं. पुणें येथें नवीन स्थापन होत असलेल्या "बँक ऑफ महाराष्ट्र"चे संचालक ( मॅनेजिंग डायरेक्टर ) होण्यासही त्यांस विनंती केली होती असें कळतें; परंतु त्यांनीं ती आभारपूर्वक नाकारल्यामुळें, आतां त्यांची त्या बँकेच्या डायरेक्टोरेटवर निवडणूक झाली आहे. पुणें येथील मंडळीनें दाखविलेली ही गुणग्राहकता विशेष महत्त्वाची आहे. मुंबईंतील निरनिराळ्या बँकांतील लहानमोठ्या कामांचा अनेक वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव, कुशाग्रबुद्धिमत्ता, उत्तम आकलन-शक्ति, स्वार्थत्याग, सार्वजनिक कामांची मनमुराद हौस व खरीखुरी कळकळ, स्पष्टवक्तेपणा, वगैरे आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळें रा. रा. वामन-रावजींचें समाजसेवेचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढत गेल्यास नवल नाहीं. ज्ञातिसंस्था व ज्ञातीबाहेरील सार्वजनिक संस्था—या दोन्ही ठिकाणीं निःस्वार्थ-

बुद्धीनें व तडफीनें काम करणारीं त्यांच्यासारखीं माणसें स्वसमाजांत अगदीं विरळा ! आठवड्याच्या धारणेवर त्यांचे लेख विविध वृत्तांत येत असून व्यापारीवर्गांत त्या लेखांची फार चहा होते. त्यांच्या लोकसेवेचें क्षेत्र उत्तरोत्तर असेंच विस्तृत होऊन, ते मुंबई-म्युनिसिपल कॉर्पोरेशन व लेजिस्लेटिव्ह कौन्सिल अशांसारख्या मोठ्या संस्थांच्या द्वारें जनसेवा करण्याचें ध्येय आज ना उद्यां आपणांपुढें ठेवतील अशी आम्हांस उमेद आहे.

* * *

**शिल्पकार कामत यांचें अभिनंदन**—इंग्लंडमध्यें शिल्पकलेंत अपूर्व यश व सन्मान मिळवून स्वदेशीं परत आलेले प्रसिद्ध शिल्पकार रा. रा. **रामचंद्र पांडुरंग कामत** यांच्या सन्मानार्थ येथील सारस्वत ब्राह्मण समाजातर्फे समाजगृहांत ४ ऑगस्ट १९३५ रोजीं सायंकाळीं एक खास जाहीर सभा भरविण्यांत आली होती. अध्यक्षस्थानीं श्री. सीताराम सुं. पाटकर, माजी हायकोर्ट जज्ज, यांची योजना करण्यांत आली होती. सभेचा दिवाणखाना ज्ञातींतील अनेक सद्गृहस्थ व विद्यार्थीवर्ग यांनीं चिकार भरून गेला होता.

शिल्पकार कामत यांनीं मिळविलेल्या अपूर्व यशाबद्दल सा. ब्रा. समाज व जमलेला मित्रसमूह यांतर्फे श्री. कामत यांचें अभिनंदन करून श्री. शंकरराव वर्दे म्हणाले:—शिल्पकार कामत यांनीं मिळविलेल्या अपूर्व यशाची गुरुकिल्ली त्यांच्या इव्हिनिंग न्यूजच्या मुलाखतींतील त्यांच्याच शब्दांत व्यक्त झाली आहे. I want to learn, I want to get on, हे त्या वेळचे शब्द अत्यंत महत्त्वाचे होते. हें ध्येय त्यांनीं पुढें ठेवून यशसिद्धि मिळविली. आपण भला व आपलें काम भलें, अशा रीतीनें वागून त्यांनीं आपल्या ज्ञातीचें नांव वर आणलें व रॉयल ॲकॅडेमीचें सुवर्णपदक मिळविलेले पहिले हिंदी गृहस्थ हा सन्मान मिळविला. इतर कैक पदकें व शिष्यवृत्त्या मिळवून आज ते स्वदेशीं दाखल झाले आहेत. हिंदी राष्ट्राचा शिल्पकलेंतील उच्च दर्जा त्यांनीं परदेशांत प्रस्थापित केला आहे. भावी कालांत त्यांस आयुरारोग्य व आपल्या कार्यांत यश मिळो अशी मी परमेश्वरापाशीं प्रार्थना करतों, व येत्या संयुक्त गौड सा. ब्रा. परिषदेच्या अधिवेशनप्रसंगीं भरणाऱ्या स्वज्ञातीच्या कलाकौशल्याच्या प्रदर्शनांत त्यांच्या कलेचा खास उच्च दर्जा दर्शविणारें एखादें शिल्पकाम पाठविण्याबद्दल विनंती करतों.

श्री. वसंतराव नाईक म्हणाले, श्री. कामत यांचें अभिनंदन करण्याचा एक समारंभ नुक्ताच उरकला आहे तेव्हां तेथें मीं व्यक्त केलेल्या विचारांची पुनरुक्ति करीत नाहीं. रॉयल ॲकॅडमीचें सुवर्णपदक पहिल्या हिंदी गृहस्थाला मिळविण्याचा मान व धवल यश श्री. कामत यांनीं मिळविलें आहे. माझे स्नेही श्री. शंकरराव वर्दे यांनीं इव्हिनिंग न्यूजच्या मुलाखतींतील त्यांच्या ज्या शब्दांचा उल्लेख केला, ते बहुमोल शब्द परदेशीं जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यानें लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. "I want to learn, I want no company. I keep my own company" हेच ते शब्द होत. परदेशीं जाऊन नसताच गोतवळा निर्माण करून आपल्या आयुष्यावर पाणी ओतणारे, व ठंठणपाळ बनून हात हालवीत परत येणारे विद्यार्थी आपणांमध्यें थोडेथोडके नाहींत. त्याच्यामुळें कुटुंब, ज्ञाति, समाज, राष्ट्र यांचा फायदा होण्याऐवजीं नुकसानच अधिक होतें ! परदेशीं विद्यार्जनाकरितां राहणाऱ्या प्रत्येक तरुणानें श्री. कामत यांचे शब्द पूर्णपणें लक्षांत ठेवून आचरणांत उतरविणें अवश्य आहे. पांच वर्षांपूर्वी विलायतेस जावयास निघाले असतांना वडीलपणाच्या नात्यानें कामतांना मीं जो उपदेश केला, तो त्यांच्या दृढ निश्चयानें व देवाच्या

कृपेनें सार्थकीं लागला, हें पाहून मला फार आनंद वाटतो. यापुढील त्यांचें कार्य अत्यंत प्रचंड आहे ! त्यांत त्यांस खऱ्या गुणग्राहक धनिकांचा हातभार मिळाला पाहिजे. परंतु ज्या धडाडीनें ते विलायतेस गेले, ज्या चिकाटीनें आत्मविश्वासाच्या बळावर व सच्छील वर्तनानें त्या मोहनगरींत त्यांचा निभाव लागला, आणि ज्या भगवंताच्या आशीर्वादानें त्यांस कीर्ति व यश यांचा लाभ झाला, तो भगवंताचा आशीर्वाद, चिकाटी, धडाडी, आत्मविश्वास आणि अंतःकरणांची जागरूक वृत्ति त्यांचें पुढील कार्य पार पाडण्याला त्यांना हात देईल. ईश्वरानें त्यांना दीर्घायुष्य द्यावें, त्यांनीं मिळविलेल्या कीर्तींत अधिक भर पडण्यासारख्या कलाकृति त्यांच्या हातून निर्माण व्हाव्यात आणि स्वदेश, स्वज्ञाति, व स्वकुटुंब यांचा माथा त्यांच्या कृतीनें व वर्तनानें उजळ व्हावा अशी सदिच्छा या प्रसंगीं मी व्यक्त करतों.

श्री. ग. वि. लाड म्हणाले, आज आपल्या धवल यशानें तेजमान दिसणारी श्री. कामत यांची ही छोटी मूर्ति न्याहाळून पांच वर्षांपूर्वीची त्यांची बावळी मूर्ति कोणी लक्षांत आणली म्हणजे ही मूर्ति आजचें हें अपूर्व यश व कीर्ति मिळवील ही कल्पना स्वप्नवत् वाटली असती. या यशाचें बीज व श्रेय ज्या निसर्गरम्य गोवाप्रांतांतून ही ईश्वरदत्त देणगी घेऊन ते मडकई टोंकाकडून मुंबईच्या किनाऱ्यास आले, त्या गोवा प्रांतास, त्यांच्या कलावान हातास, शहरांत प्रारंभीं वावरतांना साह्यभूत होणाऱ्या त्यांच्या अनेक मित्रांस, गौ. सा. ब्राह्मण राजाध्यक्ष फॉ. ए. सोसायटीस, आजचे सन्मान्य अध्यक्ष श्री. पाटकर, त्याचप्रमाणें श्री. लक्ष्मीकांत दाभोळकर, श्री. भरणेप्रभृति साहाय्यकांसही आहे. कोळ्याच्या मुलानें त्यांचें नांव हिंदुस्थानांत सर्वतोमुखी केलें व व त्यांस इंग्लंडच्या किनाऱ्यावर नेऊन सोडलें, व शिल्पकार करमरकरांनीं त्यांच्या कलावंत हाताचा खरा दर्जा न्या. मू. पाटकर यांच्या कानावर घातला तो सार्थकीं लागला. या शहरांत त्यांनीं श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा यांच्या शिल्पकृति प्रारंभीं तयार केल्या, त्या देवतांचा वरप्रसादही त्यांच्या यशास कारणीभूत झाला, व रॉयल ॲकॅडमीमधील श्रेष्ठ मान त्यांनीं मिळविला. आज त्यांस पुणेरी जाहिरातीची जरूर नाहीं. त्यांची जाहिरात रॉयल ॲकॅडमीनें केली आहे. तथापि अशा परिस्थितींतही जीवनकलहार्थ चाललेल्या तीव्र झगड्यांत "योग्य प्रसंग येतांच स्वतःचें घोडें पुढें कसें दामटावें" या आजकाल स्वकीय समाजांत उणीव असलेल्या कलेची त्यांस जरूरी आहे. या कलेशिवाय या व्यवहारी जगांत निभाव लागणें कठीण. आपलें येथील आसन स्थिर करतांना या कलेकडेही ते लक्ष देतील अशी मी आशा करतों व भावी कालांत त्यांची कीर्ति त्रिखंड गाजो अशी परमेश्वरापाशी प्रार्थना करतों.

शेवटीं अध्यक्ष न्या. मू. श्री. पाटकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले, धि राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉ. ए. सोसायटीनें शिल्पकार कामत यांची केलेली निवड सार्थ व यशप्रद ठरली व शिष्यवृत्ति सार्थकीं लागली हें पाहून मला साभिमान आनंद वाटतो. शिल्पकलेच्या इतिहासांत त्यांनीं हिंदुस्थानचें नांव वर आणलें, स्वतःचा दर्जा प्रस्थापित केला. रॉयल ॲकॅडमीचें सुवर्णपदक मिळविलेले पहिले हिंदी गृहस्थ हा अभिमानास्पद सन्मान मिळविला. प्रसिद्ध शिल्पकार करमरकर यांनीं पत्र लिहून श्री. कामत यांजकडे आमचें लक्ष वेधविलें. त्यांची शिफारस सफल झाली, हें पाहून मला फार आनंद वाटतो. श्री. कामत यांनीं मिळविलेला मान हिंदुस्थानांतील शिल्पकलेच्या इतिहासांत अपूर्व आहे. तो मिळविल्याबद्दल मी श्री. कामत यांचें अभिनंदन करतों, व त्यांस आयुरारोग्य व वाढती यशःसिद्धि चिंतितों. यानंतर त्यांनीं धि राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉ. ए. सोसायटीस साह्यभूत होण्याबद्दल सर्व स्वकीय

मंडळीस विनंती केली व स्वकीय समाजांतून व स्वदेशांतून उच्च शिक्षणाच्या शाखांत अनेक तरुण निष्णात होऊन भारतभूमीचें यश वाढो अशी सदिच्छा व्यक्त करून शिल्पकार कामत यांस पुष्पहारांनीं भूषित केलें. अध्यक्षांचे आभार श्री. य. ह. सुखटणकर यांनीं मानल्यावर व अल्पोपहार झाल्यावर हा गोड समारंभ आटोपला.

\+ × +

**शिल्पकार कामत यांचा सत्कार**—येथील व्ही. एम्. स्वस्तिक मंदिरांत ता. ४ ऑगस्ट १९३५ रोजीं **गोवा हिंदु असोशिएशनच्या** हितचिंतकांची इंग्लंडहून शिल्पशास्त्राचें शिक्षण घेऊन व तिकडील प्रांतांत, तसेंच युरोप वगैरे देशांत जाऊन आपल्या कलेचें प्राविण्य दाखवून स्वदेशीं परत आलेले तरुण शिल्पकार श्री. रा. पां. कामत यांचें अभिनंदन करण्यासाठीं सभा भरली होती. इतर संस्थांच्या प्रतिनिधींनींही या सभेंत भाग घेतला होता. त्यांत गोवा एमिग्रेशन फंड कमिटीचे अध्यक्ष मि. कोलॅसो, गोवा युनियनचे अध्यक्ष मि. गोम्स, सारस्वत ब्राह्मण समाजाचे श्री. केंकरे, स्वस्तिक लीगचे डॉ. गोळे, डॉ. सबनीस व श्री. जयकर, तसेंच पोर्तुगालचे व्हाइस काउन्सेल, ए. पी. जे. फर्नांडिस, प्रो. कोरिआ फर्नांडीस, प्रो. मेनेझीस, डॉ. कोलॅसो, (मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेटर) प्रो. व्ही. एन. नाईक, श्री. रा. का. तटणीस, आर्टिस्ट ए. पी. डिक्रुझ, श्री. पी. व्ही. तालीम, श्री. वाघ व श्री. ग. वि. लाड, वगैरे गृहस्थ हजर होते.

ॲसोशिएशनचे अध्यक्ष डॉ. कामत यांनीं प्रास्ताविक भाषण केल्यानंतर श्री. वालावलकर यांनीं कोंकणीं भाषेंत श्री. कामत यांनीं युरोपांत असतांना कसें उत्कृष्ट यश मिळविलें, ती माहिती थोडक्यांत सांगितली. यानंतर मि. कोलॅसो यांनीं समारंभास साजेसें भाषण केल्यावर प्रो. नाईक, श्री. देसाई, डॉ. कोलॅसो यांनींही श्री. कामत यांच्या गौरवार्थ भाषणें केलीं. डॉ. कामत यांनीं निमंत्रित मंडळीस पुष्पहार अर्पण करून न्या. मू. पाटकर, श्री. एल्. एस्. दाभोळकर, आर्टिस्ट करमरकर, व डिक्रूझ, तसेंच कामत यांना परदेशांत पाठविण्यास सहाय्य देणारी गौडसारस्वत फॉ. ए. सोसायटीचे व हजर असलेल्या सर्व मंडळीचे आभार मानले.

समारोपादाखल भाषण करतांना श्री. कामत यांनीं आपणास दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल सर्वांचे आभार मानून लोकांनीं केलेल्या बहुमानाचें चीज करण्यास आपण शक्य ते यत्न करूं असें सांगितलें. शेवटीं फुलें वांटण्यांत येऊन सर्वांचा एकत्रित फोटो घेण्यांत आल्यावर हा गोड समारंभ समाप्त झाला.

× × ×

रा. रा. **मुकुंदराव दामोदर पै** यांनीं क्रिकेट, आटयापाटया इत्यादि खेळांत जें प्रावीण्य संपादन केलें तें सर्वविश्रुत आहेच. विशेषेंकरून क्रिकेटच्या भागांत एके काळीं त्यांचें नांव मुंबई शहरांत व इलाख्यांत सर्वतोमुखीं होतें. वयाच्या अकराव्या वर्षापासूनच त्यांनीं मर्दानी खेळांतील आपलें वैशिष्ट्य व्यक्त करण्यास सुरवात केली. गोकुळदास तेजपाल हायस्कूल विरुद्ध वी. रामचंद्र टीममधून खेळतांना त्यांनीं १३४ धांवा काढून या खेळांत अग्रगण्य होण्याची पात्रता अगदीं अल्पवयांत प्रस्थापित केली. असें सांगतात कीं, त्या वेळीं एका टोकापासून दुसऱ्याकडे प्रत्यक्ष धांव ठोकून ती पदरांत पाडावी लागत असे. हल्लींच्यासारखें 'बाउंड्री स्ट्रोकचें' कोष्टक त्या वेळीं नव्हतें.

१९०७ सालीं त्यांचा प्रेसिडेन्सी टीममध्यें हिंदूंतर्फे समावेश झाला व त्याच सालीं युरोपियनविरुद्ध त्यांनीं काढलेल्या १०७ धांवानीं त्यांची कीर्ति प्रस्थापित झाली. यापूर्वी १९०३ सालीं त्यांनीं

अलिगड-कॉलेज-टीमविरुद्ध १५० धांवा काढल्या होत्या व बाकीच्या जिमखान्यांना न मिळवितां आलेलें यश हिंदू जिमखान्याच्या पदरांत त्यांनीं टाकलें होतें. १९११ सालीं इंग्लंडांत पाठविलेल्या ऑल इंडिया टीममध्यें त्यांचा समावेश करण्यांत आला. १९१३ पासून प्रेसिडेन्सींत हिंदूंच्या बाजूचें नेतृत्त्व त्यांजकडे आलें व तें त्यांनीं १९१६ सालखेरीज करून १९२० पर्यंत चालविलें, व त्या अवधींत हिंदु व अपयश ही पूर्वींची परंपरा त्यांनीं पार उडवून दिली. आणि चौरंगींत अग्रेसरत्त्वाचा मान त्यांनीं हिंदुपथकाला मिळवून दिला. यासंबंधीं लिहितांना, १९१९ सालीं त्यांनीं इस्लाम जिमखान्याविरुद्ध पराजित न होतां काढलेल्या १८३ धावांचा उल्लेख करणें अवश्य आहे. धांवा काढणें, स्लिपमध्यें चेंडू पकडणें, यामध्यें प्रावीण्य व पथकाच्या अग्रणीच्या अंगीं असावे लागणारे गुण त्यांच्या अंगीं प्रामुख्यानें होते. कितीही बिकट प्रसंग आला तरी भीतिवश न होतां, धडाडीनें आपल्या बाजूची योग्य मांडणी करून कित्येक वेळां त्यांनीं खेळाचा रंग पार बदलून यश मिळविलें.

या रा. रा. पै यांच्या हिंदु क्रिकेटमध्यें उत्क्रांति घडवून आणण्याच्या कामगिरीबद्दल व जिमखान्याच्या आजपर्यंत केलेल्या सेवेबद्दल मुंबई येथील पी. जे. हिंदु जिमखान्यानें एक खास जनरल सभा ता. २४ ऑगस्ट १९३५ रोजीं भरविली व तींत त्यांस जिमखान्याचें "सन्मान्य सभासदत्त्व" बहाल केलें ही गोष्ट यथायोग्यच झाली. यापूर्वी हा मान सुप्रसिद्ध पालवणकर ब्रदर्स बाळू व शिवराम या दोघांसच मिळालेला होता. या सन्मानाबद्दल रा. रा. मुकुंदराव पै यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

* * *

चर्नीरोडवरील सर हरकिसनदास नरोत्तमदास हॉस्पिटलमध्यें काम करीत असलेल्या नर्स कुमारी **अहिल्याबाई सखाराम पंडित** यांची त्या हॉस्पिटलमध्यें मेट्रनच्या जागीं ता. ९–८–३५ पासून नेमणूक झाली, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं त्या हॉस्पिटलच्या रुग्ण लोकांकडून एक सभा शेठ गोवर्धनदास भगवानदास नरोत्तमदास यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. त्या वेळीं 'भगिनी'-पदाला शोभा आणणाऱ्या निःस्वार्थदया व शिस्त या गुणांचा कुमारी पंडित यांच्या ठिकाणीं कसा पूर्णपणें विकास झालेला आहे, याचें निरनिराळ्या वक्त्यांनीं दिग्दर्शन केलें; व 'मेट्रन'पदाला (परिचर्याविभागाच्या मुख्य अधिकाराच्या जागेला ) त्या कशा सर्वथैव पात्र आहेत तें त्यांनीं वर्णन करून सांगितलें. अध्यक्षांनींही हिंदु स्त्रीला मोठ्या हॉस्पिटलमध्यें हा मान मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे असें सांगून, रुग्णजनांतर्फें कुमारी पंडित यांस रुपेरी पुष्पपात्र व तसबिरीची चौकट अर्पण केली.

कुमारी पंडित यांची वरील हॉस्पिटलमध्यें 'रुग्ण भगिनी'-नर्स ( Sister ) म्हणून १९३० सालीं नेमणूक झाली. त्यांचें वय हल्लीं ३० वर्षांचें आहे. एवढ्या अल्प वयांत व अल्प अवधींत आपली या थोर जागेबद्दल पात्रता प्रस्थापित करून, गुर्जर-समाजाकडून प्रशंसा मिळविली याबद्दल कुमारी पंडित अभिनंदनास सर्वथैव पात्र आहेत. रुग्ण-जनांचा विश्वास व कृतज्ञता संपादन करणें हें सोपें काम नाहीं. आपणा हिंदी स्त्रियांच्या अंगीं सहृदय नर्सचे गुण सहजासहजीं बाणत नाहींत, असा जनापवाद आहे. अगदीं किळसवाण्या रोग्यांपासून तो श्रीमंत खानदानी रोग्यांपर्यंत सर्वांचा समावेश हॉस्पिटलांत होतो. परंतु परिचर्येंत उच्चनीचत्त्वाचा भाव न ठेवतां, आपल्या वांट्यास आलेलें काम आळस व किळस यांचा स्पर्श लागूं न देतां दयार्द्र अंतःकरणानें केलें तर दुःखित व दीन झालेल्या रोग्याचे कृतज्ञतापूर्वक मिळालेले आशीर्वाद इहपरलोकीं कल्याणकारी असतात, हें तत्त्व फारच थोड्यांच्या मनांत वागतें. पगार मिळविण्यासाठीं

जेवढें काम केल्याशिवाय भागत नाहीं, तेवढेंच जेमतेम करून मोकळें होणें एवढीच जणूं काय इति कर्तव्यता असें समजणारे पुरुषवर्गांत काय किंवा स्त्रीवर्गांत काय फार मिळतील. आपलें काम कर्तव्यतेच्या जाणीवेनें करावयाचें असतें. त्याबरोबरच जितकी गति त्या कामांत मिळेल, तितकी मिळवावयाची असते. वरवर ज्ञान मिळवून 'ताकापुरतें रामायण' केल्यानें ना आत्महित, ना समाजहित, ना देशहित, कांहींच साधत नाहीं. या दृष्टीनें कुमारी पंडित यांचें वर्तन स्वकीय युवयुवतींना आदर्शवत् होईल अशी आम्हांस आशा आहे. कुमारी पंडित या **सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या** माजी विद्यार्थिनी असल्यामुळें, त्या संस्थेसही गोष्ट भूषणीभूत आहे.

* ÷ *

## उच्च शिक्षणासाठीं परदेशीं प्रयाण

पुणें येथील हुजूरपागेंतील हायस्कूल फॉर इंडिअन गर्ल्समधील अध्यापिका कुमारी **चंद्राबाई कर्नाटकी**, एम्. ए ; बी. टी. ह्या टी. डी. परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां मंगळवार ता. २० ऑगस्ट १९३५ रोजीं इटालियन कंपनीच्या कॉन्टेव्हेर्डे या आगबोटीनें विलायतेस गेल्या आहेत. त्यांचा जन्म १९०६ सालीं झाला. त्यांचें इंग्रजी शिक्षण हुजूरपागेच्या शाळेंत होऊन तेथून १९२२ सालीं त्या मुंबई-विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यापुढील शिक्षणासाठीं न्यू पूना कॉलेज (आतां सर परशुरामभाऊ कॉलेज) मध्यें दाखल झाल्या, व तेथून १९२६ मध्यें त्या बी. ए. परीक्षा सन्मानासह दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाल्या. १९२९ मध्यें त्यांनीं एम्. ए. व १९३४ मध्यें बी. टी. या परीक्षा दिल्या. १९२७ पासून त्यांनीं शिक्षणदानाच्या पेशास वाहून घेतलें आहे. प्रथम एक वर्ष प्रो. कर्वे यांच्या कन्याशाळेंत व त्यानंतर हुजूरपागेंत त्या अध्यापिकेचें काम करीत आहेत. गेलीं पांच वर्षें त्या मुंबई-विश्वविद्यालयाच्या प्रवेश-परीक्षेच्या परीक्षक आहेत. सुप्रसिद्ध साहित्यसेवक रा. रा. श्रीनिवास नारायण कर्नाटकी यांच्या चंद्राबाई या कन्या आहेत. लंडन येथील 'मरिआग्रे' या पाठशाळेंत अध्यापनशास्त्राचा उच्च अभ्यास करण्यासाठीं त्या आतां विलायतेस जात आहेत. पुणें सोडण्यापूर्वी गेले कांहीं दिवस तेथें त्यांचा जो जागजागीं सन्मान झाला तो त्यांच्या लोकप्रियतेचा निदर्शक आहे.

* * *

रा. रा. **नित्यानंद मंगेश वागळे** व रा. रा. **लक्ष्मीकांत माधवराव नाडकर्णी** हे आय्. सी. एस्. परीक्षेचा व अर्थशास्त्राचा विशेष अभ्यास करण्यासाठीं शनिवार ता. ७ सेप्टेंबर १९३५ रोजीं पी. ॲन्ड ओ. कंपनीच्या "रांची" या टपालच्या आगबोटीनें विलायतेस रवाना झाले. रा. वागळे हे यंदा मुंबई-विद्यापीठाच्या एम्. ए.च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले असून तींत त्यांनीं दोन शिष्यवृत्त्याही पटकावल्या आहेत. रा. नाडकर्णी हे विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षा पहिल्या वर्गांत पसार झाले असून यंदा बी. ए. च्या परीक्षेंत पहिले आले आहेत व तींत त्यांनीं दोन शिष्यवृत्त्या व एक पारितोषिक मिळविलें आहे.

* * *

डॉ. **नंदकिशोर गणेश गाडेकर**, एम्. बी., बी. एस्., हे केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या डिप्लोमा इन रेडिऑलॉजीचा अभ्यास करण्यासाठीं सोमवार ता. ९ सेप्टेंबर १९३५ रोजीं इटॅलियन कं.च्या "व्हिक्टोरिआ" आगबोटीनें विलायतेस रवाना झाले. गेलीं ४ वर्षें ते नागपूर येथें वैद्यकीय धंदा करीत होते.

* * *

सुप्रसिद्ध देशभक्त रा. रा. काकासाहेब कालेलकर यांचे जेष्ठ चिरंजीव **शंकरराव**, बी. ए, यांनींही

त्याच बोटीनें ऑक्स्फर्ड-विश्वविद्यालयांत भाषाशास्त्राचें अध्ययन करण्यासाठीं व बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठीं परदेशीं प्रयाण केलें.

* * *

रा. रा. **महेश्वर सदाशिव नाडकर्णी**, बी. ए., एल्‌एल्. बी. हे आय्. सी. एस्. व बारचा अभ्यास करण्यासाठीं शनिवार, ता. १४ सेप्टेंबर १९३५ रोजीं पी. ॲन्ड ओ. कंपनीच्या "मालोजा" या टपालच्या आगबोटीनें विलायतेस गेले.

* * *

वरील सर्व बंधु-भगिनी आपापला नियोजित अभ्यासक्रम यशस्वी रीतीनें पुरा करून सुरक्षितपणें स्वदेशीं परत येवोत असें आम्हीं इच्छितों.

## ज्ञाति-संस्थांचा परामर्ष

मुंबई येथील **सारस्वत कोऑपरेटिव बँकेचा** १९३४।३५ सालचा रिपोर्ट हल्लींच आमचे हातीं आला त्यावरून पुढील माहिती कळते. रिपोर्टाच्या सालीं सभासदांची संख्या ६९७ वरून ८८२ वर आली. संस्थेनें काढलेल्या ५००० भागांपैकीं ३००० भाग आतांपर्यंत खपले. बँकेचें व्यवहार्य भांडवल १,९९,१०० वरून २,७९,२०० वर गेलें. लोकांनीं निरनिराळ्या खात्यांत ठेवलेल्या ठेवी १,६१,५५० वरून २,३०,०६७ वर गेल्या. कर्जाच्या मागणीसाठीं आलेल्या अर्जांपैकीं १६८ अर्ज मंजूर होऊन १,०८,६२३ रु. कर्ज देण्यांत आलें; एकंदर कर्ज येणें १,१४,२०४ रु. आहे. परतफेडीची रक्कम १,२२,३३८ होती. ( १९३४ सालीं ही ५४,४८८ रु. होती. ) सरकारी व इतर रोख्यांत १,०८,४८४ रु. गुंतविले आहेत. संस्थेचा ढोबळ नफा ५३०३ वरून १०,२११ वर गेला व निव्वळ नफा ३१७८ वरून ५४३६ वर गेला. खर्चाची वाढ सुमारें २००० वरून ४५०० वर गेली. ठराविक हप्तेफेड करणारे कर्जदार ६३ होते. या वर्षीचा विशेष म्हणजे रिझर्व बँकेचे भाग विकत घेणें बँकेच्या सभासदांस सुलभ व्हावें म्हणून ६ टक्के भावानें दरएकास जास्तींत जास्त ५०० रु. अटींवर कर्जाऊ देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. ११५ सभासदांनीं या सवलतीचा फायदा घेतला. या व्यवस्थेबद्दल व्य. मं. अभिनंदनास पात्र आहे. डिव्हिडंडची शिफारस दरसालप्रमाणेंच आहे. वरील एकंदर आंकड्यावरून बँकेचें इतर कामही अभिनंदनीय आहे असेंच दिसून येईल.

१९२९ चा डिव्हिडंड ३१ डिसेंबर १९३७ पर्यंत सभासदांनीं वसूल न केल्यास बँकजमा होईल असा इशारा रिपोर्टांत आहे. यापूर्वींचा बँकजमा झालेलाच आहे. असे निद्रिस्त सभासद आणखी किती दिवस झोंपा घेणार तें कळत नाहीं. पैसा घेण्याच्या कामींही आळस ही केवढी आश्चर्याची गोष्ट !

इन्शुरन्स डिपार्टमेंटचा फायदा लोक घेत नाहींत असें व्य. मं. चें म्हणणें आहे. जास्त प्रसिद्धिची जरूरी दिसते. रिपोर्टाच्या कोऱ्या कव्हरावर माहिती दिली असती, तर बरेंच फुकट काम सहजीं झालें असतें.

वार्षिक सभेच्या दिवशीं संमेलनही भरविण्याची व्यवस्था असते. तीं त्रैमासिक भरविण्यांत येणार असून त्यांच्या तारखा १८ जानेवारी, १८ एप्रिल, १८ जुलै व १९ सप्टेंबर १९३६ ( ५ वाजतां ) अशा ठरविण्यांत आल्या आहेत. या संघटनानें विचारविनिमयास वाव मिळून बँकेची उपयुक्तता वाढविणाऱ्या कल्पना निघूं शकतील असा व्य. मं. प्रमाणें आम्हांसही भरंवसा वाटतो.

रावसाहेब **रघुनाथ श्रीपाद देशपांडे**, सुप्रसिद्ध इंजीनियर, व यशस्वी ग्रंथकार, यांनीं "Cheap and Healthy Homes" म्हणून हल्लींच प्रसिद्ध केलेलें एक पुस्तक आमच्या वाचण्यांत आलें. त्यावरून तळमजली व एकमजली सिमेंटचीं घरें

१,५०० रुपयांपासून बांधतां येतात असें दिसून येतें. यावरून सामान्य स्वज्ञातीयांसही मुंबईच्या आसपास आपलीं स्वतःचीं घरें असण्याची हौस भागवून घेतां येणें शक्य दिसतें. रावसाहेब देशपांडे यांनीं स्वास्थ्याकडे न बघतां पुण्यास "सारस्वत ब्राह्मण कॉलनी" स्थापन करून स्वज्ञातीयांची ही स्तुत्य महत्त्वाकांक्षा तृप्त करतां येणें शक्य आहे हें आपल्या उदाहरणानें उत्तम रीतीनें प्रस्थापित केलें आहे. सारस्वत कोऑपरेटिव बँक, जातींतील नीःस्वार्थ इंजीनिअर्स व कॉंट्रॅक्टर्स व महत्त्वाकांक्षी सभासद, यांचा मिलाफ झाल्यास एक अभिमानास्पद दृश्य दिसल्यावांचून राहणार नाहीं अशी आम्हांस उमेद आहे.

मुंबईतील निरनिराळ्या मोठ्या बँकांत जबाबदारीच्या जागांवर अनेक वर्षें काम करून प्रत्यक्ष अनुभव घेतलेले तरुण व तडफदार गृहस्थ, रा. रा. वामन पुंडलिक वर्दे, बी. कॉम्., हे या बँकेला सुदैवानें अध्यक्ष लाभले असून, त्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेची उत्तरोत्तर भरभराट होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

* * *

माटुंगा येथील "**गौडसारस्वत ब्राह्मण कोऑपरेटिव हाउसिंग सोसायटी**"चा ता. ३० जून १८३५ रोजीं पुऱ्या होणाऱ्या वर्षाचा ( १५ महिन्यांचा ) रिपोर्ट नुक्ताच प्रसिद्ध झालेला आमचे पाहण्यांत आला. भाडेकऱ्यांना जास्त सवलती देण्यांत आल्या असूनही रिकाम्या राहिलेल्या खोल्यांची सरासरी गेल्या वर्षापक्षां शेंकडा ७ नीं जास्त—म्हणजे शें. २६ होती. याचें कारण सोसायटीच्या इमारतीच्या शेजारीं थोड्या भाड्याच्या व अधिक सोईचे माळे असलेल्या अनेक इमारती बांधण्यांत आल्या आहेत, व येत आहेत. यामुळें जमेची व खर्चाची तोंडमिळवणी करणें दिवसेंदिवस कठीण होणार हें सरकारच्या नजरेस आणून सोसायटीच्या व्य. मं. नें सरकारच्या लोनवरील व्याज शेंकडा ४ घेण्यांत यावें व कर्ज परतफेडीची मुदत वीस वर्षांनीं वाढविण्यांत यावी अशी विनंती केली होती; परंतु वरील विनंतीस सरकारकडून नकारात्मक उत्तर मिळालें.

खेडेगांवांची ऊर्जितावस्था करण्याकडे अलीकडे सरकारचें लक्ष लागलेलें आहे. पण पूर्वीच ज्या संस्था उभारण्यांस सरकारनें अप्रत्यक्ष सहानुभूति दाखविली, त्यांच्या नाड्या, त्या संस्थांकडून कोणत्याही तऱ्हेचा हलगर्जीपणा न होतां, आंखडत आल्या असतां थोडीशी झीज सोसून त्यांना हातभार लावणें व जिवंत राहण्यास मदत करणें हें सरकारचें कर्तव्य नाहीं काय? "कोऑपरेशन"च्या तत्त्वाला उचलून धरण्यासाठीं ज्या सरकारला एकेकाळीं उमेद वाटत होती त्याच सरकारनें आतां अशा उभारल्या गेलेल्या संस्थांना सहानुभूति दाखविणें योग्य ठरत नाहीं काय ?

इतरही कोऑपरेटिव हाउसिंग सोसायट्यांना या अडचणी कदाचित् भासल्याशिवाय राहिल्या नसतील, व कोऑपरेटिव सोसायट्यांच्या सालोसाल भरणाऱ्या कान्फरन्समध्यें वरील प्रश्नांचा खल झाल्याशिवाय राहिला नसेल. याबद्दल रिपोर्टांत तरी कांहीं उल्लेख नाहीं. तो पुढील सालच्या रिपोर्टांत करावा अशी आमची सदर सोसायटीस सूचना आहे. सोसायटीच्या व्यं. मं. चा विचार, मिळकतीची व्यवस्था सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावी असें सरकारला सुचविण्यासाठीं, भागीदारांची मंजुरी घेण्याचा आहे. कोणत्याही रीतीनें आपली जबाबदारी सरकार टाळूं पाहत असल्यास सरकारच्या असल्या वर्तनाचें लोण कायदेकौन्सिलपर्यंत पोहोंचवावें अशी आमची सूचना आहे.

इंम्प्रूवमेंट ट्रस्ट व बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी यांच्याकडूनही सवलती मिळविण्यासाठीं सोसायटीच्या

व्य. मं.नें प्रयत्न करावा असेंही या वर्षी पुनः आम्ही सुचवितों.

सरकारचे अजून दोन अडीज लाख रुपये तरी देणें असतील असें आम्हांस वाटतें. सोसायटीच्या इमारतींच्या तारणावर एवढी रक्कम शेंकडा ४ दरानें देणारे धनिक गृहस्थ कोणी निघतील तर प्रयत्न करून पाहण्याची व्य. मं. स आमची सूचना आहे.

× × ×

मुंबईच्या "चिकित्सक समूहा"नें आपल्या हायस्कूलच्या इमारतफंडासाठीं एक विनंतीपत्रक काढल्याचें आमच्या नुकतेंच पाहण्यांत आलें. या हायस्कुलास एक प्रायमरी ( प्राथमिक ) शाळा जोडलेली असून ती कै. वासुदेव मोरेश्वर पोतदार यांच्या नांवाजलेल्या शाळेचें पुनरुज्जीवित स्वरूप होय व तिच्यावरच पुढें हायस्कूलची उभारणी झाली.

हल्लीं हायस्कूल व प्राथमिक शाळा यांत अनुक्रमें ६०० व १५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुमारें १०० मुली शिकत आहेत. शिक्षक अनुभवी व विद्वान आहेत. सरकार व युनिव्हर्सिटी यांस या शाळा मान्य झालेल्या आहेत. परंतु त्यांच्याकडून मिळणारी ग्रँट पुरेशी नसल्यामुळें वरील संस्थेस झीज सोसून ह्या शाळा चालवाव्या लागत आहेत.

कै. दानशूर **विष्णुपंत जनार्दन शिरोळकर** यांनीं शाळेच्या इमारतीसाठीं **एक लाख** रुपयांची देणगी आपल्या मृत्युपत्रानें ठेविली होती. ती रक्कम हल्लींच संस्थेच्या हातीं आली असून तिचा गिरगांवांत जागा घेण्याकडे उपयोग करण्यांत आला. परंतु तीवर इमारत उभी करण्याचा प्रश्न राहिलाचा यासाठीं वरील संस्थेस हें विनंतीपत्रक काढण्याचें कारण पडलें.

कै. शिरोळकरांच्या स्तुत्य देणगीमुळें हायस्कूलला त्यांचें नांव देण्याचें संस्थेनें ठरविलें आहे हें योग्यच होय. ते बरींच वर्षें संस्थेच्या व्यवस्थापक मंडळांत होते व संस्थेच्या अडचणींची जाणीव सक्रिय सहानुभूतीनें त्यांनीं दर्शविली याबद्दल संस्थेनेंही कृतज्ञता व्यक्त करणें, व ती वरील स्वरूपांत हें उभयपक्षीं अभिनंदनीय होय.

इमारतीच्या कामासाठीं संस्थेकडे आतां तिचा ३०००० रुपयांचा रिझर्व फंड एवढाच काय तो शिल्लक आहे. त्यांत हायस्कूल व प्राथमिक स्कूल यांचा समावेश होण्यासारखी प्रशस्त इमारत होणें शक्य नाहीं हें उघड आहे. चालकांच्या दृष्टीनें या कामास आणखी सवा लाख रुपये तरी लागतील असा अजमास आहे. शाळेचें सभागृह अगर निरनिराळ्या खोल्या यांसाठीं लागणाऱ्या रकमा ज्यांकडून येतील, त्यांस, त्यांची इच्छा असल्यास, त्यांचीं नांवें त्या त्या खोलीसाठीं देण्यांत येतील असें चालक मंडळीनें ठरविलें आहे.

मुंबईत ज्या अनेक शिक्षणसंस्था आहेत त्यांत वरील हायस्कूलनें बरेंच वरचें स्थान पटकावलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा संस्थेच्या कार्यास हातभार लावणें धनिकांचें कर्तव्य आहे. ज्या संस्थेनें हें प्रायमरी स्कूल तीस वर्षें व हायस्कूल सुमारें वीस वर्षें उत्तम प्रकारें चालवून शिक्षणप्रसाराचें लोकोपयुक्त कार्य झीज सोसून केलें, तिच्या कर्तबगारीसंबंधानें आणखी निराळी शिफारस पाहिजे असें नाहीं. हायस्कूलचे प्रिन्सिपॉल इंग्लंडांतील शिक्षणविषयक सनद घेऊन आलेले आहेत. शिवाय शिक्षकवर्गांत अनेक नामांकित पदवीधरांचा समावेश होतो. या सर्वांचा परिणाम म्यट्रिक्युलेशन परिक्षेंत पास होणाऱ्या व वरचे नंबर पटकावून स्कॉलरशिपा वगैरे मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येवरून दिसून येतो.

सदाशिवगल्लीसारख्या गिरगांवांतील मध्यवस्तींत हायस्कूलसाठीं जागा मिळाली हें चांगलें झालें.

स्थानिक लोक याचा भरपूर फायदा घेतील अशी आम्हांस उमेद आहे. तत्पूर्वी इमारतीस लागणारी रक्कम धनिक लोकांनीं सढळ हातानें पुरवावी अशी आमची त्यांस कळकळीची शिफारस आहे. वरील संस्था कायद्यान्वयें सरकारांत रजिस्टर झालेली असल्यामुळें तिच्या व्यवस्थेसंबंधें कोणासच साशंक राहण्याचें कारण नाहीं. शिवाय संस्थेच्या व्यवस्थेचे रिपोर्ट सालोसाल निघतात, त्यावरून तिच्या कामासंबंधीं व सांपत्तिक स्थितीसंबंधीं माहिती मिळतेच. जातां जातां या शाळांच्या चालकांस एक दोन सूचना कराव्या असें आम्हांस वाटतें.

हल्लीं मुलांमुलींत शिस्त अगदींच मोडत चाललेली दिसते. कोणतीही शिस्त अगदीं लहान मुलांमुलींत जितकी सहज रीत्या बाणते, तितकी वयांत आलेल्याच्या अंगीं बाणत नाहीं. संस्थेनें प्राथमिक शिक्षणाचीही सोय केलेली आहे; त्या अर्थी कोवळ्या वयाचीं मुलें तेथें येत असलीं पाहिजेत. शाळेंत शिस्त विशेष काय लावतां येणार ! हें काम विशेषतः आईबापांचें; पण त्यांतल्या त्यांत वेळेवर शाळेंत येणें, लिहून आणण्याचे धडे टापटीपीनें लिहून आणणें, अक्षर वळणदार लिहिणें इत्यादि गोष्टीकडे शिक्षकांनीं लक्ष पुरवितां येईल. ज्या मुलांना लहानपणीं जास्त शिस्त लाभली, तीं पुढें नामांकित माणसें झाल्याचीं उदाहरणें आहेत; यासाठीं सदर शाळेंतील शिक्षकाच्या मनावर ही गोष्ट बिंबवावी व ज्या शिक्षकाच्या वर्गांत इकडे लक्ष दिलें जातें असें दिसून येईल, त्या शिक्षकांस उत्तेजन द्यावें.

दुसरें, हायस्कूलच्या खालच्या वर्गांत ड्राईंग व सुतारकाम हे विषय आवश्यक ठेवावे. सर्व प्रकारच्या धंद्यास हे दोन विषय आधारभूत आहेत. त्यांच्या ज्ञानानें जशी त्याची ग्राहकशक्ति असेल, त्याप्रमाणें लहानापासून मोठीं कामें पार पाडतां येतात. म्हणून या विषयांतील ज्ञानाचें बीज लहान वयांत पेरलें जाणें अवश्य आहे. तसेंच वरच्या वर्गांत टाइपरायटिंग, शॉर्टहँड व अकाउन्टन्सी यांचें त्रोटक ज्ञान देण्याची व्यवस्था केल्यास हायस्कूल फार लोकप्रिय होईल असें आम्हांस वाटतें. शिवाय विद्यार्थ्यांचें फारच हित होईल हे निराळें. सीनियर केंब्रिजपरिक्षेसाठींही क्लास उघडावा. या सूचनांचा चालक मंडळ विचार करील अशी आम्हांस उमेद आहे.

संस्थेचे अध्यक्ष रा. रा. शांताराम आत्माराम सबनीस, सॉलिसिटर, हे असून चिटणीस रा. रा. सदानंद लक्ष्मण कापडी व रा. रा. धोंडनाथ काशीनाथ रेगे व शाळेचे प्रिन्सिपॉल रा. रा. वसंतराव रामचंद्र नेरूरकर हे आहेत. संस्थेचा पत्ता नं. १७३, गिरगांव रोड, मुंबई, नं. ४ असा आहे.

* * *

**गौड-सारस्वत समाज, शहापूर-बेळगांवः**— ता. २०-८-१९३५ रविवारीं सायंकाळीं ५॥ वा. शहापूर येथील मारुतीच्या देवालयांत या समाजाच्या कार्यकारी मंडळाची सभा श्री. बाबूराव अनंत भट यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस रा. वामनराव खोत, रा. कृष्णराव बडसकर, रा. वसंतराव कबे, रा. हरिभाऊ सराफ, रा. मंगेशराव केशकामत, रा. गोपाळराव सराफ, रा. अनंतराव नाईक हे हजर होते. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यासंबंधीं कांहीं अर्ज आले होते, त्यांचा विचार करण्यांत आला. डॉ. व्ही. आर. गिंडे हे एम्. आर. सी. पी. ची परीक्षा पास झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्याचा ठराव पास झाला. यानंतर रा. वसंतराव कबे यानीं, रा. घोटगे वकील यांच्या म्यु. निवडणुकींतील यशाबद्दल अभिनंदनाचा ठराव पुढें आणला होता. पण बऱ्याच चर्चेनंतर वेळच्या अभावीं तो तहकूब करण्यांत आला आहे. याशिवाय कै. रा. ब. विष्णुपंत परुळकर यांच्या निधनानिमित्त दुखवट्याचा ठराव पास झाला.

## सारस्वत दिनवत्सल संघ

### स्तुत्य देणग्या

कै. वा. माणिकराव एकनाथ मुळगांवकर, जे.पी. यांचे चिरंजीव रा. रा.बाळकृष्णपंत, बी. ए. एल् एल्. बी. व रा. रा. एकनाथपंत यांनीं आपल्या दिवंगत पित्याचे स्मणार्थ रु. १००० चे सरकारी रोखे संघास दिले आहेत. कै. वा. माणिकराव संघाचे एक ट्रस्टी होते. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या चिरंजीवांनीं संघाबद्दल व्यक्त केलेलें प्रेम व कळकळ यांबद्दल संघाचा चालक वर्ग त्यांचा फार ऋणी आहे.

२ श्री. वामनराव शांताराम दाभोळकर, सॉलिसिटर यांनीं प. वा. शिरोळकर यांनीं सा. वि. स. मंडळी व सा. दी. संघ या संस्थांस दिलेल्या देणग्या हायकोर्टमार्फत मे. ॲडमिनिस्ट्रेटर जनरलकडून मिळविण्याचे कामीं बहुमुल्य मदत केली होती. त्यांस हायकोर्टाकडून खर्चासाठीं मिळालेल्या रकमेंतून स्टँप बॅरिस्टर वगैरे कामांसाठीं खर्च झालेली रक्कम वजा करून बाकी राहिलेली रक्कम रु. ८६८-४-० मे. दाभोलकर जेष्ठाराम आणि कंपनीनें संघास देणगीदाखल दिली आहे. या शिवाय संघाकडून त्यांनां खर्चाबद्दल मिळावयाची रक्कम सुमारें सवादोनशें हीही त्यांनीं उदारपणानें सोडून दिली आहे. शिरोळकरांची देणगी मिळविण्याचे कामीं संघास कोर्टाची पायरी चढावी लागली. परंतु श्री. दाभोळकरांचे कृपेनें एक पैशाचाही खर्च न होतां उलट साडेआठशें रुपये देणगी मिळाली हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

३ श्री. सौ. लक्ष्मीबाई भांडारकर यांनीं आपले परलोकवासी वडील श्री. गणेश भिकाजी गुंजीकर यांचें स्मारक करण्यासाठीं रु. दोनशें संघास दिले आहेत.

या उदार देणग्यांबद्दल संघाचे चालक वरील दात्यांचे आभारी आहेत.

## संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद

### [९ वें अधिवेशन]

व

### कला कौशल्याचें प्रदर्शन

मुंबई येथें येत्या दिवाळींत ता. २६ आक्टोबर १९३५ रोजीं मुझफरआबाद हॉल, ग्रँटरोड येथें भरणार आहे.

फुरसतीच्या वेळांत घराला शोभा देणाऱ्या किंवा संसाराला उपयोगी पडणाऱ्या वस्तू तयार करण्याची आवड ज्ञातिसमाजांत जास्त प्रमाणांत उत्पन्न व्हावी, तसेंच पुस्तकी शिक्षणाला कला व घरगुती धंदे यांची जोड मिळावी, हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. प्रदर्शनांत ठेवण्यांत येणाऱ्या वस्तूंचें पेंटिंग, शिल्पशास्त्र, फोटोग्राफी, कोरींवकाम, घरगुती धंदे, शिवणकाम, विणकाम, कशिदा, रांगोळी व पाकशास्त्र असे विभाग करण्यांत येणार असून सोळा वर्षांखालील मुलामुलींनीं तयार केलेल्या वस्तूंचा एक स्वतंत्र विभाग ठेवण्यांत येईल. प्रदर्शनांत कामें ठेवण्यांस प्रवेश फी नाहीं.

या प्रदर्शनाचीं व्यवस्था करण्यासाठीं परिषदेच्या स्वागत मंडळानें एक स्वतंत्र कमिटी नेमलेली असून तिचे कार्यवाहक पुढीलप्रमाणें आहेत.

अध्यक्षः

सौ. शांताबाई पाटकर, J. P.

उपाध्यक्षः

डॉ.सौ. मालिनीबाई सुखटणकर, M.B.,B.S

सौ.नलिनीबाई दळवी, B. A., J. P.

सौ. कमळाबाई डोंगरकेरी.

सौ. लक्ष्मीबाई परूळकर.

सन्मान्य चिटणीसः

**सौ. पद्माबाई माडगांवकर.**

**सौ. सीताबाई पडबिद्री.**

**कु. माणिक राजाध्यक्ष** G. D. Art. (Painting )

**श्री वसंत र. तळवडेकर,** A.M.

**श्री. अनंत आ. भोंसुले,** G. D. Art. (Painting)

**श्री. वामन पु. वर्दे,** B. Com,

असें प्रदर्शन भरविणें हें कार्य फार खर्चाचें व मेहनतीचें असून त्याला यश येणें हें सर्वस्वी स्वज्ञातीय बंधुभगिनींच्या सक्रिय सहानुभूतिवर अवलंबून आहे. यासाठीं प्रदर्शनाचे व्यवस्थापक मंडळ खालील प्रमाणें मदतीची अपेक्षा करीत आहेः—

(१) निरनिराळ्या विभागासाठीं वस्तू तयार करून पाठविणें व आपल्या स्वज्ञातीय मित्रास व आप्तेष्टांस पाठविण्यास उत्तेजन देणें.

( २ ) प्रदर्शनाच्या खर्चासाठीं, तसेंच पदकें व व बक्षिसें देण्यासाठीं देणग्या देणें व आप्तेष्टांकडून मिळविणें. कोणत्याही एका विभागाकरितां अगर कोणाच्याही नांवें पदक ठेवणें असल्यास सुवर्ण पदकासाठीं कमीतकमी रु. २५ व रौप्य पदकासाठीं रु. १५ देणगी ठरविण्यांत आली आहे.

( ३ ) प्रदर्शन सुव्यवस्थितपणें पार पाडण्यासाठीं स्वयंसेवक व स्वयंसेविकांचे काम पत्करणें. स्वयंसेवकाचें काम स्वीकारणाऱ्या बंधुभगिनींचीं नांवें १५ सप्टेंबर पासून सायंकाळीं ५ ते ८ वाजेपर्यंत परिषदेच्या कचेरींत [ सारस्वत ब्राह्मण समाज, चर्नी रोड ] नोंदण्यांत येतील.

( ४ ) प्रदर्शन चालू असलेल्या मुदतींत प्रत्येक दिवशीं थोडा वेळ करमणूकीचा कांहींतरी कार्यक्रम ठेवण्याचा विचार आहे. गायन, पेटी, सतार, तबला, मुरलीवादन, जलतरंग, गरबा, नाच, नकला वगैरे वगैरे करमणूकीच्या कार्यक्रमांत ज्या बंधुभगिनींना भाग घेण्याची इच्छा असेल त्यांनीं चिटणीसानां १५ ऑक्टोबरच्या आंत तसें कळविलें असतां कार्यक्रम ठरविण्यास सोईवार होईल. या विभागांतही प्राविण्यादाखल पदकें व बक्षिसें देण्याची व्यवस्था केली जाईल.

हें प्रदर्शन सुमारें दहा दिवस उघडें ठेवण्यांत येईल व प्रदर्शनासाठीं पाठविण्याच्या वस्तूंचा तक्ता १५ ऑक्टोबरपर्यंत पाठवावयाचा असून प्रदर्शनासाठीं वस्तू पाठविणें त्या तारीख २१ व २२ ऑक्टोबर रोजीं पाठविल्या पाहिजेत. प्रदर्शनासंबंधीं नियमांचें पुस्तक खालील पत्त्यावर मोफत मिळेल. अधिक माहिती पाहिजे असल्यास रविवार व सुटीचे दिवस खेरीज करून दररोज सकाळीं ८॥ ते ९॥ सायंकाळीं ६ ते ८ पर्यंत समक्ष भेटण्याची विनंती आहे.

**सन्मान्य चिटणीस, प्रदर्शन मंडळ.**
सारस्वत ब्राह्मण समाज, चर्नी रोड,
गिरगांव, मुंबई.


# मंगेश ब्रदर्स

**यांचे**

## हातानें बनविलेले

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी (तिखट), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १
**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**
ब्रँच नं. २
**चिराबाजार, मार्केटमध्यें.**

# शोचनीय मृत्यु !

## कै० विठ्ठल अनंत सबनीस

सावंतवाडी हायस्कूल मधील तरुण शिक्षक व सावंतवाडी शहरांतील उत्साही व लोकप्रिय नागरिक श्री. विठ्ठलराव अनंत सबनीस; बी. ए., बी. टी. यांजवर निघृ॑ण काळानें झडप घालून ऐन पशति-शीच्या भरांत त्यांना आतेष्टांमधून उचलून नेलें ही शोकजनक वार्ता मोठया कष्टानें आम्हांस नमूद करावी लागत आहे ! आपल्या निगर्वी, प्रेमळ व सरळ स्वभावामुळें विठ्ठलराव विद्यार्थीगणांना व शहरांतील भिन्नजातीय सर्व नागरिकांना सारखेच प्रिय झाले होते. कोणतेंही काम एक वेळ पतकरल्यावर तें चिकाटीनें पूर्ण करण्याबद्दल त्यांचा नेहमीं कटाक्ष असे. परंतु स्वतःच्या नांवाचा गाजावाजा किंवा बडेजाव व्हावा अशी मनीषा त्यांनीं कधींही धरली नाहीं.

शाळेंतील अध्यापकाचें काम चोखपणें संभाळूनही शिक्षणाशी संलग्न असलेल्या इतर उपयुक्त अनेक चळवळींत ते मोठया आस्थापूर्वक भाग घेत असत. व फावल्या वेळांत सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामेंही ते उत्साहानें करीत. परंतु अशा प्रकारचा निगर्वी, निरलस, प्रेमळ व उत्साही कार्यकर्ता सावंतवाडी शहरास फार काळ लाभूं नये अशी भवितव्यता होती! त्यांना दोषी तापाचा आजार होऊन तीन आठ-वडयांच्या मुदतींत त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. मानवी प्रयत्नांची शिकस्त होऊनही त्यांना यश आलें नाहीं व पश्चात वृद्ध मातुःश्री, तरुण पत्नी व दोन अर्भकें ठेवून ते गेल्या सपटंबर महिन्याच्या १० व्या तारखेस ते परलोकवासी झाले ! ! !

संस्थानांतील शिक्षणबोर्डाचे सेक्रेटरी, बॉयस्काऊट ॲसोसियेशनचे पुरस्कर्ते, हायस्कूलसंमेलनाचे सेक्रेटरी, दुय्यम शिक्षणपरिषदेचे सेक्रेटरी, इत्यादि कामे ते करीत होते.

कै. वा० विठ्ठलराव यांचा जन्म सावंतवाडी संस्थानांतील कोलगांव या गांवीं एका साधारणतः सुसपंन्न अशा सारस्वत ब्राह्मण कुटुंबांत झाला. ते चिकित्सकसमूह हायस्कुलांतून मॅट्रिकची परिक्षा पास झाले. उच्च शिक्षणासाठीं विलसन कॉलेजमध्यें त्यांनीं प्रवेश केला, व त्या ठिकाणी यथाक्रम बी. ए.पर्यंत शिक्षणक्रम पुरा झाल्यावर त्यांनीं सावंतवाडी हाय-स्कूलमध्यें शिक्षणाची जागा पतकरली त्यांची प्रकृति फारशी कणखर कधींही नव्हती, व अध्यापनाच्या धंद्याबद्दल त्यांना विशेष आवड व आस्था होती. यामुळें आपलें कार्यक्षेत्र त्यांनीं स्वतःच्याच गांवीं ठरविलें. नोकरींत असतांनांच बी. टी.चा शिक्षणक्रम पूर्ण करून सन १९३२ सालीं विठ्ठलराव बी. टी. उत्तीर्ण झाले. शिकविण्याची उत्कृष्ट हातोटी, कर्तव्य-तत्परता व वर्गामध्यें स्वतःबद्दल आदर व प्रेम उत्पन्न करण्यास लागणारे आवश्यक गुण यांच्या योगानें स्वीकृत पेशामध्यें यांनीं जसें उत्कृष्ट यश मिळविलें, तसेंच अल्प अवधींत त्यांच्या अंगच्या गुणांची प्रचीति वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस आल्यामुळें पुढील बढतीचा मार्ग त्यांना सुकर झालेला होता. थोडयाच वर्षांच्या नोकरीनंतर त्यांस फर्स्ट असि-स्टंटची जागा मिळाली होती; परंतु विधिघटना निराळीच होती !




वर्ष १४ वें | सप्टेंबर-ऑक्टोबर १९३५ | अंक ५ वा

हिज मास्टर्स व्हाइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व**

**ग्रामोफोन मशीन्स**

**मिळण्याचें एकच ठिकाण.**

ऑथॉराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

नवीन व कोऱ्या रेकार्डस्चा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2. and Published by S L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum. Bombay 4

Editor:—S. M. Varde, B.A., LL.B.

# धी इंडिया प्राव्हिडंट कंपनी लिमिटेड

**कलकत्ता**

**स्थापना १९१० ] लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर [ सरकारी सिक्युरिटी**

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमा-कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरिएंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स् पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—

भेटण्याची जागा व वेळः—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव,** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० (स्टॅ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
**माझगांव,** मुंबई नं. १०

# कामत आणि कंपनी

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमच्या दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर, सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाईकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

Phone No. 42476

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १४ वें | सप्टेंबर–आक्टोबर १९३५ | अंक ५ वा

## संयुक्त परिषदेचें नववें अधिवेशन

वरेच दिवस गाजत असलेलें संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेचें नववें अधिवेशन मुंबईत ता. २६।२७ २८ ऑक्टोबर रोजीं श्री. बाळकृष्ण सीताराम कामत, बी. ए., एम. एल. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडलें याबद्दल स्वागतमंडळ, परिषद् व प्रदर्शन यशस्वी करण्यासाठीं अविश्रांत श्रम करणारे परिषदेचे 'कामगार', व परिषदेच्या पुनरुत्थानाची कल्पना काढून निराशाजनक परिस्थितींतूनही तिला इतकें उज्ज्वल मूर्त स्वरूप देणारें सारस्वत ब्राह्मणसमाजाचें 'उपन्याप मंडळ' यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करितों. मुझफरावादहॉलसारखें तीन्हीं दिवस पुरेपूर भरलेलें प्रशस्त सभागृह, विषयनियामक मंडळांतील सभासदांची हजेरी, दुसऱ्या दिवशीं व्यवस्थितपणें झालेलें सहाशें सभासदांचें सहभोजन, हीं ज्यांनीं पाहिलीं असतील, व परिषदेमुळें दिवाळीची रजा कधीं संपली तें समजलेंसुद्धा नाहीं असे जमलेल्या प्रतिनिधींचे उद्गार ज्यांनीं ऐकिले असतील, त्यांना परिषदेच्या या सोहळ्याची यथार्थ कल्पना होईल.

परिषदेचें अधिवेशन अनेक दृष्टींनीं अपूर्व असेंच झालें. बारघरे, 'नरवणे,' सारस्वत व गौड इत्यादि सर्व पोटभेदांचे प्रतिनिधि उपस्थित होऊन त्यांनीं परिषदेंत एकीच्या तत्त्वाला मान्यता दिली. प्रतिनिधि म्हणून परिषदेंतील स्त्रियांची उपस्थिति हीही अपूर्व गोष्ट होती. तीनशेंवर स्वागतमंडळाचे सभासद व चारशेंपेक्षां जास्त प्रतिनिधि हेंही अपूर्वच ! पूर्वींच्या परिषदांत तरुणांच्या धडाडीपेक्षां पिकल्या केसांस विशेष महत्त्व दिलें जात असे असा आक्षेप होता. ही परिषद तरुणांचीच होती असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. मुंबई शहरांत स्वज्ञातींतील कलाकौशल्याचें एवढ्या मोठ्या प्रमाणावर भरलेलें प्रदर्शनही पहिलेंच. मुंबईत आपल्या ज्ञातीची वस्ती जशी मोठी तसे मतभेदही मोठे. म्हणून एकी-परिषेदेच्या जुन्या पुरस्कर्त्यांनीं मुंबईत परिषद् भरविण्याचें टाळलें होतें. वृद्धांना जें साधलें नाहीं, तें अठरा वर्षांनीं तरुणांनीं मिळविलें. परिषदेच्या यशस्वितेविषयीं साशंक असलेल्या अंतःकरणांस परिषदेचें वैभव पाहून धीर आला असेल, व निराशावाद्यांचा चेहराही उल्हासानें किंचित खुलला असेल.

परिषदेचे अध्यक्ष श्री. कामत जुन्या व नव्या कायदेमंडळाचे सभासद, शेतकीसारख्या कमिशनांचे सदस्य इत्यादि नात्यानें जवळ जवळ २५।३० वर्षें सार्वजनिक काम करीत आहेत. आतांपर्यंतच्या परिषदांच्या अध्यक्षांपैकीं श्री. के. नारायणराव वजा करून बाकी सर्व सरकारी किंवा संस्थानी नोकर होते. श्री. कामतांना अध्यक्ष निवडून ज्ञातिसंस्थांचा राष्ट्रीय भावनेशीं विरोध नाहीं असें परिषदेनें दाखवून दिलें; व ज्ञातिसंस्थांच्या संपर्कानें आपलें राष्ट्रीयत्व नष्ट होत नाहीं असें कामतांनीं सिद्ध केलें. राष्ट्रीय म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांनीं ज्ञातिसंस्थांपासून चार पावलें दूर राहिलें पाहिजे, असें मानणाऱ्यांच्या

आक्षेपांस अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत दिलेलें मुद्देसूद उत्तर मननीय आहे.

पूर्वींच्या अध्यक्षांच्या भाषणाहून कामतांचें भाषण थोडेंसें निराळ्या प्रकारचें आहे. पूर्वी परिषदेचें धोरण चढाईचें असल्यामुळें अध्यक्षीय भाषणाचा बराचसा भाग बेकीच्या खंडनार्थ व एकीच्या समर्थनार्थ खर्च होत असे. ती आवश्यकता आतां राहिलेली नाहीं.अठरा वर्षांच्या दीर्घ कालांत आपल्या सामाजिक विषयांबद्दलच्या कल्पनाही बदलल्या आहेत. शिवाय नुसतीं विद्वत्तापूर्ण भाषणें सांप्रत काळीं लोकप्रिय होत नाहींत; पुढाऱ्यांनीं कार्याची दिशा दाखवून व्यवहार्य सूचना कराव्या अशी अपेक्षा लोक करीत असतात. या दृष्टीनें अध्यक्षांनीं काढलेला गेल्या दीड तपांत झालेल्या ज्ञातीच्या प्रगतीचा आढावा वाचनीय आहे.विशेषतः १९३१ च्या सेन्सस रिपोर्टांतील गौड सारस्वतांच्या साक्षरतेसंबंधीं घेतलेला उतारा पुष्कळांना विचारांत पाडील.

आपल्या भाषणांत अध्यक्षांनीं ज्या सूचना केल्या, त्यांपैकीं स्त्रियांना सभासदत्वाचे अधिकार देण्याच्या व घटनादुरुस्तीविषयींच्या सूचनांची परिषदेनें अंमलबजावणी केलीच आहे. स्त्रियांना मताधिकार देण्याच्या प्रश्नावर मतभेदाला जागाच नव्हती. स्टँडिंग कमिटीही निवडण्यांत आली आहे. घटना व कमिटी या सर्वस्वी दोषरहित नसल्या, तरी कार्यकर्त्यांस त्यांपासून पुष्कळ कार्य करून घेतां येईल. प्रचलित सामाजिक प्रश्नांवरील आपलीं मतें अध्यक्षांनीं स्पष्ट बोलून दाखविलीं, याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांतील बरेचसे प्रश्न सर्व हिंदु समाजास लागू होणारे असले, तरी परिषदेनें त्यांबद्दल मत देणें योग्य ठरलें असतें. परंतु घटनादुरुस्तीविषयक प्रश्नांनीं बराचसा वेळ खाल्ल्यामुळें इतर विषयांचा विचार करणें परिषदेस शक्य नव्हतें.

आपल्या भाषणाचें सार म्हणून अध्यक्षांनीं तरुणांना उपदेशाचे चारदोन आडाखे सांगितले, त्यांपैकीं पहिला आडाखा असा कीं, " स्वावलंबी होईपर्यंत चतुर्भुज होऊं नये, पंचविशी उलटली, तरी थोडी कळ सोसावी." हा उपदेश करितांना आपण १९३४ सालांत आहों हें विसरून १९१३ सालांत कारवार-परिषदेपुढे भाषण करीत आहों असें अध्यक्षांस वाटत असावें असा आम्हांस संशय येतो. नाहीं तर सांप्रत वरील उपदेश अप्रस्तुत आहे हें त्यांस दिसलें असतें. आजचे तरुण विवाहबद्ध व्हावयास अतिशय नाखुष असतात. त्यांस नवरदेव बनवावयास हुंड्याचा फार मोठा नैवेद्य द्यावा लागतो अशी मुलींच्या पालकांची तक्रार आहे. सांप्रतच्या तरुणांची विवाहसौख्य व तदनुषंगिक राहणी याबद्दलची कल्पना इतकी मोठी आहे कीं, पूर्वींच्या दोन पिढ्यांनीं ज्या उत्पन्नांत ८।१० माणसांचें कुटुंब पोसलें, तें उत्पन्न आज दोन माणसांस अपुरें वाटतें. तरुणांची सुखलालसा व त्यांचें उत्पन्न यांचें व्यस्त प्रमाण असल्यामुळें अविवाहित स्थिति त्यास पत्करावी लागते. म्हणून चतुर्भुज होऊं नका असल्या उपदेशाऐवजीं स्वावलंबी कसें व्हावें याबद्दल जर चारदोन व्यावहारिक सूचना राजकार्यधुरंधर व अनुभवी अध्यक्षांकडून झाल्या असत्या, तर तरुणांनीं त्यांचा साभार स्वीकार केला असता. इतकेंच नव्हे, तर बेकारीवर उपाययोजना सुचविण्याविषयींचा ठराव विषयनियामक कमिटींत एका तरुणानें आणिला असतां व्यवहारज्ञ अध्यक्षांसुद्धा एकाही सभासदाला त्याबद्दल कांहींही सुचवितां आलें नाहीं,यावरून हा विषय किती कठीण आहे याची कोणासही कल्पना होईल. अशा स्थितींत साठी उलटलेल्या अध्यक्षांनीं " थोडी कळ सोसावी " अशा प्रकारचा उपदेश तरुणांस करणें हें त्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासारखें आहे असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

परदेशगमनाविषयींचाही आक्षेप असाच वस्तुस्थितीस सोडून आहे. गेल्या महायुद्धांत ज्या ज्या सारस्वत तरुणांस परदेशीं जावयाची संधि मिळाली, त्यांनीं–त्यांनीं तिचा फायदा घेतला. आजकाल विद्याभ्यासासाठीं परदेशीं जावयास किती तरी तरुण तयार आहेत; परंतु त्यांना संधिच मिळत नाहीं. घरकोंबडेपणाची संवय सारस्वतांस नाहीं. उलट देशावर जाऊन नशीब काढावें अशीच सारस्वतांची परंपरा आहे. जिवबादादा बक्षी,शंकर पांडुरंग पंडित, धर्मानंद कोसंबी, भवानीशंकर शास्त्री सुखटणकर, मूर्तिकार कामत, अशासारख्यांचीं किती तरी उदाहरणें या परंपरेला साक्षीभूत आहेत. अध्यक्षांनीं किंवा दुसऱ्या दयाळू सद्गृहस्थांनीं सारस्वत तरुणांना तशी संधिच आणून द्यावी. तिचा फायदा घ्यावयास हजारों तरुण बिनदिक्कत तयार होतील.

जी गोष्ट परदेशगमनाविषयींची, तीच गोष्ट धंदे-शिक्षणाविषयींची. ज्यांच्या हातीं आज धंदे आहेत, ते लोक स्वकीयांशिवाय दुसऱ्यांस त्यांत प्रवेश करूं देतच नाहींत. आणि कोणीं प्रवेश करून घेतला, तर हरतऱ्हेनें त्याला हुसकून लावतात असा कटु अनुभव ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला, त्यांस आला आहे. पांच पांच वर्षे कापसाच्या दलालाकडे उमेदवारी करूनही कांहीं न वळल्यामुळें कोठें तरी नोकरी पत्करावी लागल्याचे प्रसंग पुष्कळांवर आले आहेत. म्हणून अशा प्रकारचे धंदे करणारास किंवा त्यांचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्यांस ज्या व्यावहारिक अडचणी येतात, त्यांचा परिहार कसा व्हावा याविषयीं उपाय जर परिषदेनें सुचविले, तरच उपयोग.नाहीं तर उत्तम व्यापार व कनिष्ट नोकरी हें तत्त्व सर्वांसच समजतें.

शहरांतील राहणीच्या आवडीविषयीं अध्यक्षांनीं जें सांगितलें, तेंही चिंतनीय आहे. इतकेंच नाहीं, तर दिवसेंदिवस आमच्या लोकांना खेड्यांत राहणें अशक्य होत आहे. येथें आवडीनिवडीचा प्रश्न नसून शक्याशक्यतेचा प्रश्न आहे. खेड्यांत राहणाऱ्याला शेती-शिवाय दुसरें उदरनिर्वाहाचें साधन नाहीं.आणि शेती तर उत्तरोत्तर नुकसानीचा विषय होत आहे. शिवाय पूर्वींची राहाणी बदलल्यामुळें म्हणा, मुलांच्या विद्याभ्यासासाठीं म्हणा, किंबहुना एखाददुसऱ्या सारस्वत कुटुम्बानें खेड्यांत राहणें दिवसेंदिवस असुरक्षित होत असल्या-मुळें म्हणा, आमची इच्छा असो वा नसो, आम्हांला शहराचा आश्रय करावाच लागतो.हा आर्थिक कारणांचा परिणाम आहे. आवडीनिवडीचा नव्हे: आणि जोंपर्यंत तीं कारणें बदलत नाहींत, तोंपर्यंत "परत खेड्यांत जा" असा उपदेश फुकट आहे.

इतकें लिहिल्यावर आम्हांस हें कबूल केलें पाहिजे कीं, अध्यक्षांचें भाषण पूर्वग्रहांपासून मुक्त व स्पष्टोक्ति-पूर्ण झालें. गतवैभवाच्या वर्णनानें आपल्या जातीची थोरवी गावून ते स्वस्थ बसले नाहींत,तर आपलीं सामा-जिक व्यंगें दाखवून त्यांवर उपायही त्यांनीं सुचविले आहेत. भिक्षुकांचा समाजावरील पगडा,गतानुगतिकत्वा-मुळें लग्नमुंजीच्या प्रसंगीं आपण करीत असलेला अवास्तव खर्च, आपली साधारणत: खर्चिक राहणी यांबद्दल अध्यक्षांनीं प्रदर्शित केलेले विचार कृतींत आणले पाहिजेत. " अप्रियस्यापि पथ्यस्य वक्ता दुर्लभ: " या न्यायानें आपण अध्यक्षांचे आभार मानले पाहिजेत.

अध्यक्षांच्या सभानियंत्रणकौशल्याबद्दलही दोन शब्द लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं. परिषदांसारख्या मोठ्या सभांचा अध्यक्ष दृढनिश्चयी, समयज्ञ, हजर-जबाबी, तडफदार, sense of humour असलेला असा असावा लागतो. सभेंत उपस्थित होणाऱ्या तांत्रिक प्रश्नांचा त्यानें चटकन् निकाल केला पाहिजे. नाहीं तर गोंधळ उडतो. वरील सर्व गुण बाबासाहेबांकडे भरपूर आहेत, याबद्दल दुमत होणार नाहीं. सभेंत बोलणारे वक्ते पुष्कळ, व प्रत्येकास आपल्या मताचा अभिनिवेश; यांमुळें वक्त्यांचें तारतम्य पुष्कळदा चुकतें. अशा वेळीं त्याला गप्प करण्याचें कटुकर्तव्य सुलतानशाहीचा आरोप पत्करूनही अध्यक्षांस करावें लागतें. आणि वादविवादाची वेळ गेल्यावर त्याबद्दल कोणास कांहीं वाटत नाहीं.आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावणाऱ्या अध्यक्षास सुलतानशाहीचा आरोप टाळणें कठीण. अध्यक्षांनीं सभानियंत्रणाचें काम अत्यंत उत्तम रीतीनें केलें, म्हणूनच परिषदेचें काम ठराविक वेळांत उरकतां आलें. त्यांचे आभार मानते वेळीं सुकर्णधार म्हणून एका वक्त्यानें त्यांचा जो गौरव केला, तो अगदीं यथार्थ होता.

स्टँडिंग कमिटीच्या निवडणुकीसंबंधीं अध्यक्षां-वर करण्यांत आलेले आरोप निराधार आहेत. इतकेंच नाहीं,तर ज्या रीतीनें त्यांनीं तो प्रश्न सोडविला, त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीनें तो इतक्या थोडक्या वेळांत समाधानकारकपणें सुटला नसता. स्टँडिंग कमिटीचे सभासद छप्पन, व त्यांसाठीं सुच-विलेलीं नांवें पंचाऐशीं; परिषदेच्या नियमांत निवडणुक कोणत्या रीतीनें व्हावयाची, याबद्दल तजवीज केलेली नाहीं, किंवा कोणत्या केंद्राला किती प्रतिनिधि मिळा-वयाचे याबद्दलही कांहीं व्यवस्था नाहीं. अशा स्थितींत कोणाला वगळावयाचें व कोणाला ठेवावयाचें ? वगळ-लेला इसम आपला अपमान झाला म्हणून नाखुष झाला असता. उमेदवारांनीं स्वखुशीनें रिटायर व्हावें असें अध्य-क्षांनीं सुचविलें असतां उमेदवारांची संख्या कमी न

होतां वाढूं लागली. निवडणुकीची दुसरी पद्धत सुचवा असें अध्यक्षांनीं विचारिलें असतां कोणालाच ती सुचवितां आली नाहीं. उमेदवारांच्या नांवांची यादी प्रतिनिधींकडे होती. प्रत्येक उमेदवारासाठीं मतें घेऊन त्यांची मोजणी करणें झाल्यास परिषदेचें अधिवेशन एक दिवस लांबलें असतें, व त्या गोष्टीस कोणाचीच तयारी नव्हती. अशा स्थितींत चिठ्या टाकून एकोणतीस नांवें गाळलीं व बाकी राहिलेल्या नावांची यादी ठरावरूपानें परिषदेनें पास केली. अध्यक्षांनीं या बाबतींत जें जें केलें तें परिषदेचें मत घेऊन केलें. बेसनदशीर असें कांहीं केलें नाहीं. त्यांत वैगुण्य राहिलें असल्यास त्याचा दोष अध्यक्षांकडे नसून सर्व प्रतिनिधींकडे जातो. चिठ्या टाकून निवडणूक करण्याची पद्धति प्रातिनिधिक संस्थांत नाहीं असें नाहीं; मुंबई-म्युनिसिपालिटीनें डॉ. बाटलीवाला अध्यक्ष असतांना त्या पद्धतीचा अवलंब केला होता. याचा अर्थ असा नाहीं कीं, निवडणूक निर्दोष झाली. बाहेरगांवचे जास्त प्रतिनिधि स्टँडिंग कमिटींत आले पाहिजे होते. ही उणीव को-ऑप्शननें भरून काढण्याची तजवीज करण्यांत आली आहे. आमचें म्हणणें एवढेंच कीं, निवणुकींतील दोषाचें खापर अध्यक्षांच्या माथीं मारणें चूक आहे. प्राप्त परिस्थितींत त्यांनीं अवलंबिलेली पद्धति योग्य होती असेंच सर्व बाजूंनीं विचार करणारास म्हणावें लागेल.

परिषदेपासून फलनिष्पत्ति काय असा प्रश्न कोणी विचारील. प्रदर्शनानें व परिषदेनें मुंबईंत स्वज्ञातीच्या मंडळींत जागृती उत्पन्न केली यांत संशय नाहीं. सभासदांची हजिरी व ठरावांवर झालेलें मतप्रदर्शन, परिषद् व प्रदर्शन या कामीं निरनिराळ्या पोटभेदांतील बंधुभगिनींनीं एकमेकांशीं केलेलें सहकार्य व तीं यशस्वी होण्यासाठीं केलेले श्रम, यांवरून मुंबईतपुरतें तरी परिषदेचें सार्थक झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुंबईबाहेरील स्वज्ञातीयांनीं परिषदेविषयीं विशेष आस्था दाखविली नाहीं हें कबूल केलें पाहिजे. विशेषतः पुण्याला स्वज्ञातीचीं सुमारें दीडशें कुटुंबें आहेत, व अध्यक्षही पुणेकर आहेत. असें असतां पुण्याहून फक्त एक प्रतिनिधि परिषदेस यावे हें कशाचें निदर्शक आहे ? दिवाळीच्या सणांत आम्हीं घर सोडून कसें यावें, ही सबब दूरस्थ मंडळीस सोईची असली, तरी तिचा फायदा पुणेकरांस घेतां येणार नाहीं. कारण इच्छा असती, तर त्यांस अध्यक्षांप्रमाणें दिवाळी व परिषद् दोन्हीं साधतां आलीं असतीं. सारस्वत युनियनच्या इमारतीच्यासाठीं फंड जमविण्याच्या कामीं पुणेकर सारस्वतांस मुंबईवाल्यांच्या सहकार्याची जरूरी होती: परंतु परिषदेच्या कामीं मुंबईनें पुण्याच्या सहकार्याची अपेक्षा केली असतां तिला उपेक्षेचें उत्तर मिळालें. असो. परिषद् झाल्यानें परिषदेचें कार्य संपलें नाहीं. अध्यक्षांनीं म्हटल्याप्रमाणें त्याला नुकती सुरवात झाली आहे, आणि स्टँडिंग कमिटीनें आपल्या कार्यास बाहेरगांवीं प्रचार करण्यापासून सुरवात केली पाहिजे. सांप्रत काळीं कोणत्याही अल्पसंख्याक जनसमूहास आपलें अस्तित्व टिकवावयाचें असल्यास त्यानें संघटित झालें पाहिजे हें तत्त्व ज्या प्रमाणांत स्वज्ञातिबंधुभगिनींच्या गळीं उतरेल, त्या प्रमाणांत परिषदेच्या कार्यास उठाव येईल. आमच्या मंडळींची उपेक्षावृत्ति मावळो व परिषदेस उत्तरोत्तर सुयश मिळो अशी महाराष्ट्रसारस्वताची भगवंताला प्रार्थना आहे.

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद्-अधिवेशन नववें

## स्वागताध्यक्ष बॅ. विश्वनाथ गणपत दळवी यांचें भाषण

परिषदेच्या स्वागतमंडळातर्फे सर्वांचें स्वागत करून ते म्हणाले कीं,

या आपल्या परिषदेचें आठवें अधिवेशन अलिबाग येथें इ. स. १९१७ च्या एप्रिल महिन्यांत झालें. त्यानंतर अठरा वर्षांनीं हें अधिवेशन होत आहे. बेळगांवची पहिली संयुक्त परिषद् व त्यानंतरचीं सात अधिवेशनें भरविण्यांत ज्यांनीं पुढाकार घेतला, रूढीचें सीमोल्लंघन करून एकीची ध्वजा ज्यांनीं उभारली, त्या बहुतेक थोर व्यक्ति आज दिवंगत झाल्या आहेत. पूर्वीच्या परिषदांचें अध्यक्ष रा. ब. सदानंद त्र्यंबक भांडारे, रा. ब. गांगोली, दि. ब. कल्ले नारायणराव, रा. बाबासाहेब शिरगांवकर, श्री. कल्याणपूरकर, रा. ब. बळवंतराव वागळे, परिषदेचे केवळ प्राण असे श्रीमंत बाबासाहेब दाभोळकर, रा. ब. अच्युत भास्कर देसाई, या सर्वांनीं परिषदेसारख्या अमोल संस्थेची जोड आम्हांस दिली, व इहलोकींचें कर्तव्य पुरें करून या परिषदेच्या रूपानें आपल्या ह्यातींत स्वतःचें चिरस्मरणीय स्मारक उभारलें. त्यांची आठवण झाली–त्यांनीं स्वज्ञातीची व स्वदेशाची केलेली बहुविध सेवा आणि त्यांची ज्ञातिहिताची कळकळ या सर्व गोष्टींची आठवण झाली कीं, आज त्यांच्या उपदेशाला आपण मुकलों आहोंत या विचारानें मन व्याकुळ होतें.

आपले पूर्वज आर्यावर्ताच्या उत्तरेकडून दक्षिणेंत आल्यावर त्यांनीं कोंकण प्रांतांत नवीन मातृभूमि वसविली. कोंकण किनाऱ्यावरील आमच्या मातृभूमीइतकीच ही मुंबापुरी गौड-सारस्वतांना आधार देणारी प्रेमळ माता झाली आहे. पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं व इंग्रजी अंमलाच्या आरंभीं मुंबईच्या नागरिक कर्तव्यांत–गौड-सारस्वतांनीं भाग घेतला आणि इतर

### मुंबईकरांच्या बरोबरीनें या नगरीचें वैभव आणि महत्त्व वाढविण्यास मदत

केली. अव्वल इंग्रजींत राम कामतीनें मुंबईत सारस्वतांच्या वैभवाचा पाया घालून, वाळकेश्वराच्या देवळाची स्थापना केली. डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर, न्या. मू. काशीनाथपंत तेलंग, रा. नारायणराव दाभोळकर, सर नारायणराव चंदावरकर वगैरे व अगदीं अलीकडे श्री. बाबासाहेब दाभोळकर, रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले व त्यांचे चिरंजीव नारायणराव आदिकरून गौड सारस्वतांनीं मुंबापुरीच्या इतिहासांत आपलीं नांवें चिरस्मरणीय केलीं आहेत.

आपल्या ज्ञातीनें मुंबईत केलेल्या कामगिरीचा उल्लेख करतांना मला जितका अभिमान वाटतो, तितकाच किंबहुना त्याहूनही जास्त अभिमान मला आमच्या ज्ञातीनें या शहरांत आरंभापासून स्वीकारलेल्या उदार आणि उदात्त धोरणाचा उल्लेख करण्यास वाटत आहे. गौड सारस्वत ब्राह्मणांनीं जातीच्या दुरभिमानानें अन्य धर्मांच्या किंवा जातीच्या माणसांना या शहरांत विरोध केल्याचें एकही उदाहरण मिळणार नाहीं, हें सांगण्यास मला अत्यंत अभिमान वाटतो. आपल्या जातींत ज्या भेदभावना आहेत, त्यांची एकदोन प्रसंगीं जरी थोडीशी बाधा आपल्या ज्ञातिसमाजाला क्षणभर झाली, तरी अंतीं बंधुप्रेमाचाच विजय झाला. सुमारें अर्धशतकापूर्वी आमच्या देवालयांच्या बाबतींत आपसांतच थोडासा वाद झाला. त्यांत भेद-पोटभेदांच्या भांडणांचा संबंध नव्हता. गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील सर्व भेद व पोटभेद जे या परिषदेचे घटक आहेत, ते एका ज्ञातींचे आहेत हें कोर्टाच्या निकालानें ठरून गेलें. मंगळूर परिषदेनें जागृत केलेल्या भेद–पोटभेदांच्या भूताला बेळगांवांत गति देऊन, एकीकरणाचें कार्य सुलभ करण्यास कोर्टाच्या वरील ठरावाचा फारच उपयोग झाला. येथील सारस्वत ब्राह्मणसमाज, सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, सारस्वतः दीनवत्सल संघ वगैरे अनेक संस्थांनीं मुंबईकर गौडसारस्वतांचें हें बंधुप्रेमाचें ब्रीद बेळगांव-परिषदेच्याही पूर्वीपासून अखंड पाळिलें आहे. बंधुजनांत फूट पडून शिळ्या कढीला ऊत आणण्याचे प्रयत्न आर्यावर्ताला ललामभूत असलेल्या या मुंबापुरींत तरी कधींही टिकाव धरणार नाहींत.

इ. स. १९१६ त आपल्या परिषदेचें यामागील अधिवेशन अलीबागेस झालें. महायुद्धामुळें उत्पन्न

झालेली परिस्थिति हें त्या अधिवेशनानंतर परिषद बंद पडण्याचें एक प्रमुख कारण झालें असावें, असें दिसतें. महायुद्धानंतर स्वराज्याची आकांक्षा फलद्रूप होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. राष्ट्रीयत्वाच्या भावनेंत ज्ञातिभावनेचा लोप होणार असें कांहीं काळ वाटलें. परंतु आमच्या देशाच्या दुर्दैवानें त्या राष्ट्रीय भावनेचा परिपोष झाला नाहीं. धर्मभेद आणि जातिभेद यांचें महत्त्व कमी होण्याऐवजीं तें दिवसेंदिवस जास्त वाढत आहे. राजकीय, स्थानिक, आणि सार्वजनिक निवडणूकींत सरकारी आणि खासगी नोकऱ्यांत, फार काय पण

## देवी सरस्वतीच्या विद्यालयीन साम्राज्यांत देखील

धार्मिक आणि जातिविशिष्ट आकर्षणाचा जोर दिवसेंदिवस जास्त वाढत आहे.या शहरांतील सुशिक्षित वर्गांत आमचा भरणा फार मोठा असून, आमच्यापैकीं बहुतेकांचा नोकरीपेशा असल्यामुळें व जातीच्या धर्माच्या भेदांना महत्त्व आल्यामुळें आमच्या तरुणांना चरितार्थाच्या साधनांचीही दिवसें दिवस वाण पडत आहे. परिषदेमुळें सुरू झालेले परस्परांतील दळणवळण परिषदेच्या अभावीं अठरा वर्षें कमीं होत गेलें, आपल्यांतील भेद-पोटभेदांचे लहान लहान गट, तसेंच स्थानिक गट बनविण्याची प्रवृत्ति वाढूं लागली आहे. सर्वांना समान भासणाऱ्या अडचणींचा विचार करण्यासाठीं एकत्र जमण्याचा योग १८ वर्षांत आला नाहीं. आमच्या समाजांत परस्परांविषयीं अनास्था वाढत चालली आहे; व इतर अनेक समाजांनीं आपापली संघटना करून स्वतःचा फायदा करून घेण्याचे प्रयत्न चालविले आहेत या परिस्थितीचा आमच्या समाजावर फारच अनिष्ट परिणाम झाला व तो या शहरासारख्या जीवनकलहाची तीव्रता जास्त असलेल्या ठिकाणीं विशेष भासू लागला आहे; यामुळें परिषदेचें पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता गेल्या दोनतीन वर्षांत या शहरांतील निरनिराळ्या स्वज्ञातीय संस्थांत कामें करणाऱ्यांना भासूं लागली आणि त्यामुळेंच आजचें हें अधिवेशन भरत आहे.

प्रतिनिधिबांधव हो, हें आपल्या परिषदेचें मुंबईत पहिलेंच अधिवेशन आहे. आपल्या ज्ञातिसमाजांत स्त्रीवर्गाविषयीं आदर पहिल्यापासून रुळलेला आहे. तशांत गेल्या वीस वर्षांत हिंदी महिलांनीं शिक्षणांत आणि सार्वजनिक कार्यांत पुष्कळ प्रगति केली आहे. पुरुषांच्या बरोबरीनें आणि पुरुषांइतक्याच जबाबदारीच्या जाणिवेनें कार्य करण्याचा हक्क व योग्यता स्त्रियांनीं कृतीनें शाबीत केली आहे. आमची परिषद् भरली असतां स्त्रियांना केवळ शोभेची आणि मानाची जागा देऊन खूष करण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं. या परिषदेच्या कार्यांत

## स्त्रियांकडे महत्त्वाची आणि जबाबदारीची कामगिरी द्यावी

हें जाणूनच या परिषदेला जोडून कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविण्याचा उपक्रम करण्यांत आला. या प्रदर्शनाची सर्व व्यवस्था स्वज्ञातीय महिलांनीं केली आहे. अवघ्या तीन महिन्यांच्या अवधीत प्रदर्शनाची कामगिरी त्यांनीं किती चोख आणि प्रशंसनीय रीतीनें बजाविली आहे, हें आपण स्वतः पाहल तेव्हां स्त्रियांच्या सहकारितेची आवश्यकता आपणांस पटेल, अशी माझी खात्री आहे. विशेष अभिमान वाटण्यासारखी परिषदेची व्यवस्था नसतांही गौड सारस्वत महिलावर्गानें परिषदेला एका महत्त्वाच्या शाखेची जोड दिली आणि आज हस्तोद्योगाचें शिक्षण अत्यावश्यक समजलें जात आहे. त्यांत स्त्रियांच्या साहाय्यानें महत्त्वाची कामगिरी किती करतां येईल याचें दृश्य आपल्या नजरेसमोर मांडलें आहे.

परिषदेनें आजपर्यंत ज्या अनेक शिफारशी केल्या त्यांपैकीं बऱ्याच शिफारशींना या शहरांत कृतीचें स्वरूप आलेलें आपणास दिसेल. परदेशीय शिक्षणाची योजना, परस्पर सहकारी बँक, ज्ञातिसाठीं नियतकालिक पत्रें वगैरेविषयीं परिषदेनें विचार करून केलेले ठराव अंमलांत आणण्याचे यशस्वी प्रयत्न या शहरांतील व्यक्तींनीं व संस्थांनीं केलेले आपणांस दिसून येतील. फॉरेन एज्युकेशन सोसायटी, को-ऑपरेटिव्ह हाउसिंग, को-ऑपरेटिव्ह बँका, वगैरे अनेक संस्थांच्या रूपांनीं परिषदेच्या ठरावांची अंमलबजावणी मुंबईंत कमजास्त प्रमाणांत यशस्वी झालेली आहे. या संस्थांचा फायदा मुंबईबाहेरील स्वज्ञातियांसही मिळत आहे व तो जास्त प्रमाणांत मिळत जावा यासाठीं प्रयत्न करण्यांत कसूर होत नाहीं. बहुतेक सर्व ठिकाणीं राहणाऱ्या गौड सारस्वत ब्राह्मणांपैकीं कांहीं जण अनेक कारणांनीं मुंबईत नेहमीं वास्तव्य करीत असल्यामुळें येथील ज्ञातिसमाज प्रातिनिधिक

आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं- त्या अर्थी मुंबईतील ज्ञातिहितार्थ होणाऱ्या प्रयत्नांचा लाभ प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें सर्वत्र असलेल्या स्वज्ञाति' यांना होत असतो. परिषदेंत होणाऱ्या विचारांना कृतीचें स्वरूप जसें आजवर मुंबईस मिळालें तसें यापुढेंही मिळेल अशी मी आशा करतों.

### अध्यक्ष श्री. बा. सी. कामत यांचें भाषण

आरंभीं गेल्या सतरा' वर्षांच्या खंडांत दिवंगत झालेल्या डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, सर नारायण चंदावरकर, रा. ब. अनंत शिवाजी देसाई, मि. जस्टिस माधव कृष्ण बागळे, दि. ब. ए. के. पै, रा. ब. स. वि. राजाध्यक्ष, न्यायशास्त्री भवानीशंकर सुखटणकर, श्री. काशीनाथ रघुनाथ मित्रप्रभृति सुमारें पन्नास पुढाऱ्यांचें पुण्यस्मरण करून ते म्हणाले कीं, सर्वांच्या मनांत व आपले जे टीकाकार बाहेर शिल्लक राहिले असतील ( कारण पूर्वींचे " वेकीवाले " सध्या नामशेष दिसतात ) त्यांच्याही आक्षेपांत जो प्रथम आक्षेप उद्भवतो तो हा कीं, परिषदेपासून आज पंचवीस वर्षांत कांहीं कामगीरी झाली आहे कीं काय ? किंवा हा केवळ सहभोजनासाठीं भोजन-बारगिरांचा जलसा आहे ? यास उत्तर परिषदेच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या कामाच्या समालोचनानेंच दिलें पाहिजे. परिषदेच्या कामगिरीची मुख्य कसोटी निरनिराळ्या भेदांतील मिश्रविवाह पंचवीस वर्षांत असे विवाह किती झाले यांची नोंद सांपडणें सुलभ नाहीं. या बाबतींत एक गोष्ट सुचते ती ही कीं, परिषदेची जी संघटना आहे, तींत सुधारणा होणें जरूर आहे; या सुधारणेंत एक मुख्य अंग असें पाहिजे कीं, जनरल सेक्रेटरींच्या मदतीस नेहमीं करीत राहील असें एक कार्यकारी मंडळ ( Standing Commitee ) असावें. वर्षांतून बाराही महिने काम करीत राहण्याचें कर्तव्य या मंडळाकडे असावें. तसेंच सहविवाहास पोषक अशी माहिती गोळा करून त्याची नोंद आपल्या कचेरींत ठेवणें व असे विवाह स्वसंतोषानें घडून येण्यास उत्तेजन देणें हें काम सदर मंडळाचें असावें.

### शिक्षणप्रसार

परिषदेची कामगिरी दुसऱ्या दिशेनें पाहतां म्हणजे ज्ञातींतील शिक्षणप्रसाराच्या दृष्टीनें पाहतां मागील २५ वर्षांचें चित्र अत्यंत उज्ज्वल आहे असें कोणाही कट्टर वितंडवादी टीकाकारासही कबूल करणें भाग पडेल. बेळगांव येथील १९१० सालच्या परिषदेपासून आजपावेतों परिषदेच्या स्फूर्तीमुळें निर्माण झालेले शिक्षण-प्रसारकनिधि अगर संस्था यांचा नामोच्चार आपल्या स्मरणार्थ संकलित रीतीनें करणें उपयुक्त होईल असें वाटतें. सदर तपशील असा:—

१ श्रीमंत दाभोळकर स्कॉलरशिप्स्
फंड...दरमहा मदत सुमारें रु. ५७०

२ श्रीयुत मंगेश विश्वनाथ राजाध्यक्ष
स्कॉलरशिपस् व चॅरिटी फंड... ...
रु. १००,०००

स्कॉलरशिपस एकूण रु. ३६,०००
अनाथांस मदत एकूण रु. १६,०००

५२,०००

३ रावबहादुर राजाध्यक्ष फॉरेन
एज्युकेशन फंड एकूण मदत ४२,०००

याशिवाय परिषदेच्या स्फूर्तीनें अथवा घडून आलेल्या जागृतीमुळें अस्तित्वांत आलेल्या शिक्षणप्रसारक संस्था म्हणजे

१ सारस्वत विद्यालय म्हापसें, गोवें
२ कन्याशाळा, मालवण
३ सरस्वती वसतिगृह, कोल्हापूर
४ वसतिगृह, इंदूर
५. इतर ज्ञातिसंस्था मडगांव, गोवा, इत्यादि

यांचें श्रेय परिषदेस न देणारा इसम प्रत्यक्ष ब्रह्मदेवासही कांहींच श्रेय देऊं नये म्हणेल. अशांच्या नादीं कोणी लागावें ?

परिषदेची तिसरी कामगिरी नैतिक स्वरूपाची आहे. परिषद-संमेलनानिमित्त उत्तर हिंदुस्थान म्हणजे ग्वाल्हेर वगैरे टोंकापासून दक्षिण हिंदुस्थानमधील मंगळोर, कोचीन इत्यादि टोंकापर्यंत पांगलेल्या गौड सारस्वतांस एकत्र आणून त्यांमध्यें स्नेहसंवर्धन, तसेंच विचारजागृति करणें हा परिषदेचा निःसंशय विजय होय. इतर कोणत्याही मार्गानें इतकें ऐक्य, विचारविनिमय अगर स्नेहवृद्धि होणें शक्य नाहीं.

संयुक्त परिषदांपासून कांहीं प्रतिक्रिया स्वज्ञातीवर घडून आली कीं काय, हेंही पाहणें जरूर आहे. या बाबतींत आपल्या थोड्याशा कुडाळदेशकरबंधूंनीं आपला सवता सुभा अलीकडे उभारला आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु हा संयुक्त परिषदेचा प्रत्यक्ष परिणाम नसून त्यास इतर कारणेंही आहेत.

या सतरा-अठरा वर्षांच्या अवधींत कित्येक ठिकाणीं विशेषतः या मुंबई शहरांत व उपनगरांत आपल्या निर-निराळ्या भेदाचे स्थानिक गट निर्माण झाले आहेत, ही गोष्ट खरी आहे. हे जातिवार गट संयुक्त परिषदेच्या एकीकरणाच्या तात्त्विक कल्पनेस विरोधक आहेत तसा त्याचा अर्थ नाहीं. हे लहान लहान समूह विशेषतः शैक्षणिक अथवा आर्थिक मदतीकरितां अगर करमणुकी-साठीं स्थापन झालेले दिसतात. त्यांचें कार्यक्षेत्र पृथक् असून आपआपल्या अल्प परीघाच्या सीमेंत प्रथमतः सहकार्य व परस्पर मदत करावी ही वृत्ति जरी आकुंचित असली, तरी भेदाच्या एकीकरणास बाधक अगर विरोधक नाहीं असें मला वाटतें. आतां राहिला एक जुना शिळा आक्षेप तो हा कीं ज्ञातिविशिष्ट संस्थांमुळें राष्ट्रीय भावना नष्ट होतात अगर दूर जातात. हा आक्षेप परिषदेच्या स्थापनेनंतर २५ वर्षांनीं विचारांत घेण्याचें कारणच नाहीं.

## आपण एकदा तारूं लोटून फार पुढें गेलों आहों.

माझ्या सार्वजनिक आयुष्यक्रमांत माझा नानाविध संस्थांशींही संबंध असून माझा ज्ञातिसंस्थाशीं संबंध आहे; परंतु त्यामुळें राष्ट्रीय भावनांस असा संबंध आड आल्याचें माझें मन मला ग्वाही देत नाहीं. सारस्वत हे त्यांच्या नांवाप्रमाणें त्यांच्या विद्या व बुद्धिबल यांवर उभे राहिले, तर ते इतर हिंदुसमाजा-पैकीं कोणत्याही ज्ञातीस मागें टाकतील असा मला अभि-मान वाटतो. या बुद्धिसामर्थ्याच्या पायावरच हायकोर्टा-सारख्या उच्च स्थानापासून तों लहानसहान खात्यांतील जागांपर्यंत तोंड न वेंगाडतां ते टिकाव धरूं शकतात असें सर्वसाधारण निरीक्षणावरून दिसून येतें. येणेंप्रमाणें ज्या अर्थीं इतर समाजांशीं आपला वैरभाव अथवा हेवा-दावा नाहीं, त्याअर्थीं अराष्ट्रीय भावनांस आपला समाज बळी पडेल अशी मला भीति नाहीं. ज्ञातिसंघाशिवाय देशांतील हजारों जातिभेद मोडण्याचें काम सुरू करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखें होईल; मात्र असे संघ द्वेषमूलक पायावर अस्तित्वांत येऊं नयेत, अगर द्वेषमूलक वृत्तीनें चालविलेले नसावेत.

राष्ट्रीय भावनांवर आघात करणारी नवीन आपत्ति म्हणजे पार्लमेंटनें पास केलेला नवीन

## राज्यघटनेचा कायदा व ब्रिटिश सरकारचा जातिनिर्णय

हिंदुस्थानांत जाति कोणी व केव्हां निर्माण केल्या असतील त्या असोत. परंतु ब्रिटिश सरकारनें आमच्यांतील भांडणामुळें त्या वज्रलेप करण्याचें श्रेय घेतलें यांत शंका नाहीं. नवीन कायद्यानें राष्ट्रीय भावना ठार होणार. हा दोष दुरभिमान नसलेल्या अशा लहानसहान ज्ञाति-संघाच्या गळ्यांत बांधण्यांत काय अर्थ ?

सारस्वत ज्ञातीच्या बुद्धिसामर्थ्याचा व शैक्षणिक प्रगतीचा वर उल्लेख केला आहे. या बाबतींत आपण या प्रांतांतील पुढारलेल्या कोणत्याही जातीस हार जाणार नाहीं. या विधानाच्या पुष्ट्यर्थ कांहीं पुरावा आहे काय, असा प्रश्न उद्भवेल; म्हणून मी मुद्दाम कांहीं आंकडे आमच्या एका मित्राच्या, श्रीयुत यशवंत हणमंत सुखटणकर, सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी, मुंबई—यांच्या साहाय्यानें गोळा केले आहेत, ते या ठिकाणीं आपल्या माहितीकरितां उद्धृत करणें अप्रासंगिक होणार नाहीं, म्हणून खालीं दिले आहेतः—

| ज्ञातींतील | संख्या |
|---|---|
| I. C. S. ( आय. सी. एस. ) ( मंगलोर, मद्रासकडील सुद्धा ) | २२ |
| I. M. S. ( आय. एम. एस. )……… | ३ |
| M. D. ( एम. डी. )……… | ११ |
| F. R. C. S. [ एफ. आर. सी. एस. ] | ५ |
| M. S. [ एम. एस. ] | ३ |
| M. R. C. P. [ एम. आर. सी. पी. ] | ३ |
| D.P.H.D.T.M. ( डी. पी.एच.डी. टी. एम. ) | ५ |
| D. Sc. ( डी. एससी. ) | ४ |
| Ph. D. ( पी. एच. डी. ) | २० |
| Wranglers (including 2 B-Star Wranglers) | ३ |

वगैरे..

सारस्वतांचें उच्च शिक्षणांतील व उच्च कारभारांतील स्थान मागील १०।२० वर्षांत अभिमानास्पद आहे असें वर दिलेल्या माहितीवरून दिसून येईल;तथापि साक्षरता Literacy, म्हणजे पत्र लिहितां-वाचतां येईल इतकी साक्षरता पाहिली, तर मागील ( १९३१ च्या ) सेन्सस-प्रमाणें तुलनात्मक दृष्ट्या तिचा नंतर खालीं आहे.

## साक्षरता दर हजारीं प्रमाण

१ ब्राह्मण देशस्थ ५२६

२ ब्राह्मण चित्पावन ५५२

३ कायस्थ प्रभु ६४४

४ ब्राह्मण औदिच ५१८

५ ब्राह्मण गौ. सारस्वत ४५६

खानेसुमारी बिनचूक झाली असावी असें धरल्यास वरील क्रमांक विस्मय उत्पन्न करतात. असो.

देशाच्या कारभारांत केवळ बुद्धिमत्तेच्या व स्वतःच्या गुणांनीं सारस्वत उच्च स्थानीं पोंचू शकतात याचा पुरावा खालील आंकडे सिद्ध करतातः—

मुंबईचे मेयर १, हायकोर्ट जज्ज [ संस्थानांतील धरून ] ९, युनि. व्हाइस चान्सेलर १, कंट्रोल ऑफ करन्सी १, डायरेक्टर ऑफ प. हेल्थ १, मुंबई म्यु. हेल्थ ऑफिसर १, लीगल रिमेंब्रन्सर १, मुंबई स्मॉल-कॉज कोर्ट जज्ज १, युनिव्हर्सिटी रजिस्ट्रार १, असि. कमिशनर इन्कमटॅक्स १, डेप्युटी हायककमिशनर फॉर इंडिया १, डेप्युटी ट्रेड कमिशनर लंडन १.

आपल्या परिषदेच्या घटनेसंबंधानें स्वागत-कमिटी-कडून एक योजना आपल्यापुढें येणार आहे असें समजतें. या योजनेचा आस्थापूर्वक आपण विचार कराल असा मला भरंवसा आहे. आपल्या परिषदेच्या घटने-( Constitution ) मध्यें स्त्रियास जितकें महत्त्वाचें स्थान द्यावयास पाहिजे, तितकें दिलेलें नाहीं; उलट त्यांस दूर ठेवून सामाजिक सुधारणा करावयाची अशी कल्पना या परिषदेच्या कांहीं चालकांस एक वेळ पसंत होती असें वाटतें. घटनेंतील 'गृहस्थ' या शब्दावर मल्लिनाथी करून ही घटना बदलतां येत नाहीं. ती पर्शियन लोकांच्या कायद्याप्रमाणें अबाधित राहिली पाहिजे. नाहींतर

## मुंबईवर क्वेटासारखा धरणीकंप गुदरेल

असें कित्येकांस जर वाटत असेल, तर या प्रतिगामी धोरणानें परिषदा भरविण्यापेक्षां आपण सर्वांनीं गाशा गुंडाळून आणि परिषदेचा शिल्लक फंड कोणत्याही धर्म-कार्यास द्यावा असा ठराव पास करून घरोघर परत गेलेलें मला पसंत पडेल. वास्तविक सामाजिक सुधार-णेच्या मार्गांत आजकाल

## स्त्रिया ह्या धोंड राहिलेल्या नाहींत

केव्हां केव्हां त्याच स्वतःपुरत्या फार पुढें जाऊं पाहतात व त्या वेळीं लगाम आवरून धरणें पुरुषांस भाग पडतें. तथापि स्त्रियांच्या मदतीवांचून सामाजिक सुधारणा करूं पाहणें किती अवघड आहे हें आपणास रोज प्रत्येक गृहकृत्याच्यावेळीं पदोपदीं दिसून येतें. घटनेत त्यांच्या सहकार्यास वाव ठेवणें ही सुधारणा अत्यंत जरूर आहे.

आपल्या परिषदेचा मुख्य उद्देश (objective) एकीकरण. याशिवाय इतर उद्देश सामाजिक, नैतिक, बौद्धिक, व सांपत्तिक उन्नति; यांपैकीं सामाजिक उन्नति-प्रीत्यर्थ सुधारणेच्या बाबी पूर्वी ज्या गणल्या जात असत, त्या सध्या जमेंत राहिल्या नाहींत. कॉंग्रेसच्या जवळ जवळ सुरवातीपासून सामाजिक सुधारणेसाठीं भरविलेल्या परि-षदांमधून जे विषय पन्नास वर्षांपूर्वी घेणें जरूर वाटे, त्यांपैकीं उदाहरणार्थ स्त्रीशिक्षण, बालविवाह यांसारख्या विषयांचें महत्त्व आतां राहिलें नाहीं. हे प्रश्न सुटले आहेत. सहभोजन हाही प्रश्न शिल्लक राहिला नाहीं. तो प्रश्न आपल्या परिषदेनें सोडविला असें या मुंबईत म्हणून आपल्या असंख्य देशीं व परदेशी माधवरावांचा मी अपमान करूं इच्छित नाहीं. त्यांना धन्यवाद देऊन तें मुंबईतील धाष्टर्य खेड्यापाड्यांत, लग्नकार्यांत, दाख-विण्याचा सरळपणा ईश्वर आपणास देवो इतकेंच इच्छितों. बालविवाह, स्त्रीशिक्षण, सहभोजन, यांखेरीज सामाजिक प्रश्न चालू फॅशनचे अनेक आहेत. आजकाल विधवाविवाह या प्रश्नालाही फारसें महत्त्व राहिलेलें नाहीं. घटस्फोटासारखे विषय जरी तरुण पिढीस महत्त्वाचे वाटत असले, तथापि असले स्फोटकारक विषय आपल्या परिषदेमध्यें वादविवादास घेण्याची प्रथा नाहीं म्हणून म्हणा, अथवा पाश्चात्य देशांत त्यापासून होणारे लाभा-लाभ पाहतां अशा विषयांचा वादविवाद करणें म्हणजे

## आपल्या देशांतील सामाजिक घडीचा निष्कारण स्फोट करणें

असें मला वाटत असल्याकारणामुळें म्हणा, या चालू फॅशनमध्यें उतरण्याची माझी इच्छा नाहीं. स्त्रियांच्या दर्जासंबंधानें अगर त्यांच्या हक्कासंबंधानें लोकमत निर्माण करण्यास आतां स्त्रियाच पुढें येत आहेत. तेव्हां या दृष्टीनें आपल्या परिषदेमध्यें उहापोहाची तितकी जरूर राहिली नाहीं. स्त्रियांवर, आपल्या कॉन्स्टिटयूशनचा अर्थ करणारांनीं घातलेला बहिष्कार आपण दूर केलात, तर तें काम आपोआपच याच ठिकाणीं त्या करूं शकतील. चालू अधिवेशनांत आपण स्त्रियांच्यासुद्धां "कला-कौशल्याचें प्रदर्शन" भरविण्याचें ठरविलें ही आनंदाची गोष्ट आहे. कारण निदान त्यामुळें तरी हा बहिष्कार पूर्णपणें तडीस न जातां स्त्री-जात ही काय वस्तु आहे हें प्रतिनिधींस समजून येईल. या अधिवेशनाला जोडूनच एक दिवस स्त्री प्रतिनिधींची सभा असती तर सामाजिक प्रश्नांच्या चर्चेच्या दृष्टीनें या अधिवेशनास फारच चांगलें रूप आलें असतें. प्रचलित विषयांपैकीं, मुलींना बापाच्या मिळकतींत कांहींतरी वारसा हक्क मिळावा, तसेंच अविभक्त कुटुंबांत पतीच्या पश्चात् विधवेस मृतपतीचा हिस्सा वारसाहक्कानें मिळावा, अशा बाजूनें हिंदु कायद्यांत दुरुस्ती व्हावी अशाबद्दल परिषदेनें लोकमतास पाठिंबा देणें जरूर आहे असें मला वाटतें. हा प्रश्न कायदेपंडितांचा आहे. तथापि न्याय्य काय आहे याजबद्दल लोकमत प्रदर्शित करणें सर्व प्रतिनिधींचें कर्तव्य आहे.

या कायद्याच्या गुंतागुंतीच्या प्रश्नाखेरीज दुसरा साधा सामाजिक प्रश्न जो आपणास सोडवितां येण्यासारखा आहे, तो हा कीं, आपल्या समाजांत मुंजी, लग्न इत्यादि विधींत भटजींच्या हडेलहप्पीचा सुकाळ, अवास्तव खर्च व आनुषंगिक खुळचटपणा इत्यादि गोष्टी प्रचलित आहेत; मुलांच्या मुंजीसाठीं हजारों रुपये खर्च करणारे हरीचे लाल अद्याप समाजांत आहेत, आणि त्यांचीच रड आर्थिक हलाखीबाबत अगर मुलांच्या शिक्षणास पैसा नाहीं म्हणून जास्त असते. वास्तविक यज्ञोपवीत धारण करणें जरूर आहे, म्हणून मुंजीसारखा गृह्य संस्कार आजकाल संक्षेप पद्धतीनें ५।२५ रुपयांत झाला पाहिजे. लग्नविधि कायद्याच्या कक्षेंत येण्यापुरताच सुटसुटीत असावा. काळवेळ वांचून पैसाही वांचेल व तोच पैसा सत्कार्यीं लावतां येईल. तरुण मंडळींनीं तरी निदान भटजींची गुलामगिरी झुगारून दिली पाहिजे.

आचरट सामाजिक रूढींचें बंड असलेला हिंदुसमाजाइतका रूढीचा दास दुसरा कोणताही नसेल. ही गुलामगिरी ज्यांना झुगारून देण्याच धैर्य नाहीं, त्यांनीं इतर गुलामगिरी झुगारण्याच्या वल्गना न करणें बरें. परदेशगमन करून आलेल्या इसमास देवळांत अगर कोठेंही मज्जाव नसावा. पुनर्विवाहित दंपत्याच्या संततीस कोणताही कमीपणा मानण्यांत येऊं नये. कुंकुम अलंकार हा केवळ सवाष्ण स्त्रियांचा स्पेशल अधिकार आहे, अशी रूढि पाळण्यांत विधवा स्त्रियांना आपण निवडून काढून त्यांचा अपमान करून त्यांच्या मनास आपण भयंकर धक्का देतों; त्यांसही या रूढींच्या अत्त्याचारापासून आपला बचाव करण्याची वाटल्यास मुभा असावी. जुन्या रूढींत फेरबदल होणें इष्ट आहे व स्त्रियांनींच या कामीं पुढाकार घेणें जरूर आहे. आपल्या समाजांत कांहीं रूढि फार उत्तम आहेत. स्वच्छतेच्या, स्त्री-विनयाच्या, गुरुजनांच्या, आदराच्या, साध्या राहणीच्या, इत्यादि चांगल्या रूढींचें काळजीपूर्वक जतन झालें पाहिजे. जातां जातां आपल्या **विविध-वृत्त**पत्रानें बुवाबाजीस आळा घालण्याचे प्रयत्न करून लोकहित केलें आहे हें नमूद करणें जरूर आहे.

"अहो, पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाहीं. परिषदा भरून करायचें काय?" असेही कांहीं लोक वैतागून म्हणणारे आहेत; परंतु विचार केला असतां असें दिसून येईल कीं, हा प्रश्न आपल्याच ज्ञातीस गांजीत नसून सार्वत्रिक किंबहुना जागतिक झाला आहे.

## बेकारी व आर्थिक हलाखी

याजवर उपाय शोधण्यांत अमेरिकेसारखा स्वतंत्र व सधन देशही जेरीला आला आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या अनेक परिषदा भरवूनही यावर उपाय सांपडलेला नाहीं, मग आपली तर परिषद ज्ञातिविषयक आहे. त्यांत या विषयाचें उत्तर शोधीत बसणेंच चुकीचें आहे. पहिली गोष्ट अशी कीं, मागील पांचपंचवीस वर्षांत सरकारी

नोकऱ्यांसंबंधानें परिस्थिति फार बदललेली आहे, हें लक्षांत ठेवूनच तरुणांनीं व त्यांच्या पालकांनीं आयुष्य-क्रम आंखला पाहिजे. लायकीप्रमाणें नोकरी हे दिवस बदलून जातीप्रमाणें नोकरी अशी स्थिति आल्यानें नोकरीसाठीं आशाळभूतपणाची वृत्ति सोडली पाहिजे. कांहीं जातींत नोकरीशिवाय तरुण सुखानें राहत आहेत. त्यांचें निरीक्षण करून नोकरीसाठीं खेटे घालण्याची आमची वृत्ति सुटेल तेव्हां पांच वर्षांनंतर समाजाची आर्थिक स्थिति बदलेल.

दुसरी गोष्ट व्यापार उद्योगधंदा; यांतही हिंदुस्थानांत विशेष अडचणी अहेत हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यां-तही चढाओढ भयंकर झालेली आहे.

**टोप्यांचा धंदा करून आतां लक्षाधीश होईन** असे दिवस राहिलेले नाहींत. प्रत्येक धंदा पांच टक्के कमाईचा बनलेला आहे. त्यांतही धडाडी आणि "बुद्धि-र्यस्य बलं तस्य" या तत्त्वावर कल्पकता असल्यास पोटा-पुरतें साधन काढण्याची वृत्ति अंगीकारली पाहिजे. परंतु याही बाबतींत जात व पुराणसंस्कृति आडवी येते. चामडी व हाडकें हिंदुस्थानांतून विलायतेस जातात; त्यांत पडतां का हो, म्हणून विचारल्यास हिंदु म्हणतो, 'छे हो, तो ढोराचा धंदा, आमच्या जातीचा नाहीं; लोक काय म्हणतील?' कांहीं बाबतींत हिंदु चालीं आडव्या येतात. ज्या ठिकाणीं एखादा सिंधी तरुण ४।५ शें रुपयांचा माल घेऊन नशीब काढण्यास एडन, जिब्राल्टर अगर सिंगापूर येथें जाईल, त्याच ठिकाणीं सारस्वतास विचारल्यास 'छे हो, मी दोन वर्षांपूर्वी २२ वर्षांचा असतांना आईच्या आग्रहास्तव घरांत कुंकू लावण्यास कोणीं नव्हतें म्हणून बायको केली: आतां आम्हास फक्त दोनच मुली आहेत, व ती तिसरे खेपेची गरोदर आहेच: तेव्हां मी माझें इकडील कर्तव्य टाकून जाऊं कसा?" ही वृत्ति बदलली पाहिजे. आईच्या आग्रहास्तव लग्न, व २॥ वर्षांत कर्तव्य म्हणून ३ मुलें, ही स्थिति पालटल्याशिवाय आर्थिक आपत्ति टळणार नाहीं. आपणास कांहीं ग्रहस्थ असे सांपडतील कीं त्यांस, समजा, ग्वाल्हेरकडे भक्कम पगारावर नोकरी आली, तरी मुंबईच्या संवयीप्रमाणें खाद्यपेयांची सोय नसल्याकारणानें तिची पर्वा करीत नाहींत. मला एक दक्षिणी गृहस्थ असे भेटले कीं, त्यांची बदली बढतीच्या जाग्यावर सिमल्यास होणार होती. त्यांनीं व त्यांच्या मातुश्रींनीं विचार करून, शेवटीं त्यांनीं वरिष्ठांस सांगितलें, "साहेब, सिमल्यास माझ्या बाळाचें मराठी शिक्षण कसें होईल? मला ती बढती नको" अखेर एका मद्रासी बहादुरानें ती जागा पत्करली. तात्पर्य, ही घरकोंबडेपणाची वृत्तीही पालटली पाहिजे. आणखीही एक गोष्ट ध्यानांत आणण्याजोगी आहे. देशांतील कच्चा माल कोठें विकतो, कोठे स्वस्त मिळतो, त्याला उत्तम मार्केट ( बाजारपेठ ) कोणतें, कोणत्या वेळीं भाव स्वस्त व महाग होतात: दलाली, नोर, काय पडतो याची साधी माहिती व अभ्यासु वृत्ति, कच्चा माल दारांत मिळत असला तरी सुद्धा आम्हास नको असते. आम्हीं आपला फावला वेळ

**फडक्यांच्या कादंबऱ्या, सुडक्यांच्या ४ आणे माला**

नोकरीच्या जाहिराती यांत घालवितों. उत्तम कापूस अगर अळशी हीं कोठें पिकतात, त्यांच्या जाति कोणत्या, मुंबईस येऊन हा माल परवडतो कीं काय, याच्या बाजारपेठा कोणत्या, याचा अभ्यास करणें हें आम्हास कमीपणाचें वाटतें; मारवाड्याच्या मुलास तसें वाटत नाहीं. रत्नागिरी बंदरांतून दोन लाख रुपयांचा आंबा बाहेर जात असेल, आणि गोमंतकांतून दोन लाखांचा जात असेल. "आम्हांस त्याचें काय? आम्ही सुशिक्षित, आम्ही मंगेशीच्या देवस्थानाचा इतिहास लिहिणार, आर्थिक उन्नतीचा मक्ता आम्ही यंदा परिषदेकडे देणार." पण परिषदा जर द्रव्य उत्पादनाचा फॉर्म्युला देणार असत्या तर कॉंग्रेसनें आज पन्नास वर्षांत हिंदुस्थानचें सोनें केलें असतें.

धनिकांचें कर्तव्य, भांडवलाच्या सोईसाठीं देशांत काय गोष्टी असाव्यात. जुने-नवे धंदे सुधारण्याच्या बाबतींत सरकारचें कर्तव्य काय, इत्यादि ऊहापोह कर-ण्याचें हें स्थान नव्हे. सर्वसाधारण रीत्या विचारांची दिशा वर दाखविली आहे. सारस्वत जातीनें सारस्वत को-ऑप-रेटिव बँक, कॅनरा बँक, हाउसिंग सोसायटी, सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी, दीनवत्सल संघ, इत्यादि उप-

युक्त संस्था चालवून उत्तम कामगिरी केली आहे. तरुणांनीं आपला दृष्टिकोन बदलून आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे. तरुणांनीं आजकालच्या परिस्थितीस अनुसरून ४।२ आडाखे ध्यानांत धरण्यासारखे आहेत. त्यांचें दिग्दर्शन करण्याची परवानगी घेतों.

१ स्वावलंबी होईपर्यंत लग्न करून चतुर्भुज होऊं नये. पंचविशी उलटली तरी थोडी कळ सोसावी.

२ संततिनियमनशास्त्राचा अभ्यास केल्याशिवाय लग्नास तयार होऊं नये; संततिनियमनासाठींच सदर शास्त्र पाळावें.

लोकसंख्या किती झपाट्यानें वाढत आहे याचा विचार करावा. मागील पिढींतील कुटुंब चालू पिढींत किती संख्येचें झालें आहे याचें निरीक्षण करावें.

३ आपला शेजारी भपकेबाज राहणी ठेवतो, म्हणून आपली राहणी वाढवूं नये; अगर पत्नीस भपका आवडतो म्हणून स्वातंत्र्य देऊं नये. आपल्यामध्यें उत्पन्न व राहणी यांचें व्यस्त प्रमाण दिसून येत असून आर्थिक अवनति होत आहे, असें दिसतें.

४ शहरांतच संसार थाटण्याची लालसा नसावी. Urbanisation चे परिणाम व्यक्तीच्या संसारावर होत आहेत. शक्य तों लहान गांव पसंत केल्यास आपले हाल कमी होऊन ग्रामसुधारणा होईल.

५ शक्य असल्यास देशांतर करण्यास कचरूं नये. अन्न-प्राप्तीसाठींही देशांतर अथवा प्रांतांतर केल्यास 'कोकालो फलदायकः' या न्यायानें शंभरांत एकाचें तरी दैव उदयास येऊन ज्ञातीचा फायदा होईल.



सोलापूर येथील सारस्वत ब्राह्मण सोशल क्लबातर्फे झालेल्या दसरा-संमेलनांतील मुलांनीं केलेल्या प्रेमसंन्यास नाट्य प्रयोगांतील एक प्रसंग.

# बाळकृष्ण सीताराम कामत

संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेच्या नवव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण सीताराम ऊर्फ बाबासाहेब कामत हे मूळचे सावंतवाडी संस्थानांतील पाट या गांवचे. त्यांचे वडील सीतारामपंत शिरोडकर यांनीं कॉंट्रक्टच्या कामीं कीर्ति व पैसा संपादन केली. बाबासाहेबांचा जन्म २१ मार्च १८७१ सालीं झाला, व डेक्कन कॉलेजांतून ते बी. ए. झाले. व वडिलांचा कॉंट्रॅक्टचा धंदाही कांहीं दिवस त्यांनीं चालविला. नंतर लिबरल म्हणून सार्वजनिक आयुष्यांत त्यांनीं पदार्पण केलें. पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे ते पुष्कळ वर्षे सभासद होते. मोर्ले-मिंटो सुधारणांतून उत्पन्न झालेल्या मुम्बई-कौन्सिलांत ते १९१२ सालपासून सदस्य होते. मॉंटफर्ड सुधारणांच्या वेळीं लिबरल पक्षातर्फे जें शिष्टमंडळ विलायतेंत गेलें त्याचे बाबासाहेब सभासद होते. मॉंटफर्ड सुधारणा मिळाल्यानंतर पहिल्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मध्यभागातर्फे ते सभासद निवडून गेले. १९२३ सालीं केनियांतील हिंदी लोकांतर्फेच्या डेप्युटेशनचे सभासद म्हणून बाबासाहेब फिरून विलायतेंत गेले. १९२४ सालांत हिंदुस्तानांतील शेती सुधारणेचे उपाय सुचविण्यासाठीं लॉर्ड लिनलिथगो यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या कमिशनचे बाबासाहेब एक सभासद होते. अशींच दुसरीं पुष्कळ कमिशनें, फॉसेट कमिटीसारख्या कमिट्या यावर बाबासाहेबांनीं काम करून जनसेवा केली आहे. ते पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे व्हाइस प्रेसिडेंट आहेत. अशा पुष्कळ संस्थांचे प्रमुख सभासद व सल्लागार आहेत. सांप्रतच्या मुंबई-कौन्सिलांत ते सरकार-नियुक्त समासद आहेत. त्यांच्याइतके पट्टीचे वक्ते कौन्सिलांत फारच थोडे आहेत. त्यांची नेमस्त पण मुद्देसूद टीका फार परिणामकारी असते. इंग्रजी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे.

कारवार-परिषदेचें अध्यक्षस्थान बाबासाहेबांनीं मंडित केलें होतें. पुष्कळशा अधिवेशनांत हजर राहून परिषदेकडून खरोखर समाजसुधारणा व्हावी अशी मेहनत त्यांनीं घेतली होती. स्त्रियांना मताधिकार मिळावा याही प्रश्नाला त्यांचें आनुकूल्य होतें. त्याचप्रमाणें प्रसंगोपात् सडेतोड पण विधायक टीका करावयास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. परिषदेच्या हातून उक्तीपेक्षां कृति व्हावी या गोष्टीवर त्यांचा विशेष कटाक्ष होता.

नुकत्याच भरलेल्या परिषदेनें स्टॅंडिंग कमिटी नेमलेली आहे, व ज्ञातीच्या उन्नतिप्रीत्यर्थ कार्य करावयाचें या कमिटीवर सोंपविण्यांत आलें आहे. नियमाप्रमाणें बाबासाहेब या कमिटीचे अध्यक्ष आहेत. त्यांच्यासारख्या अनुभवी, तडफदार व व्यवहार्याव्यवहार्यविवेकी अध्यक्षांच्या साह्यानें परिषदेची उत्तरोत्तर प्रगति होत जावी असें आम्हीं इच्छितों.

---


# मंगेश ब्रदर्स

**यांचे**

**हातानें बनविलेले**

**( मशिनमध्यें नव्हे. )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी ( तिखट ), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वत:ची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

**ब्रँच नं. १**

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

**ब्रँच नं. २**

**चिराबाजार, मार्केटमध्यें.**

# ज्ञातिवृत्त

गेल्या अंकांत श्री. गजानन सांवा प्रियोळकर हे इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजच्या परीक्षेंत पहिल्या-विभागांत उत्तीर्ण झालेले पहिले सारस्वत असा उल्लेख आहे. परंतु त्यापूर्वी श्री.मधुकर विष्णु पंडित,बी. एस्सी. हे त्याच परीक्षेंत १९३४ सालीं उत्तीर्ण झाले आहेत, व हा पहिलेपणाचा मान त्यांजकडे गेला पाहिजे असें एक वाचक कळवितात.

× × ×

डॉ. एम्. डी. अवसरे, बी. एस्सी. पी. एच डी. हे विश्वविद्यालयाच्यां सेनेटचे सभासद म्हणून विश्व-विद्यालयाच्या शिक्षकसंघा मार्फत निवडून आले, याबद्दल त्यांचें आम्ही अभिनंदन करतों. डॉ. अवसरे हे सा. वि. स. मंडळीचे माजी विद्यार्थी होत.

× × ×

सावंतवाडी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचें संमेलन प्रो. बाबुराव शांताराम कालेलकर, M. A., LL. B. यांच्या अध्यक्षतेखालीं चालू महिन्याच्या आरंभी मोठ्या थाटानें साजरें करण्यांत आलें.

× × ×

सारस्वत ब्राह्मणसमाजाच्या विद्यमानें एक सारस्वत स्वयंसेवक मंडळ स्थापन करण्यांत येऊन एक ज्युनियर व एक सीनियर अशीं दोन स्वयंसेवकाचीं पथकें तयार होत आहेत.

× × ×

## सारस्वत तरुणाचें कौशल्य

मुंबईला नुकत्याच भरलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या मार्फत मुझफराबाद हॉलमध्यें जें कलाप्रदर्शन भरलें त्यांतील अनेक आकर्षक वस्तूंत श्रीयुत प्रभाकर रघुनाथ देशपांडे यांनीं तयार केलेले चार नमुने फारच चित्तवेधक होते.

"स्टीम लॉंच," "मॅग्नेटिक बीमएंजिन," "विजेची मोटर" आणि "विमान" यांचे हे छोटेखानी नमुने आहेत. श्री. देशपांडे हे 'डफरीन' बोटीवर नाविक-शिक्षण घेत असलेले एक हुशारपैकीं कॅंडिडेट असून, त्यांना पहिल्या वर्षीच सरदार आंग्रे स्कॉलरशिप व शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची स्कॉलरशिप मिळाली आहे,

### १ लें मॉडेल स्टीम लॉंचचें

आहे. ही लॉंच प्लायवुडची बनविली असून त्यांत एक छोटा बॉयलर बसविला आहे. इतरही सर्व गोष्टी प्रत्यक्ष लॉंचप्रमाणें तयार करण्यांत आल्या आहेत. बॉयलरखालीं स्पिरिटचा दिवा ठेवून त्यांत पाणी घातलें कीं यांतील एंजिन सुरू होतें व एका छोट्या हौदांत ही स्टीमलॉंच चालू लागते. यांतील सर्व बारिकसारिक भाग स्वत: देशपांडे यानीं तयार केले आहेत.

### दुसरा नमुना मॅग्नेटिक बीम एंजिनचा

आहे. हें एंजिन ४ व्हाल्व बॅटरीवर फार उत्तम चालतें.

### तिसरा नमुना विजेच्या मोटरचा

आहे. ही सर्व मोटर स्वत: देशपांडे यांनीं बनविली असून ती व्हाल्ववर उत्तम वेगानें फिरते.

### चवथा नमुना विमानाचा

बांबूच्या व कागदाच्या साहाय्यानें हें बनविलें आहे. या विमानाला रबराच्या २ स्प्रिंगज् बनवून लाविल्या आहेत. त्यांच्या साहाय्यानें हें विमान जमिनीपासून ३० फूट उंच व १५० फूट लांबपर्यंत उडूं शकतें.

---

स्वज्ञातींतील सुप्रसिद्ध हायकोर्ट वकील श्री. नीलकंठ आत्माराम ऊर्फ मामासाहेब शिवेश्वरकर यांस ता. १-१२-३५ रोजीं सायंकाळीं ५। वाजतां त्यांच्या राहत्या घरीं देवाज्ञा झाली, हें कळवावयास आम्हास फार वाईट वाटतें. मामासाहेब सारस्वत दीनवत्सल संघाचे एक ट्रस्टी होते. त्यांच्या स्मशान-यात्रेस जस्टिस दिवेटिया, दि. ब. कंबळी, श्री. गोविंदलाल ठाकूर, श्री. अ. ग. देसाई, श्री. काणे, श्री. मोने, श्री. नाडकर्णी, स्मॉ. कॉ. जज्ज, श्री. द. अ. तेलंगप्रभृति पुष्कळ मंडळी उपस्थित होती. वेस्टर्न इंडिया ॲडव्होकेटस् असोसिएशन, सारस्वत दीनवत्सल संघ वगैरे संस्थांतर्फे त्यांच्या शवास हार अर्पण करण्यांत आले. स्मशानांत श्री. पां. वा. काणे वकील, डॉ. व्यंकटराव यांचीं त्यांच्या गुण-वर्णनपर भाषणें झालीं.

ईश्वर मृताच्या आत्म्यास शांती देवो !

# शोचनीय मृत्यु !

## रावसाहेब रामचंद्र घनःशाम सबनीस

सावंतवाडीचे रावसाहेब रामचंद्र घनःशाम सबनीस यांना ता. ११ ऑक्टोबर रोजीं सावंतवाडी येथें देवाज्ञा झाली, हें ऐकून मुंबई इलाखा व त्याबाहेरही असणाऱ्या त्यांच्या हजारों शिष्यांस फार वाईट वाटेल. आपासाहेब जन्मजात शिक्षक होते. कोणताही दुर्बोध विषय कितीही मंदबुद्धि विद्यार्थी असला, तरी त्याला त्यांच्या शिकवणीमुळें आत्मसात् करितां येत असे. त्यांनीं एकदा शिकविलेल्या पाठाची उजळणी त्यांच्या शिष्यांस कधींही करावी लागत नसे, व वर्गांतील त्यांचा तास केव्हां संपला हेंही कळत नसे.

एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून त्यांनीं केलेली संस्थानची सेवा चिरस्मरणीय राहील. १९१३ पासून १९२४ सालापर्यंतच्या अकरा वर्षांच्या त्यांच्या कारकीर्दींत प्राथमिक शाळांची संख्या त्यांनीं दुप्पट केली. कुडाळला हायस्कूल दिलें; आरवंदे, वालावली वगैरे ठिकाणीं मिडल स्कूलस् स्थापन केलीं. अस्पृश्यस शिक्षणाची व मुलींच्या इंग्रजी शिक्षणाची सोय केली. प्राथमिक शाळांच्या बाबतींत गांववाल्यांनीं शाळागृह बांधून द्यावें, व सरकारनें शिक्षणाची तरतूद करावी, अशी श्रमविभागाची पद्धत चालू करून खेडेगांवच्या लोकांस स्वतःच्या पायावर उभें राहावयास शिकविलें. प्राथमिक शिक्षकांच्या पगारवाढीची सोय केली. आजच्या संस्थानांतील शिक्षणाच्या अभिनंदनीय प्रगतीचें बरेंचसे श्रेय आपासाहेबांसच आहे. १९२८ सालांत संस्थाननें नेमिलेल्या शिक्षणसमितीवर आपासाहेबांसारखा अनुभवी सभासद नसल्यामुळें त्या समितीचा रिपोर्ट अव्यवहार्य म्हणून धूळ खात पडला आहे.

सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणावरील त्यांचें प्रेम त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. सावंतवाडींतील कळसुलकर हायस्कूलला स्वतःची इमारत मिळावयास त्यांचे श्रम पुष्कळसे कारणीभूत झाले आहेत. ते त्या सोसायटीचे उपाध्यक्ष होते.

आपासाहेबांना त्यांच्या आयुष्यांत दुःखाचे पुष्कळ प्रसंग आले, पण ते त्यांनीं धैर्यानें सोसले. वेदांतविषयाचें वाचन व मुलांना शिकविणें यांतच आपला बहुतेक वेळ ते घालवीत असत. मृत्युपूर्वी थोडेच दिवस आपले दौहित्र व शिष्य श्री. सदानंदराव शिवेश्वरकर I.C.S. परिक्षा पास झाल्याचें ऐकून त्यांस कृतकृत्या झाल्यासारखें वाटलें असेल.

परमेश्वर त्याच्या आत्म्यास चिरशांती देवो !

## कै. विठ्ठल नागेश खासनीस

ले. **स. र. सुखटणकर**, बी.ए., एल्‌एल्‌.बी., धारवाड.

गुरुवर्य खासनीस यांचा जन्म इ. स. १८७९ सालीं खानापूर येथें झाला. ते पितृसुखास लहानपणींच आंचवले व त्यांचें शिक्षण त्यांचे मामा श्री. मैझरकर यांनीं केलें. धारवाड हायस्कूलमधून प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर त्यांनीं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें इंटरपर्यंत अध्ययन केलें व पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतून १९०४ सालीं ते बी. ए. झाले. लगेच त्यांना धारवाड हायस्कुलांत नोकरी पत्करावी लागली. तेथून लवकरच त्यांची बदली बेळगांवच्या सरदार हायस्कूलांत झाली व तेथेंच ते अखेरपर्यंत काम करीत होते.

श्री. खासनीस यांची अत्यंत नामांकित शिक्षकांत गणना होती. त्यांची शिकविण्याची हातोटी अप्रतिम होती. इंग्रजी भाषा व इतिहास हे त्यांचे आवडते विषय होते. इंग्रजी भाषेवर त्यांचें विशेष प्रभुत्त्व होतें. विद्यार्थ्यांवर त्यांचें वजनहीं तसेंच असे. व्रात्य व उच्छृंखल विद्यार्थीसुद्धां त्यांना नमून असत–इतका पूज्यभाव त्यांच्याबद्दल विद्यार्थ्यांत असे. विद्यार्थ्यांवर संतापणें किंवा त्यांस शिव्या देणें हें त्यांस माहित नव्हतें. ' प्रगतीला भिति नाहीं' असा त्यांचा विद्यार्थ्यांस उपदेश असे.

'अक्रोधेन जयेत् क्रोधं असाधुं साधुना जयेत्' अशा प्रकारच्या आपल्या वृत्तीनें बेळगांवांतील लहानथोरांचीं मनें त्यांनीं आकर्षित करून घेतलीं होतीं. परंतु वरिष्ठांच्या पुढेंपुढें करण्याची त्यांना संवय नसल्यामुळें त्यांना हेडमास्तरची जागा मिळाली नाहीं. त्यांचीं

सामाजिक व राजकीय मतें उदार होतीं. ढोंगधत्तुऱ्याचा त्यांना तिटकारा वाटे.

खासनीस यांचें सर्व आयुष्य कष्टांत गेलें, व कौटुंबिक दुःखाचेही बरेच प्रसंग त्यांच्यावर आले. यामुळें अलीकडे त्यांच्या मनांत थोडासा निराशावाद डोकावूं लागला होता. लवकरच सेवानिवृत्त होऊन ऊर्वरित आयुष्य समाधानांत काढूं अशी त्यांस आशा वाटत होती. परंतु देवाची इच्छा दुसरीच होती !

गेल्या उन्हाळ्याच्या सुटींत ते आपल्या चिरंजीवाकडे बैलहोंगल येथें राहावयास गेले होते; तेथें कॉलेरिक डायारियाच्या विकारानें ता. ६।६।३५ रोजीं त्यांचा अंत झाला. त्यावेळीं त्यांचें वय ५४ वर्षांचें होतें.

त्यांच्या मृत्युबद्दल दुःखप्रदर्शनार्थ सरदार हायस्कूलमध्यें सार्वजनिक सभा भरून त्यांच्या असंख्य शिष्यांनीं आपल्या पूज्य गुरूंचें स्मारक करावयाचें ठरविलें आहे, व तत्प्रीत्यर्थ एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे.

विद्या विभूषित विनीत सुशांत वृत्ति ।
विद्यार्थि वृन्द सुखवी सुकला तुझी ती ।
जी दे अम्हां गुरुकुलस्मृतिमोददायी ।
गेलासि हाय ! पसरे तम बेळगांवीं ॥ १ ॥

## श्री. रामचंद्र शंकर टाकी ऊर्फ श्री. भाई

श्री. रामचंद्र शंकर टाकी ऊर्फ टाकी महाराज हे जोगेश्वरी येथें ता० १४ ऑक्टोबर रोजीं दिवंगत झाले, हें नमूद करावयास आम्हांस फार वाईट वाटतें.

श्री. भाईचा जन्म १८५७ सालीं मुंबईत झाला. डॉ. भाऊ दाजी व टाकी यांचे वडील यांचा घरोबा होता. त्यांचें शिक्षण सेंट झेवियर हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजांत झालें. १८८३ सालीं बी. ए. झाल्यावर ते शिक्षणखात्यांत शिरले. कारवार हायस्कूलांत नोकरी केल्यावर १८८९ सालीं त्यांची डे. ए. इन्स्पेक्टरच्या जागीं नेमणूक झाली. त्या जागेवर २८ वर्षें निरनिराळ्या जिल्ह्यांत काम करून व लोकप्रियता संपादन करून ते १९०९ सालीं फर्लोवर गेले, व त्यांनीं पेन्शन घेतलें.

प्राथमिक शाळांसाठीं त्यांनीं तयार केलेला शिक्षणक्रम अद्याप सुरू आहे. एडवर्डसुसाहेबांच्या गॅझेटियरमधील ' मुंबईतील शिक्षणाचा इतिहास' हें प्रकरण श्री. भाईनीं लिहिलें आहे.

टाकींचा बालपणापासून भक्तिमार्गाकडे ओढा होता.

पेन्शन घेतल्यावर त्यांनीं रामेश्वर, पुरी इत्यादि ठिकाणीं यात्रा केल्या. मराठींतील तुकाराम व वामनपंडित हे त्यांचे आवडते कवि. वाईजवळील मोडकळीस आलेल्या वामन पंडिताच्या समाधीचा जीर्णोद्धार १९२१ सालीं करून त्यांनीं वामनावरील आपलें प्रेम व्यक्त केलें. त्यांच्या पुण्यतिथीसही टाकी पुष्कळ मंडळींसह १९२९ पर्यंत दरसाल जात असत. पुढें प्रकृति क्षीण झाल्यामुळें त्यांनीं आपल्या जोगेश्वरी येथील सद्भक्तिमंदिरांत पंडितांच्या पादुका स्थापिल्या व तेथेंच ते पुण्यतिथि साजरी करूं लागले.

१९१७ सालांत टाकींनीं भगवद्गीतेवर टीका इंग्रजींत प्रसिद्ध केली. त्या टीकेचे तीन भाग आहेत. त्यांची दुसरी भाषा लॅटिन असल्यामुळें त्यांस मुद्दाम संस्कृत शिकावें लागलें. हा त्यांचा ग्रन्थ बराच लोकप्रिय आहे.

१९२२ सालांत त्यांच्या सद्भक्तिमंडळाची स्थापना झाली. १९२३ सालांत त्यांनीं जोगेश्वरी येथें श्रीरामेश्वरमंदिराची स्थापना केली, व दररविवारीं धार्मिक प्रवचनें करावयास सुरवात केली. बहुश्रुतता, सहृदयता व प्रेमळपणा यांमुळें हीं त्यांचीं प्रवचनें फारच परिणामकारक होत असत. १९२८ सालांत त्यांनीं सद्भक्तिप्रकाश मासिक सुरू केलें. त्यांनीं इंग्रजींत पुष्कळ धार्मिक ग्रंथ लिहिले आहेत. त्याचप्रमाणें पुरुषार्थदीपिका व ज्ञानेश्वर महाराज अथवा सद्भक्तिविजय असे त्यांचे दोन मराठी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो !

# कविता—हुंडा

किती वाढला हुंडा-राक्षस घालितसे थैमान ॥ जगतीं ॥ घालितसे थैमान ॥
नवल वाटतें मच्चित्तातें लवविति यातें मान ॥ जन कां ॥ लवविति यातें मान ॥

जरि गरिबाच्या झोंपडींत तो खाया ना दाणा ॥ धड ही ॥ खाया ना दाणा ॥
परि लग्नाला उभा राहतां "हजार ते आणा" ॥ बोले ॥ 'हजार ते आणा' ॥

श्रीमंताच्या सदनिं कशाची ददात ती नाहीं ॥ कधिंही ददात ती नाहीं ॥
हेही खरोखर घेति भयंकर दया न त्यांनाही ॥ तिळही ॥ दया न त्यांनाही ॥

सुशिक्षित असा जो पदवीधर तरूण कीं असतो ॥ ऐसा । तरूण कीं असतो ॥
तो इतरांहुनि चौपट खचितचि घेउनियां बसतो ॥ हुंडा ॥ घेउनियां बसतो ॥

निर्लज्जासम कितिक जन तरी "जन्मसिद्ध हक्क ॥ अमुचा ॥ जन्मसिद्ध हक्क ॥
हुंडा घेणें आहे" म्हणुनी म्हणति पहा चक्क ॥ ऐसें ॥ म्हणति पहा चक्क ॥

पूर्वकालिं ही वरा दक्षिणा म्हणोनियां चाल ॥ पडली ॥ म्हणोनियां चाल ॥
स्त्रीवर्गाचे आतां साचे करी परी हाल ॥ अतिशय ॥ करी परी हाल ॥

दक्षिणेचें रूप खुषीचें, ही बनली सक्ती ॥ केवळ ॥ ही बनली सक्ती ॥
आर्यस्त्रियांना सुटण्या यांतुनि काढा हो युक्ती ॥ कांहीं ॥ काढा हो युक्ती ॥

शिक्षित चतुर सुशीला कन्या देती मूर्खाला ॥ कोणी ॥ देती मूर्खाला ॥
तिच्या गुणांचें चीज कराया अक्कल ना त्याला ॥ लवही ॥ अक्कल ना त्याला ॥

उदारधी कनवाळू जी का मूर्तिच अवतरली ॥ दयेची ॥ मूर्तिच अवतरली ॥
परिस्थितीनें गरिबा पडुनी दया सकल जिरली ॥ तियेची ॥ दया सकल जिरली ।

अक्षरशत्रू जी मतिमंदा मिळे शिक्षितास ॥ पत्नी ॥ मिळे शिक्षितास ॥
छत्तीसांचा त्या उभयांचा अंक गमे खास ॥ जणूं कीं ॥ अंक गमे खास ॥

अमंगलाचें स्मरण असुनिही देती वृद्धाला ॥ बाला ॥ देती वृद्धाला ॥
वैधव्याचा दारुण अवचित तिजवरती घाला ॥ पडतो ॥ तिजवरती घाला ॥

कलहप्रिय जी कानही पितळी चंचल चित्ताची ॥ मूढा ॥ चंचल चित्ताची ॥
धनिकगृहीं ती पडतां होते अब्रू वित्ताची–॥ हानी ॥ अब्रू वित्ताची ॥

अविवाहित ठेवाया दुहिता धैर्य नसे पितया ॥ बहुधा ॥ धैर्य नसे पितया ॥
कारण कीं ते समाजबांधव छी थू करिति तया ॥ सकलहि ॥ छी थू करिति तया ।

"कुमार्गगामिनि होइल" म्हणती राहतां महिलेला–॥ कुमारी ॥ राहतां महिलेला ।
मनोनिग्रहा कवण शिकवि मग सांगा विधवेला ॥ जगतीं ॥ सांगा विधवेला ॥

नावडला तरि सोडुनि करिती दुसरी तत्काळ ॥ भार्या ॥ दुसरी तत्काळ ॥
आयुष्याचे दिन मोजुनियां घालविते काळ ॥ पहिली ॥ घालविते काळ ॥

करिति न कोणी विवाह दुसरा परि माहेराला ॥ टाकिती ॥ परि माहेराला ॥
अशा प्रकारें स्त्री जातीच्या वर्णु किती हाला ॥ सर्वही ॥ वर्णु किती हाला ॥
सकलहि ऐसी अर्थासाठीं अनर्थसीमा ती ॥ झाली ॥ अनर्थसीमा ती ॥
हुंड्यापायीं विषमविवाहें जन्माची माती ॥ होते ॥ जन्माची माती ॥
सुधारणा त्या सर्व कराव्या सुधारकां वाटे ॥ चित्तीं ॥ सुधारकां वाटे ॥
अधमपणाच्या ह्या रूढीच्या जाति न कां वाटे ॥ कुणिही ॥ जाति न कां वाटे ॥
वरास हुंडा देणें होतो हा अन्याय महान् ॥ खरोखर ॥ हा अन्याय महान् ॥
करील जितुके विवाह तितका पुरूष तो श्रीमान् ॥ होतो ॥ पुरूष तो श्रीमान् ॥
हुंडा देणें योग्य वधूला, दुजी वरील जरी ॥ पति तो ॥ दुजी वरील जरी ॥
सोडुनि हिजला, तरी बिचारी खाइल जन्मभरी ॥ हुंडा ॥ खाइल जन्मभरी ॥
धनाश्रयानें श्रीमंताचे दोषहि गुण म्हणती ॥ लोकीं ॥ दोषहि गुण म्हणती ॥
म्हणोनियां ही मोडा रूढी धनवानां विनती ॥ करितें ॥ धनवानां विनती ॥
क्वचित् कुठेंही अपवाद असा असेल हुंड्याला ॥ कुणीही ॥ असेल हुंड्याला ॥
या मदुक्तिचा रोष धरूं नका विज्ञप्ती त्याला ॥ माझी ॥ विज्ञप्ती त्याला ॥
सूज्ञ जनांनो विचार करुनी सोडा ही जबरी ॥ तुम्ही । सोडा ही जबरी ॥
अनेक गरिबां वांचविल्याच्या श्रेया घ्या पदरीं ॥ आतां ॥ श्रेया घ्या पदरीं ॥
सभोंवतीं हें नजर फेकितां दृश्य दिसे नयनां ॥ माझ्या ॥ दृश्य दिसे नयनां ॥
शांति न वाटे म्हणुनि कळविलें रचुनी या कवना ॥ जन हो रचुनी या कवना ॥

मु० **चंदगड,**
जि०—बेळगांव

कुमारी—**शांता सखाराम करंडे**
ता. २६ आक्टोबर १९३५ इ.

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद् व प्रदर्शन--१९३५

## पारितोषिकें

**प्रथम विभागः—चित्रकला, शिल्पकला, छायाचित्र वगैरे**

### सुवर्णपदक

| | देणाराचें नांव | मिळविणाराचें नांव | कशासाठीं |
|---|---|---|---|
| १ | श्री. सौ. शांताबाई पाटकर | श्री. ए. ए. भोंसुले | विभागांतील सर्वोत्कृष्ट काम |
| २ | श्री. सरस्वतीबाई राजाध्यक्ष (कै. श्री. मं. वि. राजाध्यक्ष यांच्या स्मरणार्थ) | ,, दिनकर ए. कुमठेकर | तैलरंगांतील सर्वोत्कृष्ट तसबीर |
| ३ | ,, डॉ. आर्. एस्. तिरोडकर | ,, एस्. ए. कालेलकर | सर्वोत्कृष्ट छाया चित्र |
| ४ | ,, ,, | ,, आर्. एस्. सावर्डेकर | Composition |
| ५ | मेसर्स व्ही. प्रभा कंपनी | ,, नारायण एन्. पाटकर | पोस्टर |
| ६ | प्रदर्शन मंडळ | ,, आर्. जी. चिमुलकर | Best design for a Certificate of Merit |
| ७ | श्री. बी एम्. मुळगांवकर | ,, व्ही. आर. तळवडेकर | वॉटर कलर |
| ८ | ,, डॉ. ए. एस्. पै | ,, आर्. जी. चिमुलकर | तैलरंगांतील सर्वोत्कृष्ट काम |

### रौप्यपदक

| | मिळविणाराचें नांव | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री. कु. माणिक राजाध्यक्ष | Water Colour | 'Messenger' |
| १० | ,, एम्. देसाई | Photograph | 'the Artist' |
| ११ | ,, बी. ए. कुमटेकर | Landscape from Danda | |
| १२ | ,, व्ही. आर्. तळवडेकर | Head study, oil colour | |
| १३ | ,, आर्. जी. चिमुलकर | Water colour | "Waiting" |
| १४ | ,, व्ही. आर्. तळवडेकर | Photograph | चौपाटीवरील महाशिवरात्र |
| १५ | ,, कु. चंपू नेवरेकर | Water colour | "a Study" |
| १६ | ,, एम्. व्ही. दुभाषी | Photo | "Bijapur architecture" |
| १७ | ,, सौ. राधा सालेतूर | Oil colour | "Still life" |
| १८ | ,, आर्. व्ही. गावनेकर | Water colour | "To the Lake" |
| १९ | श्री. कु. चंपू नेवरेकर | Oil colour | "Flowers" |
| २० | ,, आर्. व्ही. गावनेकर | Water colour, | "Still Life" |
| २१ | ,, बी. व्ही. चिटणीस | ,, | "Wet Day" |
| २२ | ,, पी. जी. शिरूर | ,, | "Darjiling", |
| २३ | ,, कु. चंपू. नेवरेकर | Oil colour | Fakir |
| २४ | ,, एच्. आर्. करंडे | Oil Colour | Still Life |
| २५ | ,, पी. एन्. कल्याणपूर | Oil Colour | Sketch Portrait |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | ,, कु. चंपू नेवरेकर | Water Colour | Moon light |
| २७ | ,, सौ. चंद्रप्रभा धोंड | Water Colour | Still Life |
| २८ | ,, वी. व्ही. चिटणीस | Drth ,, | ,, |
| २९ | ,, आर्. एस्. सावर्डेकर | Oil Colour, | "My Friend's portrait" |
| ३० | ,, सौ. गंगूबाई त्रासी | Water Colour | Flower Design |
| ३१ | ,, कु. कृष्णाबाई कवाड | ,, | Bana Ganga |
| ३२ | ,, श्री. सी. एस्. प्रभाकर | ,, | Portrait from Life |
| ३३ | ,, पी. जी. शिरूर | Water Colour | "Elephanta Cares.' |

## द्वितीय विभाग: — Domestic शिवणकाम, भरतकाम वगैरे

### सुवर्णपदक

| | देणाराचें नांव | मिळविणार | कशासाठीं |
|---|---|---|---|
| १ | श्री. सौ. विमलाबाई गणपतराव राजाध्यक्ष | श्री. सौ. मंजुळाबाई भांडारे. | विभागांतील सर्वोत्कृष्ट काम |
| २ | श्री. ज. वि. वर्दे, कै. विठ्ठलराव वर्दे यांचे स्मरणार्थ | ,, ,, सुंदराबाई कुबेर, | कपडे वेतणें, व शिवणें Coat & Pant |
| ३ | ,, वा. शां. दाभोळकर, ( कै. उमाबाई शां. दाभोळकर यांचे स्मरणार्थ ) | ,, ,, सीताबाई पडबिद्री | Handicraft वेताची टोपली |
| ४ | ,, सौ. कस्तुरबाई डी. लाड | श्री. जगदीशचंद्र कर्णीक. | Artistic Panel |
| ५ | ,, नारायण अनंत वागळे | श्री. सौ. लीला डी. मुंडकूर | बेसनलाडू "पाकशास्त्र' |
| ६ | ,, डॉ. जे. एस्. नेरूरकर, (कै.शांताराम नारायण वकील यांचे स्मरणार्थ) | श्री. सौ. सुशीलाबाई मोहनराव गोकर्ण | Hardinger drawn thread पोलका |
| ७ | ,, सौ. लक्ष्मीबाई परुळकर | कु. शांता गुणाजी; | कशिदा. |
| ८ | ,, पं. रा.दळवी. (कै. रामराव दळवी यांचे स्मरणार्थ ) | श्री. सौ.सुशिलाबाई पाडगांवकर | Best Needle work or Embroidey |
| ९ | ,, सौ. दुर्गाबाई माडगांवकर रोखबक्षिस | श्री.सौ.नलिनीबाई पाटकर | Needlework, knitting जंपर |
| १० | ,, सौ. नलिनीबाई दळवी | श्री. के. जी. सरदेसाई; | Carving चंदनी देव्हारा |
| ११ | ,, एस्. आर्. हळदवणेकर | श्री. कु. सुमती वसंतराव नाईक; | "चांदबीबी" रांगोळी |

### रौप्यपदक

| | मिळविणाराचें नांव | कशासाठीं |
|---|---|---|
| १२ | श्री. सौ. राधा सालेतोर | Machine Embroidery,झबलें |
| १३ | ,, ,, शांताबाई तलगिरी | Cutting and Sewnig ,Silk Frock |
| १४ | श्री. कु. सुशीला कालेलकर | Crochet,मोराचा रुमाल |
| १५ | श्री. आर्. आर्. प्रभू | Fretwork |
| १६ | श्री. सौ. लीला मुंडकूर | Cookery, घीवर |
| १७ | ,, ,, मंजुळाबाई भांडारे | जरीचें काम, कंबरपट्टा |
| १८ | ,, ,, शांता मुळगांवकर | Hardinger, उशी |
| १९ | ,, कु. सुमति वसंतराव नाईक | Drawn Thread टेबल क्लॉथ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ता. ... नं. ... दा नं.

| | | |
|---|---|---|
| २० | श्री. सौ. एम्. सगुणाबाई | Cross stitch |
| २१ | ,, ,, पार्बतीबाई नाडकर्णी, बडोदें | कशिदा |
| २२ | ,, ,, लीला मुंडकूर | फेरीवर्क |
| २३ | ,, ,, मंजुळाबाई भांडारे | Glass painting, Tulips |
| २४ | ,, सुशिलाबाई पाडगांवकर | Silk Painting |
| २५ | ,, कु. चंपूबाई नेवरेकर | Brush Painting |
| २६ | ,, सौ. कमलाबाई नारायण वागळे | पोतीची फ्रेम |
| २७ | श्री. सौ. मंजुळाबाई भांडारे | Leather Work |
| २८ | श्री. गुडे | Paper work |
| २९ | श्री. मधुकर रामचंद्र शणई | Scale work |
| ३० | श्री. सौ. विमल मुजुमदार | Black & White |
| ३१ | ,, ,, यू. मित्राबाई | Wonders of the sea |
| ३२ | ,, कु. सुशीला डी. मुळगांवकर | Ribbon sinel |
| ३३ | ,, कुळकर्णी ब्रदर्स | "बारा आसनें;" Modelling |
| ३४ | ,, कु. सुंदरी पंडित, वय १३ | रांगोळी. |

## तृतीय विभागः— Juvenile Section बालविभाग

### सुवर्णपदक

| | देणाराचें नांव | मिळविणार | कशासाठीं |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम ना. देसाई मातृस्मरणार्थ | कु. रवीन्द्र भांडारे | विभागांतील सर्वोत्कृष्ट काम |
| २ | श्री. सौ. इंदिराबाई लक्ष्मीकांत दाभोलकर | ,, प्रेमा मंगेश नाडकर्णी | Fretwork |
| ३ | श्री. सौ. इंदिराबाई अनंत शिरगांवकर | ,, प्रेमा कामत | झिगाचें काम |
| ४ | श्री. सरदार तेंडुलकर | ,, महाबळेश्वर व्ही. वाघ | पेंटिंग |
| ५ | श्री. सौ. कृष्णाबाई मोरेश्वर रांगणेकर | ,, प्रेमा मंगेश नाडकर्णी | |
| ६ | श्री. नीळकंठ घनःशाम नाडकर्णी | ,, शांताराम सुकथनकर | Best Boys' work |
| ७ | श्री. सौ. सुशिलाबाई नाबर, (कै. बाजी नारायण नाबर स्मरणार्थ) | ,, शैलबाला डा. कंटक | Best Girls' work |
| ८ | श्री. सौ. डॅा. मालिनीबाई सुकथनकर | ,, हिराबाई डी. नाडकर्णी | Miscellaneous |

### रौप्यपदक

| | मिळविणार | |
|---|---|---|
| ९ | कु. हेरंब कंटक | हस्ताक्षर |
| १० | ,, राजिवी नाईक | Pen & Ink work |
| ११ | ,, सत्यानंद सावर्डेकर | जॅामेट्रीचें डिझाइन |
| १२ | ,, मिरा दत्तात्रय तेंडुलकर | Water Colour |
| १३ | ,, स्नेहलता कोरगांवकर | Oil Colour |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कु. | गुलाब सुकथनकर | सोळावर्षांपेक्षां कमी वयाच्या मुलीचें उत्कृष्ट काम |
| १५ | ,, | नलिनी रघुनाथ गायतोंडे | Knitting work |
| १६ | ,, | लीला कामत | झाग |
| १७ | ,, | विमल हेगडे | Silk Knitting |
| १८ | ,, | कौसल्या पदुकोणे | Kachhi Knitling |
| १९ | | नवीवाडी कन्या शाळा | Sewing & Knitting |
| २० | ,, | शांता नेरूरकर | Embroidery |
| २१ | ,, | शांता मंगेश भट | General Embroidery |
| २२ | ,, | इंदिरा जी. कोरगांवकर | उशा गिरद्या वगैरे |
| २३ | ,, | जमना वसंत लाड | Fretwork |
| २४ | ,, | वत्सा बी. कुळकर्णी | टोपली विणणें |
| २५ | ,, | लीला कामत | सुतारकाम |
| २६ | ,, | गिरगांव मुलींची शाळा | Popee canvas Painting |
| २७ | ,, | एम्. व्ही. कुळकर्णी | Hobbies & collections |
| २८ | ,, | दयाराम जी. राजाध्यक्ष | General Models |
| २९ | ,, | प्रमिला जयवंत वेलिंगकर | Frames in general |
| ३० | ,, | मुकुंद आर्. लाड | General Handicraft |
| ३१ | ,, | प्रमिला व्ही. देसाई | भरत काम; Frames |
| ३२ | ,, | गिरिजा भट | Model |
| ३३ | ,, | शारदा विणेकर | बियांचें काम |

रौप्य पदकांसाठीं व प्रदर्शनासंबंधीं बक्षिसांसाठीं किंवा खर्चासाठीं देणग्या देणाऱ्यांचीं नावें तसेंच दुसरीं कांहीं मागाहून बक्षिसें मिळविणारांचीं नावें, व उत्तम शेरा मिळविलेल्या चित्रांची माहिती स्थलसंकोचामुळें प्रसिद्ध करितां येत नाहीं त्याबद्दल दिलगिरी वाटते.

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद्

## स्टँडिंग कमिटीच्या पहिल्या सभेची हकीकत

### गोषवारा, व ठराव

सं. गौ. सा. ब्रा. परिषदेच्या नवव्या अधिवेशनांत नेमलेल्या स्टँडिंग कमिटीची पहिली सभा ता. २४ नोव्हेंबर १९३५ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां मुंबई येथें सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत श्री. बा. सी. कामत, बी. ए., एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. कमिटीचे ३२ सभासद सभेस हजर होते.

श्री. मुर्डेश्वर यांनीं नवीन सभासद स्वीकृत (Co-opt.) करून घेण्याचा ठराव मांडला; त्यावर बॅ. तेंडोलकर यांनीं अशी हरकत घेतली कीं, स्टँ. कमिटीस सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार नाहीं. त्यावर सभासद स्वीकृत करण्याच्या आपल्या सूचनेस परिषदेनें संमती दिल्यामुळें तो ठरावच समजला पाहिजे त्या अर्थी स्टँ. कमिटीस प्रतिनिधि नसलेल्या मुंबईबाहेरील विभागांतून सभासद स्वीकृत करून घेतां येतील असें अध्यक्षांनीं रूलिंग दिलें.

सभासद स्वीकृत करण्यासाठीं वगैरे पुढील विभाग असावे असें ठरलें.

१ दक्षिण महाराष्ट्र २ रत्नागिरी ३ कराची ४ कोल्हापूर (संस्थान) ५ म्हैसूर (संस्थान) ६ ग्वाल्हेर (संस्थान) ७ इंदूर (संस्थान) ८ मद्रास (प्रांत) ९ उत्तर कर्नाटक १० दक्षिण कर्नाटक ११ कोचीन (संस्थान)

दक्षिण महाराष्ट्राकरितां श्री. के. पद्मनाभराव यांस स्वीकृत केलें. इतर विभागांतील सभासद स्वीकृत करण्याचें काम या सभेंत न करतां (प्रथम माहिति मिळवून) पुढें करण्याचें ठरलें.

नंतर पास झालेले ठराव:—

**ठराव १ :**—परिषदेचे उद्देश साध्य करण्यासाठीं मुंबईंत व इतर केंद्रांत स्थानिक कमिट्या नेमाव्या. या कमिट्यांचें नांव संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मणसभा असें असावें. त्यांचे सभासद, व कार्य इत्यादि बाबी पुढीलप्रमाणें असाव्या:—

(अ) परिषदेचा घटनेचा नियम २ मान्य करणाऱ्या व दरसाल आठ आणे वर्गणी देणाऱ्या कोणाही गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीच्या व्यक्तींस या सभेचे सभासद होतां येईल.

(ब) अशा प्रत्येक सभेनें सभासदांकडून जमविलेल्या वर्गणीपैकीं निम्मे रक्कम परिषदेकडे पाठवावी व बाकीची अर्धी स्वतःच्या उपयोगासाठीं ठेवावी.

(क) अशा सभांस जोडून क्लब, वाचनमंदिर पुस्तकालय, महिला शाखा, स्त्रियांसाठीं शिक्षणाचे वर्ग अशा एक किंवा अधिक योजना करतां येतील व फक्त त्या योजनांसाठीं किंवा अशाच सोईसाठीं म्हणून निराळी जादा वर्गणी ठेवतां येईल.

श्री. मुर्डेश्वर हा ठराव मांडतांना म्हणाले कीं, अशा सभा स्थापन करविणें हें परिषदेचें प्रथम कार्य असून, त्यावर परिषदेचें चिरस्थायित्व अवलंबून आहे. या सभा स्थापन झाल्यावर घटना तयार करणें घटनाकमिटीस सोपें जाईल. डिरेक्टरीसाठीं माहिती मिळविण्यास या सभांचा फार उपयोग होईल. फक्त या सभांच्या सभासदांचाच निर्देश डिरेक्टरींत करावा. या सभांचें परिषद हें फेडरेशन असावें.

**ठराव २:**—परिषदेच्या उद्देशांविषयीं सहानुभूति ठेवणाऱ्या ज्या गौड सारस्वत संस्था आज आहेत, त्यांनीं परिषदेशीं संलग्न होण्यासाठीं अर्ज करून दर साल रुपये १० वर्गणी दिल्यास त्यांस संलग्न संस्था म्हणून परिषदेशीं संलग्न करून घेतां येईल.

**ठराव ३:**—

(अ) परिषदेचा ठराव ५ प्रमाणें स्वज्ञातियांची डायरेक्टरी तयार करण्यासाठीं एक कमिटी नेमावी.

( ब ) या कमिटींत पुढील सभासद नेमण्यांत यावे.

१ रा. ब. एस्. एस्. तालमकी
२ श्री. आर्. के. प्रभु
३ ,, एस्. पी. वर्दे
४ ,, जी. पी. मुर्डेश्वर
५ डॉ. एस्. संजीवराव
६ श्री. एस्. व्ही. शिरगांवकर
७ ,, एस्. एम्. वर्दे
८ ,, एस्. एल्. कापडी
९ ,, आर्. एस्. पडबिद्री
११ ,, डी. ए. तेलंग
११ ,, बी. बी. पाटकर
१२ ,, वाय्. एच्. सुखटणकर
१३ डॉ. व्ही. पी. कामत

(क) या कमिटीस आणखी सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असून परिषदेचा ठराव ५ यांतील डायरेक्टरीसाठीं कोणती माहिती जमा करावयाची तें त्यांनीं ठरवावें व जरूर ती माहिती मिळविण्यासाठीं मुंबईत व इतरत्र व्यवस्था करावी. या कमिटीच्या उपरिनिर्दिष्ट सभासदांपैकीं पहिल्या तिघांकडे डायरेक्टरी तयार करण्याचें व संपादनाचें काम सोंपविण्यांत आलें आहे.

डायरेक्टरीसाठीं मिळविण्याच्या माहितीचा तक्ता पसंतीसाठीं स्टॅ. कमिटीच्या पुढील सभेंत मांडावा असें अध्यक्षांनीं सांगितलें.

परिषदेच्या कांहीं ठरावांविषयीं सेक्रेटरींनीं पुढील माहिती दिली व सभेनें त्यासंबंधीं पसंती दर्शविली.

(१) ठराव ३ अन्वयें घटना तयार करण्याच्या कमिटीची सभा करावयाची ती स्थानिक कमिटयांची रचना झाल्यावर किंवा त्या दिशेनें कांहीं तरी प्रयत्न झाल्यावर म्हणजे येत्या फेब्रुवारी महिन्याच्या सुमारास बोलवावी.


( २ ) ठराव ८ प्रमाणें सह विवाहांसाठीं रजिस्टर तयार करण्याचें काम डायरेक्टरीच्या कामाबरोबरच करावें.

( ३ ) ठराव १६ ( ब ) प्रमाणें पूर्वीच्या जनरल सेक्रटरींनीं रु. ६००० किंमतीचे रोखे सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेंत ठेवले असून हिशेबांचें ऑडिट व्हावयाचें आहे.

( ३ ) ठराव १९ अन्वयें १९१७ सालीं अलिबागेस भरलेल्या अधिवेशनाचा अहवाल तयार करून प्रसिद्ध करावयाचा तो श्री. एस्. एम्. वर्दे; श्री. वाय्. एच्. सुखटणकर व श्री. ए. जी. तेंडुलकर यांनीं करावा.

**ठराव ४:**–बॅ. एस्. आर्. तेंडोलकर, श्री. जी. पी. मुर्डेश्वर, श्री. एस्. पी. वर्दे व श्री. एस्. एम्. वर्दे यांची पोटकमिटी नेमण्यांत आली असून या कमिटीनें मुंबईतील गौ. सा. ब्रा. ज्ञातीचीं देवालयें व धर्मार्थ संस्था यांच्या ट्रस्टींबरोबर विचारविनिमय करून परिषदेचा ठराव ११ अन्वयें मध्यवर्ति इमारत बांधण्याची योजना तयार करावी. ही योजना तयार करतांना कायद्याच्या बंधनांचा योग्य विचार करावा. कमिटीनें आपला रिपोर्ट स्टॅ. कमिटीस लवकर सादर करावा.

**ठराव ५:**–कारकुनाचा पगार, पोस्टखर्च, भाडें वगैरे ऑफिस-खर्चासाठीं दरमहा रु. ३० पर्यंत ऑफिस-फंडांतून खर्च करण्यास मंजुरी देण्यांत आली.




वर्ष १४ वें नोव्हेंबर-डिसेंबर १९३५ अंक ६ वा

हिज मास्टर्स व्हाइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

नवीन कोरे रेकॉर्डस् व

ग्रामोफोन मशीन्स

मिळण्याचें एकच ठिकाण.

ऑथाराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई

फोन नं. २४१४१

नवीन व कोऱ्या रेकार्डसूचा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2, and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahmin Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:—S. M. Varde, B.A., LL.B.

# धी इंडिया प्राव्हिडंट कंपनी लिमिटेड

कलकत्ता

स्थापना १९१० ] लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमा-कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरिएंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहू एकच कंपनी गणली जाते. " हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स् पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—

भेटण्याची जागा व वेळः—
घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट,
गिरगांव, कोणत्याही दिवशीं सायंकाळीं
६ ते १० ( स्टँ. टा. )

**आर. एम्. दिवाडकर आणि कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
माझगांव, मुंबई नं. १०



# कामत आणि कंपनी

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड


आमच्या दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर, सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाईकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

Phone No. 42476

नवव्या संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेचे अध्यक्ष



श्रीयुत बाळकृष्ण सीताराम कामत, बी. ए., एम्. एल्.सी.



संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेतर्फे भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटन समयीं घेण्यांत आलेला फोटो

डावीकडून उजवीकडे:—

१ श्री. सौ. कमलाबाई डोंगरकेरी. २ श्री. सौ. सुंदराबाई शिरूर.
३ श्री. सौ. शांताबाई पाटकर. (प्र. क. अध्यक्ष)

स. २० ता. ६ ता. ग.

॥ श्री ॥

महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १४ वें नोव्हेंबर-डिसेंबर १९३५ अंक ६ वा

# परिषद् झाली: पुढें काय ?

संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें आठवें अधिवेशन अलिबाग येथें ता. ७।८।९ एप्रिल १९१७ या दिवशीं मोठ्या थाटानें पुरें पडलें. परिषदेचें कार्य अव्याहत चालावें, स्वज्ञातीची खानेसुमारी पुरी करावी हे व अशा प्रकारचे ठराव मोठ्या उत्साहानें या अधिवेशनांत पास झाले. इतकेंच नव्हे, तर अलिबाग येथें सारस्वत विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह बांधण्याची योजना होऊन त्या कामासाठीं सुमारें हजार रुपयांचे आंकडेही पडले. परिषदेचें पुढील कार्य व्यवस्थितपणें व जोमानें चालेल अशी सामान्यतः आशा वाटण्यासारखी परिस्थिति या अधिवेशनाचे अखेरीस होती.

परंतु परिषदेची अंतःस्थिति ज्यांना माहित होती त्यांना हें अधिवेशन बहुशः शेवटचें ठरणार अशी भीति वाटत होती. इंदूर-परिषदेच्या अखेरीस पुढील अधिवेशन कोठें व कसें भरवायाचें याची कांहींच व्यवस्था झाली नव्हती. इंदूर येथें परिषदेची इतिश्री झाली असा बोल लागू नये म्हणून मोठ्या परिश्रमानें अलिबागचें निमंत्रण मिळविण्यांत आलें होतें व त्या निमंत्रणानुसार परिषद् भरविल्यावर पुढील निमंत्रणाचें चिन्ह दिसेना याचाही अध्यक्षांनीं अत्यंत खेदानें आपल्या समारोपाच्या भाषणांत उल्लेख केला होता. अलिबागच्या अधिवेशनानंतर परिषदेसंबंधीं इतकें औदासीन्य उत्पन्न झालें कीं, त्या अधिवेशनाचा अहवाल प्रसिद्ध करण्याची देखील कांहीं एक व्यवस्था झाली नाहीं. अधिवेशनानंतर सहा महिन्यांनीं महाराष्ट्र सारस्वतांत एक त्रोटक व अपुरा अहवाल छापण्यांत आला. त्याच्याही प्रति दोनचार वर्षांत दुर्मिळ झाल्या. परिषद् भरविण्याची कोणालाही इच्छा नाहीं व शक्यताही नाहीं, असें दिसूं लागलें.

ही परिस्थिति होण्यास अनेक निरनिराळीं कारणें होतीं. त्यांपैकीं मुख्य कारण हें कीं परिषदेविषयीं तरुण पिढीला आस्था वाटावी अशी परिषदेची घटना नव्हती. गौड सारस्वत जातींत ज्यांचा अंतर्भाव होतो, असे कित्येक ज्ञातिसंघ पहिल्या मंगळूर-परिषदेंत वगळण्यांत आले होते. त्या चुकीची दुरुस्ती करावी म्हणून बेळगांवची परिषद् मोठ्या परिश्रमानें भरविण्यांत आली. या कामीं कै. शांताराम नारायण ऊर्फ बाबासाहेब दाभोळकर आणि कै. रा. अच्युत भास्कर देसाई या दोघांनीं पुढाकार घेतला होता. त्यानंतर सालोसाल परिषदेचीं अधिवेशनें भरविण्यासाठीं बाबासाहेबांनीं पुष्कळच खटपट केली. त्या कामीं त्यांनीं स्वतःच्या द्रव्याचाही बराच व्यय केला. परिषदेच्या निमित्तानें शिक्षणप्रसारासाठीं धनिकांनीं कांहीं तरी चिरकालिक कार्य करावें, असा पायंडा बेळगांव-परिषदेंत दाभोळकर स्कालर्शिप्स फंड काढून त्यांनीं घातला, त्याचेंही चीज होऊन पुढें बहुशः प्रत्येक अधिवेशनाच्या वेळीं धनिक ज्ञातिबांधवांकडून शिक्षणकार्यास

मदत होत गेली. अलिबाग-परिषदेंत ज्या निरनिराळ्या शिक्षणसंस्थांचा उल्लेख करण्यांत आला, त्या सर्वांचा परिषदेशीं जिव्हाळ्याचा संबंध असून त्यांपैकीं अनेकांचा उगमही परिषदेतूनच झाला. तथापि याबरोबरच परिषदेला कांहीं धनिकांनीं भरविलेल्या मजलशीचें स्वरूप येत गेलें. परिषदेंत राजकारणाला मज्जाव असला, तरी पहिल्या बेळगांव–परिषदेपासून जे कांहीं औपचारिक किंवा नैमित्तिक असे राजकीय छटेचे ठराव होत गेले, ते नव्या पिढीच्या मनाला रुचणारे नव्हते. याचें एकच उदाहरण सांगावयाचें म्हणजे अत्याचारांस आळा घालण्यासाठीं केलेल्या दडपशाहीच्या कायद्यांना विनशर्त व पूर्ण पाठिंबा देण्याचा बेळगांव–परिषदेच्या अधिवेशनांत अध्यक्षांनीं मांडलेला ठराव होय. त्यापुढील अधिवेशनांचे ठराव जरी तितक्या भडक स्वरूपाचे नव्हते, तरी तरुण पिढीच्या वाढत्या राष्ट्रीयत्वाच्या भावनांना ते रुचण्यासारखे नव्हते, यांत शंका नाहीं. यापेक्षां परिषदेच्या घटनेनुसार राजकारणापासून अलिप्त राहण्याचें धोरण परिषदेनें कडकपणें अंमलांत आणणेंच युक्त झालें असतें.

या परिषदेसारख्या परिषदांचें एक प्रमुख कार्य म्हणजे स्वज्ञातीच्या पुढें असलेल्या सामाजिक प्रश्नांचा विचार करणें हें होय. पोटभेदांतील पंक्तिभेद दूर करणें आणि परस्परांशीं रूढ नसलेला किंवा बंद पडलेला विवाहसंबंध घडवून आणणें हें परिषदेचें मुख्य ध्येय होतें. ही सामाजिक सुधारणा करण्याचें मत अंगीकारल्यानंतर तेथेंच थबकून राहावयाचें, पुढें जावयाचें नाहीं, इतर सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणांच्या विचारालाही परिषदेंत मज्जाव करावयाचा किंबहुना त्यांना प्रसंगविशेषीं विरोधही करावयाचा, हें परिषदेच्या पहिल्या अधिवेशनापासून अलिबागेपर्यंत तिच्या कांहीं चालकांनीं स्वीकारलेलें धोरण परिषदेला फारच बाधक झालें. याचीं कांहीं उदाहरणें व्यक्तिविशिष्ट असल्यामुळें त्यांचा निर्देश केला नाहीं, तरी कित्येक उदाहरणें स्पष्ट सांगतां येण्यासारखीं आहेत. मुलींच्या विवाहकालची वयोमर्यादा काय असावी, याविषयींचा ठराव बेळगांव–परिषदेंत आला त्या वेळीं आपल्या ज्ञातींत केवळ मुंबईसारख्या शहरांतच नव्हे, तर खेड्यापाड्यांत देखील पंधरा–सोळा वर्षांच्या उपवर वधूंचीं लग्नं होत होतीं; तरी देखील लग्नाची मर्यादा दहा ते बारापर्यंत असावी. बाराच्या पुढें परिषदेनें जाऊं नये, अशी वृत्ति परिषदेंतील अनेक प्रमुख गृहस्थांनीं प्रदर्शित केली व अखेरीस डॉ. सांबारे यांना हटातटानें झगडा करून चौदा वर्षांची वयोमर्यादा परिषदेकडून ठरवून घ्यावी लागली. विलायतचा प्रवास केलेल्यांना किंवा अस्पृश्य व परधर्मीय यांच्याशीं उघड सहभोजन केल्याबद्दल ज्यांचीं नांवें जाहीर होतीं अशांना परिषदेंतून किंवा निदान परिषदेच्या सहभोजनांतून वगळण्याचा बूट अखेरपर्यंत पुनः पुनः निघत होताच. स्त्रीप्रतिनिधींना परिषदेंत मज्जाव करण्याचा आपल्या पुढारलेल्या ज्ञातीला न शोभणारा ठराव ' प्रचंड ' बहुमतानें मंजूर झाला. परिषदेच्या सहभोजनाचे वेळीं ' सोंवळें ' वस्त्र परिधान करण्याची ताकीद चालू होतीच. परिषदेचें हें सामाजिक प्रतिगामी धोरण परिषदेविषयीं तरुण पिढीच्या मनांत आदर किंवा आस्था उत्पन्न करणारें नसून त्याच्या अगदीं उलट होतें.

परिषदेची रचनाही अशाच अनास्थेला पोषक होती. परिषदेचें अधिवेशन भरण्याची सर्व व्यवस्था मुंबईतील चार दोन माणसांनीं आणि जेथें परिषद् भरावयाची तेथील त्यांच्या स्नेह्यांनीं करावयाची. त्यासाठीं या सूत्रचालकांवर खर्चाचा बराच बोजा पडे हें खरें; परंतु त्याबरोबरच त्यांच्याच घरचें एक कार्य, असें परिषदेला स्वरूप येत असे. ज्ञातिकार्य करणारे प्रमुख गृहस्थ हा कै. बाबासाहेब दाभोळकरांचा लौकिक योग्य होता. त्या लौकिकाला साजेसा स्वार्थत्यागही त्यांनीं केला होता. त्यामुळें त्यांच्याविषयीं आदर धरून त्यांच्या व त्यांच्या स्नेह्यांच्या मतास मान देण्याची आणि त्यासाठीं स्वतःचीं मतें विशेष प्रसंगीं बाजूस ठेवण्याचीही परिषदेच्या अनेक सभासदांची तयारी होती. पण असे प्रसंग वारंवार येऊं लागले.

आपण परिषदेचीं अधिवेशनें भरण्याची खटपट करावी आणि तेथें येऊन कांहीं माणसांनीं सुधारकी प्रश्न उपस्थित करावे आणि आपणांस न रुचणारें धोरण परिषदेच्या माथीं मारूं पाहावें, हें परिषद सुरू करणाऱ्या शिष्ट व वजनदार पुढाऱ्यांना आवडेना. उलट प्रतिगामी आणि सनातनी धोरणाचा पुरस्कार परिषदेनें करावा

आणि मामुली स्वरूपाचे कांहीं ठराव करून वर्षभर पुन: सामसूम व्हावें, हें कांहीं सभासदांना मानेना. परिषदेचें प्रत्यक्ष कार्य वर्षभर लोकांसमोर मधून मधून तरी येईल अशी कोणतीही योजना परिषदेपुढें नव्हती. यामुळें परिषदेविषयीं पूर्ण अनास्था उत्पन्न होऊन परिषद् नकोच, अशी बहुतेकांची प्रवृत्ति मालवण-परिषदेपासून होत चालली होती, ती अलिबाग-अधिवेशनाच्या वेळीं पराकाष्ठेस पोंचली.

याच सुमारास महायुद्धामुळें राजकारणाला महत्त्व आलें. होमरूलची चळवळ हिंदुस्थानांत फैलावली. राष्ट्रीय भावना कमी झाली होती असें मात्र म्हणतां येणार नाहीं. मॉंटफर्ड सुधारणांमध्यें मुसलमान आणि ब्राह्मणेतर यांना मिळालेलें महत्त्वच या विधानाचें समर्थन करण्यास पुरेसें आहे. परंतु धर्मभेद व ज्ञातिनिष्ठा यांस राजकारणाला महत्त्व आल्यामुळें आमच्या परिषदेसारख्या राजकारणाशीं फारखत केलेल्या आणि जेथें राजकारणाचा संपर्क लागला तेथें प्रतिगामी धोरण अंगीकारलेल्या संस्थेची उपेक्षा सहाजिकच झाली. तथापि गौड सारस्वत ज्ञातीचा लोप झाला नाहीं, तोंवर परिषदेची उपयुक्तता नष्ट झालेली नाहीं, ही जाणीव महाराष्ट्र सारस्वतासारख्या मासिकांतून व इतर ज्ञातिसंस्थांच्या सभांतून मध्येंच केव्हां केव्हां दृग्गोचर होत असे.

अलिबाग-परिषदेनंतर पडलेला अठरा वर्षांचा खंड परिषदेला एक प्रकारें उपकारक झाला असें म्हणतां येईल. असहकार चळवळीच्या भरांत तीव्र मतभेदांच्या तापानें अनेक संस्था होरपळून गेल्या. त्या मतभेदांची आंच परिषदेला लागणें बरेंच संभवनीय होतें. त्या काळांतील सुषुप्तावस्थेमुळें परिषद अबाधित राहिली असें म्हणतां येईल.

राजकीय चळवळीचा भर कमी झाल्यावर ज्या सामाजिक प्रश्नांना महत्त्व आलें, त्यांत अस्पृश्यतानिवारण-चळवळीला प्रमुख स्थान मिळेल. गौड सारस्वतांकडे मुंबईतील कित्येक प्रमुख देवालयें असल्यामुळें अस्पृश्यांना मंदिरप्रवेश देण्याचा प्रश्न मुंबईंतील या उदार मतवादी ज्ञातीनें जाहीरपणें हातीं घेतला व गौड सारस्वतांच्या देवालयांत अस्पृश्यांना मुक्तद्वार असल्याचें जाहीर केलें. याच सत्कार्याचें फळ म्हणजे ज्ञातींत जागृति होऊन परिषदेचें पुनरुत्थान होण्याची आशा बळावणें हें होय.

या अठरा वर्षांत परिषदेच्या घटनेची विस्मृति पडली होती. परिषदेचे अहवाल दुर्मिळ झाले होते. अलिबाग-परिषदेचा अहवाल निघालाच नव्हता. अशा स्थितींत परिषद् पुन: कशी जागृत करावी हा प्रश्न बिकट झाला. तथापि कांहीं मंडळींनीं बरीच खटपट करून जुने अहवाल मिळविले व मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजांत सभा भरून मुंबई येथें परिषद भरविण्याचें ठरविलें. त्या ठरावानुसार स्वागतमंडळाची स्थापना करून मध्यें जनरल सेक्रेटरींकडे परिषदेसाठीं निमंत्रण पाठविण्यांत आलें. परिषदेबरोबरच प्रदर्शनही भरविण्याचें ठरलें. परिषदेच्या निमंत्रणाचा स्वीकार जनरल सेक्रेटरी यांनीं जुलै १९३५ रोजीं केला. त्यामुळें प्रदर्शन व परिषद् यांची मुदत पुढें ढकलावी किंवा कसें, असा प्रश्न आला असतां पूर्वीं ठरलेल्या दिवशींच दोन्ही कार्यें करण्याचा निश्चय करून तो यशस्वीतेनें पार पाडल्याचें श्रेय स्वागत-मंडळ व प्रदर्शनमंडळ यांना देणें योग्य आहे. नियमित कार्यक्रम नेमलेल्या वेळीं केल्यामुळें कांहीं घाई झाली व त्यामुळें त्यांत अनेक प्रकारें न्यून राहिलें हें खरें असलें, तरी हीं कार्यें दिरंगाईवर पडल्यानें नवीन अडथळे उत्पन्न होण्याचा संभव होता हें विसरतां नये. घाईमुळें परिषदेच्या कामीं राहिलेलें न्यून थोड्याशा परिश्रमानें भरून काढतां येण्यासारखें आहे. परिषदेची माहिती मुंबईबाहेरील दूरच्या स्थळीं पोंचवून तेथील लोकांचें सहकार्य जरी अधिवेशनास मिळवितां आले नाहीं, तरी यापुढें स्थानिक संस्थांच्या व पुढाऱ्यांच्या मदतीनें खटपट केल्यास तें मिळावयास हरकत नाहीं.

यापुढें परिषद् कार्यक्षम व्हावी आणि स्वज्ञातीस उपयुक्त व्हावी, पुनरपि अशी दीर्घ निद्रा घेण्याची पाळी येऊं नये अशीच प्रत्येकाची इच्छा असणार. ती इच्छा फलद्रूप करावयाची असल्यास मागील चुकांची पुनरावृत्ति होतां नये.

परिषद् हें दहापांच मंडळीचें कार्य नसून सर्व ज्ञातीचें आहे, ह्या भावनेचा प्रसार झाला पाहिजे. यंदाच्या स्वागतमंडळाचें या बाबतींतील धोरण स्वागतमंडळापुरतें पाहतां योग्य आहे. परिषद् व प्रदर्शन यांसाठीं झालेला सुमारें साडेचार हजार रुपयांचा खर्च दहापांच धनिकांवर न लादतां सामर्थ्य असलेल्या गृहस्थांकडून प्रत्येकीं दहा रुपये जमवून ही रक्कम उभारण्यांत आली. त्या-

पेक्षां जास्त मिळविलेल्या सर्व मोठ्या रकमा प्रदर्शनाच्या बक्षिसांकरितां व पांच रुपयांहून कमी रकमा प्रदर्शनाच्या खर्चाकरितां वापरण्यांत आल्या. यामुळें स्वागतमंडळाच्या सभासदांची संख्या वाढून परिषदेविषयीं माहिती व आस्था जास्त मंडळींत प्रसृत झाली.

तथापि प्रतिनिधींच्या बाबतींत मात्र स्वागतमंडळानें फारच हेळसांड केली किंवा वेळेच्या अभावीं त्यांना योग्य प्रकारें कार्य करतां आलें नाहीं असें म्हणणें भाग आहे. बाहेरगांवीं तर परिषदेसंबंधीं म्हणण्यासारखें असें कांहींच प्रचारकार्य झालें नाहीं, हें वर आलेंच आहे.

तथापि प्रदर्शनद्वारा आणि स्त्री-प्रतिनिधींवरील बंदी उडवून महिलावर्गांत जागृती करण्याचें बरेंच कार्य यंदाच्या परिषदेकडून झालें आहे. स्टँडिंग कमिटींतही कांहीं स्त्रियांची योजना झाल्यामुळें ही जागृती कायम ठेवणें त्यांच्या सहाय्यानें सुगम होईल. स्टँडिंग कमिटीचे स्त्रीपुरुष सभासद कार्यवशात् जेथें जातील तेथें त्यांनीं परिषदेविषयीं जागृती करणें व स्थानिक संस्थांचें परिषदेस सहकार्य मिळविणें हें त्यांचें कर्तव्य होय.

ज्ञातीची डिरेक्टरी करणें, ज्ञातिसंस्थांचें एकमेकांशीं व परिषदेशीं सहकार्य मिळविणें, परिषद्-दिन साजरा करणें व करविणें वगैरे अनेक प्रकारें परिषदेविषयींची सहानुभूति सर्वथा ताजी ठेवण्याचें काम स्टँडिंग कमिटीला सर्व वर्षभर करतां येण्यासारखें आहे. परिषदेच्या पुनरुज्जीवनाचा उत्साह आला तसा गेला असें न होतां ही पुनरुज्जीवित परिषद् जुन्या चुका सुधारील आणि ताज्या दमानें ज्ञातीला व राष्ट्राला उपयुक्त अशी कामगिरी बजावील ही आशा फलद्रूप होवो.

तसेंच प्रदर्शनानें केलेल्या कामगिरीचें चीज होण्यासाठीं कलाकौशल्य, शिवणकाम, वगैरे शिकविण्याचे वर्ग मुंबईंत तरी निघाले पाहिजेत. ज्यांनीं प्रदर्शनमंडळाच्या कार्यांत भाग घेतला आणि ज्यांनीं प्रदर्शनांत आपल्या कौशल्याचीं कामें मांडून बक्षिस व प्रशस्तीपत्रें मिळविलीं त्यांजवर ही जबाबदारी आहे. प्रदर्शन जसें यशस्वी झालें, तसेंच या प्रदर्शनांत शोभलेलें गौड सारस्वतांचें कलाकौशल्यही चिरस्थायी होण्यासाठीं प्रयत्न झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांसाठीं विद्यार्थी साहाय्यक मंडळी, अनाथांसाठीं दीनवत्सल संघ वगैरे संस्था आहेत, तशाच कलाशिक्षणाला उत्तेजन देणाऱ्या संस्था निघणें जरूर आहे. प्रदर्शनाच्या बक्षिससमारंभाबरोबर या जबाबदारीचा विसर परिषदेच्या चालकांना आणि प्रदर्शनमंडळाला पडणार नाहीं, असा भरंवसा वाटतो.

## ‘ दारिद्र्याची कहाणी ’

( **चाल**–दिंडी )

**द्वारिं येई मम कोणि एक बाई ॥**
**बाळ तान्हुलें कटीवरी घेई ॥**
**‘कोण तूं गे ?’ म्या सत्वरी पुशीलें ॥**
**म्हणे भिक्षा मज हवी थोडि बाळे ॥ १ ॥**

**करीं होती त्या झोळी एक सान ॥**
**वस्त्र त्यालीं तीं जीर्ण हीं मलीन ॥**
**बाळ तान्हें सारखें रडे फार ॥**
**उन्हाचा त्या होईना सहन भार ॥ २ ॥**

**‘ब्राह्मणाची मम जात’ वदे बाई ॥**
**‘स्वर्गवासी पति षष्ठ मास होई ॥**
**आप्तइष्टांनीं सर्व लुटुनि नेलें ॥**
**वालि नाहीं मज दुजा सर्व गेलें ॥ ३ ॥**

**–लाडक्याला मम नाहिं दुग्ध वस्त्र ॥**
**घरादाराचें नाहिं त्यास छत्र ॥**
**कामधंदा तरि कोण देई आज ॥**
**भरूं खळगी कशिबशी करूनि साज ॥ ४ ॥**

**–मंदिरी त्या सतत राहि बाई ॥**
**लाजलज्जा भीतीहि पार जाई ॥**
**आत्महत्या वाटते मला गोड ॥**
**परी येइ मम लाडकाच आड ॥ ५ ॥**

**वदे ऐसें तों नयन भरुनि आले ॥**
**वस्त्र तीचें अश्रूंनीं चिंब झालें ॥**
**पाहुनिया मन्मनीं खेद झाला ॥**
**हात चालेना मुळीं लेखनाला ॥ ६ ॥**

# प्रायश्चित्त !

( कु. नीरा मोंडकर, बी. ए., बी. टी. यांजकडून )

बोटींत पाय ठेवल्यापासून कमलाकरचें चित्त अस्वस्थ झालें होतें. एफ्. आर. सी. एस. साठीं त्याच्या वडिलांनीं त्याला इंग्लंडला पाठविलें, त्याला तीन वर्षांचा अवधि लोटला होता. त्याचा चित्तभ्रम होऊं नये, म्हणून पद्मेसारख्या अनुरूप मुलीशीं त्याचा वाग्निश्चयही करून टाकला होता. एवढा "बंदोबस्त" करूनही तारुण्यसुलभ प्रमाद त्याच्या हातून घडला. हिंदुस्थानांत काळ्या कामिनीशीं बांधिलेली प्रेमगांठ सैल करणारी गौरांगनेची गहिरी नजर ती पुरीच सोडून टाकणार होती. पण ऐन वेळीं त्याच्या आईची पुण्याई उभी राहून तो मोहापासून बचावला. तरी ही गोष्ट कर्णोपकर्णीं पद्मेच्या कानावर गेली होती. चुकीची भरपाई करण्याकरितां कमलाकरनें नाना उपाय योजून पाहिले. पण पद्मेचीं पत्रें एकाएकीं थांबलीं. परीक्षेचा इच्छित निकाल लागतांच कमलाकर निघाला.

"उद्यां प्रभा व पद्मा बंदरावर आलींच पाहिजेत. माझ्या सततच्या विनवण्यांनीं दगडी देव देखील विरघळले पण या हाडामासाच्या पुतळीचं अंतःकरण कसलं बनलं, देव जाणे. आणि म्हणे स्त्रियांचं अंतःकरण मृदु असतं !"

बोट थांबतांक्षणींच त्यानें डोळे ताणून ताणून पाहिलें, पण त्याची इच्छित वस्तु त्याला दिसेना. तेव्हां हिरमुसला होऊन तो आपल्या घरच्या मंडळीसह बिऱ्हाडीं निघाला. तो आल्या दिवसापासून घरीं नुसता मंडळीचा तोबा उडाला ! अभिनंदनपर पत्रें किती आलीं याची तर गणतीच नवती. त्या सर्वांची वास्तपुस्त करतांना त्याला पांच मिनिटांची फुरसत मिळेना. पद्मेच्या घरीं जाण्यासाठीं त्याची सारखी धडपड चाललीं होती. बाळ्या पुष्कळ दिवसांनीं घरीं आलेला, त्याला आवडणारे गोडाधोडाचे जिन्नस करून घालण्यांत आई दंग झाली. मग मुलाचें मन कोठें धांव घेत आहे, याचा तिला बिचारीला विसर पडल्यास नवल काय ?

"चंपाताई, प्रभाकर घरीं आहे का ?" घरांत शिरतां शिरतांच कमलाकरनें विचारलें.

"नाहींत. नुक्तेच बाहेर गेले." चंपेनें तुटक उत्तर देऊन लगेच पाठ फिरविली

"हा काय प्रकार आहे ? मला भेटायचें हा मुद्दाम टाळतो, कीं चुकामूक होते ? कांहीं कळत नाहीं." माझ्या गाढवपणामुळें पद्मेसंबंधीं विचारण्याचे धाडसही होत नाहीं. तिचें लग्न होऊन तर ती गेली नाहीं ! तें कांहीं नाहीं. उद्यां अवेळीं त्याला गांठायचेंच ! चिन्ह कांहीं बरोबर दिसत नाहीं," असा विचार करून तो दुसऱ्या दिवशीं आला.

'चंपाताई, मी आलों आहें म्हणून सांगा बरें ! आज त्याला भेटल्याशिवाय मला जायचंच नाहीं, म्हणून तर या वेळीं आलों." ते त्याचे शब्द खिडकींत शून्य दृष्टीनें उभी असलेल्या चंपेनें ऐकतांच ती केवढ्यांदा तरी दचकली! तिचीं ती अवस्था पाहून कमलाकराला कमालीचें आश्चर्य वाटलें. पण तो अशाच वेळीं आला होता कीं, तिला कोणतीही सबब सांगणें शक्यच नव्हते. ती मुकाट्यानें त्याला घेऊन प्रभाकरच्या खोलींत गेली. तेथें जें कांहीं त्यानें पाहिलें, त्यानें तो अगदीं जमिनीला खिळल्यासारखा झाला.

समोरच दिसण्यासारखा पद्मेचा एनलार्ज केलेला फोटो टांगला होता. त्या फोटोंत फोटोग्राफरचें अप्रतिम कौशल्य दिसून येत होतें. दुसऱ्यांना हंसविणारा तिचा तो हंसरा चेहरा तो फोटो आहे याचा क्षणभर विसर पाडीत होता. कमलाकर देहभान विसरून तिला भेटण्यासाठीं पुढें झाला तों प्रभाकर

दीनमुद्रेनें त्याकडे टक लावून बसलेला त्याला दिसला. त्याबरोबर परिस्थितीची त्याला नीट कल्पना त्आली. याच्या डोळ्यांत झरझर अश्रु गोळा झाले. " प्रभाकर, असं कसं रे एकदम झालं ? मी किती आशेनं तुम्हाला मी भेटायला आलों ! मला धक्का बसूं नये म्हणून तर ही बातमी आईनें चोरून ठेविली नाहीं ? माझ्या चुकी-बद्दल परमेश्वर मला दुःखाच्या इतक्या खोल दरींत फेंकून देईल असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण काय ! "ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें." आवंढा गिळून कमलाकरनें कसेबसे शब्द उच्चारले. ते त्याचे शब्द ऐकून काय बोलावें हेंच प्रभाकरला सुचेना. "प्रभाकर, आपण कितीही दुःख केलं तरी पद्मा आपल्याला या जन्मीं भेटणं शक्य नाहीं. माझ्यापेक्षां तुझं दुःख अर्थात् जास्तच असणार. तेव्हां या गोष्टी तुला शिकवणं म्हणजे माझा मूर्ख-पणा आहे. पण तूं बोलल्याशिवाय या गोष्टी मला समजण्याला मार्ग कोणता ?" त्याचा एक एक शब्द ऐकून प्रभाकरचा चेहरा दुःख,संताप, तिरस्कार यांनीं इतका भेसूर दिसूं लागला कीं कमलाकरला त्याच्या-कडे पहावेना. " कमलाकर तुला मी काय आणि कसं सांगूं ? पण पहिल्यानं तुझी गैरसमजूत मला दूर केली पाहिजे. तूं समजतोस त्या अर्थानं पद्माताई आपल्याला अंतरली नाहीं. ती पृथ्वीच्या पाठीवर कुठंतरी खुशाल आहे. पण आपल्याला भेटायला मात्र केव्हांच येणार नाहीं."

"म्हणजे ! तूं म्हणतोस तरी काय ? मला नुसता थोडासा ठावठिकाण सांग. मी पृथ्वी पालथी घालून तिला शोधून आणीन."

"नको कमलाकर, माझ्या ताईचा मानी स्वभाव तुला ठाऊक नाहीं !"

"यांत मानीपणाचा काय संबंध ?"

"नाहीं कसा ?" पण एकदर हकीकत तुला समजलीच पाहिजे. कमलाकर, ताईची किंमत मला फार उशिरां कळली. माझा कृतघ्नपणा मला खायला उठतो. आम्हां दोघां पोरक्या पोरांची हकीकत तुला ठाउक आहेच ! समजूत आल्यापासून तिनं दुसऱ्याची मदत नाकारली. स्वतः कष्ट करून मला शिक्षण दिलं. तूं मडमेशीं लग्न करणार ही भयंकर बातमी ऐकल्यापासून तिनं आपल्या लग्नाचा नाद सोडून दिला. माझी ताई किती सहनशील ! आपलं दुःख गिळून माझ्या आनंदांत स्वतःचा आनंद मानला. चंपेविषयींचा माझा आग्रह पाहून तिनं माझं मन मोडलं नाहीं. माझा संसार मांडून त्यांतच आपलं मन रमवलं. मला नेहमीं म्हणायची, 'प्रभा, अजून तूं वाटेल तितकं शीक. तुझं लग्न झालं तरी तूं मला मोठा वाटत नाहींस. नोकरी करण्याची इतक्यांतच कांहीं जरूरी नाहीं. माझ्या जिवांत जीव असेतोंपर्यंत तुला मी मुळींच कष्ट करूं देणार नाहीं. कमलाकर, माझ्या बहिणीच्या प्रेमळपणाचा मीं अवास्तव फायदा घेतला, त्याचं मला भलतंच प्रायः-श्चित्त मिळालं. तिनं मिळवून आणावं आणि आम्ही आयतोबासारखं बसून खावं. पण चंपेला तिचा तो चांगुलपणा खपेना. नणंदेमुळें आपल्याला हे दिवस दिसले, याचा तिला पूर्ण विसर पडला. तिच्याविषयीं ती बेफिकिरी दाखवूं लागली.'काय झालं केलं तर ? कांहीं मुलखावेगळं नाहीं केलं. त्यांत मोठेपणा कसला ? जग नाहीं का करीत ? यांना आतां पैसा करायचाय् काय ? त्यांचं नशीब वांकडं नसतं, तर ठरलेल्या लग्नांत असं विघ्न कां आलं असतं !' अशा तऱ्हेचे शब्द माझ्यासमोरही ती बोलूं लागली आणि कमलाकर, तुला काय सांगूं ? माझ्या नादान-पणाचा कळस होऊन मी ते शब्द मुकाट्यानं ऐकत असें. पण माझी ताई कांहीं एक बोलत नसे. फारच झालं तर एकटीच असतां मृत मातेच्या मूर्तीसमोर हृदय हलकं करीत असे. मीं विचारलं तर 'कांहीं नाहीं रे, प्रभा, मला सहज आईची आठवण झाली झालं !' असं म्हणायची. इतकं असून सुद्धा ती आपल्या कर्तव्यांत चुकत नव्हती.

"परवांचा प्रकार मात्र अनपेक्षित घडला. मला तो मागाहून कळला. कळला म्हणजे मी जबरदस्तीनं काढून घेतला. संध्याकाळीं मी क्लबमधून आलों. जेवायची वेळ झाली, तरी ताई दिसेना. चंपेला विचारलं तर तिनं उडवाउडवी केली.'गेल्या असतील फिरायला: येतील आतां; पाहावं तेव्हां भटकायला पाहिजे. वडीलधारं विचारणारं आहे कोण ?"

"भलंतच बडबडूं नकोस. इतका वेळ ती बाहेर राहायची नाहीं. काय सांगून गेली आहे ?"

"मला नाहीं कांहीं सांगितलं."

घड्याळाचा कांटा जसजसा सरकूं लागला, तसा माझा अस्वस्थपणा वाढूं लागला. चंपेला जेवण उरकून घ्यायला सांगून मी ताईची वाट पाहत खोलींत बसलों. हाताचा उगीच चाळा चालला होता. तितक्यांत टेबलावरच्या पुस्तकांत माझ्या नावचं पाकिट मिळालं. अक्षर ताईचं होतं.

"एकाएकीं ताईला काम आलं वाटतं ? त्याशिवाय तिनं मला हें लिहून ठेवलं नाहीं; तरी म्हटलं, माझी ताई आहे. मला कळवल्याशिवाय गेली तरी कुठं ? असं वाटून उत्सुकतेनं तें पाकिट मीं घाईघाईनं फोडलं तों काय ! माझ्या डोळ्यांवर आलेला मोहाचा पडदा एकदम दूर झाला ! तें पत्र मीं अतिशय जपून ठेवलं आहे. हें बघ. कमलाकर, हें पत्र वाचल्यापासून माझ्या स्वतःचाच मला अतिशय कंटाळा येऊन गेला आहे."

कमलाकर तें वाचीत असतांना मागील सर्व आठवणींनीं प्रभाकरांचा चित्तक्षोभ अतिशय वाढला.

तें पत्र पुढीलप्रमाणें होतें. "अनेक आशीर्वाद, पत्र लिहायला कागद पुढं ओढला खरा. पण सुरवात काय करूं तेंच सुचत नाहीं. प्रत्यक्ष सांगतां येणार नाहीं म्हणून लिहिणं भाग आहे. या वेळीं माझा मनस्ताप इतका वाढला आहे कीं, त्यामुळं मला वेड लागेल कीं काय अशी भीति वाटते. तुला न भेटतांच जाणं मला श्रेयस्कर वाटतं. यापुढं भूतकालच्या गोड आठवणींतच आयुष्य संपवलं पाहिजे. प्रभाकर, आपलं लहानपण तुला आठवतं का ? शेजारच्या काकूनं तुला लाडू दिला, तेव्हां तूं काय म्हणालास, आठवतं का ? "अहो माझ्या ताईला" असं काकूनीं म्हणतांच तूं त्याचे दोन तुकडे करून मागितलेस पण कसे ? "एक मोठा करा हं काकू. ताई मोठी आहे ना म्हणून" काकूला तुझं कौतुक वाटून त्यांनीं लगेच दुसरा लाडू काढून माझ्यासाठीं दिला व ही गोष्ट मोठ्या प्रेमानें मला सांगितली. मोठा झाल्यावर सुद्धां माझ्यापासून तूं दूर जात नव्हतास. आणि त्याकरतां मित्रमंडळीकडून तुला हिणवून घ्यावं लागत असे. पण ताई असेल तिथं उभा असायचाच. मलाही तुझ्याशिवाय बिलकुल करमत नसे. तुझं लग्न झाल्यावर चंपेचा तुझ्यावर अर्थातच जास्त हक्क. तुझ्या प्रेमांत भागीदारी झाली. पण मला तुझ्याशिवाय विसावा कुठला ? चंपेला माझ्याबद्दल मुळींच प्रेम वाटत नव्हतं हें मला आस्ते आस्ते दिसून येऊं लागलं. तुझ्या नकळत माझ्यावर आडून आडून टीका करूं लागली. पण नवराबायकोंत बेबनाव होऊं नये म्हणून मीं तोंडाला खीळ घातली. पण आतांचा प्रकार सहनशक्तीपलीकडचा आहे. धरलं तर चावतं, सोडलं तर बाधतं, अशी स्थिति झाली झाली आहे. झाली एवढी शोभा पुरे आहे. तुम्ही दोघं आनंदानं संसार करा. माझा शोध करण्याच्या भरीला पडूं नको. आईबापांचं नांव निष्कलंक राहील अशाच तऱ्हेनं मी दिवस काढीन. तुझा लहानपणचा फोटो घेऊन जात आहे. कठीण परिस्थितींत मागील सुखदायक आठवणीच रमवितात. तुझ्यावर माझा कोणत्याही तऱ्हेचा राग नाहीं. ज्यांच्यावर मी विसंबून होतें, त्यांनींच दगा दिल्यावर नशिबाशिवाय कोणाला बोल लावायचा ?

ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो.

तुझी

पद्माताई "

" प्रभाकर या पत्रानें नीटसा बोध होत नाहीं."

हो; म्हणूनच चंपेला विचारलं तर ती मुळींच दाद देईना, तेव्हां तिच्याशीं बोलणंच वर्ज केलं. नाइलाजानं तिनं थोडक्यांत सांगितलं. कमलाकर, मीं जेव्हां तें ऐकलं, तेव्हां माझे कान फुटतील तर बरं असंच वाटलं."

" काय, काय सांगितलं चंपाताईनं?

" पद्माताई बाहेरून आल्यावर मी दिसलों नाहीं म्हणून तिनं दोनतीनदा माझी चौकशी केली; तेव्हां चंपा एकदम उसळली आणि म्हणाली,'एवढं अगदीं भावाशिवाय चैन पडत नाहीं, तर त्याच्याबरोबर जावं कीं एवढा लगटपणा कशाला करायला पाहिजे! मला ठाऊक आहेत सारीं सोंगं; त्या कमलाकरनं नाकारलं तर दुसरीं काय कमी स्थळं आहेत? पण लग्न कां करीत नाहीं त्याचं बिंग मी ओळखून आहे. भावाचं प्रेम दाखवायचं आणि भावजईचा गळा कापायचा!"

कमलाकर मी शपथ घातल्यावर तिनं हे स्वतःचे शब्द जसेच्या तसे सांगितले. ताईच्या जन्माचा अशा रीतीनं सगळेकडून खेळखंडोबा व्हायला बऱ्याच अंशानीं मी कारण झालों ही जाणीव झाल्यापासून माझाच मला अत्यंत तिटकारा आहे. प्रायश्चित्त सुद्धा रोज घेत आहे. कसं म्हणशील तर संन्यस्त राहून! एखाद्या रानटी माणसालाही लाजवणारा माझ्या ताईवर केलेला हा गलिच्छ आरोप ऐकून मला कोणालाही तोंड दाखवण्याची लाज वाटूं लागली आहे. या मानसिक यातनांचा कसा विसर पडेल तें तूं तरी सांग."

" प्रभाकर, पद्मा खरोखरीच एक रत्न आहे. सुखाच्या बाबतींत मात्र ती पुरी अभागी आहे. तिची मीं एकदा फसगत केल्यावर ती माझ्याशीं लग्न करील ही गोष्ट अशक्य वाटते. तिचा तूं भाऊ म्हणवतोस. तुला दुबळेपणा मुळींच शोभत नाहीं. चुकीचे परिणाम भोगलेच पाहिजेत."

× × × × ×

कमलाकरच्या खोलींत पद्मेचा एक भव्य फोटो टांगलेला होता. त्याचें सकाळ-संध्याकाळ दर्शन घेतल्याशिवाय तो डिस्पेन्सरींत जात नसे. आशाळभूत वधूपित्याचेंही त्याच्यावरचें लक्ष लवकरच कमी होऊं लागलें. पद्माताई भेटेल या प्रभाकराच्या आशेचा तो हिरमोड करी. पण ती भेटेल आणि आपल्याला क्षमाही करील अशी चोरटी आशा कोठें तरी त्याच्या हृदयाच्या कोपऱ्यांत लपून राहिली होती. पण त्या आशेची ओळखही न ठेवतां निराश जीवनानें चुकीचें प्रायश्चित्त करण्याचा त्याचा संकल्प होता.

---


मंगेश ब्रदर्स

यांचे

हातानें बनविलेले

( मशिनमध्यें नव्हे. )

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी ( तिखट ), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.

ब्रँच नं. २

चिराबाजार, मार्केटमध्यें.

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# ॥ श्री शांतादुर्गास्तव ॥

## स्रग्धरा वृत्त

श्रीमन्माता मनोज्ञा कलिमलमहिषध्वंसिनी शंकराची
शांता शक्ती निवारी निखिल भवभया, निम्नगा जी दयेची ।
ताप प्रापंचिकाचा हरण करि. असे जी उभी भक्तकाजा. ।
दुर्गा कैवल्यधामा. पदकमलिं तिच्या हा नमस्कार माझा ॥ १

श्रीरंग स्थाणु पार्श्वस्थित अहिवलया जी सर्वे मध्यवर्ती. ।
शांता त्र्यैगुण्यगूढा स्मितवदन अशी चिन्मयी शांत मूर्ती. ।
ताठा षड्भावनांचा जिरवि, शिशुपरी लालवी भाविकाला. ।
दुर्गा ध्यानीं धरोनीं नमन करितसें पादयुग्मांबुजाला. ॥ २
श्री धी, संतान, कीर्ती, इहपर, जगतीं साध्य साधोनि गेले ।
शांतापादप्रसादें बहुत जन जनीं ऐकिलें देखियेले. ।
तारापद्ग्रस्तदासावनिं झडकरिं ये धाउनी धावण्याला ।
दुर्गा शांता परा तच्चरणसरसिजीं वाहिलें मस्तकाला ॥ ३

श्री ब्रह्मांडप्रसू, श्री विधिहरिहर यद्योगनिद्रास्त्रधामीं ।
शांतासच्चित्स्वरूपीं प्रयलसमयिं ते लीन होती, तिला मी ।
ताटस्थ्या टाकुनी दे विनविं परिजनीं सत्कृपापांग शांते ।
दुर्गे मातें नुपेक्षीं. शरण पतित मीं वंदिलें पादुकांतें ॥ ४
श्रीमूर्ती अंतरंगीं, चिर वदनिं बसो नाम, काया झिजावी ।
शांता सेवेंत, तापत्रयभय न शिवो, गाढ निष्ठा असावी ।
ताव द्विज्ञापना ही तव चरणतलीं ठेविलीसे भवानी ।
दुर्गे साष्टांग माझें नमन तुजविना नावडो सेव्य कोणी ॥ ५

जयजय जयतु जगदंब

—दुर्गादास

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद्

## अधिवेशन ९ वें: कलाकौशल्याचें प्रदर्शन

प्रदर्शनकमिटीच्या सं. सेक्रेटरी श्री. सौ. दुर्गाबाई माडगांवकर यांनीं प्रदर्शन खुलें करावयाचे वेळीं वाचलेला रिपोर्टः—

रिपोर्ट वाचावयाची परवानगी मागून सौ. माडगांवकर म्हणाल्या, "सावंतवाडींत १९११ सालीं परिषदेबरोबरच एक प्रदर्शन उघडण्यांत आलें होतें. आतां उघडण्यांत येणारें आपल्या जातींतील मंडळींनीं मुंबईंत भरविलेलें पहिलेंच प्रदर्शन आहे.

या प्रदर्शनांत ज्या पुष्कळ उणीवा आहेत, त्यांची आम्हांस जाणीव आहे; परंतु अतिशय थोड्या वेळांत या प्रदर्शनाची व्यवस्था करावी लागली, हें ध्यानांत घेऊन ज्ञातिबांधव व भगिनी आमच्या या प्रयत्नांकडे सहानुभूतीनें पाहतील अशी आम्हांस आशा आहे.

जुलै महिना अखेर सारस्वत ब्राम्हणसमाजांत परिषदेच्या स्वागतमंडळाच्या कांहीं सभासदांनीं प्रदर्शनाचा प्रश्न पहिल्यानें उपस्थित केला, तेव्हां आमच्या अध्यक्ष श्री. सौ. शांताबाई पाटकर व उपाध्यक्ष श्री. सौ. नलिनीबाई दळवी या हजर होत्या.

प्रदर्शनाबद्दल आमच्या बंधूंना वाटत असली काळजी पाहून आम्हीं आनंदानें त्यांत भाग घ्यावयाचें कबूल केलें व प्रदर्शनकमिटी स्थापन होऊन काम जोरानें सुरू झालें. पुष्कळ भगिनींनीं या कामीं आमचा जो पाठपुरावा केला, त्यामुळें प्रदर्शन थोड्या मुदतींतही यशस्वी होईल असा उत्साह व आशा आम्हांस वाटूं लागली. आमच्या प्रयत्नांस कितपत सिद्धि मिळाली हें ठरविणें आपणा सर्वांचें काम आहे.

वेळ थोडा असल्यामुळें प्रदर्शनाच्या प्रचारकार्यास अवकाश नव्हता. परंतु असें असतांही गोवें, बडोदें, बेळगांव वगैरे ठिकाणाहून प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं वस्तु आल्या. फक्त स्त्रियांपुरतेंच हें प्रदर्शन मर्यादित करावें ही कल्पना आम्हांस न आवडल्यामुळें आम्हीं आपल्या बांधवांचें सहकार्य घ्यावयाचें ठरविलें, व हें प्रदर्शन म्हणजे आपल्या जातींतील स्त्रीपुरुषांनीं कलेच्या सांगोपांग आविष्करणासाठीं केलेल्या श्रमाचे फळ आहे, व तद्द्वारा स्वज्ञातींतील एकी व संघटना व्हावी हा जो परिषदेचा उद्देश त्याला पुष्टि मिळणार आहे.

प्रदर्शनांतील वस्तूंच्या सोईसाठीं प्रौढांचा व बालांचा असे दोन बिभाग करण्यांत आले व आलेल्या सर्व वस्तु चित्रकलाविषयक गट, घरगुती वस्तूंचा गट व बालांच्या कामाचा गट अशा रीतीनें मांडण्यांत आल्या आहेत, व प्रत्येक गटासाठीं एकएक पोटमंडळ नेमण्यात एऊन त्या पोटमंडळामार्फत प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली आहे. आपल्यापैकीं कलावंत टीकाकारांना कदाचित् ही व्यवस्था पसंत पडणार नाहीं; परंतु आमचें काम कोणत्या धर्तीवर झालें आहे, हे सांगणें अवश्य आहे.

या प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं एकंदर ३४०० वस्तु आल्या त्यापैकीं

| | |
|---|---|
| ४०० | चित्रकला विभाग |
| २००० | गृह काम विभाग |
| १००० | बालविभाग |

अशी वर्गवारी आहे. ज्यांनीं वस्तु पाठविल्या, त्यांची संख्या ७२३ आहे. म्हणजे हें प्रमाण माणशीं ५ असें पडतें. दिवाळीसारख्या सणांतही वेळ काढूनही ज्यांनीं आमच्याकडे ह्या वस्तु पाठविल्या, त्यांचे आम्ही आभारी आहों.

ह्या वस्तु तपासून त्यांचे गुण ठरविण्याचें काम योग्य परीक्षकांच्या संघाकडे सोंपविलें होतें व ते सर्व ज्ञातीबाहेरचे होते. त्यांचा निकाल लवकरच सांगण्यांत येईल. आपला अमूल्य वेळ खर्चून व गैरसोई सोसून त्यांनीं परीक्षकांचें काम केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

अपरिहार्य कारणांमुळें कॅटलॉग प्रसिद्ध करणें आम्हांस अशक्य झालें याबद्दल आपण सर्व आम्हांस क्षमा कराल अशी आशा आहे.

कार्यकर्त्यांच्या श्रमांमुळें व कलाप्रेमी दात्यांच्या कृपेनें बक्षिसांसाठीं हजारापेक्षां जास्त रकम आम्हांस मिळाली व तिचें पुढीलप्रमाणें विभाग करण्यांत आले.

| गट | सर्वश्रेष्ठ पदक | सु. पदक | रौप्यपदक | बहुप्रशस्त | प्रशस्त |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ७ | २५ | ३८ | ५ |
| २ | १ | ९ | २५ | ७६ | ४१ |
| | | एक रोख बक्षीस | | | |
| ३ | १ | ७ | २५ | १९ | ९ |

ज्या ज्या दात्यांनीं प्रदर्शनासाठीं व बक्षिसासाठीं देणग्या दिल्या, त्यांचे आम्ही आभार मानतों. त्याचप्रमाणें प्रदर्शन यशस्वी करावयासाठीं ज्यांनीं ज्यांनीं कमिटीस मदत केली, त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. प्रदर्शनाच्या वस्तु जमा करण्यासाठीं मुंबई व उपनगर येथें निरनिराळीं केंद्रें उघडण्यांत आलीं होतीं. ज्या बंधुभगिनींनीं या वस्तु जमवून व्यवस्थितपणें पोंचविण्याचें काम केलें, त्यांचा निर्देश करणें अवश्य आहे. त्यांच्या मदतीशिवाय हें कार्य सिद्धीस गेलें नसतें. नंतर सेक्रेटरींनीं, बॉम्बे आर्ट सोसायटीनें आपले पडदे दिल्याबद्दल, व भांडारे कॉंट्रॅक्टरनीं ते बसवून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्याचप्रमाणें प्रदर्शनाबरोबरच निरनिराळे करमणुकीचे जे कार्यक्रम ठरविण्यांत आले होते, त्यांत भाग घेणारांचे आभार मानले व प्रदर्शन प्रेक्षकांच्या पसंतीस येईल अशी आशा व्यक्त करून आपला रिपोर्ट संपविला.

## श्री. सौ. शांताबाई पाटकर यांचें भाषण

प्रदर्शनकमिटीच्या अध्यक्ष श्री. सौ. शांताबाई पाटकर यांनीं श्री. सौ. सुंदराबाई शिरूर यांना प्रदर्शन खुलें करावयाची विनंती करितांना पुढील आशयाचें भाषण केलें:—

स्वतःस अध्यक्ष नेमिल्याबद्दल कमिटीच्या सभासदांचे आभार मानून प्रदर्शन सर्वांगसुंदर व्हावें या निश्चयानें ज्यांनीं अविश्रांत श्रम घेतले त्यांचे, तसेंच वर्गणी व इतर प्रकारें ज्यांनीं प्रदर्शनाला मदत केली त्यांचे श्री. सौ. पाटकर यांनीं आभार मानिले. त्या म्हणाल्या "या प्रदर्शनाचा मुख्य हेतु म्हणजे चित्रकला, शिल्पकला, शिवणकाम, कशिदा इत्यादि उच्च कलांना उत्तेजन मिळावें, फुरसतीचे वेळीं घर सुशोभित करावें व व्यवहारांत उपयुक्त वस्तु निर्माण करावयाची अभिरुची समाजांत उत्पन्न व्हावी हा आहे. वर्षांतून एकदा प्रदर्शन भरवून संतुष्ट न राहतां स्त्रियांच्या कलाकौशल्याची वाढ व्हावी, याबद्दल कायमची व्यवस्था करणें जरूर आहे. दुसऱ्यांनीं तयार केलेल्या फुलांफळांचें प्रदर्शन चारपांच वर्षांनीं पाहण्यापेक्षां स्वतःच फुलांफळांची बाग उत्पन्न करणें हें जसें श्रेष्ठ, तद्वतच प्रदर्शन नुसतें पाहून समाधान मानण्यापेक्षां त्यांतील वस्तु तयार करण्याची अंगीं पात्रता आणणें हें जरुरीचें आहे.

ह्या हेतूच्या सिद्धीसाठीं पारशांच्या Industrial home सारखी संस्था स्वज्ञातीसाठीं आज भरणाऱ्या गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेनें काढल्यास त्यापासून सार्वजनिक उपयुक्त कार्य होईल असें मला वाटतें. दोनप्रहरीं शिळोप्याच्या गप्पागोष्टी करण्यापेक्षा चित्रकला, संगीत, शिवणकाम, भरतकाम, कशिदा वगैरे कलांमध्यें प्राविण्य मिळविण्याकरितां सदर Industrial Home ( औद्योगिक शाळेंत ) शिक्षणाची व्यवस्था केल्यास बरें होईल. सांपत्तिक सुस्थितींत असलेल्या स्त्रियांच्या वेळेचा सदुपयोग होऊन त्यांना मानसिक सुप्रसन्नता प्राप्त होईल. दुर्दैवानें ज्यांची सांपत्तिक स्थिति खालावलेली असेल, अशा स्त्रियांना कलाकौशल्याचीं कामें करून संसाराला द्रव्याची मदत करावयाची पात्रता येईल. अशा रीतीनें द्रव्यसंपादन करणें स्त्रियांना भूषणावह होईल. यावर असा आक्षेप येईल कीं,

अशी पात्रता पुष्कळ स्त्रियांत आली, तर अशा वस्तूंचा खप होणें कठीण जाईल. तरी मी सुचविलेल्या उद्योगशाळेनें अशा वस्तु खपविण्याचा प्रयत्न करावा. सर रतन टाटा इंडस्ट्रिअल इन्स्टिट्यूटमध्यें असा प्रकार चालू आहे. प्रदर्शनांत अशा वस्तूंची विक्री व्हावयाचा संभव असतो. विक्रीसाठीं नाहीं तरी प्रदर्शनांत बक्षिस मिळाल्यास मनाला समाधान तरी मिळेल. प्रदर्शनामध्यें दुसऱ्यांनीं केलेल्या सुंदर वस्तु पाहिल्या, म्हणजे साहजिकच गर्वहरण होऊन स्वतःच्या कौशल्याची वाढ करावयाची प्रबल इच्छा कलाकुशल स्त्रियांत उत्पन्न होते. ह्या व इतर कारणांसाठीं कलाकौशल्याचें प्रदर्शन असणें जरूर आहे.

या प्रदर्शनांत ज्या स्त्रीपुरुषांनीं आपलीं कामें पाठवून तें यशस्वी केलें, त्यांचे आभार मानणें जरूर आहे. आजच्या प्रसंगीं फक्त प्रदर्शनच खुलें करावयाचें आहे. बक्षिससमारंभ पुढें सावकाश रीतीनें करण्यांत येईल. ज्या स्त्रीपुरुषांनीं बक्षिसें ठरविण्याकरितां जजिसचें काम केलें, त्यांचे मीं आभार मानतें. आर्टस्कूलचे मि. जेरार्ड यांनीं प्रदर्शनासंबंधीं दिलेलें मत मी तुम्हास वाचून दाखवितें:

The work shown in this exhibition proves that there is real vital interest taken in painting and craft work not only by professional artists but by amateurs in this commiunity. I should like to see similar exhibitions spring up in all towns in India. It would stimulate art consciousness in the public. A good deal of the work is of a high standard and it is interesting to see the many and varied conceptions of art. The photographic section also showed interesting work some of the amateur examples being equal to many of the professional exhibits."

आजच्या प्रसंगीं हें प्रदर्शन उघडण्यासांठीं माझ्या भगिनी श्री. सौ. शिरूर यांची योजना करण्यांत आली आहे हें आपणास विदित आहे. सौ. शिरूर आपल्या परिचयाच्या आहेत. त्या नेहमीं सार्वजनिक कामांत पुढाकार घेत असतात. स्त्रियांच्या ज्या उपयुक्त-संस्था मुंबईत आहेत, त्यांमध्यें त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यांच्या प्रकृतीला स्वास्थ्य नसूनही त्यांनीं आजचें प्रदर्शन उघडण्याचें कबूल केलें हें त्यांच्या सौजन्याचें द्योतक आहे. हें प्रदर्शन खुलें करण्यासाठीं आपणां सर्वांतर्फे मी त्यांस विनंति करितें.

## श्री. सौ. सुंदराबाई शिरूर यांचें भाषण

अध्यक्ष श्री. सौ. सुंदराबाई शिरूर यांनीं प्रदर्शन खुलें करावयाच्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वतःस दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले व कलाकौशल्याच्या प्रदर्शनाची आवश्यकता व उपयुक्तता प्रतिपादन केली. प्रदर्शनामुळें कलाकुशल मंडळींत जी योग्य चढाओढ लागते, तिचा कलेच्या प्रगतीसाठीं फार उपयोग आहे, असें त्यांनीं सांगितलें. कलेचें निरनिराळे नमुने दृष्टीस पडल्यानें ज्ञानांत भर पडते व व्यापकता येते. आपल्या कामांत दोष कोठें आहेत, चुका कोठें होतात हें समजतें. कलाकौशल्याचे नवे नवे नमुने नजरेसमोर येऊन तसे उत्पन्न करण्यास स्फूर्ति येते व उत्तेजन मिळतें. कलेची उपासना ही श्रीमंतांना आनंददायक आहे. मध्यम स्थितींतल्या माणसांस त्यापासून आपल्या उत्पन्नांतही भर घालतां येते, असा त्यांचा दुहेरी फायदा होतो. सांप्रतच्या आर्थिक अडचणीच्या कालांत मध्यम वर्गाच्या स्त्रियांनीं कारागिरीच्या वस्तु उत्पन्न करून आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न अवश्य करावा. असें त्यांनीं सांगितलें. ज्यांना प्रदर्शनांत पदकें व पारितोषिकें मिळालीं त्यांचें त्यांनीं अभिनंदन केलें. ज्यांना मिळालीं नसतील त्यांनीं आपलें काम निकृष्ट आहे असें मानून निराश होऊं नये, कारण निरनिराळ्या परिक्षकांना निरनिराळ्या वस्तु पसंत होतात. तो अभिरुचीचा प्रश्न आहे. परंतु दुसऱ्या प्रदर्शनांत यश मिळविण्याचा प्रयत्न करून करावा.

अशा अर्थाचें भाषण करून श्री. सौ. शिरूर यांनीं प्रदर्शन खुलें झाल्याचें जाहीर केलें.

स. २
ता. २३

# ज्ञातिवृत्त

डॉ. रघुनाथराव तिरोडकर ( M. D. Lond. ) यांनीं इंडियन मेडिकल कौन्सिलच्या इन्स्पेक्टरच्या जागेचा राजिनामा दिला, त्या वेळीं त्यांनीं केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल " कौन्सि लच्या कार्यकारी मंडळीनें" त्यांचे आभार मानले.

× × ×

सावंतवाडीचे श्री. एस्. एस्. आजगांवकार यांना भांडारकर संशोधनमंडळाकडून रुपये चाळीसचें बक्षिस निबंधलेखनाबद्दल मिळालें आहे. त्यांच्या निबंधाचा विषय "शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाशीं फकुद्दीन अल्तईचें तत्त्वज्ञान कितपत जुळतें ?" हा होता.

× × ×

कै. नारायणराव टोपीवाले यांचा द्वितीय वार्षिक स्मृतिदिन ता. ५-११-३५ रोजीं कुडाळदेशकर ब्राह्मणनिवासांत श्री. एम् एल्. डहाणूकर यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरवून साजरा करण्यांत आला.

× × ×

नुकत्याच संपलेल्या क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांत श्री. दिवेकर या सारस्वत खेळाडूला हिंदूंच्या अकरा प्रतिनिधींत निवडण्यात आलें होतें. श्री. मुकुंदराव पै यांच्या नंतर चौरंगी सामन्यांत खेळणाचा मान मिळालेले सारस्वत दिवेकरच आहेत.

× × ×

**अभिनंदनीय यश**-बेळगांव येथील सुप्रसिद्ध 'देशपांडे वीव्हिंग वर्क्स' चे मालक श्री. नीलकंठराव देशपांडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. सुबोधचंद्र हे सिटी अॅन्ड गिल्डस ऑफ लंडन युनिव्हर्सिटीच्या प्लेन फायनल परीक्षेस गेल्या मे महिन्यांत मुंबईच्या व्हि ज्यु. टे. इन्स्टिटयुटमधून बसले होते. कळविण्यास आनंद वाटतो कीं, सदर परीक्षेत ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्याची बातमी आली आहे.

श्री. सुबोधचंद्र यांनीं पुणे येथील गव्हर्मेंट वीव्हिंग इन्स्टिटयुटच्या दोन वर्षांचा अभ्यासक्रम नुकताच पुरा केला असून पहिल्या नंबरचें सर्टिफिकट मिळविलें आहे.

**सारस्वत दीनवत्सल संघ**— सारस्वत दीनवत्सल संघाची २७ वी वार्षिक सभा रविवार ता. १७।११।१९३५ रोजीं ३ वाजतां सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत श्री. सखाराम वामनराव शिरगांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. २७ व्या वर्षाचा रिपोर्ट व जमाखर्चाच्या हिशोबाचा तक्ता मंजूर करण्यांत आला. पुढील सद्गृहस्थ व्यवस्थापक मंडळाचे सभासद म्हणून नवीन नियमांप्रमाणें निवडण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें.

१ श्री. भिकाजी सीताराम सबनीस
२ ,, सदानंद लक्ष्मण कापडी
३ ,, शंकर पुंडलिक वर्दे
४ ,, वामन सखाराम अणावकर
५ ,, जगन्नाथ गोविंद हवालदार
६ ,, नीळकंठ त्रिंबक देसाई
७ ,, नीळकंठ बाळकृष्ण रांगणेकर
८ ,, लक्ष्मण नारायण दडकर
९ ,, डॉ. काशीनाथ विष्णु कामत भांगले.
१० ,, यशवंत हणमंत सुखठणकर
११ ,, कृष्णाबाई वाघ
१२ ,, श्रीपाद वासुदेव पाडगांवकर स्वयंसेवकाग्रणी
१३ ,, वामन काशीनाथ महात्मे दुय्यम ,,

वृत्तांताच्या सालअखेर संघाच्या सभासदांची संख्या ४ वाली, १४३ तहाहयात सभासद, ७१४ सामान्य सभासद इतकी होती.

या सालांत साधारण सभासदांकडून २६४१-४-० वर्गणी वसूल झाली. त्यापैकीं मुंबईच्या सभासदांकडून मिळालेली वर्गणी रु. २१४३-० आहे. बाहेर गांवच्या वर्गणीची वसुली फारशी समाधानकारक नसून आगाऊ सूचना देऊन सुद्धा वर्गणीसाठीं पाठविलेल्या व्ही. पी. परत येतात; ४१ सभासदांचीं नांवें वर्गणी वसुलीची आशा नसल्यामुळें कमी करावीं लागलीं, असा उल्लेख रिपोर्टांत आहे.

१९३४ सालच्या दिवाळींत स्वयंसेवकांनीं घरोघर फिरून रु. १७१०-१४-३ च्या देणग्या संघासाठीं मिळविल्या,

संघाच्या कायम फंडाच्या रोख्याची दर्शनी किंमत रु. १००१०० झाली आहे.

रिपोर्टाच्या सालीं संघाकडे १५१ अर्ज आले व त्यापैकीं १३६ अर्ज मदतीसाठीं मंजूर करण्यांत आले. यांना मदतीसाठीं रु. ७५०७-१-० खर्च करण्यांत आले. गेल्या सालपेक्षां ३२ इसमांना जास्त मदत देण्यांत आली व रु. २०७५-१-० जास्त खर्च करण्यांत आले.

रिपोर्टाच्या सालीं पुढीलप्रमाणें मदत देण्यांत आली

| गांव | पु. | स्त्रिया | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | ५ | १६ | ११७६ |
| उपनगर | १ | २ | २१६ |
| रत्नागिरी जिल्हा | ६ | ३३ | २००२ |
| सावंतवाडी संस्थान | २ | २७ | १६२० |
| बेळगांव जिल्हा | १ | ७ | ५२८ |
| कुलाबा जिल्हा | १ | १ | ८४ |
| कारवार जिल्हा | ० | १६ | ८१६ |
| गोवें प्रांत | १ | १० | ६६६ |
| इतर ठिकाणें | ० | ७ | ३९९ |
| | १७ | ११९ | रु. ७५०७ |

या सर्व माहितीवरून रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें संघाचें पाऊल प्रगतिपथावर आहे असें दिसतें.

पुढील सालासाठीं श्री. ज. पुं. नेरूरकर व श्री. स. वि. राजाध्यक्ष यांना हिशेबतपासनीस नेमण्यांत आले.

अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत या उपयुक्त संस्थेची उत्तरोत्तर प्रगति होत जाईल अशी आशा व्यक्त केली.

आभारप्रदर्शनानंतर सभेचें काम संपलें.

# सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी

## ३२ वी वार्षिक सभा

सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीची वार्षिक सभा रविवार, ता. २४ नोव्हेंबर १९३५ रोजीं दुपारीं स्टॅ. टा. ३-३०वाजतां गिरगांवांत सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत मंडळीचे एक संस्थापक व आद्य कार्यकर्ते व बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे माजी सेक्रेटरी श्री. अनंतराव वासुदेव सबनीस, बी. ए., जे. पी. यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

मंडळीच्या ३२व्या वार्षिक सभेचें मिनिट मंजूर करण्यांत आल्यावर, व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष श्री शंकर पुंडलीक वर्दे, बी. ए.. एल्.एल्. बी. यांनीं व्यवस्थापक मंडळानें छापून सभासदांना वांटलेला संस्थेचा ३३ वा वार्षिक वृत्तांत जमाखर्चाच्या आढाव्यासह मंजूर करावा, असा ठराव सभेपुढें मांडला.त्यांला श्री. मेघःशाम रघुनाथ इंगळे, बी. एस्‌सी. यांनीं अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें मंजूर झाला.

सदर वृत्तांतावरून पुढील ठळक गोष्टी दिसून येतात:

संस्थेच्या पटावर २० आश्रयदाते, १४ वाली, ४०८ तहाहयात सभासद व १,३४० साधारण सभासद आहेत. एकूण रु. १३,४२९ शिष्यवृत्तींच्या रुपानें संस्थेनें दिलें असून, त्यापैकीं १९४१ रु. १८ गतभर्तृकांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च झाले आहेत. संस्थेनें आपल्या ३३ वर्षांच्या जीवनक्रमांत ८२२ विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या शिक्षणाप्रित्यर्थ एकूण रु. १,८२,११०खर्च केले आहेत. त्यापैकीं ५९ गतभर्तृका आहेत. स्मारक-फंड कायम-फंड, मिळून रु. १,९१,७६६ कायम शिल्लक तिच्या हाती आहे.

मंडळीनें गेल्या ३३ वर्षांमध्यें ज्ञातींतील ८०२ विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठीं रु.१८२११० खर्च केले.त्यापैकीं ५९ गतभर्तृका असून त्यांच्या विद्यार्जनासाठीं सुमारें रु. १६२७८ खर्च झाले. आहेत. यापैकीं बऱ्याच भगिनी आसेष्टांस व संस्थेस यथाशक्ति मदत करीत आहेत.

तथापि विद्यार्थ्यांच्या गरजांच्या मानानें दिलेल्या शिष्यवृत्त्यांच्या रकमा अपुऱ्या आहेत शिवाय बऱ्याच होतकरू विद्यार्थ्यांचे अर्ज द्रव्याभावीं नाइलाजानें नाकारावे लागले. ज्ञातींतील उदार माणसांनीं संस्थेला सढळ हातानें द्रव्यसहाय्य केल्यास या सर्व विद्यार्थ्यांस मदत करणें मंडळीला शक्य होईल.

मंडळीच्या दुसऱ्या महत्त्वाचा बाबीसंबधानें उल्लेख करावयाचा म्हणजे तिच्याकडे असलेले स्मारक फंड व त्यांचा विनियोग हा होय. दिवंगत प्रियजनांचे स्मरण राहावें या हेतूनें पुष्कळ ज्ञाती-बंधु--भगिनींनीं संस्थेजवळ लहानमोटया रकमा दिल्या असून त्यांच्या उत्पन्नांतून त्या त्या नांवें दरसाल बक्षिसें व शिष्यवृत्त्या दिल्या

जातात. हा स्मारकनिधि रु. ११,१४३ आजपावेतों झाला आहे.

## नवीन उपक्रम

ज्ञानसंपादन करण्याइतकीच किंबहुना अधिक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे शरीरसंपत्ति उत्तम ठेवणें हें होय. संस्थेच्या व्यवस्थापक मंडळानें गेल्या सालापासून मुंबई व उपनगर येथील संस्थेच्या विद्यार्थ्यांची दर सहा माहींला वैद्यकीय तपासणी करून त्याबद्दल व्यवस्थित नोंद करून ठेवण्याचें काम सुरू केलें आहे.

तसेंच व्यवस्थापक मंडळाच्या विनंतीवरून कांहीं सुप्रसिद्ध डॉ[illegible]रीं मंडळीच्या मुंबई वउपनगर येथील विद्यार्थ्यांना जरूर तेव्हां मोफत औषधोपचार करण्याचें थोर मनानें कबूल केलें आहे.

संस्थेचें व्यवस्थापक मंडळ व विद्यार्थी यांमध्यें मोकळ्या मनानें विचारविनिमय होऊन विद्यार्थ्यांच्या अडचणा दूर व्हाव्या व त्यांच्या मनांत संस्थेविषयीं आपलेपणा उत्पन्न व्हावा आणि प्रौढ वयांत त्यांनीं ज्ञातीच्या व देशाच्या उत्कर्षाला पोषक अशी कामगिरी करण्यास लायक व्हावें, या हेतूनें गतवर्षापासून व्यवस्थापक मंडळानें मधून मधून संभाषणात्मक सभा भरविण्याचा क्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांच्या हजिरीवरून हा उपक्रम त्यांना पसंत आहे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

मंडळीनें सुरू केलेले हे नवीन उपक्रम अत्यंत मर्यादित स्वरूपांत असले, तरी ते यशस्वी झाल्याचें दिसून आल्यावर मंडळीस उत्तेजन मिळून तेच उपक्रम तिला मोठ्या प्रमाणांत सुरू करण्यास कठीण पडणार नाहीं.

श्रीमती कृष्णाबाई वाघ, श्री. गजानन हरि जांबोटकर एम. ए. बी. टी. (मुंबई) टी. डी (लंडन) प्रो. वामन विठ्ठल नाडकर्णी बी. ए., एम्. एस्.सी. व श्रीयुत अनंत गोविंद तेंडुलकर, एस्. टी.सी. हे पुढील वर्षासाठीं मतसंख्यानुक्रमें व्यवस्थापक मंडळावर निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें.

श्री. आनंदराव नारायण नेरुरकर, बी कॉम. व श्री. माधव महेश्वर मुजुमदार, बी. कॉम. यांना पुढील सालासाठीं संस्थेचे पुन्हा हिशेबतपासनीस निवडण्यांत आलें.

नंतर डॉ. एस्, एस्, राव, एम, बी. बी. एस् डॉ. व्ही. डी. तेलंग, एम्. बी. बी. एस् व डॉ. एम्.डी. आमोणकर एम्. बी. बी. एस् हे संस्थेचे तहाहयात सभासद झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

नंतर अध्यक्षांचें पुढील आशयाचें भाषण झालें:—

संस्थेचे एक संस्थापक व जुने कार्यवाह या दृष्टीनें मंडळीची उत्तरोत्तर होत होत असलेल्या सर्वांगीण प्रगतीबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला. व्यवस्थापक मंडळानें आपल्या उत्कृष्ट कामगिरीनें संस्थेसंबधीं ज्ञातीचा पर्ण विश्वास संपादन केल्यामुळेंच तिच्या द्रव्यनिधींत एकसारखी भर पडत आहे, असें आपलें मत देऊन, त्याबद्दल त्यांनीं व्यवस्थापक मंडळाचें अभिनंदन केलें. श्री. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी, श्री. मंगेश लक्ष्मण राजाध्यक्ष, एल्. एस्. ई. डॉ. सोयरू मंजूनाथ कामत, एम्. बी. बी. एस् ( हुबळी ) वगैरे संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनीं तिची निरनिराळ्या रीतीनें गेलीं कित्येक वर्षें सेवा करून तिची उच्च परंपरा कायम राखली याबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला. विद्यार्थ्यांसाठीं व्यायामशाळा, पुस्तकालय स्थापणें वगैरे संस्थेचे दुसरे उद्देश आतां संस्थेनें हातीं घ्यावे असें सुचवून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

अध्यक्षांचें आभार मानण्यांत आल्यावर सभेचें काम संपलें.

—श्री. शामराव आनंदराव व श्री. लक्ष्मण आनंदराव दळवी यांनीं श्रीमती रमाबाई आनंदराव धुमे यांचें स्मरणार्थ सारस्वत दीनवत्सल संघास रु. ५०० दर्शनी किंमतीचे चार टक्के व्याजाचे पोर्टट्रस्ट बॉंड्स् दिले आहेत.

## श्री. एम्. डी. नाडकर्णी यांचें निधन

कारवार, येथील स्थानिक बँकचे अध्यक्ष व नाणावलेले सुप्रसिद्ध वकील श्री. एम्. डी. नाडकर्णी यांना न्युमोनियानें ता. ११ नोव्हेंबर रोजीं देवाज्ञा झाली. मरणसमयीं त्यांचें वय अवघें पस्तीस वर्षांचें होतें. श्री. नाडकर्णी हे लॅन्ड मॉर्गेज बँकचे उपाध्यक्ष असून त्यांना सार्वजनिक कार्याची हौस असे. त्यांच्या या अकाली निधनानें कारवार येथील एक लोकप्रिय कार्यकर्ता नाहींसा झाला असेंच म्हणावें लागेल.

# श्री. दीनानाथ केकरे यांचा विजय

## ६६। तास अखंड सायकलारोहण !

बेळगांवचे मल्लरत्न कुमार दीनानाथ केकरे यांनीं येथील युनियन जिमखान्याच्या ग्राउंडवर शनिवार ता. १४ डिसेंबर रोजीं सकाळीं ९ वाजल्यापासून अखंड सायकलारोहणाला प्रारंभ केला होता, तो अखेर ता. १७ डिसेंबर रात्रीं ६६ तास १५ मिनिटें झाल्यावर त्यांनीं थांबविला. रात्रौ दोन वाजून एक-वीस मिनिटांनीं त्यानीं श्री. मुळे यांचें रेकॉर्ड मोडलें. तेव्हां त्यांना पुष्पहार घालण्यांत आला.६६ तास १५ मिनिटें झाल्यावर त्यांची सायकल अंधारांत कशावर तरी आदळल्यामुळें त्यांना खालीं उतरावें लागलें व अशा रीतीनें सतत १०० तास सायकलारोहण करून जागतिक रेकॉर्ड मोडण्याचा त्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. श्री. केकरे यांची प्रकृति उत्तम आहे.

बेळगांव येथील युनियन जिमखाना ग्राउंडवर अखंड सायकल चालविण्याच्या रेकॉर्डकरितां श्री. केकरे यांनीं प्रथम सुरवात केली. ते सायकलवर बसल्याला ता. १६ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां बरोबर छपन्न तास झाले होते. व सायकलवर बसून ग्राउंडला चक्कर मारीत राहण्याचा त्यांचा क्रम तसाच चालू असून त्यांच्या मनाचा उत्साह लवमात्रही कमी झालेला नव्हता. लांबीच्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास त्यांनीं अंदाजें संवातीनशें ते साडेतीनशें मैल लांबीचें अंतर तोडलें. जनतेकडून श्री. केकरे यांना मनःपूर्वक प्रोत्साहन देण्यासाठीं स्त्रीपुरुषांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या.सायकलचें रेकॉर्ड मोडण्याला सुरवात झाल्यापासून जिमखान्या-वर अतिशय गर्दी झाल्यानें व्यवस्था ठेवण्यास फार त्रास पडत होता; म्हणून लोकांनीं त्यांच्या मार्गांत येऊन त्यांना कोणत्याही तऱ्हेचा अडथळा न होईल अशी खबरदारी घेण्याबद्दल एक पत्रक काढून विनंती करण्यांत आली होती. ता. १५ रोजीं तेथील आरोग्यखात्याचे असि. डायरेक्टर मे. शिवेश्वरकर हे रात्रौ ११ वाजेपर्यंत ३ वेळां तेथें येऊन बसून गेले. रविवार रात्रौ. ३-३॥ च्या दरम्यान त्यांना फारच पेंग येऊन साधारण एक तासभर त्रास झाला. त्यानंतर लवकरच त्यांची झोंप अगदीं जाऊन पूर्वदिवशींच्या उत्साहानें ते सायकल मारूं लागले.

# संपादकीय

महाराष्ट्र सारस्वताच्या या अंकाच्या प्रसिद्धीबरोबर वर्गणीदारांच्या ऋणांतून या सालापुरते आम्ही मुक्त होत आहों. या अंकाबरोबर महाराष्ट्र सारस्वतानें आपलीं चौदा वर्षे पुरीं केलीं. चालू सालीं पहिले दोन अंक प्रसिद्ध होण्यास विलंब लागला खरा, परंतु पुढचे अंक नियमितपणें वर्गणीदारांच्या भेटीस गेले आहेत. पुढील वर्षापासून म. सा. नियमितपणें प्रसिद्ध होईल असा आम्हांस दृढ भरंवसा वाटतो.

संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेच्या ध्येयांचा पुरस्कार करण्यासाठीं जन्मलेल्या या द्वैमासिकानें नुकत्याच भरलेल्या परिषदेच्या नवव्या अधिवेशनाची कल्पना प्रथमपासून उचलून धरिली व तिला शक्य तितका पाठिंबा दिला. परिषदेनें विचार करण्यालायक अशा ज्या सूचना त्यानें केल्या, त्यांपैकीं कित्येक ठरावरूपानें परिषदेनें मान्यही केल्या आहेत. यावरून महाराष्ट्र सारस्वतानें प्रदर्शित केलेले विचार बुधजन-मान्य झाले आहेत असें मानावयाला हरकत नाहीं. पुनरुज्जीवित परिषदेनें निवडलेली स्टँडिंग कमिटी जें जें कार्य करील, त्याला जरूर ती प्रसिद्धि देण्याचें वगैरे साह्य महाराष्ट्र सारस्वत यापुढेंही करीत राहील.

महाराष्ट्र सारस्वताचें दुसरें कार्य म्हणजे या देशाच्या निरनिराळ्या भागांत पांगलेल्या सारस्वतांची एकमेकांना माहिती देणें हा आहे. याच उद्देशानें ज्ञातिवृत्त हें सदर महाराष्ट्र सारस्वतांत येत असतें. कधीं कधीं सरकारी गॅझेटांतील नेमणुकाही याच कारणामुळें प्रसिद्ध करण्यांत येत असतात. या भागाचें महत्त्व आमच्या मंडळीस अद्याप समजावें तसें समजलें नाहीं, असें आम्हांस वाटतें. म्हणूनच या भागाची उपेक्षा करण्याची प्रवृत्ति आमच्यामध्यें दिसून येते. म. सा. चें भावंड कॅनरा सारस्वत जें प्रतिमासिक निघतें, त्यांत स्वज्ञातिबांधवांविषयींची माहिती किती पद्धतशीर रीतीनें देण्यांत येत असते, ती पाहिल्यास आमचें म्हणणें पटेल. ज्ञातिसंघटना जर करावयाची, तर एका ठिकाणच्या सारस्वतांनीं दुसऱ्या ठिकाणच्या सारस्वतांबद्दल बेपर्वा राहून चालणार नाहीं.

मुंबईबाहेर कराची, बडोदें, इंदूर, सोलापूर, पुणें वगैरे ठिकाणीं सारस्वत ब्राह्मण समाज, युनियन, सोशल समाज वगैरे संस्था आहेत. या संस्थांमार्फत जर दर दोन महिन्यांनीं त्या त्या ठिकाणचीं बातमीपत्रें म. सा. त प्रसिद्धीसाठीं येतील, तर किती तरी कार्यभाग होईल. बाहेरगांवाहून आलेल्या बातमीपत्रांना म. सा. त नेहमीं जागा मिळते हें आजपर्यंतचे अंक पाहिल्यास दिसून येईल. स्वज्ञातिबांधवांकडून अशा प्रकारची बातमी न आल्यामुळें आम्हांस ज्ञानप्रकाश, किंवा दुसरीं स्थानिक वृत्तपत्रें यांत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवर निर्वाह करावा लागतो. शिळ्या बातम्यांवर आमचें समाधान होत नाहीं. म्हणून उपरिनिर्दिष्ट संस्थांच्या चालकांना आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं आपापल्या टापूंतील सारस्वत जगतांत घडणाऱ्या गोष्टींची बातमी नियमितपणें म. सारस्वताकडे पाठवावी. त्यायोगें परस्पर प्रेमभाव व दळणवळण वाढून संघटनही होईल.

महाराष्ट्र सारस्वताचे कांहीं वाचक त्यांत भारदस्त लेख येत नाहींत म्हणून नाक मुरडतात. पण असे लेख जर त्यांत येत नसले, तर त्यांची जबाबदारी वाचकांवरच आहे. भारदस्त लेख म. सा. कडे आले व त्यांना प्रसिद्धि मिळाली नाहीं, असें कधीं झालें नाहीं. सारस्वत ब्राह्मण ज्ञातीचा इतिहास, किंवा त्या ज्ञातीला लागू होणारे सामाजिक, आर्थिक वगैरे प्रश्न यांचा ऊहापोह करावयास या द्वैमासिकाइतकी दुसरी योग्य जागा नाहीं.

नवशिक्या सारस्वत लेखकास उत्तेजन मिळावें हाही एक महाराष्ट्र सारस्वत प्रसिद्ध करण्यांत उद्देश आहे. महाराष्ट्र सारस्वताचें ध्येय व धोरण यास विसंगत नसलेल्या अशा कोणत्याही प्रसिद्धियोग्य लेखास महाराष्ट्र सारस्वतांत स्थान मिळेल.

परंतु आम्ही बुद्धिमान्, आम्हीं सुशिक्षित असा अभिमान बाळगणाऱ्या आमच्या जातींत लेखनकलेची उपासना करणारे लोक फारच थोडे आहेत. या कामासाठीं आवश्यक असे श्रम करावयाची तयारी आमच्यापैकीं फारच थोड्यांची असते; यामुळें महाराष्ट्र सारस्वताला चांगल्या लेखांची वाण भासते. एखाद्या ध्येयाशीं तद्रूप होऊन तत्सिध्यर्थ पराकाष्ठेचे श्रम करण्याची तयारी व चिकाटी आमच्यांत नाहीं, म्हणून सार्वजनिक कार्यांत आम्हांला यावें तितकें यश येत नाहीं.

श्री. कुमारी नीरा मोंडकर, श्री. यशवंत हणमंत सुखटणकर, इत्यादि लेखकांनीं, कु. शांता करंडे वगैरे कवयित्रींनीं जें आम्हांस लेखनसाह्य केलें, त्याचे आभार मानणें अवश्य आहे. 'बालिकेचा सवाल' व 'दारिद्र्याची कहाणी' या कविता पाठविणाऱ्या भगिनींचें नांव आम्हांस माहित नसल्यामुळें तें आम्हांस प्रसिद्ध करतां आलें नाहीं. तें तिनें आम्हांस कळवावें अशी विनंती आहे. या लेखकलेखिकांना महाराष्ट्र सारस्वताकडे लेख पाठविल्यामुळें प्रसिद्धि अथवा आर्थिक मोबदला मिळण्याची आशा नसल्यामुळें या त्यांच्या निष्काम प्रेमाबद्दलची किंमत विशेष आहे.

सारस्वत ज्ञातींतील बहुजनसमाज नोकरीपेशाचा आहे व आतां उद्योगधंद्यांची कास धरल्याशिवाय आमच्या समाजाला तरणोपाय नाहीं असें वारंवार सांगण्यांत येत असतें. सारस्वतांत कारखानदार अगदींच नाहींत असें नाहीं. त्यांनीं आपले अनुभव व स्वतः चालवीत असलेल्या धंद्याबद्दल माहिती महाराष्ट्र सारस्वतांतून प्रसिद्ध केल्यास त्यांच्या धंद्यांना प्रसिद्धि मिळून पुष्कळ तरुणांना त्या माहितीचा उपयोग होईल.

महाराष्ट्र सारस्वताला वर्गणीदारांची उणीव नाहीं असें वर्षारंभीं आम्हीं लिहिलें. ज्यांनीं महाराष्ट्र सारस्वतःची वेडीवांकडी ज्ञातिसेवा गोड मानून तिचें कौतुक केलें, त्या वर्गणीदारांचे आभार मानून पुढेंही त्यांनीं आपला स्नेह कायम ठेवून म. सा. कडून सेवा करून घ्यावी अशी विनंति करून हें निवेदन संपवितों.

—संपादक



नवव्या सं. गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचे अध्यक्ष श्री. बा. सी. कामत हे सभागृहाशीं आले असतांना घेण्यांत आलेला फोटो

# संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद् व प्रदर्शन

निकाल ( मागील अंकावरून चालू )

## चित्रकला विभाग

**बहुप्रशस्त** ( Highly Commended )

| मिळविणाराचें नांव | | कशाबद्दल |
|---|---|---|
| १ श्री. आर्. एस् सावर्डेकर | | तैलरंग "The Cub" |
| २ ,, डी. ए. कुमटाकर | | जलरंग " Landscape from Danda " |
| ३ ,, एस्. बी. शिरगांवकर | | " Two Hours with Pastels " |
| ४ ,, आर्. व्ही. नेरूरकर | | pastel "Under the Golden beams " |
| ५ ,, ए. ए. भोंसुले | | ,, "Negro Head " |
| ६ ,, एम्. देसाई | Photo | " Sea Nymph" |
| ७ ,, ए. ए. भोंसुले | तैलरंग | "Mandolin player " |
| ८ ,, सौ. सीता कोडीकल | ,, | "Study of a Head " |
| ९ ,, आर. व्ही. गावनेकर | ,, | " Still Life " |
| १० ,, ए. ए. भोंसुले | | " A study in Chalk " Black & White |
| ११ ,, कु. तारा रेगे | | |
| १२ ,, आर्. जी. चिमुलकर | जलरंग | " Despair " |
| १३ ,, व्ही. आर्. तळवडेकर | ,, | " Shah Alam " |
| १४ ,, जे. एस्. कालेलकर | ,, | " Song " |
| १५ ,, कु. चंपू नेवरेकर | ,, | " Mahim Forl. " |
| १६ ,, बी. व्ही. चिटणीस | ,, | " Bombay Flood. " |
| १७ ,, कु. कृष्णाबाई कवाड | ,, | " Khandala Hills. " |
| १८ कु. चंपू नेवरेकर | ,, | " Still Life " |
| १९ कु. शकुंतला एन्. पंडीत | ,, | " Nature " |
| २० ,, एम्. देसाई | फोटो | " Mother's Joy " |
| २१ ,, एस्. ए. कालेलकर | ,, | " Reflection " |
| २२ ,, ,, | ,, | " The Dawn " |
| २३ ,, आर्. आर्.पडबिद्री | ,, | " The Rising Sun " |
| २४ कु. कृष्णाबाई कवाड | तैलरंग | " Still Life Study " |
| २५ ,, सौ. सीता कोडिकल | ,, | Still Life |
| २६ कु. माणिक राजाध्यक्ष | जलरंग | "Consolation." |
| २७ श्री. व्ही. आर्. तळवडेकर | फोटो | "Punjab Mail." |

| | | |
|---|---|---|
| ५२ | श्री. सौ. सत्याबाला बी. बोरकर | Japanese Scene |
| ५३ | ,, ,, मंजुळाबाई भांडारे | Pad |
| ५४ | ,, ,, | Piro Frame |
| ५५ | ,, ,, ,, | Work Tray |
| ५६ | ,, ,, | Painting |
| ५७ | ,, ,, ,, | On Guard |
| ५८ | ,, ,, सुशीलाबाई पाडगांवकर | Leather work |
| ५९ | ,, ,, ,, | The chaln |
| ६० | ,, ,, रमाबाई नेरूरकर | ' Grain Temple ' |
| ६१ | ,, ,, नलिनी मुंग्रे | चंदनाचा हार |
| ६२ | ,, ,, लीला खोटे | Fruits |
| ६३ | ,, ,, ,, | तांडव नृत्य |
| ६४ | ,, ,, प्रेमाबाई साखरदांडे | Miscellaneous, Pencil Shavings work |
| ६५ | ,, कु. वत्सला पावसे | ' श्रीविष्णु ' ( Frame ) |
| ६६ | ,, इंदिरा देशपांडे | Parrots ( Fery work ) |
| ६७ | ,, सौ. नलिनीबाई बी. पंडीत | मण्याचें तोरण |
| ६८ | ,, ,, कुसुमबाई संजीवराव नाईक | सुताचा रुमाल |
| ६९ | ,, ,, कमलाबाई कानविंदे | ,, |
| ७० | ,, व्ही. पी. राव | Pen painting |
| ७१ | ,, सौ. सुमतीबाई वर्दे | Mother's care |
| ७२ | ,, ,, इंदिराबाई नाडकर्णी | ' १९३३ ' |
| ७३ | ,, श्री. सुंदरराव कल्याणपुर | 'गांधी' |
| ७४ | ,, सौ. लीलाबाई कोर्ष्याकर | ॐ |
| ७५ | श्री. , लक्ष्मीबाई व्ही. मुळगांवकर | 'Who dares' |
| ७६ | ,, प्रभावतीबाई सुकथनकर | |
| ७७ | ,, कु रतन गोपाळ आरस | Tiger |
| ७८ | ,, सौ. सुशीलाबाई डी. कंटक | Embroidery |
| ७९ | ,, ,, यू. मित्राबाई | Head study |
| ८० | ,, लक्ष्मीबाई पालेकर | |
| ८१ | ,, ,, राधा सालेतोर | |

(Commended) प्रशस्त

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गुणाजी | Blouse |
| २ | ,, वसुंधरा रांगणेकर | कशिदा (कपडा) |
| ३ | ,, कु. माणिक झाडदोळकर | टेबल क्लॉथ |
| ४ | ,, ,, सरोजिनी मसुरेकर | गादला ब्लॉउस |
| ५ | ,, लीलावती जी. रेगे | चॉकोलेट |
| ६ | ,, रमाबाई व्ही. दळवी | |

| | | |
|---|---|---|
| ७ | ,, अंबाबाई शामसी | |
| ८ | ,, लक्ष्मीबाई बाणावलकर | "पक्षांचें घरटें" |
| ९ | ,, कमळाबाई एन्. वागळे | Ring Swing |
| १० | ,, सुरेंद्र हरि भांडारे | Fret work Box |
| ११ | ,, लक्ष्मीबाई एन्. पालेकर | Woollen Set |
| १२ | ,, मंजुळाबाई भांडारे | Boy's picture |
| १३ | ,, सुमती व्ही. नाईक | श्रीकृष्ण ( grain work ) |
| १४ | ,, वत्सला रांगणेकर | Artificial confectionery |
| १५ | ,, सुमित्रा जे. मुलकी | Ferry work ( Deer Frame) |
| १६ | ,, ताराबाई रेगे | Temple and Deer |
| १७ | कु. लीलावती महात्मे | Fery Work 'Dog'. |
| १८ | ,, व्ही. आर. गुडे | Engraved Photo Mount |
| १९ | ,, दत्तात्रय एम्. मुझुमदार | 'शिवाजी' |
| २० | ,, हिराबाई एम्. नाडकर्णी | मुरलीधर–विणलेला रुमाल |
| २१ | ,, आनंदीबाई डी. पंडित | Corotebel chair Ball |
| २२ | श्री. इंदिरा के. तेलंग | Grapes and Plums |
| २३ | ,, कु. सीता कांबटकोन | Glass painting |
| २४ | ,, दुर्गाबाई नाईक | ,, |
| २५ | ,, कु. चंपू नेवरेकर | Pen Painting |
| २६ | ,, माणक पाटणकर | |
| २७ | ,, दुर्गाबाई फडर्णास | Sparrows |
| २८ | ,, सुमतीबाई वर्दे | Paper Tea set |
| २९ | ,, सरोजिनी पी. रेगे | Flower Basket |
| ३० | कु. शरयु एस्. सबनीस | Scene |
| ३१ | ,, सरोजिनी एच्. मसुरेकर | झबलें |
| ३२ | ,, ,, | पोलका |
| ३३ | ,, माणिक पाटकर | Stencil |
| ३४ | कु. शारदा त्रिणेकर | Pillow case |
| ३५ | राजीबाई नाईक | Hand Embroidery |
| ३६ | कु. सुशीला आर्. पालेकर | |
| ३७ | ,, इंदुमती सबनीस | सशाचा रुमाल |
| ३८ | ,, मैना पोतनीस | Shadow work |
| ३९ | कु. प्रेमा व्ही. लोटलीकर | Table Cloth |
| ४० | ,, अन्नपूर्णाबाई नेवरेकर | |
| ४१ | ,, लीला खोटे | |

## बालविभाग ( Juvenile )

### बहुप्रशस्त (Highly Commended)

**मिळविणाराचें नांव**

१ कु. सत्यानंद सावर्डेकर
२ ,, नलिनी श्रीधर वद
३ ,, लीला बी. माडगांवकर
४ ,, मंजुळा एस्. महाजन
५ ,, ललिता नेरूरकर
६ ,, रमाकांत सुकथनकर
७ कु. माणिक वागळे
८ ,, यशवंत मंगेश वागळे
९ ,, शांताबाई तलगिरी
१० ,, प्रेमा मंगेश नाडकर्णी
११ ,, जम्ना वसंत लाड
१२ ,, प्रेमा वसंत लोटलीकर
१३ ,, कमलाबाई एस्. माशेलकर
१४ ,, उमाबाई गिरसाप्पा
१५ ,, शारदा आर्. विणेकर
१६ ,, सुशिला रेडकर
१७ ,, प्रेमा मंगेश रेडकर
१८ ,, कृष्णाबाई कामत
१९ जयवंत एस्. पाटकर

### प्रशस्त ( Commended )

**मिळविणाराचें नांव**

१ कु. राजीवबाई नाईक
२ ,, उमाबाई गिरसाप्पा
३ ,, गिरगांव म्यु. मराठी स्कूल
४ ,, काशी गणेश देसाई
५ ,, मालती आचार्य
६ ,, एम्. व्ही. कुळकर्णी
७ ,, माणिक दत्तात्रय सिनारी
८ ,, हरिश्चंद्र कामत
९ ,, वसंत आर्. महात्मे